
www.misalpav.com
मिसळपाव
दिवाळी अंक २०१७
व्यक्तिचित्रे
विशेषांक

**निर्मिती**
मिसळपाव ऑनलाईन प्रकाशन

**कॉपीराईट**
© मिसळपाव.कॉम
www.misalpav.com

**संपादक**
आदूबाळ

**मुखपृष्ठ**
अभ्या..

**सजावट (पिडीएफ)**
इनोबा म्हणे

**संपर्क**
admin@misalpav.com

**जाल आवृत्ती**
http://www.misalpav.com/node/41251

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# अनुक्रमणिका

## मिसळपाव दिवाळी अंक २०१७

### संपादकीय

अभिनिवेशाच्या टोप्या, सत्त्व ते निकें आणि अंकाचं इर्जिक – आदूबाळ (६)

### व्यक्तिचित्रे

जेडी५८ – मकरंद घोडके (८)

दत्तू किटे – गुल्लूदादा (१२)

बबन म्हात्रे – वकील साहेब (१६)

सासुलीचा योगी श्री सावत्या – रुस्तुम (२०)

पड्यारमाम – पैसा (२२)

बाळासाहेब xxx (पाहीजे तर लोखंडे म्हणू!) – जयंत कुलकर्णी (२५)

सिनेमावाला विज्या – मित्रहो (२९)

पाटील गुरुजी – सौन्दर्य (३३)

जीना यहाँ , मरना यहाँ – अभिदेश (३५)

एका माणसाची गोष्ट – किरण गायकर (३९)

पाटील मालक – मोदक (४१)

हेईनरिश हारर: पराक्रमाची आश्चर्यकारक गाथा – मार्गी (४४)

कोलाज – किसन शिंदे (४६)

सतीश पिंपळे: एक ऋषिरंग – नवल (४९)





कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

## लेख

महाबळेश्वर, खेड परिसरातील सह्यभ्रमंती : दाभीळटोक घाट आणि निगडा घाट – स्वच्छंदी मनोज (५३)

लोकसाधना : एका रुजव्याची गाथा – वेल्लाभट (६१)

एक उनाड दिवस... – स्वाती दिनेश (६३)

...उर्फ सुगरणीचा सल्ला : पोळ्या - एक अर्वाचीन छळ – मेघना भुस्कुटे (६६)

ईशान्य भारत : मणिपूर – समर्पक (६८)

दोन वैमानिकांच्या मैत्रीची एक अनोखी कहाणी – श्रीरंग जोशी (८१)

पिट्सबर्ग – अभिजीत अवलिया (८४)

La Ruta del Cares – निशाचर (९०)

मोनालिसाच्या गूढ स्मिताची विलक्षण रहस्यकथा – चित्रगुप्त (९९)

हे टाळता आले असते? वारिग फ्लाईट २५४ – लाल टोपी (१०४)



## कथा

स्मृतिगंध – प्रभाकर पेठकर (१०७)

पांढरा कावळा – जव्हेरगंज (११०)

सोंगाड्या – जागु (११२)

शेवटचा दिस – चॅट्सवूड (११५)

उनाडटप्पू– चॅट्सवूड (१२१)



## कविता

ती – महेश बाळकृष्ण भालेराव (१२६)

शब्द – केतन पटवर्धन (१२७)

पतीची आरती – शीतल डोळस (१२८)

बघतो जिकडे तिकडे दिसती – विदेश (१२९)

पुरंदराचं तेजस्वी पातं!– राघव (१३०)

दीपोत्सवा, आज तरी तुझं इथे स्वागत!– अनन्त यात्री (१३१)

भाऊबीज – बेसनलाडू (१३२)

गाणे – क्रान्ति (१३३)




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

## पाककृती

तीखी पुरी – पद्मावती (१३४)

दौलत की चाट – जुइ (१३६)

बकलावा – सुरन्गी (१३९)

हातोळे – सूड (१४०)

बदाम केशरी कतली – रुपी (१४१)



## इतर

अमोल गवळी यांची व्यंगचित्रं – अमोल गवळी (१४२)

विंचवाचं बिऱ्हाड – श्रीवल्लभ पांचपोर (१४९)


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# संपादकीय



**अभिनिवेशाच्या टोप्या, सत्त्व ते निकें आणि अंकाचं इर्जिक**

मिपाकरहो, नमस्कार!

आपल्या मिपाचा २०१७ दिवाळी अंक घेऊन आज आपल्यासमोर येत आहोत.

सभोवताली माहितीचा आणि संपर्काचा विस्फोट होत असताना मिपासारख्या संस्थळांचं नक्की स्थान काय आहे, असा प्रश्न हल्ली वारंवार मनात येत असतो. मिपावर सकस लेखन तर वाचायला मिळतंच, आणि इच्छा असेल तर मिपाचा उपयोग समाजमाध्यमासारखाही (सोशल नेटवर्कसारखाही) करता येतो. मिपाचं समाजमाध्यम-रूप आणि फेसबुक, ट्विटरसारखी अन्य समाजमाध्यमं पाहिली, तर अलीकडे प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे जनमताचं सातत्याने होत असलेलं ध्रुवीकरण (पोलरायझेशन). प्रत्येकाला एकाच वेळी अनेक अस्मिता असतात, आणि प्रसंगी त्या परस्परविरोधीही असू शकतात. त्यातलीच एक अस्मिता सामान्य, उत्सवप्रेमी माणसाची. याच सामान्य, उत्सवप्रेमी वाचकासाठी मिपाचा हा दिवाळी अंक घेऊन आलो आहोत.

आज पदार्थविज्ञानाला / पुंजभौतिकीला मान्य सिद्धांतांप्रमाणे काळ सलग असतो. पण भावनिक पातळीवर आपल्या आयुष्याच्या प्रवाहाकडे पाहता 'सुखाचे क्षण' आणि 'दु:खाचे क्षण' अशी सरळसोट विभागणी जाणवते. सणवार, उत्सव हे संस्कृतीने दिलेले सुख साजरं करायचे क्षण आहेत. अशा प्रसंगी येत असलेल्या उत्सवी दिवाळी अंकाचा आस्वाद अभिनिवेशाच्या टोप्या आणि भूमिकांची कवचकुंडलं उतरवून घेतला, तर ते योग्य ठरेल.

दिवाळी अंकातून दर वर्षी काहीतरी नवं द्यायचा प्रयत्न केला आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळी अंकात विशेष विभाग आहे - व्यक्तिचित्रांचा. मराठी साहित्यात व्यक्तिचित्रांचं दालन खूप समृद्ध आहे. मिपाकर लेखकांनीही आपल्याला प्रत्यक्ष (किंवा कल्पनेत) भेटलेल्या व्यक्तींबाबत लिहावं, या हेतूने हा विशेष विभाग दिवाळी अंकात समाविष्ट केला आहे. या विभागाला भरभरून प्रतिसाद मिळाला. मुख्य म्हणजे हा प्रतिसाद हा इतर *लेखनाऐवजी* न येता इतर *लेखनाबरोबर* आला आहे. यामुळे अंकाचं स्वरूप हे सर्वसमावेशक झालं आहे. भरल्या ताटात पक्वान्न उठून दिसावं, तसंच बाकी सगळेच पदार्थ निगुतीने शिजवलेले, चविष्ट असावेत असं काहीसं चित्र तुम्हाला दिसेल.

गतवर्षी 'गोष्ट तशी छोटी' या मिपाच्या दृक-श्राव्य उपक्रमानेही पदार्पणातच देदीप्यमान यश मिळवलं. यामुळेच, यंदाच्या दिवाळी अंकात 'गोष्ट तशी छोटी'ची टीम दृक-श्राव्य विभाग घेऊन आली आहे. या विभागाचं वैशिष्ट्य म्हणजे मिपावरच्या काही अक्षर वाङ्मयाचं अभिवाचन यात ऐकायला मिळेल. ('मोकलाया' त्यात नाही. काळ्जी क्रू नये.) या दृक-श्राव्य विभागाला भरघोस प्रतिसाद मिळो आणि हा विभाग मिपाच्या दिवाळी (आणि अन्य) अंकांचा कायमचा भाग होवो, अशी शुभेच्छा इथे व्यक्त करतो.

व्यक्तिचित्रांची आणि अन्य लेखनाची संख्या आणि नवा गडी असलेला दृक-श्राव्य विभाग धरून दिवाळी अंक नेहमीपेक्षा आकाराने मोठा झाला आहे. मिपाचे वाचक कितीही विचक्षण असले, तरी जवळजवळ सत्तरेक धागे अचानक एके दिवशी अंगावर सोडणं योग्य वाटलं नाही. या पद्धतीमुळे चांगल्या लेखनालाही प्रसंगी कमी प्रतिसाद मिळतात, हेही निरीक्षण होतंच. त्यामुळे यंदा मिपाचा दिवाळी अंक दिवाळीच्या पाच दिवसांत टप्प्याटप्प्याने प्रकाशित होईल. संपूर्ण अंक एकदम वाचायची इच्छा असणाऱ्यांसाठी पाच दिवसांनंतर पीडीएफ प्रकाशित करूच.

आमच्या गावाकडे शेतीच्या कामासाठी किंवा गावातल्या एखाद्या लग्नकार्यासाठी 'इर्जिक' घालतात. गावात सगळ्यांकडे सगळं नसतं. नांगर असेल, पण बैल एकच असेल. किंवा खुरपी पुरेशी नसतील. लग्नकार्यात तर वस्तू आणि मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात लागतं. तर गाव एकत्र येतं, आणि लोकसहभागातून कार्य पार पडतं. कार्य संपल्यावर, मांडवपरतणीच्या वेळी, यजमान सगळ्यांना जेवू घालतो. लग्नातल्या पक्वान्नांच्या तुलनेत जेवण साधंसंच असतं, पण यजमानाने आपल्या सहकाऱ्यांप्रती व्यक्त केलेली ही कृतज्ञता असते.

असंच हे दिवाळी अंकाचं इर्जिक घालतो आहे. इतक्या लोकांचे हात या कार्याला लागले आहेत की या अंकावर संपादक म्हणून केवळ माझं नाव लागावं याने चांगलंच कानकोंडं वाटतं आहे. सगळ्यांनी आपुलकीने घेतलेल्या कष्टांची परतफेड आभारप्रदर्शनाचे निव्वळ औपचारिक, कोरडे शब्द लिहून होणार नाही. इर्जिकात असलेल्या स्निग्ध कृतज्ञतेचे भाव माझ्या मनी आहेत.

या सगळ्यांची नावं खाली (अकारविल्हे):

- अभ्या..
- आनंदयात्री
- एस
- किसन शिंदे
- जव्हेरगंज
- डॉ सुहास म्हात्रे
- नीलकांत
- नीलमोहर


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

- पद्मावति
- पिलीयन रायडर
- पैलवान
- पैसा
- प्रचेतस
- प्रशांत
- प्रा.डॉ.दिलीप बिरुटे
- मूनशाईन
- यशोधरा
- वेल्लाभट
- श्रीरंग_जोशी
- सुधांशुनूलकर
- स्नेहांकिता
- स्रुजा

लिहिणारे हात नसते, तर या सुसज्ज टीमचा काहीच उपयोग नव्हता. अंकासाठी आवर्जून लेखन पाठवणाऱ्यांचे, दृक-श्राव्य विभागात योगदान देणाऱ्यांचे आभार.

...आणि वाचकहो, तुम्ही नसतात, तर या खटाटोपालाच काही अर्थ उरला नसता. त्यामुळे तुमचे सर्वात जास्त आभार, आणि आम्हां सर्वांकडून दिवाळीच्या शुभेच्छा!

**संपादक**


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# जेडी ५८

जाड भिंगाचा हा चश्मा चौकोनी चेहऱ्याला अगदीच सूट होतो. घालायला दोन सफारी - एक ग्रे, दुसरी ब्राऊन! केस अगदी बारीक चिंगुळे. उजव्या हाताचा अंगठा आणि मधल्या बोटाची चिमटी हरणासारखी हवेत नाचवायची अदब आणि जोडीला तोंडातल्या तोंडात असंबद्ध वाटावी अशी बडबड.

**मकरंद घोडके**



चार वर्षं झाली आता रिटायर होऊन. VRS! सध्या माझं वय ५८. मज्जानु लाईफ. झपाट्याने दिनक्रम बदलूनच टाकला. रात्रीची वेळ ड्यूटीची - रात्री ९ ते सकाळी ६. हवेत तरंगलेला वेळ - म्हणजे काम असूनही नसल्याचा आनंद जास्त.

Observation, calculation & study.

ही माझी लाडकी सायकल आणि ही आपली दोस्त JD! (काळ्या बॅगेला जास्त कवटाळून) खर्च तो कसला नाहीच.

सकाळी पुन्हा ६ ते २ मस्तपैकी ताणून निद्रादेवीची आराधना, रवंथ, आणि मग रात्री झालेल्या मंथनाचा निचरा. घरी जाणं येणं बरेच दिवस झालं बंदच केलंय. एखाद्या झाडाचा बुंधा, एखाद्या ATMच्या शटरचा आडोसा, हातगाडी, फूटपाथ, बेंच सगळं काही चालतं. रेल्वे स्टेशन लागलंच तर बेस्टच एकदम! स्वत: मी हरवू नये, म्हणून ही पाहा माझी बॅग - नावसुद्धा आहे त्यावर - J.D.

चलोss चलोsss ट्रिंगss ट्रिंगsss चलो JD sss

सौंदर्यस्थळं पाहिली की खूप बरं छान वाटतं - मग ते स्त्री असो वा निसर्ग. आतून अगदी रसरसून मस्त वाटतं. या बेसुमार छान वाटण्याच्या जागा लालभडक रक्तातून पलीकडे गेल्या की बेहिशोबी, बेढब डबकेदार सुस्त लाईफची प्रश्नचिन्हं आतड्यांमध्ये ढवळू लागतात, फेसाळू लागतात. नकोच ती पापड भाजल्यासारखी मध्येच करपलेली उन्हं, भकासवाणी दुपार आणि तेच तेच तासातासाला रंगवून सांगितल्या गेलेल्या टीव्हीवरच्या बातम्या, असाहाय्यतेचा फाटक्या दारुण कहाण्या. हे सुखवस्तू /दळिद्र मुखवटेदार कसं काय जगू शकतात माणसं??

नकोच होतं मला ते! तेव्हाही नाही आणि आता तर नाहीच नाही. नकोय मला ती सक्तीची रिटायरमेंट, नकोय पोटभरून जेवण. मला समाधान हवं, पैसे नको. प्रेम हवं, मला हाव नको. मनापासून कुणीतरी मारलेली हाक हवी...अर्रss रss नकोच असलं काही! साहित्यिक चोर माणसासारखं व्हायला लागलं उगाच! अनुभव नाही, पण अनुभवसंपन्न प्लास्टिक बोलणं उगाच! 'य' ला 'ट' आणि 'म' ला 'ध' जोडा उगाच! -पावसाळी नवकवीसारखं! नकोच ते!!

चलो JD ssss

जाड भिंगाचा चश्मा त्याने हातरुमालाने पुसून नाकावर सरकवला. आता रस्त्याच्या दुतर्फा झाडं दिसू लागली. हिरवीगार रसरशीत छान छान. ५८ची बॅग जरा वेगळीच. दोन इनिशियल्स होत्या त्यावर - J.D. बहुतेक नाव आणि आडनाव. सायकलच्या कॅरेजला ऑक्टोपसने त्याने JD बांधून टाकली. टांग मारली आणि प्याडल हाणत दूरवर गेला.

आपला देश म्हणावा तेवढा विकसित नाही. गरिबी, महागाई, भ्रष्टाचार डोक्याला वरताण झालाय. जीव विटलाय. पेटून उठावं, फाडून-फोडून टाकावं वाटतं सगळं... वगैरे वगैरे डिस्कशन म्हणून ठीक आहे. पण प्याडल मारलं की दम लागतो आणि जिवापल्याड डिस्कशन फोल वाटतं. मग JD उघडली जाते. एक कसलंतरी विचित्र इंजेक्शन बाहेर येतं. ५८ ते मांडीत टोचतो. JD बंद होते. मग हातानेच तो सायकल चालवत निघून जातो.

जमिनीला समतल ते रिकामं इंजेक्शन, ज्यावर स्टिकर चिटकवलंय - 'फूड इंजेक्शन.'

जाड भिंगाचा हा चश्मा चौकोनी चेहऱ्याला अगदीच सूट होतो. घालायला दोन सफारी - एक ग्रे, दुसरी ब्राऊन! केस अगदी बारीक चिंगुळे. उजव्या हाताचा अंगठा आणि मधल्या बोटाची चिमटी हरणासारखी हवेत नाचवायची अदब आणि जोडीला तोंडातल्या तोंडात असंबद्ध वाटावी अशी बडबड.

असा हा ५८चा गडी पाहताक्षणी बावळट वाटतो खरा, पण लक्ष वेधून घेतो आणि काही अंशी जिंकूनही!

कानात कसलेतरी विचित्र आवाज घुमत आहेत. पलीकडे कसलातरी दैवी जल्लोश चालूये आणि इकडे - असंबद्ध बडबड!

देवालयाच्या गाभाऱ्यासमोर पायरीवर JD अगदी शिथिल होऊन एकटक 'त्या' मूर्तीकडे पाहू लागतो.

हे देवा, ईश्वरा, तुला मनःपूर्वक नमस्कार आणि धन्यवाद. Observation calculation and study.

सगळ्या श्रद्धा-अंधश्रद्धा, विश्वास - या नारळाच्या कवटीतून फुटून अगरबत्ती, धूप यांच्या धुरकट वासातून हळूच देवाच्या मनात प्रवेश करत असतील का? की त्याला गोंडस असं कवच देऊन आपल्यासाठी आपण सकारात्मक ऊर्जा म्हणून अलौकिक ऊर्जेत रूपांतरित करू इच्छितो! Yes!! Law of energy transformation!!

पण या सगळ्या प्रेरणा बऱ्याचदा न कळत्या वयात कुणीतरी आजूबाजूने पसरवत बिंबवत लादत जातो. एक विशिष्ट वयातून संक्रमण करत असताना जे वैचारिक खाद्य आपण खातो, त्याचा प्रभाव दीर्घकाळ टिकून राहतो आणि हे संक्रमण न कळत्या वयात सर्वाधिक असतं! परंपरेच्या, संस्काराच्या, पुराणकथांच्या पोकळ्या अशी कितीतरी कोळीदार जळमटं या संक्रमणाने भरून जातात. सगळ्याच संकल्पना विज्ञानवादी तर्कवादी होऊ शकत नाहीत, तशाच त्या दैववादी आस्तिकतेनेही पाहता येत नाहीत!


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

जेवढे श्वास, तेवढे विचार - हरघडीला बदलणारे - जग जिंकणारे वा उद्ध्वस्त करणारे - प्रचंड ताकदवान! जेव्हा कुणीच नसतं आजूबाजूला, तेव्हा विचार हे अगदीच हल्ला चढवतात. शरीरावर कब्जा करतात. त्यांना हवं ते वदवून आणि करवून घेतात.

अगदी साधं गृहीतक - सगळे शोध ज्या कुणी शास्त्रज्ञांनी लावले, ते मुळात प्रचंड एकलकोंडेपणात, अस्वस्थेत, असाहाय्यतेत, अडचणीत!! त्यांच्या ईश्वरीय संकल्पनाही कधीकाळी कामात लुडबुडत आल्या असतीलच की! पण त्याकडे बघायचं कोणत्या दृष्टिकोनातून?? बऱ्याच जणांनी नव्या जमान्याबरोबर जाणं पसंत केलं! आणि इतरांनी अगदी विरोधी भूमिका घेत त्यांच्या काबाडकष्टाचं / यशाचं मूल्यांकन दैवी आभार मानून केलं!

टणsss! घंटा घणाणली. देवालयाच्या कोपऱ्यात भगव्या वेषात ऋषितुल्य व्यक्ती काहीतरी बडबडत होती आणि भक्तगण त्या रसात अगदी चिंब न्हाऊन गेले.

ती केसाळ ऋषितुल्य व्यक्ती अगदी गोड आवाजात, भरल्या पोटाच्या अदबीने शांत नजरेने एकेक शब्द उच्चारीत होती.

Who am I? कोण आहे मी? माझ्या अस्तित्वाचं प्रयोजन? कशासाठी आलोय आपण इथे?

हा वारा का वाहतोय? ही सृष्टी धरा - ऊन-पाऊस-थंडी यांचा खेळ कशासाठी? त्याच्या प्रत्येक उच्चारागणिक त्याची लांबलेली/लोंबलेली दाढी काय झकास हलत होती! मग ठरलेल्या पठडीतली वाक्ये - संसार परमार्थ आणि सुख यांच्या व्याख्या परमेश्वराप्रती लीन होण्याचं महत्त्व! भक्तगण डोलत राहिला कितीतरी वेळ...

Observation calculation study

मोठमोठाली अविश्रांत शहरं, आलिशान जगणं, प्रसिद्धीचा हव्यास, मोठेपणाची हौस, हौसेने जपलेले गैरसमज, दु:ख, जळजळ, भीती, मत्सर, हेवा आणि एक दिवस कुठलीही सांकेतिक पूर्वसूचना डावलून गोठून जाणारी निर्जीव देहयष्टी!

छान चित्र काढावं, बेसूर भेसूर का असेना गाणं गावं - ऐकावं, मनमुराद हसावं स्वतःशीच, वेडंवाकडं हवं तसं नाचावं, कधीतरी स्वतःच्या चश्म्यातून दुनियेकडे पाहून थुंकावं सगळ्यावर. मोडून टाकावीत सगळी बंधनं. व्हावं अगदी भिकार, वागावं अगदी टुकार. जगावं असं बेफाम घर्षणरहित - जडत्व येईपर्यंत. ज ss ड ss त्व ss ये - येईपर्यंत!

Yes! सगळ्या समस्यांची 'जड' आहे 'भूक'! मग ती शरीराची असो, मनाची किंवा नावीन्याची असो, ती तुम्हाला हवं ते बनवते. त्यावर विजय म्हणजे पंचेंद्रियांवर विजय! हाहा ss हाहा ss हा s हा sss

आय गॉट इट JD! आय गॉट इट JD! 'फूड इंजेक्शन'!

JDच्या शेजारी तो दाढीवाला भिकारी बसलेला. दात विचकून का हसतोय हा भिकारडा? भुकेसाठी? तो भीक मागतोय, कारण त्याला जेवायचंय - मग त्याने जेवण मागायला हवं! पण तो पैसे मागतोय. पैशाने भूक मिटते? त्याच्यावर ही वेळ का यावी? हरणाची चिमटी हवेतल्या हवेत फिरते - आपलं सरकार का नाही यावर काही करत? हाहा ss हाहा ss हा s हा sss सगळं सरकारने करायचंय, मग आपण काय करायचंय?? सरकारवर मोर्चे - आंदोलने - निषेध!

Observation calculation study

साला सिस्टिमच सगळी करप्ट.मग करपवणारे एवढे पावरफुल झालेत. कळतंय आपल्याला, पण कुत्र्याच्या शेपटासारखं वागतोय - डुक्कर साले!! "कुछ देना मत - कुछ लेन मत" जनजागृती - करेक्ट वोटिंग फॉर करेक्ट लीडर - तेही मास वोटिंग - बदल - विकास - एवढं सोप्पंय - हाहा ss हाहा ss हा s हा sss

कुछ लोंग बने होते हैं सिस्टीम बनाने कें लिये और कुछ बिगाडनेके लिये और बहोत सारे बस सिस्टीम में उलझे रहतें हैं! हाहा ss हाहा ss हा s हा sss

टण ssss पुन्हा घंटा घणाणली, दैवी जल्लोश पुन्हा जोरजोरात सुरू होतो आणि एकटाच सामसूम हरवून गेलेला JD त्या जल्लोशात मुरत जातो. एकवार आकाशाकडे, एकवार गर्दीकडे आणि वारंवार स्वतःकडे पाहतो, देवालयाच्या आवारातून हळूहळू बाहेर पडू लागतो. दैवी जल्लोश दुपटीने वाढलेला असतो. हे एकसुरी कपडे घातलेले आणि झेंडे नाचवणारे लोक फक्त मनाची भूक मिटवत, गुंगवून टाकतायेत सगळ्या दिशा. चौबाजूला हा गुलाल, धुरकट वातावरण, घंटानाद आणि कसलीतरी शरीर तापवणारी विचित्र ऊर्जा - भूक मिटवणारी ऊर्जा. तहान-भूक विसरून त्याच अवस्थेत झिंगायला लावणारी ऊर्जाकेंद्रं. एस एनर्जी पॉईंट्स!! यू आर जीनियस. ती ऊर्जाकेंद्रं मला शोधायलाच हवीत.

९मध्ये कुठलाही अंक मिळवला की तोच अंक परत मिळतो. मग ९'मध्ये' आहे तरी काय? कॉन्स्टंट? कॅटॅलिस्ट? की..? कसलं शास्त्र - संख्याशास्त्र! ऊर्जा रूपांतरित होते, मग आत्माही ऊर्जाच... तीही ट्रान्सफॉर्म होतच असणार? ऊर्जा साठवली तर नंतर ती वापरता येते - मग जेवढे श्वास तेवढं जगणं, मग श्वास लांबवून घेतले, तर जगणं लांबवता येईल कासवांसारखं? आजूबाजूला ढोल-ताशांनी फेर धरला आणि तो चक्राकार लोंढा गुंगून गेला दैवी निनादात!

धंडाडा धंडाडा ss धन धन ss धंडाडा धंडाडा धन धन ssssss

Yes, JD, you are something special!! सायकल एका गजबजलेल्या बसस्टॉपवर मागे लावून JD तिथल्या बाकड्यावर येऊन बसला. एक मुलगी कानात हेडफोनवर मस्त गाणी ऐकतेय. तिला खरंच गाणी आवडतात की आजूबाजूचा पसारा तिला ऐकावासा वाटत नाहीये, किंवा त्या गाण्याचा अंमल - धुंदीच मुळात अशी आहे की ज्याने आजूबाजूचं वातावरण खास आपल्यासाठी आहे असा भास तयार होतो! Yes, भास!

अंमल - धुंदीचं असंही एक इंजेक्शन बनवता येईल, बरं का JD - तुम्हाला जाणीव देणारं - Yes, you are something very special!! म्हणजे जगाला प्रेमात पडायला लावणारं इंजेक्शन!! JD, यू आर जीनियस! ५८, JD (बॅग) उघडतो आणि एका पानावर सगळं नोट डाऊन करून घेतो. सायकल घेतो आणि तिथून सरकतो.

रात्रीचे अकरा वाजून गेलेत. तरीसुद्धा या गाववस्तीवर माणसांची एवढी तोबा गर्दी! कुणाच्या लग्नाची पूजा तर नव्हे? मग काहीच संबंध नसलेली नवीकोरी बिनअर्थाची फेमस गाणी वाजत का नाहीयेत? माणसांचे, उगाच लुडबुड करणाऱ्या लहान पोरट्यांचे आवाज का नाहीत? ओहो ss हो ss हा तर अनुपम, अलौकिक माणूस गेल्यानंतरचा गम्मत सोहळा!! व्वा, छान, छान. नि:शब्द घोळक्यामध्ये ती बाई उद्ध्वस्त होऊन बसली होती. आता ती रडत नव्हती. नुसताच घशाचा आतल्या आत घरघर आवाज येत होता. तिच्या चिल्ल्यापिल्ल्यांना काहीच माहीत नव्हतं. भुकेने ते ताटकळून सुकून गेले होते. अत्यंत विचित्र आणि गंभीर मैतीचा माहोल. दिवट्या हातात घेऊन वस्तीवर माणसं एकदम गपगार. मध्येच एखादा हुंदका काळीज फाडत चिरत जायचा. या मेलेल्या माणसाचं आकस्मिक जाणं कुणालाच आवडलं नाही. काळजीत पडलेली बायको, सोन्यासारखी दोन मुलं. म्हातारे, जीर्ण आई-बाप. त्याने असं जायला नको होतं अशी कुजबुजत चर्चा. तरीपण माणसाची सवय काय जात नाही. बसतो आवळत पैसापाणी - दागदागिने. देवाज्ञा झाली की सगळं आहे तसं, आहे तिथं टाकून जावं लागतंय...

Observation calculation study


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

काय असेल बरं देवाज्ञा? काय असेल त्याच्या मनात? त्याला मन आहे? तो आहे, म्हणजे तो लक्ष ठेवतो प्रत्येकाकडे? काय योजना असेल ही! माणूस बनवण्याच्या फॅक्टरीमध्ये एक प्रॉडक्ट एक दिवस एक्स्पायर होतं. दुसऱ्या एखाद्या जगात या माणसाची आवश्यकता तर नसेल? असलं काही खरंच असेल का? पण सांगणार कोण आणि कसं? शरीर एक दिवस इथेच सोडून जावं लागतं म्हणजे? कुठे जाते त्यातली चेतना ऊर्जा? कोण सांगणार?

शरीराचं काम व्यवस्थित चालविण्याकरिता त्यात वेगवेगळे व्हिटॅमिन्स, मिनरल्स, कार्बोहायड्रेट्स, ऑक्सिजन, प्रोटीन, फॅट्स भरले तर ते चालत राहतं. न्यूटन म्हणतो - जोवर घर्षण होतं नाही तोवर चकती फिरत राहते - जडत्व येईपर्यंत! वर्षानुवर्षं घासल्याने इंजिन दमत जातं. मग घर्षण होणार नाही, बाहेरील बल (फोर्स) अटॅक करणार नाही - असं काही आहे का? हं, JD त्या मेलेल्या माणसासमोर जाऊन बसला.

त्या निर्जीव देहाची हळूच हळुवार पाहणी केली. अंगावर गुलाबाच्या पाकळ्या, नाकात कापूस, तोंडात तुळशीचं पान. कसलीच हालचाल नसल्याने बघवत नव्हता तो देह! ५८, JDला जास्तच कवटाळून बसला. पाण्याच्या बुडबुड्यांचे आवाज कानात गुदगुदू लागले. पुन्हा क्षीण होतं गेलेला ढोलाचा, घंटानादाचा आवाज... टणटण धडाड धडाड.... टणटण धडाड धडाड.... ५८ आणि ती 'उद्ध्वस्त बाई', दोघेच त्या देहाभोवती. बाकी सगळे हाताच्या घड्या बांधून दूरवर. कोण अंत्ययात्रेचं सामान आवरतंय, कोण मोबाईलवर दबक्या आवाजात निरोप देतंय...वेळ अचानक थांबली. टिकटिक वाजायचं बंद झालं...

कधीकधी एका प्रसंगातून दुसऱ्या प्रसंगात नुसतं वरवर वावरत असायचो मी! खरंच आपली आवश्यकता आहे का या प्रसंगाला? की नुसत्याच न हलणाऱ्या नेपथ्यासारखं फक्त इतरांच्या आयुष्याचे आपण बॅकग्राऊंड आहोत?

त्या निर्जीव देहाकडे पाहता पाहता सटासट कितीतरी फ्लॅशचे फटकारे बुबुळासमोर पुढे सरकले. माझ्या पंचेंद्रियांना हलवून हादरवून टाकलं त्यांनी. सगळं जगचं खिजवणारं वाटून गेलं. का जगत होतो शेळपटासारखा? सरळ VRS घेऊन टाकली. दोन वर्षं घरी बसून होतो. ’गरज' आणि 'चैन' याचं झणझणीत अंजन डोळ्यात पडलं. जेवढं गरजेचं होतं, ते फक्त JD भर होतं, बाकी मुलाबाळांना देऊन टाकलं. वेळ अजूनही थांबलेलीच. ‘बायको’! - हा अत्यंत संवेदनशील प्रकार माझ्या आयुष्यात होऊन गेला. त्याने मला आधार दिला. व्यावहारिक बळ दिलं, अशी कशी काय निसटून गेली ती रेतीसारखी! खूप रडलो, बिथरलो, घाबरलो, वैतागलो. पुन्हा पाहतो तर काय - एक उंच लाट अंगावरून निघून गेली होती. हाच का तो शांत समुद्र काही क्षणासाठी रुद्रावतार झालेला! बायको, लव्ह यू सो मच - नो कमेंट्स! सॉरी, आय नो, तू आहेसच इथे.

वेळ अचानक सुरू झाली!

टिक टिक टिक टिक sss हरणासारखी चिमटी पुन्हा आकाशभर फिरली. JD, यू कॅन डू इट!

शेवटी प्रेत जाळायची तयारी पूर्ण झाली. आजूबाजूच्या बायकांनी त्या बाईच्या दंडाला धरून बळेच उठवलं. ती बेशुद्धच होती जवळपास!!५८ने हळूच JD उघडली. एक इंजेक्शन बाहेर काढलं, कुणालाही कळू न देता प्रेताला टोचलं. तो निर्जीव देह - ताटीवर उठून बसला!!!

JD बंद करून ५८ कधीचाच सटकलेला. माणसं सैरावैरा धावू लागली. चर्चांना विषय मिळाले. गम्मत सोहळा फारच भयानक प्रकारे उरकला!

अपरात्रीची सुसह्य गारव्याची २ची वेळ. कुत्री भुंकून भुंकून कंटाळलेली - रस्त्याच्या बरोबर मध्ये पसरलेली. ५८ ने JD उघडली. सुंदर छोटासा आरसा काढून ५८ त्याकडे पाहू लागला - स्वतःला! आपण असे कसे दिसतो? रोज आपण वाढत राहतो, मग आरशाकडे रोज बघूनसुद्धा स्वतःला बदलताना आपण नोटीस का नाही केलं? शरीर तर बाह्यावरण, मन-विचारसुद्धा वाढत्या वयात वाढले, बदलले. पण ते ध्यानात का नाही आलं? आपण एकमेव होतो स्वतःजवळ अगदी सुरुवातीपासून! जुन्या जवळच्या वस्तूंची दखल - किंमत समजत नसावी कदाचित! स्वतःबद्दल फार प्रेम ठेवू नये JD .मी बिघडेन अशाने .डार्विन म्हणतो - survival of fittest! जो सर्वात जास्त ताकदवान, तोच टिकतो. Not fit not good, very bad. हरणासारखी चिमटी हवेतल्या हवेत फिरली. फिटेस्ट राहायला पाहिजे आपण!

JDच्या तळाशी एक छोटीशी वस्तू दडवून ठेवलीये. त्यातून एक धून निघते. गुणगुणावीशी वाटते, धून परिचयाची नाही, पण हृदयाच्या कप्प्यामध्ये हलवून टाकते एकदम. Yes, विचार करण्याची अवस्थाच बदलवून टाकणारी धून! ज्यातून ही धून निघते अशी अनामिक शिट्टी लपवून ठेवलीये त्या तिथे JD च्या तळाशी!

मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करणारी यंत्रणा

तुमचे विचार एक कपात किंवा बशीत काढून ठेवा. अगदी चिकटून बसलेले 'नको त्या प्रकारचे 'विचार आणि काही 'तऱ्हेवाईक' पण आवडणारे विचार एकदम मिक्स करून इतर पब्लिकच्या मिक्सरमध्ये घुसळवा. आता हे एकजिनसी मिश्रण मस्तपैकी स्वडोक्यात टाका आणि एन्जॉय करा - एक जबराट पाककृती! नो नो JD, यू आर फूल ss! that इज नॉट करेक्ट वन!

वडाच्या झाडाच्या पारंब्या जमिनीत घुसून पुन्हा तिथे वडाचं झाड तयार होतं. काय निवांत सॉलिड झोप लागते तिथल्या मुळ्यांपाशी - विचारहीन झोप! आठवत नाही किती वेळ पडलो होतो तिथे.

Calculation observation study...

निसर्गनियमच तो! चक्राकार. बापरे sss सर्कलला जेवढे - तेवढेच नियम निसर्गाला लागू होणार मग!

मग कुठेतरी pi (π) हा पाय टाकून बसला असणार .कॉन्स्टंटली आणि अचूक एकदम ३.१४१६! येस, एका सेंटर पॉईंटवर थांबून एक चक्राकार गोल आखला, तर त्याची त्रिज्या म्हणजे जीवन जगण्याची सेल्फी स्टिक - जी वर्तुळाकार व्यास बनून डायरेक्ट आपल्याभोवती गुंफ़लीये. व्वा! जीवनसुद्धा वर्तुळाकार - हरणासारखी चिमटी अवकाशभर फिरली नाही!! जिथून आपण स्टार्ट केलं, तिथेच परत मरायला कुणी येत नाही - की मग पुनर्जन्म होतो मग - कॉन्स्टंटली!

जुन्या छपरांच्या पत्र्यांच्या घरात 'आठवण' म्हणून लटकवलेल्या फोटोंमध्ये 'जन्म-मृत्यू' यांची नोंद आहे, पण अंतरे सामान नाहीत. त्यांच्या शरीरगाड्या कमी-जास्त धावल्या आहेत. ओह्ह, I am not sure JD, पण सायंटिस्ट हा फॉर्म्युला शोधू शकले नाहीत - 'अमरत्व' शरीरावर नियंत्रण. Yes, I can do it JD. सूत्र साधं आहे - सायन्स प्लस मॅजिक! जिथे सायन्स संपलं, तिथे अद्वैत्वाचा खेळ - तो मॅजिकच! चलो JD ...सायकलला टांग - ट्रिंग ट्रिंग, ट्रिंग ट्रिंग sss

No calculation No Observation No Study

JD हा सरळ सरळ वाचता न येणारा कागदाचा पसारा. सगळं काही लिहून ठेवलंय तुझ्या उदरात. पुरातत्त्वशास्त्राच्या एखाद्या विद्यार्थ्याला कधीकाळी सापडलाच, तर एखादी PhD सहज होऊन जाईल त्याची. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला अतर्क्य वाटणारं संक्रमण सोपवतोय, सामावून घे सगळं त्यात. समुद्रकिनारी पाऊस कोसळतोय - सोसाट्याचा वारा - आभाळातून पाणी आणि खालीसुद्धा पाण्याने भरलेली जमीन - हे लपलेल्या सूर्यदेवा - तुझी तुलाच परत करतोय JD - सामावून घे.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

आता रेतीत फक्त सायकल रुतून बसलीये. एक कोवळ्या वयाच्या पोराने ती कशीबशी ओढून वर काढली आणि चक्कर मारायला घेऊन गेला. बालचमूच्या टीमने समुद्रावर काही कागदी भिंगऱ्या बनवल्या, त्यातलीच एक सायकलच्या हॅण्डलला लावली. ती चक्राकार फिरू लागली वाऱ्याच्या जोराने! मुलांनी मनसोक्त आनंद घेतला त्या ऑक्टोपसवाल्या सायकलचा. कितीतरी वेळ समुद्राच्या लाटा खाली-वर होतं राहिल्या...

एक पेटीवजा काळा ठिपका लाटेवर स्वार होऊन निघून गेला - Bye Bye JD.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# दत्तू किटे

"पण काही म्हातारे लोकसुद्धा किती जवान दिसतात, नाही?" यावर दर्शन होईस्तोवर परत कधी म्हातारीने मागे वळून पाहिलं नाही. असेच दत्ताभाऊंचे टोमणे झेलत झेलत मुख्य गाभाऱ्यापाशी दर्शन घेत असता दत्ताचा आवाज आला, "प्रसाद". मागे वळून बघतो तर दत्ता चक्क पुजारीबाबांसमोर हात पसरत उभा होता. पुजारीने वाटीतली साखर देत असतानाच ,"साखर नको हो, नेहमीचा प्रसाद द्या ना, पेढा." विचित्र हसत अजून दत्ता त्याच अवस्थेत होता. त्या बिचाऱ्या भटाने आपल्या अखत्यारीतला पेढा काढून शिरजोर भटाच्या हातावर टेकवला. सुवर्णपदक मिळाल्याच्या विजयी मुद्रेने आम्ही बाहेर पडलो. असा हा दत्त्या कधी काय म्हणेल, काय करेल याचा नेम नसायचा.

**गुल्लू दादा**



२३ जुलै २०१७, वार रविवार. रविवारी रात्री आमच्या मेस (खानावळ) बंद असायच्या. नाइलाजाने (नाइलाजाने कसलं हो! आम्ही तर चातकासारखी वाट बघायचो रविवारची) आम्ही बाहेर जेवायला जायचो. खिसे भरलेले असले की सतत बाहेर जेवायला जाता येतं. पण घरचे बरोबर दुखती नस पकडत, महिन्यात येणाऱ्या ४ रविवारी बाहेर जेवता येईल इतकाच चंदा पाठवला जायचा. अध्येमध्ये बाहेर जेवायला गेलं की मित्रांकडे उधारी व्हायची. कधीना कधी द्याव्या लागणाऱ्या उधारीमुळे पुढील सगळेच दिवस तंगीत जायचे. त्यापेक्षा फक्त रविवारीच जिभेचे चोचले पुरवले जायचे. तशा आमच्या मेस ह्या अव्वल दर्जाच्या सहकारी (co-operative) मेस होत्या. आम्ही, आमच्यासाठी, आमच्या पोटाच्या कल्याणासाठी चालवलेली खानावळ म्हणजे ह्या सहकारी मेस ('लोकशाही'च्या व्याख्येच्या सुरात वाचावे. याविषयी नंतर कधीतरी). तर आठवाड्यातले ६ दिवस अगदी घरच्यासारखं जेवल्यानंतर रविवारी जीव चटपटीत खायला अगदी असुसला जायचा. पावलं आपोआप ढाब्याकडे वळायची. औरंगाबाद शहरापासून १४-१५ कि.मी. अंतरावर दौलताबाद रोडवर डोंगरे मामांच्या 'साईकृपा' ढाब्यावर आमची मैफल रंगायची. नेहमीचे सदस्य म्हणजे गोपी, किसना, जब्या, पक्या, पिऱ्या आणि गुल्लू दादा (म्हणजे मी). त्या दिवशी रविवार असल्यामुळे या दिनचर्येला अपवाद नव्हताच.

महिला क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना मस्त रंगला असतानाच आमच्याही मैफलीला झिंग चढली होती. स्टार्टर म्हणून नागेली पापडाबरोबर मसाला (हा मसाला म्हणजे कांदा, टोमॅटो बारीक चिरून त्यावर लिंबाचा हलकासा छिडकारा. चवीला मीठ, चटपट मसाला आणि तिखट). बिना मसाल्याचा नागेली पापड म्हणजे झिरो आहे राव, झिरो. आख्ख्या संभाजीनगरात चरून झालंय, पण साईकृपाच्या नागेली पापडाची सर कुणालाच येत नाही. फक्त नागेलीसाठी औरंगाबाद १४-१५ कि.मी. बऱ्याचदा मागे टाकलंय आम्ही. चखणा म्हणून चिकन मसाला (हा कोण चिकन बनवण्याचा मसाला नाही बरं.. ही एक डिश आहे भारी) म्हणजे एकदम आहाहाहा....!

या सगळ्यांचा आस्वाद घेत हॉटस्टारवर आम्ही सामना बघत होतो. हरमनप्रीत खेळत असल्यामुळे भारताने एव्हाना जश्नाची तयारी सुरू केली होती. पक्याने सगळ्यांना मोबाईल बंद करण्यास सांगितले. फक्त सामना ज्या मोबाईलवर बघत आहोत तो सुरू ठेवू या, असं सुचवलं. आम्हाला कळत नव्हतं हा असं का म्हणतोय ते. जब्यानेही त्याला पुष्टी जोडताच आम्ही जास्त खोलात न जाता मोबाईल बंद करून सामना बघण्यात गुंग झालो. थोड्या वेळाने गोप्याला एक कॉल आला, (त्याच्याकडे दोन मोबाईल होते. त्याने एकच बंद केला होता) म्हणून तो थोडा बाहेर जाऊन बोलू लागला. अर्धा-एक तास बोलल्यावर तो परत येताच त्याला सगळ्या माहोलचा इचका झालेला दिसला. भारतीय महिला फलंदाज निराश होऊन मैदान सोडत होत्या. शेवटच्या पाच फलंदाजांना दोन अंकी धावाही जमवता आल्या नव्हत्या. हे इतकं अनपेक्षित होतं, जणू कुणाची नजर लागावी. इंग्रज महिला 'दुगना लगान' वसूल झाल्याच्या खुशीत नाचत होत्या. पुरणपोळीचा घास त्यांनी 'ते बघ विमान आलं' म्हणून पळवून नेला होता. इकडे आमची झिंग उतरून डोळे घुबडासारखे एकमेकांकडे बघत होते. एव्हाना गोप्याला त्याची चूक कळली होती. रडक्या सुरात तो म्हणाला, "कॉल दत्त्याचा होता." सगळ्यांनी डोक्यावर हात मारला. या महान हस्तीचा संपर्क होऊ नये म्हणूनच पक्याने सगळ्यांना फोन बंद करण्यास सांगितलं होतं. हा दत्त्या म्हणजे पराकोटीचा अपशकुनी माणूस. अर्थात सगळे योगायोगच म्हणा. पण या घटनेपासून त्याच्या अपशकुनीपणाच्या सगळ्या घटना डोळ्यासमोर स्लाईड शो करत निघून गेल्या आणि त्याच्या अपशकुनीपणावर नकळत विश्वास बसला.

तशी ह्या अपशकुनी विनोदी पात्राची पहिली गाठ कधी पडली हे जरी स्पष्ट आठवत नसलं, तरी पहिला किस्सा स्मरणात आहे. वसतिगृहात रॅगिंगची भीती असल्यामुळे प्रथम वर्षात बाहेर खोली घेऊन राहायचा शिरस्ता होता. खोलीसमोरला रस्ता ओलांडला की एक भलं मोठं अपार्टमेंट लागायचं. त्यात माझे काही वर्गमित्र राहायचे. पण अगदी सुरुवातीला कोणीच कोणाला ओळखत नव्हतं. नाही म्हटलं तरी गोप्या, किसना, जब्या यांची ओळख झाली होती आणि पक्या तर माझा खोली मित्रच होता. तर सर्वमताने पहिल्या श्रावण सोमवारी मंदिरात जाण्याचं ठरलं. मी मंदिराकडेच काम असल्यामुळे परस्पर बाकीच्यांना सामील होणार होतो. तर श्रावणातल्या पहिल्या सोमवारी खडकेश्वर येथील शिवमंदिरात आम्ही दर्शनासाठी रांगेत लागलो. पहिलाच श्रावण सोमवार असल्याकारणाने आमच्या सारखे हवशे-नवशे सगळेच रांगेत असल्यामुळे तुफान गर्दी होती.

"बाबो, इतकी गर्दी... महादेवाला ओव्हर टाईम करावा लागतो वाटते आज." मागून एक अपरिचित आवाज आला. हळूहळू रांग पुढे सरकत होती. स्पीकरवरून भक्तांसाठी सतत सूचना येत होत्या - रांगेत लागा, घाई करू नका, चांगल्या कामाला उशीरच लागतो, प्रशासनाला सहकार्य करा. याबरोबरच चपला कुठे काढाव्या, लहान मुलांना सांभाळा. पाकिटमार, खिसेकापूंपासून सावधान. सोनं, मोबाईल अशा किंमती वस्तू सांभाळा इ.इ.

"जे लोक फक्त श्रावण सोमवारसारख्या दिवशीच दर्शनाला येतात, त्यांच्या मनोकामना कधीच पूर्ण होत नाहीत." परत तोच आवाज. आवाज तर ओळखीचा वाटत नव्हता, म्हणून मागे वळून पाहिलं. सावळासा रंग, केस याने नीट लावले नव्हते की न्हाव्याने व्यवस्थित कापले नव्हते काय कळतं नव्हतं, पण त्यांची अवस्था गारपीटग्रस्त वा अतिवृष्टी झालेल्या पिकांसारखी होती. काही उभे, काही वाकडे अन काही एकदमच भुईसपाट. डाव्या हनुवटीवर ठळक उठून दिसणारा काळाकुट्ट मस. अंगात राखाडी रंगाचा शर्ट आणि पांढरी पँट (श्रावणात पांढरी पँट घालायला हिम्मत लागते भाऊ). पायात एकदम निकृष्ट दर्जाची स्लीपर (पावसाळ्यात पांढऱ्या पँटवर स्लीपर घालण्यासाठी पार्श्वभागात


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

दम असावा लागतो भावड्या). तर या स्लीपरमुळे पायाचा अंगठा आणि पहिलं बोट यामध्ये आपण पिठाची पातळ लापशी करतो ना, अगदी तसंच द्रव खिदळत होतं. त्याच्या पँटची मागून काय हालत झाली असेल याची कल्पना मला आली. किसना मागून टपली मारून म्हणाला, "तुला काय करायचं बे लोकांच्या मनोकामनेशी? तू तुझं बघ ना."

प्रत्युत्तरात अनोळखी आवाज म्हणाला, "अरे, ही काळ्या जबानीच्या भटाची वाणी आहे, तू बघ नाही तर कोणाचीच मनोकामना पूर्ण होणार नाही." आजही या वाणीत दम असल्याचं जाणवतं. खरं सांगतो, आमच्या मनोकामना आटोकाट प्रयत्न करूनही आजवर पूर्ण झालेल्या नाहीत आणि पूर्ण होण्याची कुठलीही शक्यता अजूनतरी नजरेस पडत नाही.. :( असो. त्याला इतक्या वेळ माझ्याकडून अपेक्षित प्रतिसाद न आल्यामुळे, मी त्याला ओळखत नाही हे त्याने लगेचच ताडून म्हटलं, "तू असा अनोळख्यासारखा का वागतोस? मी तुझ्याच वर्गातला आहे, 'दत्तात्रय किटेकर'." हस्तांदोलनाचं आमंत्रण देत तो म्हणाला. म्हणजे अरेच्चा, ही मागची बडबडी व्यक्तीसुद्धा आमच्याच बरोबर होती. मी लगेचच त्याला 'दत्त्या' म्हणून आमच्यातील (खरं म्हणजे माझ्यातील) अवघडलेपणा दूर केला.

माझ्यापुढे दोन-तीन म्हातारे लोक होते. त्यांना उद्देशून दत्त्या म्हणाला, "या म्हाताऱ्यांची काय मनोकामना राहिली बापा आता? पिकलं पान गळायचा तेवढा अवधी." यावर समोरील म्हातारीने मागे बघून दत्त्यावर एक जळजळीत कटाक्ष टाकला.

"पण काही म्हातारे लोकसुद्धा किती जवान दिसतात, नाही?" यावर दर्शन होईस्तोवर परत कधी म्हातारीने मागे वळून पाहिलं नाही. असेच दत्ताभाऊंचे टोमणे झेलत झेलत मुख्य गाभाऱ्यापाशी दर्शन घेत असता दत्ताचा आवाज आला, "प्रसाद". मागे वळून बघतो तर दत्ता चक्क पुजारीबाबांसमोर हात पसरत उभा होता. पुजारीने वाटीतली साखर देत असतानाच ,"साखर नको हो, नेहमीचा प्रसाद द्या ना, पेढा." विचित्र हसत अजून दत्ता त्याच अवस्थेत होता. त्या बिचाऱ्या भटाने आपल्या अखत्यारीतला पेढा काढून शिरजोर भटाच्या हातावर टेकवला. सुवर्णपदक मिळाल्याच्या विजयी मुद्रेने आम्ही बाहेर पडलो. असा हा दत्त्या कधी काय म्हणेल, काय करेल याचा नेम नसायचा.

एके दिवशी सकाळी ९च्या दरम्यान एक सद्गृहस्थ वसतिगृहात आले. "पुरुषोत्तम आंबिवडेकर कुठे राहतो?"

किसन्या माझ्याकडे बघून नकारार्थी मान हलवत त्यांना म्हणाला, "या नावाचं कुणीच राहत नाही या वसतिगृहात."

"शासकीय मुलांचे वसतिगृह ना हे?"

किसन्या खिदळत म्हणाला, "शासकीय मुलांचे नाही हो, मुलांचे शासकीय वसतिगृह आहे."

मी त्याला ढोपराने शांत करत म्हटलं, "पण काका, इथे पुरुषोत्तम आंबिवडेकर नावाचा कुणीच राहत नाही."

तेवढ्यात गोप्या आला. "काका, तुम्ही? या ना दत्तात्रयची खोली हवीय ना?"

गोप्या आणि दत्त्या बारावीला बरोबर शिकल्यामुळे यांचा परिचय होता. आम्ही मात्र दत्त्याच्या दुसऱ्या नावातच (पुरुषोत्तम आंबिवडेकर) गुरफटून गेलो होतो. एखाद्याची दोन नावं असू शकतात, पण इथे तर आडनावातही झोल होता. या हस्तीचं घरचं नाव-आडनाव हजेरीपटावरल्या नावापेक्षा वेगळं होतं. कुणाचे पालक वसतिगृहात आले की, आम्ही त्यांना त्यांच्या पाल्याच्या खोलीवर तडक नेत नसू. पहिले किसन्याच्या खोलीवर नेत असू. किसन्याची खोली नेहमी स्वच्छ असे आणि पाल्याला सिगारेटची थोटकं, अॅश ट्रे (हा पाण्याची बाटली कापून तयार केलेला असे), माचिस, बियरच्या बाटल्या यांची विल्हेवाट लावायला थोडा अवधी मिळावा, हे यामागचं प्रयोजन.

किसन्याच्या बेडवर बसून बिपाशाचं मादक चित्र न्याहाळताना काका म्हणाले, "ही पुरुषोत्तमची खोली नाही वाटतं."(आमच्या भुवया उंचावल्या. मनात म्हटलं, इथे तरी बिपाशाच्या अंगावर कपडे आहेत. मला दत्त्याच्या खोलीतलं मल्लिकाचं अतिमादक चित्र आठवलं.)

गोप्या म्हणाला, "हा त्याची खोली दुसरी आहे काका, तो आंघोळीला गेलाय. खोलीला कुलूप होतं. जाऊच आपण त्याची आंघोळ झाली की त्या खोलीवर."

"अरेरे, ९ वाजता आंघोळ! (जणू काही दत्त्याने धर्म भ्रष्ट केलाय, असा भाव काकांच्या चेहऱ्यावर होता.) घरी होता, तेव्हा ६ वाजता पूजा करायचा. वसतिगृहात मुलं बिघडतात हेच खरं." अत्यंत त्रासिक चेहरा करून गळ्यातील रुद्राक्षाची माळ कपाळाला टेकवत काका म्हणाले. मी तेथे बिना दात घासायचा उभा आहे हे जर काकांना कळलं असतं, तर त्यांनी मला नक्कीच गोमूत्राने गुळणा भरायला लावला असता. दत्त्याचे खरे कारनामे समजले असते, तर काकाला आत्ताच I.C.U.मध्ये दाखल करावं लागलं असतं.

तेवढ्यात दत्ता तेथे हजर झाला. जवळ जाऊनही हा दत्त्या आहे म्हणून ओळखू येत नव्हता. आज्ञाधारक मुलाप्रमाणे चपटा भांग, जीन्स-टी शर्ट, पायात adidasचा बूट (रोज संडासची चप्पल घालून फिरणाऱ्या दत्त्याकडे हे बूट आहेत, हे पाहून आम्ही सगळ्यांनी एकमेकांकडे आश्चर्याने पाहिलं.) आदिदासच्या बुटांवर तीन तिरप्या रेषा असतात, पण इथे चार होत्या. जवळ जाऊन पाहतो तर ते abidasचे बूट होते. (मनात म्हटलं - च्यायला, या माणसाचं सगळंच नकली असतं.) पावडर फासून सावळ्याचा सेमी-गोरा होण्याचा प्रयत्न झालेला दिसत होता.

दत्त्याच्या वडिलांच्या चेहऱ्यावर, 'ये है मेरा शेर बाकी तुम सब भेडियां' हा भाव होता. थोड्या वेळ किसन्याच्या रूमवर बसून मग आमची वरात दत्त्याच्या खोलीकडे निघाली. खोलीमध्ये चहूकडे चंदन अगरबत्तीचा सुगंध दरवळला होता. (दत्त्याने पहिल्यांदा माचिसचा सदुपयोग केला असेल.) बाकी खोली होती तशीच होती. फक्त सिगारेटची थोटकं, अॅश ट्रे, बियर बाटली कुठे दिसत नव्हती. बेडवरची चादर तीच होती, फक्त पलटी मारून अंथरलेली होती. (एकाच चादरीचा एवढा सुरेख आणि पुरेपूर वापर फक्त दत्त्याच करू शकतो). फॉरेन्सिक मेडिसिनचं पुस्तक उघडून टेबलावर ठेवलं होतं. मल्लिकाची जागा श्री गणेशजींनी घेतली होती. (दत्त्या नेहमी खिळ्यालाच चित्र का टांगत असे, ते आत्ता समजलं होतं. बदलायला सोपं जातं म्हणून. त्याला बापाच्या धाडसत्राची पूर्वकल्पना असावी.) आता दत्त्याच्या खोलीपुढे किसन्याची खोली म्हणजे रविवारचा बाजार वाटत होता. अशा प्रकारे अचानक धाड टाकलेल्या बापाला त्यांच्याच 'सव्वाशेराने' खुबीने कटवलं होतं. दत्त्याची खोली परत जैसे थे व्हायला अवघे २४ तास भरपूर होते.

पुढच्या टाकलेल्या धाडीतही दत्त्या थोडक्यात वाचला होता. दत्त्या पहिल्या वर्षी नापास झाल्यानंतर काकांनी गोप्याला त्याला घेऊन अभ्यास कर अशी विनंती केली होती. गोप्यानेही ती उशिरा का होईना, स्वीकारत शेवटच्या वर्षी त्याच्याबरोबर अभ्यास केला. दत्त्या तर काही पास झाला नाही, गोप्याचा मात्र एक विषय गेला. मोसाद एजंटप्रमाणे अचानक टाकलेल्या पुढच्या वर्षाच्या धाडीत मात्र दत्त्या गारद झाला. बापाला खोली माहीत झाल्यामुळे कुठलीही संधी न देता धाड पडली. सिगारेट, बियर बाटल्यांसहित दत्त्या अगदी रेड हँड पकडला गेला. बाप त्याला १०-१५ दिवस घरी घेऊन गेला. मस्त 'झंडू बाम ट्रीटमेंट' दिली असणार. याआधीही त्याने पहिल्या वर्षी नापास झाल्यावर १०-१५ दिवसांच्या सुट्ट्यांचा आस्वाद घेतलेला होता.

घरून आल्यावर दत्त्या 'दत्तात्रय' बनला होता. सकाळी ६ला आंघोळ करून तयार असायचा. पूजापाठही करत असेल कदाचित. एकूणच आमूलाग्र बदल दिसत होता. घरी बापाने त्याचा मेंदू धुऊन काढला होता (ब्रेन वॉशिंग). पण

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

त्यावर लवकरच गंज चढणार याची आम्हाला खातरी होती. दत्त्या म्हणजे कुत्र्याची शेपूट होतं. नळीत घालता नळी वाकडी होईल, पण शेपूट सरळ होणार नाही.

दर महिन्याला घरून येणारे ५ हजार रुपये घसरून ३ हजार झाले होते. पैसे कमी पाठवले तर याचे षौक बंद होतील, असा बापाचा सरळ हिशोब. त्याला जेवणखाण्यासाहित आपले षौक पुरवणं अशक्य होऊ लागलं.

'संकटकाळी जो मदत करतो, तोच खरा मित्र' या उक्तीला जागून हळूहळू आम्ही त्याला सिगारेट शेयर करू लागलो. इतरही गोष्टींचं तसंच. दत्त्या परत माणसात आला. सिगारेट, बियर अगदी अगदी जैसे थे झालं. ३ हजारात षौक पूर्ण होत नाहीत, म्हणून दत्त्याने एका पान टपरीवाल्याशी सलगी वाढवून उधारी केली. नियमित त्याकडून सगळे सिगारेट घेत असल्यामुळे त्याचा दत्त्यावर विश्वास होताच. तुम्हाला खोटं वाटेल, पण वसतिगृह सोडण्याच्या आधीपर्यंत उधारीची थकबाकी होती तब्बल २५ हजार रुपये. यावर दत्त्याला छेडताच तो म्हणे, "एका पगाराची गोष्ट आहे ही फक्त." वैद्यकीय अधिकारी होऊन पहिल्या पगारात उधारी फेडतो, म्हणून आधार कार्डची एक प्रत टपरीवाल्यापाशी ओळख म्हणून ठेवली होती. वरून बापाचा फोन नंबरही दिला होता. रुजू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत जर उधारी फेडली नाही, तर घंटी सरळ माधवराव किटेकरांच्या फोनची वाजणार होती. इतकं असूनही दत्त्या मात्र बिन्धास होता. त्याची उधारी ऐकून आमचे दात घशात जायची वेळ आली होती.

दुपारच्या जेवणानंतर आख्खं वसतिगृह अजगरावस्थेत पडलेलं असताना दत्त्या आणि मी चकाट्या पिटायचो. त्यात जागतिक दर्जाचे विषय चर्चिले जायचे. त्यापैकीच एक म्हणजे दत्त्याचं लग्न. म्हंटलं, "दत्त्या, तुझ्या लग्नात लय मजा येणार लेका."

"छ्या, आपण नाही करणार लग्न." दत्त्या म्हणाला.

याला मध्ये मध्ये असे झटके येतात हे माहीत होतं, पण तरी दुपारी असंही काय करणार, म्हणून मी चर्चा पुढे रेटत विचारलं, "का रे ?"

पलंगावरून उठून दत्त्याने खिडकीत ठेवलेली मधाची वाटी माझ्या हाती दिली. त्याला भरपूर माश्या बिलगलेल्या होत्या. दत्त्या म्हणाला, "यातली एकतरी माशी हाकलून लाव."

मी थोडा प्रयत्न केला, पण लगेच लक्षात आलं. म्हंटलं, "अरे, यांच्या पंखांना मध चिटकल्यामुळे त्यांना उडता येत नाही."

दत्त्या म्हणाला, "मोह, वासनासुद्धा अशाच असतात. त्यांच्या मागे लागलं की आपणही त्यात खोल खोल गुंतत जातो आणि कधी आपल्या पंखांना मध चिटकतो, कळतही नाही. आपल्याला होणारी पोरं, त्यांच्याबरोबर परत 'अबकड' शिकायचं म्हणजे अधोगतीच नाही का? सगळं सोडून त्यांच्याकडे लक्ष ठेवा, त्यांना मोठं करा. कशासाठी? तर आनंद मिळतो म्हणून, कशासाठी? तर म्हातारपणाच्या आधारासाठी. आज ज्यांना मुलं आहेत, ते सगळे सुखी आहेत का? काहींना तर मुलं वागवत नसल्यामुळे, मुलं नसती तर ती जास्त सुखी असती अशी परिस्थिती आहे. ही सगळी स्वप्नं सत्यात उतरली असती, तर वृद्धाश्रम स्थापन झाले असते का? त्यापेक्षा नको ते लग्न आणि नको ती पोरं-सोरं." असा हा आमचा दत्त्या कधी कधी टोकाची भूमिका घेई. पण पुढच्याला विचार मात्र करायला लावे. थोडा वाव मिळाला की समोरच्याला आपल्या तत्त्वज्ञानाचे डोस पाजी. रोज कॉलेजच्या पोरी खालून वरून न्याहाळणारा हा आणि याला अचानक इतकं ज्ञान कुठून प्राप्त झालं, तेच मला कळेना. त्याच्या लग्न संकल्पनेवर भरपूर वाद-विवाद घालावेसे वाटत. पण काही माणसांचं फक्त ऐकायचं असतं, अशी त्याची वर्गवारी होती.

भारतीय पुरुष संघाचा कुठलातरी क्रिकेट सामना चालू होता. आपली फलंदाजी सुरू होती. सगळे उपाहारगृहात सामना बघत बसले होते. दत्त्या आला नि म्हणाला, "काय झाला रे स्कोअर?"

त्याच बॉलला विकेट पडली. सगळे दत्त्याकडे पाहायला लागले. त्याला कॉल आला, म्हणून सगळ्यांच्या नजरा चुकवत तो बाहेर निघून गेला. थोड्या वेळाने चुपचाप येऊन एकदम मागे माझ्या बाजूला बसला. दोन मिनिटांत परत दोन विकेट्स पडल्या. समोर बसलेल्या दिन्याने मागे वळून कुठे दत्त्या आहे का पाहिलं.

तेथूनच तो ओरडला, "दत्त्या, ऊठ, भो**च्या! ऑल आऊट करतो की काय आता?" सगळ्यांच्या रेट्यामुळे दत्त्याला तेथून उठावं लागलं. विकृत हसत दत्त्या बाहेर पडला.

दत्त्या गेल्यावर टीमची गाडी रुळावर आली. चांगली १००-१५० धावांची भागीदारी झाली. नाही म्हणायला मध्यात २-३ विकेट गेल्याच म्हणा. पण त्यांनीही थोडाफार हातभार लावल्यामुळे भागून गेलं. पण परत गळती लागली. २-३ विकेट्स सलग पडल्या. दिन्याने परत मागे वळून पाहिलं. पण दत्त्या कुठे सापडला नाही. अखेर शेवटचीही विकेट पडली. शेवटच्या ४ फलंदाजांना एकूण २० धावाही काढता आल्या नाहीत. म्हंटलं, "बघा बरं, दत्ता नसतानाही विकेट पडल्याच की नाही? उगाच आपण सगळे बिचाऱ्याला अपशकुनी म्हणून सहभागी करत नव्हतो." उठताना माझं लक्ष उपाहारगृहाच्या डाव्या खिडकीत गेलं. मला घेरी यायचीच बाकी होती फक्त, कारण दत्त्या खिडकीतून सामना बघत होता.

असा हा आमचा आवली दत्ता. त्याला चिडवल्याचंही काहीच वाटत नसे, राग तर अजिबात नाही. कुठे महत्त्वाच्या कामाला बाहेर जायचं असेल, तर कधी कधी आपणहूनच म्हणे, "मी राहतो इथेच. उगाच तुमचं काम अडायचं माझ्यामुळे." त्या वेळी मात्र त्याची खूप कीव येई. अशा वेळी आम्ही त्याला, "तू चल रे भावा, काम नाही झालं तरी चालेल. कोई दोस्त पनौती नहीं होता और दोस्त से बढकर कोई काम नहीं होता." असं म्हणत असू अन काम नाही झालं की त्यालाच शिव्यांची लाखोली वाहिली जाई. एकदा मित्रांसोबत गोव्याला जायला निघालो. निघायच्या आधी दत्त्याचा फोन. गोव्याला जाईपर्यंत इतक्या अडचणी आल्या की सांगता दम लागेल. अक्षरशः चश्मा तुटण्यापासून ते महामंडळाची बस पंक्चर होईपर्यंत. गोवाची हवा अर्ध्या रस्त्यातच गेली होती.

वसतिगृहात 'शनी लागणे'च्याऐवजी 'दत्तू किटेची सावली पडली की काय?' असा नवीन वाक्प्रचार उदयास आला होता. आपण सगळे विज्ञानाचे विद्यार्थी आहोत. आपल्याला अशा अपशकुनी, पनौती, शनी ह्या गोष्टी शोभत नाहीत... मान्य. पण असं खरंच घडत होतं. काही महत्त्वाच्या निर्णयात याला माणुसकीच्या नात्याने सामील करावं, तर ते काम अडून बसे. म्हणून सगळे याला महत्त्वाच्या वेळी टाळत. अगदी परीक्षेच्या आणि निकालाच्या दिवशी याच्या खोलीची बाहेरून कडी लावण्यात येई. याचं तोंड दिसू नये म्हणून. पास झाल्यानंतर मात्र पहिला पेढा दत्त्यालाच भरवण्यात येई. तोंड दाखवलं नाहीस म्हणून. अशा प्रकारे दत्त्याला जीवही तेवढाच लावला जाई. वसतिगृहातल्या बहुतांश पार्ट्यांना दत्त्या हजर असायचा. त्याच्याशिवाय पार्टी म्हणजे बिना विदूषकाची सर्कस. दत्त्यामुळे पार्टी एका वेगळ्याच कक्षात जाई. चखण्यासाठी खाली पेपर टाकण्यापासून ते पॅक भरण्यापर्यंत सगळी महत्त्वाची कामं त्याकडे असत. पॅक भरता भरता एखाद्या नवशिख्याला तो ज्ञानाचे दोन थेंब पाजूनच टाकी. खाली पेपर टाकताना दुहेरी टाकावा, तेलकट वा ओलसर पदार्थ पेपरवर कधीच ठेवू नयेत. चखणा खाताना गरम गरम पदार्थ आधी खावेत, बियर असल्यास पॅक भरताना ४५ अंशाच्या कोनात भरावा इ.इ. पार्टीत तो भडक लाईट नेहमी बंद करण्यास सांगे. त्याने दारू कमी चढते म्हणे. गाण्याची पसंतीही शांत, काळीज चिरत जाणाऱ्या दर्दी गाण्यांना असे. पार्टीचा माहोल एकदम मादक होई. न पिणाऱ्यांनाही झिंगल्यासारखे वाटे आणि पिणाऱ्यांची अवस्था तर आपण इंद्र दरबारात आहोत की काय अशी होई. इंद्र अर्थात 'दत्तात्रय किटेकर'.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

खिशात खडकू नसताना भावाच्या पार्ट्या कधी चुकल्या नाहीत. सगळे त्याला हातचा एक म्हणून बिनातिकीट सामील करून घेत.

दत्त्याच्या भावांमध्येसुद्धा त्यासारखेच काहीना काही खट्याळ गुण होते. दत्त्या शेंडेफळ, मधला भाऊ खूप हुशार (असं ते म्हणतात), आणि मोठा भाऊ या सगळ्या खटाळ्यांचा विभागप्रमुख. मोठा महेश मुंबईला असे, तर मधला जयेश पुण्यात. घरी जाताना यांना औरंगाबादवरून जावं लागे. मग सुट्टयात नेहमी आमच्या वसतिगृहात दिसत. मधल्या हुशार भावाशी अशीच एकदा गाठ पडली. गोप्या त्याला म्हणाला, "चला सिनेमाला जाऊ."

"कोणत्या...?" जयेश तोऱ्यात म्हणाला. (हे साहेब नेहमी तोऱ्यातच असतात).

"सरबजीत..!" गोप्या.

"पाहिला आहे मी."अगदी त्याच तोऱ्यात. याचा तोरा पाहून मला खरं तर बोलायचा कंटाळा आला होता. पण तरी मित्राचा भाऊ काय नि आपला भाऊ काय, एकच... म्हणून मी म्हटलं, "थेटरात पाहिला का ?"

"नाही मोबाईलवर." जयेश.

"अरे, पण आजच आला ना सिनेमा? लगेचच मोबाईलवर कसा येणार?" गोप्या आश्चर्याने म्हणाला.

"पुण्यात त्याच दिवशी येतो मोबाईलवर प्रत्येक सिनेमा."

हा गमतीने बोलतोय का, तेही आम्ही तपासून पाहिलं, पण तो खरंच गंभीर होता. गोप्या आणि मी एकमेकांकडे पाहत काहीही न बोलता तेथून काढता पाय घेतला. हे म्हणजे सरळ सरळ आम्ही औरंगाबादमध्ये राहतो म्हणून मागास म्हणण्यासारखं होतं. माणसाने कुठपर्यंत पुड्या सोडाव्यात यालाही काही मर्यादा असावी. हा भाऊ B.A.M.S. होता. आयुर्वेदशास्त्राच्या प्रगतीचे अडथळे झटकन माझ्या लक्षात आले.

मोठा भाऊ महेश. आम्ही पहिल्या वर्षात असताना तो अंतिम वर्षात होता. आम्ही अंतिम वर्षात आलो, तरी त्याला अंतिम वर्ष सोडावंसं वाटत नव्हतं. कित्येक बॅच त्याला ज्युनिअरच्या सिनियर झाल्या असतील. पण पडलो तरी नाक वरच! वाढत्या वयात पोराचा आनंद हिरावून घेता कामा नये, म्हणून कंटाळून समजदार बापाने पोराचं लग्न लावून दिलं. काही दिवसांत बाप (महेश) कॉलेजात, तर लेकरं शाळेत बसून डब्बा खातील. पण हा भाऊ काय पास व्हायचा नाही. दत्त्याला सहजच एके दिवशी विचारलं, "तुझा मोठा भाऊ काय करतो रे ?"

तो निरागसपणे म्हणाला, "K.E.M.ला आहे अंतिम वर्षात." ऊर भरून आला. म्हटलं, बघा, भाऊ इतक्या सुप्रसिद्ध वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असतानासुद्धा चेहऱ्यावर थोडाही अहंभाव नाही. सगळ्या वसतिगृहात दत्त्याच्या सुशिक्षित परिवाराची जाहिरात आम्ही करून टाकली. जाहिरातीचा पहिला बकरा होता 'अन्या.'

मोठ्या भावाचं वसतिगृहात आगमन होताच, मार्गदर्शन घ्यायला अन्या हजर.

"सर, कोणतं पुस्तक वाचू? क्लास कोणते लावू? ठरावीक वाचू की सगळं वाचू?" इ. इ. असंख्य प्रश्न विचारले.

महेशनेही लगेचच प्रतिसाद न देता, एक सराईत डॉक्टरप्रमाणे पहिले हात-पाय, तोंड धुऊन आला. कपडे बदलले, आरशात बघून केस नीट लावून घेत म्हणाला, "त्याचं असं आहे ना, आमच्या मुंबईत मुलं अमकं अमकं पुस्तक वापरतात. क्लासचं विचाराल तर हेच छान आहेत. तशे तेही चांगले आहेत म्हणा, पण मला विचाराल तर मी हेच सुचवेन" इ. इ. अहो इतकंच काय, काय काय वाचायचं हेदेखील सांगितलं. वैद्यकीय क्षेत्राविषयी भरपूर मार्गदर्शन केलं. आम्ही सगळे भारावलो. म्हटलं, भाऊ असावा तर असा! आम्ही तेव्हा जेमतेम पहिल्या वर्षात असल्यामुळे आम्हाला वैद्यकीय क्षेत्र एवढं परिचयाचं नव्हतं. काही दिवसांनी डॉ. महेश किटेकर यांची मला फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट (मराठीत काय म्हणतात बुवा?) आली. प्रोफाईल तपासताच मला धक्का बसला. भाऊ K.E.M. रुग्णालयात फिजिओथेरपी करत होते. हे तर चहावाल्याने यशस्वी उद्योगपती कसं व्हावं असं सांगण्यासारखं होतं. (फिजिओथेरपीवाल्यांना कमी लेखण्याचा उद्देश नाही. पण त्यांनी M.B.B.S.वाल्यांना मार्गदर्शन करणंसुद्धा पटत नाही ना. :)

वास्तविक त्यांच्या अभ्यासक्रमापेक्षा आमचा खूप सखोल असतो. तरी त्याने सगळं आत्मविश्वासाने आमच्या माथी मारलं होतं. यावर चिडून सगळे दत्त्याच्या खोलीवर जाताच बत्तिशी दाखवत तो म्हणाला, "मी कुठे म्हणालो तो M.B.B.S. आहे म्हणून? मी फक्त K.E.M.ला आहे म्हटलं." असे हे किटेकर म्हणजे जरा विचित्रच होते.

एकदा मोठा भाऊ आणि दत्त्या मुंबईला जात होते. रेल्वेत जागा आरक्षित केलेली होती. जागेवर बसताच थोड्या वेळाने एक जोडपं येऊन ही जागा आमची असल्याचा दावा करू लागलं. भरपूर वेळ यांची हुज्जत चालू होती. कोणीच नरमाईने घेईना. त्या जोडप्याचा जागा क्रमांक, बोगी क्रमांक सगळं बरोबर होतं. दत्त्याचंही बरोबर होतं. रेल्वे विभागाकडून अशी चूक कशी झाली याने सगळे अचंबित झाले. तरी त्यांची हुज्जत घालणं सुरूच होतं. एका भल्या गृहस्थाने मध्यस्थी करत दोघांची तिकिटं पुन्हा तपासली. दत्त्याकडे चश्म्याच्या वरून बघत जवळजवळ तो खेकसलाच, "कालच आहे हे तिकीट." जोडप्यातल्या पुरुषाने या दोघा भावांना अक्षरशः धक्के मारून बाहेर काढलं.

या सगळ्या कुटुंबात वडील मात्र खूप हुशार आहेत. आपल्या मुलांची हुशारी लक्षात घेता त्यांनी सगळ्या भावांना अकरावी-बारावीत महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर शिकण्यासाठी ठेवलं आणि mkb बॉर्डरचं आरक्षण घेऊन घेतलं. दोन भावांनी याचा यथोचित फायदा जरी घेतला नसला, तरी शेंडफळाने अडकेपार झेंडा फडकवला. अवघ्या १४६ गुणांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात त्याचा नंबर लागला. या कुटुंबाची विना आरक्षण कल्पनाही करवत नाही...

पार्टीचं निमित्त होतं दत्ता M.B.B.S. पूर्ण झाल्याचं. नेहमीचेच वळू हजर असल्यामुळे गप्पांना ऊत आला होता. इथून पुढे सगळ्यांचे रस्ते वेगवेगळे असणार होते. भेट झालीच तर तो निव्वळ योगायोग असणार होता. आजवर सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळाली होती. पण पहिल्या श्रावण सोमवारी 'कोणाचीच मनोकामना पूर्ण होणार नाही' असं सांगणाऱ्या दस्तुरखुद्द दत्तूभाऊंची काय मनोकामना होती, याची उत्सुकता सगळ्यांनाच होती. त्या अनुषंगाने जब्याने दत्त्याला छेडताच सगळ्यांच्या नजरा दत्त्यावर रोखल्या होत्या. दत्त्यानेही चोरटा कटाक्ष सगळ्यांकडे टाकत शांतपणे खाली मान घालून उत्तर दिलं, "देवा, ह्या सगळ्यांच्या मनोकामना पूर्ण होऊ दे...!"

(त्यानंतर मात्र आम्ही आमच्या त्या मनोकामना कधीतरी पूर्ण होतील अशी भाबडी आशा सोडून दिली).

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# बबन म्हात्रे

बबन हा तसा पक्का नास्तिक माणूस. म्हणजे त्याला सुधारण्यासाठी गेलेल्या कित्येक जणांना त्याने नास्तिक करून टाकलंय, इतका हाडाचा नास्तिक. देव, धर्म, कर्मकांड, पोथ्या, पुराणे सर्व कोळून प्यालेल्या या माणसासमोर कोणत्याही श्लोकाचा किंवा ओवीचा उच्चार करायचा अवकाश, याचा काही ना काही प्रतिवाद तयार असायचा. याच्या पाचवीला दाभोळकरांनीच याच्या डोक्यावर हात ठेवला होता की काय कोण जाणे? पण एवढं असूनही आमच्या पंचक्रोशीत जो कोणी बाबा, बुवा, साधू, संत, महंत, किंवा भगत येई, तेव्हा त्याच्या दरबारात हाच बहाद्दर सर्वात अगोदर हजर.

**वकील साहेब**



काही व्यक्ती जन्मतःच विक्षिप्त असतात. विक्षिप्त म्हणजे काय की, त्यांचं नक्की काय चालू असतं त्यांचं त्यांनाच ठाऊक नसत. त्यांना जायचं असेल खुर्दला, तर बुद्रुकचा पत्ता विचारतील. एम.बी.ए. करायचं असेल, तर इंजीनियरिंगचा फॉर्म घेऊन येतील. विचार उजव्या विचारसरणीचे असतील, तर डाव्यांच्या सभांना गर्दी करतील. त्यांना एकाच वेळी सर्व काही हवं असतं. सर्व माहीत करून घ्यायची भूक. एकाच वेळी रस्त्यावर सायकलचं दुकान टाकण्यापासून आपल्याकडची द्राक्षे युरोपच्या बाजारपेठेत नेऊन विकण्यापर्यंत सर्वच गोष्टीत त्यांना इनसाईट असते. बबन म्हात्रे हा त्यातलाच एक आसामी. याचं वागणं नेहमी असं जरा विचित्रच होतं. त्याला आवडायची मधू कर्णिक आणि जेव्हा बघावं तेव्हा गप्पा मारत बसायचा त्या जाधवांच्या सुलूबरोबर. अशाने मधू कशी काय पटनार होती ते त्याच त्यालाच माहीत. बबनची आणि माझी खास अशी काही मैत्री होती असं काही नाही. पण कधी कधी बोलणं व्हायचं, इतकंच. साधारण पाच फुटाच्या आसपास उंची, पाणीदार डोळे, कधी फॉर्मल कपडे, गुळगुळीत दाढी, पॉलिश केलेले शूज असा जंटलमन दिसेल, तर कधी आठ आठ दिवस न बदललेली जीन्स, टी शर्ट, वाढलेली दाढी अशा गबाळ्या अवतारात दिसेल याचा काही नेम नाही. पण कुठेही दिसल्यावर दुरूनच एक हात खांद्यापासून पूर्ण वर हवेत उचलून अभिवादन करण्याची पद्धत आणि काही विनोद झाला तर लहान मुलासारखे गदागदा खांदे हलवत हसण्याची लकब यामुळे बबन कोणतेही कपडे आणि कोणत्याही अवतरात असला तरी चटकन ओळखू यायचा.

बबन हा तसा पक्का नास्तिक माणूस. म्हणजे त्याला सुधारण्यासाठी गेलेल्या कित्येक जणांना त्याने नास्तिक करून टाकलंय, इतका हाडाचा नास्तिक. देव, धर्म, कर्मकांड, पोथ्या, पुराणे सर्व कोळून प्यालेल्या या माणसासमोर कोणत्याही श्लोकाचा किंवा ओवीचा उच्चार करायचा अवकाश, याचा काही ना काही प्रतिवाद तयार असायचा. याच्या पाचवीला दाभोळकरांनीच याच्या डोक्यावर हात ठेवला होता की काय कोण जाणे? पण एवढं असूनही आमच्या पंचक्रोशीत जो कोणी बाबा, बुवा, साधू, संत, महंत, किंवा भगत येई, तेव्हा त्याच्या दरबारात हाच बहाद्दर सर्वात अगोदर हजर. आमच्या सर्व मित्रांच्या मते बबन म्हणजे फक्त टिंगल करण्याचा विषय होता. अगदी माझ्याही. पण एके दिवशी मला त्याच्याबद्दलचे हे मत बदलणं भाग भाग पडलं. त्याचं झालं असं, की आम्ही कॉलेजला असतानाचे दिवस होते, दसऱ्याचं सीमोल्लंघनाचं निमित्त म्हणून आणि नेहमीच्या रहाटगाडग्यातून थोडा बदल म्हणून आईबाबांना गावाबाहेरच्या देवाच्या दर्शनासाठी घेऊन जाण्याचा बेत मी आखला होता. आईची तयारी चालू होती, म्हणून तोपर्यंत मी घराबाहेर गाडी पुसत होतो. इतक्यात मागून आवाज आला,

"काय, कुठे निघाली स्वारी?" मी मागे वळून बघितलं, तर बबन आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे उजवा हात खांद्यापासून वर हवेत उचलून मला विचारात होता.

"काही खास नाही रे" मी म्हंटलं, "दसरा आहे म्हणून जरा घरच्यांना मंदिरात घेऊन जातोय. येतोस का?"

"हॅट, आपण कधी मंदिरात देवाच्या पाया पडायला जात नाही" बबनने आपण रस्त्यावरची पाणीपुरी खात नाही हे जितक्या तुच्छतेने म्हणावं तस म्हटलं. मग मलाही त्याची फिरकी घ्यायची हुक्की आली. मी त्याला म्हटलं,

"काय रे? भागवत कथा, हरिनाम सप्ताह आणि काय काय नको त्या सत्संगाला जाऊन बसतोस. तेव्हा कुठे जातो रे तुझ्यातला दाभोळकर?"

"ते काही आपण तिथलं पाणीदार लेक्चर ऐकायला जात नाही." बबन म्हणाला, तसा मी त्याला म्हणालो,

"मग काय तिथे वाटला जाणारा प्रसाद खायला जातोस?"

"नाही रे. तुम्ही लोक ना, खूप भाबडे आहात रे, खूप भाबडे!"

"म्हणजे?"

"अरे, वर्षानुवर्षे तेच भागवत अन तेच तेच हरिनाम अखंड जपत राहिल्याने आपल्या आयुष्यात काही फरक पडतो, यावर विश्वास तरी कसा बसतो रे तुमचा ?"

"आमचं सोड रे, तूच कशाला जातोस मग तिथे ऐकायला?"

"हे बघ, तुला सोप्पं करून सांगतो." समजावणीच्या सूरत बबन म्हणाला, "फार दिवसांपूर्वी मी एक इंग्लिश कथा वाचली होती, त्यात राज्य गमावलेल्या राजाच्या पाचव्या की सहाव्या वंशजाची कथा होती."

"बरंम मग?"

"त्यात त्या राजाने राज्य सोडून जाताना त्याचा शाही राजमुकुट एका गुप्त ठिकाणी जमिनीत पुरून ठेवलेला असतो. त्या राजाची अशी अपेक्षा होती की तो राजमुकुट त्याच्या वंशजानाच मिळावा. पण त्या ठिकाणाची माहिती ज्याच्याकडे विश्वासाने सोपवावी त्यानेच तो राजमुकुट हस्तगत करू नये म्हणून तो राजा एक शक्कल लढवतो. तो त्या गुप्त ठिकाणाच्या माहितीचा एक क्लिष्ट असा श्लोक बनवतो. आणि तो श्लोक त्या विश्वासू (?) सेवकाकडे देऊन सांगतो की हा आमच्या घराण्याचा पारंपरिक श्लोक आहे. आमच्या खानदानातील जो तरुण


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

लग्न करतो, त्याने लग्नापूर्वी हा श्लोक एकदा तरी पठण करावा, असा नियम आहे. त्यामुळे बाकी काही झालं तरी चालेल, पण हा श्लोक माझ्या मुलाकडून त्याच्या विवाहप्रसंगी तू वदवून घे." त्याप्रमाणे त्या कोड वर्डला देवाचा पवित्र श्लोक समजून त्या राजाच्या चार पिढ्या डोळे झाकून त्याचं विवाहप्रसंगी पठण करतात आणि आयुष्य कंठतात. पण पाचवी पिढी हुशार असते. ती त्या श्लोकाच्या अर्थाची उकल करते, त्याप्रमाणे राजमुकुटाचा शोध घेते आणि शेवटी राजमुकुट त्यांना प्राप्त होतो."

"हो, ठीक आहे. पण त्याचा इथे काय संबंध?" माझा हा अज्ञानमुलक प्रश्न ऐकून बबनने असा काही चेहरा केला की बस.

"अरे मूर्ख माणसा, मला असं सांगायचं आहे की आपल्या सर्व ग्रंथ, पोथ्यापुराणात नाममाहात्म्याखेरीज एक गूढ पण तितकाच सोपा अर्थ दडलेला आहे, जो रूपकामध्ये मांडलेला आहे. त्याची कुठे उकल होते का, त्यासाठी मी प्रवचन-कीर्तनांना जाऊन बसतो, समजलं?"

"छे, काहीतरीच काय? कशाचा संबंध कुठे जोडतो आहेस? असं कुठे असतं काय?" मी त्याला झटकत म्हटलं.

"हेच तर तुम्हाला कळत नाही." माझी कीव करत बबन म्हणाला, "सांगतो. हे बघ, आज दसरा आहे ना? नवरात्र नुकतंच संपलंय ना?"

मी हो म्हटलं, तसा बबन म्हणाला "आत्ताच्यासारखी पूर्वी मोठ मोठी धरण, बंधारे नसायची. तेव्हा चार महिने पडलेल्या पावसाचं जे पाणी विहीर, नद्या, तलावात असायचं, त्याच पाण्यावर पुढचे आठ महिने माणसांची, शेतीची अन गाई गुरांची तहान भागवणं भाग होत. बरोबर?"

"बरोबर."

"हेच पाणी काटकसरीने वापरण्यासाठी पूर्वजांनी तुम्हांला ठिबक सिंचनाचं एक प्रात्यक्षिक दर वर्षी करायला सांगितलं, जेणेकरून तुम्ही त्यातून बोध घेऊन पुढचे आठ महिने पाणी जपून वापराल."

"कोणतं प्रात्यक्षिक?" मी न उमजून विचारलं.

"अरे बाळा, नवरात्रात देवीच्या शेजारी मातीमध्ये धान्य पेरल होतं, ते छोट्या मडक्यातल्या ठिबक सिंचनामुळे उगवलं आणि मोठं झालं की नाही?"

बबनच्या म्हणण्याचा अचानक उलगडा झाल्याने मी म्हटलं, "अरे हो, हे तर माझ्या लक्षातच नाही आलं?"

"तेच तर" चेव येऊन बबन म्हणाला, "याच प्रात्यक्षिकातून शिकून आपण पाणी जपून वापरावं असं आपल्या पूर्वजांना वाटत असेल. शिवाय दर वर्षी नियमित आपल्या शेतातल्या मातीच्या उगवण क्षमतेचं परीक्षण झालं, ते वेगळंच. पण आपण समजूनच घेत नाही. एकीकडे देवीची आरती करत दुसरीकडे पाण्याची नासधूस करणं काही सोडत नाही. ही 'अंध'श्रद्धा नाही का?"

बबन्याने मला बरोब्बर पेचात पकडलं होतं. ह्याला आस्तिक करायला गेलेले स्वत:च नास्तिक का झाले होते, ते आत्ता समजलं. त्याचा युक्तिवाद बिनतोड होता. मला कळत होतं, पण वळत नव्हतं. मोठा बाका प्रसंग होता. पण इतक्यात घरातून आईने आवाज देऊन माझी सुटका केली. मी म्हटलं, "आई आवाज देते आहे. ओके, चल बबन, भेटू या नंतर."

तर असा हा आमचा मित्र बबन म्हात्रे. जो अगोदर चेष्टेचा अन टिंगल करण्याचा विषय होता, तो नंतर माझ्यापुरता तरी कुतूहलाचा विषय झाला होता. नंतर आमच्या वरच्यावर भेटी होत राहिल्या. तो मला जेवताना ताटाला पाणी फिरवण्यापासून तर चितेभोवती मडक्याने पाणी फिरवण्यापर्यंत साऱ्या रूढी-परंपरांमागचं विज्ञान सांगत राहायचा. वाद घालायचा, पटवून द्यायला झटायचा. नाही म्हटलं, तरी त्याचे युक्तिवाद पटण्यासारखेच असायचे. मला नक्की काय करू तेच कळायचं नाही. वर्षानुवर्षं मनावर खोलवर झालेले संस्कार त्याच्या विचारांना आचरणात आणू देत नव्हते. पण या सगळ्या गोष्टींमुळे एक मात्र झालं की बबनची आणि माझी एकमेकाशी एक विशेष अशी नाळ जोडली गेली. बाकी कोणीही त्याची कितीही टिंगल केलीम तरी तो त्याचे नवीन विचार, संशोधन माझ्याच जवळ मांडायचा. कारण मी जरी त्याचे विचार स्वीकारत नसलो, तरी नाकारतही नव्हतो. त्याची टिंगल करत नव्हतो. खरं तर मी त्याच्या साठी एक उत्तम श्रोता होतो. श्रवणभक्ती हाच माझा धर्म होता. त्यामुळे त्याचं माझ्याशीच फार चांगलं जमायचं.

पुढे यथावकाश आम्ही कॉलेज पूर्ण करून नोकरीला लागलो. जवळपास सर्व मित्रांची लग्नही झाली. पण बबनने मात्र काही लग्न केलं नाही. पत्रकारिता करायला लागला. कुठल्याशा एका वर्तमानपत्रात त्याचे लेख छापून यायचे. त्याचा लेख छापून आला की तो पहिले मला दाखवायला घेऊन यायचा. त्यामध्ये हेच सर्व असायचं - जुन्या रूढी-परंपरा, त्यांची तत्कालिक कारणं आणि आज त्याला आलेलं कर्मकांडाचं स्वरूप. बबन एक झपाटलेला कार्यकर्ता होता. फार पैसा जरी मिळत नसला, तरी एक विशेष असं आत्मिक समाधान त्याला या कार्यातून मिळत असावं.

एक दिवस असाच मी ऑफिसला जात असताना बबन लगबगीत कुठे तरी जाताना दिसला. हातात समानाची बॅग होती. कुठे तरी गावाला निघलेला असणार, म्हणून मी हटकून विचारलं, "काय बबनराव, एवढ्या घाईत कुठे?"

तसा बबन म्हणाला, "अरे, कुंभमेळा आहे ना. त्र्यंबकेश्वरला चाललोय."

"काय?" मी तर आश्चर्याने उडालोच. "अरे, काय संन्यास घ्यायचा विचार आहे की काय तुझा?"

"नाही रे!" मला झटकत बबन म्हणाला, " अरे, तुला म्हणून सांगतो, इकडे ये" असं म्हणून माझ्या हाताला धरून तो मला जवळच असलेल्या एका चहाच्या टपरीवर घेऊन गेला. जरा कोपऱ्यातली जागा बघून आम्ही दोघे स्टूलवर बसलो.

"हं, सांग आता, हे सर्व काय प्रकरण आहे?" मी बोलायला सुरुवात करत म्हटलं.

"अरे, त्याचं काय आहे, माझ्या डोक्यात ना एक भन्नाट आयडिया आली आहे." - बबन.

"कसली आयडिया?" - मी.

"अरे, मला सांग, लाखोच्या संख्येने हे सगळे लोक कुंभमेळ्यात का जातात, माहीत आहे का?" बबनने विचारलं.

"हो, माहीत आहे, पाप धुवायला..." मी सांगितलं.

"अरे, तेच तर या लोकांना कळत नाही. त्याच्यामागेही एक कारण आहे, पण ते कुणाच्या लक्षातच येत नाही. त्याचा शोध न घेता दर बारा वर्षांनी मेंढ्या जातात आणि पाण्यात डुबकी मारून येतात." बबन त्याला 'सत्य का ग्यान' झाल्याच्या सुरात म्हणाला.

"हो का? मग तुला कळलंय का त्याच्यामागचं कारण?"

"तेच तर सांगतोय ना, मी त्या कारणाच्या फार जवळ पोहोचलोय असं वाटतंय. आता फक्त पडताळा घ्यायचा तेवढा बाकी आहे, बस्स!"


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"अच्छा, मग ते काय कारण आहे, मलाही कळू दे..." मी म्हणालो.

"हे बघ, तुला कुरींजी या फुलाचं नाव माहीत आहे?" बबनचा प्रश्न. बबनची ही नेहमीची खोड आहे. सरळ मुद्द्याला सुरुवात करण्याअगोदर काहीतरी प्रास्तविक करण्याची.

"नाही, मला नाही माहीत. पण त्याचा इथे काय संबंध?"

"सांगतो, ऐक. हे जे फूल आहे ना, ते बारा वर्षांतून एकदाच उमलतं." बबन सांगत होता.

"बरं, मग?" आश्चर्याने मी विचारलं.

"अरे, विचार कर, जर अशी फुलं असू शकतात, तर दर बारा वर्षांनी विशिष्ट तिथीलाच उमलणारीही फुलं असू शकतीलच ना?"

"होम असू शकतील, मग?"

"हे बघ, माझा असा तर्क आहे की, त्र्यंबकेश्वरला ब्रह्मगिरी पर्वतावर अशीच एक वनस्पती असू शकते, जी कुंभमेळ्यातल्या काही पर्वणीच्या तिथीलाच फुलत असेल. तिचं औषधी महत्त्वही अपार असू शकतं. पण आपल्या पूर्वजांनी सरळ सरळ त्या वनस्पतीचं नाव सांगितलं असतं, तर कासच्या पठारावरच्या फुलांची आपण जशी वाट लावली, तशीच या वनस्पतीचीही लावली असती. म्हणून आपल्या पूर्वजांनी त्या वनस्पतीचं नाव आपल्याला थेट न सांगता त्याचा स्पर्श होऊन आलेल्या पाण्यात स्नान करणं पवित्र असतं, असं मुद्दाम सांगितलं असेल. काय वाटतं तुला?"

"अरे, तेथे गरुडाकडून ते अमृताचे चार थेंब पडले होते ना, म्हणून भरतो तेथे कुंभमेळा. तुझं आपलं काहीतरीच..."

"नाही रे! ती सत्यावरती बेमालूमपणे अच्छादलेली दंतकथेची शाल आहे रे!" - बबन.

"बरं, तसं तर तसं, पण एक विचार कर - आपल्या काही शे पिढ्या अगोदर ज्या तपस्वींना ही गोष्ट ठाऊक असेल, ते तरी अमर होऊन आज हयात असला हवे होते ना?" माझा प्रश्न.

"तेच तर तुला सांगतोय ना, की अमर असं कोणी नसतं रे. जो जन्माला आला, तो मरणारच आहे. ही वनस्पती कोणाला अमर करत नसेल. पण त्या पाण्याने आंघोळ केल्याने 'पापं' धुतली जात असतील, तर माझ्या मते ती अनेक आजारांवरची एकमेव रामबाण औषधी असेल. म्हणून जुन्या काळातल्या लोकांनी आजाराला 'पाप' असा कोड वर्ड वापरला असेल. आता मला सांग, 'दृष्टी पडता ब्रह्मगिरी त्यासी नाही यमपुरी' या वाक्याचा तुझ्या मते अर्थ काय?" बबनचा प्रश्न.

"अरे, साधं आहे, जो एकदा ब्रह्मगिरीला भेट देतो, त्याला कधी नरकयातना भोगाव्या लागत नाहीत, एवढा साधा सोप्पा अर्थ तर आहे."

"नाही रे! मला वाटतं नरक, यमपुरी हे फक्त रूपक आहे. खरा अर्थ असा असेल की ज्याला ही ब्रह्मगिरी खऱ्या अर्थाने 'दिसेल' ना, त्याचं जीवन एकदम सुखकर होऊन जाईल. त्यात दु:खाला जागा राहणार नाही." बबन मला समजावत म्हणाला.

"चल रे, काहीतरीच काय? तुझ्या मनाला येईल तो काहीही अर्थ काढतोस तू." मी म्हणालो, तसा बबन म्हणाला,

"बरं, मला सांग, तू नवनाथांची पोथी ऐकली आहेस का?"

"हो, ऐकली आहे एकदा कधीतरी."

"त्यात एके ठिकाणी असं लिहिलेलं आहे की, सोन्याचा मोह पडलेल्या एका व्यक्तीचे डोळे उघडण्यासाठी त्याचे गुरू त्याला दिव्य दृष्टी बहाल करतात आणि त्यानंतर त्याला या सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधील ब्रह्मगिरीसहित सर्व पर्वत सोन्याचे दिसू लागतात." - बबन

"अरे, ती नाथांची पोथी आहे. त्यात नाथांच्या अशा अनेक लीला लिहिलेल्या आहेत."

तसा बबन उसळून म्हणाला, "अरे, हे सोनं वगैरे सर्व रूपक आहे रे. प्रत्यक्षात तिथलं सोनं म्हणजे ती वनस्पती, जिला समजून घेण्याची दृष्टी असेल त्यालाच दिसेल, असा अर्थ आहे की नाही?"

"मला काही कळत नाही बाबा" डोकं चक्रावून मी म्हणालो, "आणि मला सांग, एवढ्या मोठ्या डोंगरावर नेमकी तीच वनस्पती कशी शोधणार आहेस तू? की हनुमानासारखा द्रोणगिरीच उचलून आणणार आहेस?" माझा पुन्हा प्रश्न.

"त्यासाठीच तर दोन वर्षांपूर्वी मी तब्बल सहा महिने त्र्यंबकेश्वरला जाऊन राहिलो होतो. अनेक वेळा ब्रह्मगिरी पालथी घालून मी तेथे असलेल्या तब्बल तेवीसशे वनस्पतींची यादी तयार केली आहे."

"काय सांगतोस काय, तेवीसशे?" मी आश्चर्यचकित होऊन विचारलं.

"होय, तेवीसशे. त्यामुळे माझा तर्क जर खरा असेल, तर आता पर्वणी काळात जी एखादी नवीन वनस्पती फुललेली आढळेल, तीच ती जादुई वनस्पती असेल बघ." बबन स्पष्टीकरण देत म्हणाला.

त्याचा तो तर्क आणि त्यासाठी त्याने घेतलेली प्रचंड मेहनत बघून मला त्याचं मन मोडवेना. कोणत्यातरी अजब गजब तर्काच्या पाठीमागे लागून तो त्याला मूर्तस्वरूप देण्याची भोळी आशा बाळगून होता. मी त्याच्या कार्याला शुभेच्छा देऊन त्याचा निरोप घेतला.

सिंहस्थ कुंभमेळा संपून बरेच दिवस लोटले आणि एक दिवस मला बबनचा फोन आला. फोनवर बबन अक्षरश: आनंदाने नाचतच होता. "काय रे, सापडली की काय तुला तुझी रामबाण औषधी?" मी विचारलं, तोवर तिकडून हर्षवायू होऊन जवळपास ओरडत बबन म्हणाला, "अरे, रोग बरे करणारी रामबाण औषधीच काय, त्याहीपेक्षा मोठा खजिना हाती लागला आहे माझ्या!"

"काय सांगतोस काय? मी म्हणालो.

"हो तर, माझा जसा तर्क होता त्यानुसार मला खरोखर एक नवीन वनस्पती तिथे सापडली, तिच्या गुणधर्मांचा अभ्यास करण्यासाठी तिचे काही नमुने मी अभ्यासासाठी प्रयोगशाळांमध्ये पाठवले आणि तिथून आलेले निष्कर्ष केवळ भन्नाटच नाही, तर धक्कादायकसुद्धा होते."

"काय सांगतोस? असं काय होतं त्यात?" मी न राहवून विचारलं.

तसं बबन सांगू लागला, "मनुष्याचा वार्धक्याकडे झुकण्याचा वेग अत्यंत मंद, म्हणजे जवळपास शून्य करण्याची क्षमता या वनस्पतीत आहे."

"खरंच?"


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"हो, खरंच. तुला सांगतो, या वनस्पतीची घाऊक प्रमाणात शेती केली ना, तर सर्व पृथ्वीवरची दु:ख, दैना अन विवंचनाच नष्ट होऊन जातील. जगाच्या पाठीवर कुठे वृद्धाश्रम राहणार नाही. थोर विभूतींचा हात आपल्या पाठीवर सदैव राहील. वृद्ध आणि त्यांची ससेहोलपट कुठे दिसणार नाही. सर्वत्र चैतन्याचे वारे वाहू लागतील. माणसाचं आयुष्यमान किती तरी वर्षांनी एकदम झपाट्याने वाढेल." बबन न थकता सांगत होता.

"तुझ्या अथक प्रयत्नांना अखेर यश आलं, यातच खरा आनंद आहे बघ." मी त्याचं तोंड भरून कौतुक केलं. फोन ठेवला अन माझ्या मनात बबनबद्दल अपार आदरभाव दाटून आला. त्याच्या जिद्दीला यश आलं याचा आनंद वाटला आणि त्याच्या या तपश्चर्येच्या फलितातून तो अखिल मानवजातीला सुखी करू पाहत होता, यामुळे त्याचा मित्र असल्याबद्दल अभिमानसुद्धा वाटला.

नंतर काही दिवस असेच गेले. कामाच्या धामधुमीत मी हे सर्व प्रकरण विसरूनच गेलो. आणि अचानक एक दिवस बबन रस्त्यात भेटला. अगदी नेहमीसारखाच होता. संशोधनाचा गर्व नाही की कसला अभिनिवेश नाही. मीच त्याला हटकून विचारलं. सुरुवातीला तर सांगतच नव्हता. पण शेवटी खूपच आग्रह केला, तेव्हा बोलला,

"मी त्या वनस्पतीचे सर्व नमुने आणि निष्कर्ष जाळून टाकलेत." बबनने एका दमात सर्व सांगून टाकलं.

"काय?" मला आश्चर्याचा धक्काच बसला. "असं का केलंस तू, बबन?"

"तुझ्यापासून काय लपवू रे? ते अमृत नव्हतं, विष होतं, विष!"

"म्हणजे? काय ते नीट सांग." काहीच उलगडा न झाल्याने मी विचारलं.

"हे बघ, मला वाटतम की, उत्पत्ती, स्थिती आणि लय या जीवनाच्या अटळ अवस्था आहेत. जो जन्माला आला, त्याचा मृत्यू अटळ आहे. हा सृष्टीचा नियम आहे. आपण त्यात उगाच ढवळाढवळ करू नये. ज्याला वार्धक्य येण्याची अन मरणाची चिंता आहे, तो आपलं तारुण्य भरभरून जगतो. त्याचा मनमुराद उपभोग घेतो. जर त्याची भीतीच नसेल, तर आयुष्य लांबलचक असूनसुद्धा किती नीरस आणि बेचव होऊन जाईल? फूलपाखरू फक्त सातच दिवस जगतं. पण ते सातही दिवस किती आनंदाने मनमुराद इकडे तिकडे स्वच्छंदीपणे बागडतं. आणि दुसरीकडे कासव तीनशे वर्षं जगतं, पण अत्यंत सुस्तावलेलं अन मरगळलेलं आयुष्य कंठत राहतं. तीनशे वर्षं सुस्तावलेलं आयुष्य जगण्यापेक्षा सात दिवस स्वच्छंदी आयुष्य जगणंच योग्य नाही का? शिवाय यातून पुण्यात्मेच दीर्घायुषी होतील, असं थोडीच आहे? मरणाची भीती न उरलेले अनेक रावणसुद्धा दीर्घायुष्याचा टिळा कपाळावर मिरवत जिकडे तिकडे बोकाळताना दिसले असते. तुला सांगतो, हे संशोधन मानवजातीला वरदान नाही, शाप ठरलं असतं, शाप. म्हणून मी त्याचा तत्काळ अंतच करून टाकला." बबनने सर्व मन मोकळं केलं. त्याचं तत्त्वज्ञान ऐकून मी पूर्णपणे निरुत्तर होतो.

बबनने जे काही केलं, ते योग्य होतं की नाही - माहीत नाही. कदाचित हाच विचार करून चरकसंहिता, भृगुसंहिता यासारखे मौल्यवन ग्रंथ लिहिणाऱ्या आपल्या पूर्वजांनी दूरदृष्टीकोन ठेऊन आपल्या भावी पिढीपासून हे ज्ञान मुद्दाम दडवून ठेवलं असेल. बबननेही दूर दृष्टीकोन ठेवून तेच केलं. मी दुरूनच त्याला दंडवत घातला. फुटकळ गोष्टींचं पेटंट घेऊन त्याच्या जिवावर संपूर्ण आयुष्य चैनीत घालणारे अनेक जण या जगात आवतीभोवती दिसत असताना, केवळ मानवजातीच्या भल्यासाठी अथक परिश्रमांनंतर मिळालेल्या आपल्या अनमोल संशोधनाचा त्याग करणारा बबन हा त्या क्षणाला मला खूप खूप मोठा वाटला.

एक मात्र खरं, की काही व्यक्ती जन्मत:च अफाटच असतात. आणि बबन त्यातलाच एक होता.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# सासुलीचा योगी श्री सावत्या

गावचा अघळपघळपणा त्याच्या वागण्याबोलण्यात असायचा आणि मग आपोआप अशा लोकांना आपण परीटघडीचे लोक सहसा जवळ उभे करीत नाही, त्यातलाच तो प्रकार. त्याला फार जाणवू दिले नाही, पण त्यातलेच. त्यात पुन्हा तो बसमध्ये पाठी येऊन बसायला लागला आणि माझ्या आधीच्या स्टॉपवर चढायचा आणि माझी नेहमीची जागा बळकावायचा. मग मला खिडकीसाठी लोकांच्या मिनतवाऱ्या काढाव्या लागायच्या. आता तो आणखीनच डोक्यात गेला होता.

**रुस्तुम**



"लाह्या व्हाया, लाह्या व्हाया!!!"असा काहीसा आवाज बसमध्ये ऐकायला आला की आम्हास समजायचे बेलापूर आलेले आहे आणि पाच एक मिनिटात ऑफिसमध्ये पोहोचणार, किंवा अचानक रेड्याचा आवाज ऐकायला यायला लागला की आम्हास समजायचे आता पांडवकडा आलाय आणि मग आम्ही आमची झोप आवरायला लागायचो.असले उद्योग कोण करणार? सावत्याच. आमचे बसमधले घड्याळच म्हणा. फक्त यांत्रिक घड्याळ आणि हे मानवी घड्याळ ह्यातला फरक असा की ह्याचा आवाज ऐकला की आमच्या चेहऱ्यावर हास्याची एक लकेर नकळत उमटायची.

सावत्याची आणि माझी ओळख गेल्या दोन-अडीच वर्षातीलच आणि तशीही अनवधानानेच झालेली.... माझ्यावर leadपणाची नवीन वस्त्रे चढवण्यात आली होती आणि त्या प्रोजेक्टची सुरुवात होती. चांडेल नावाचा सिव्हिलमधला एक designer, त्याचे माझ्याविषयी फार चांगले मत होते. (वास्तविक सिव्हिल आणि माझे डिपार्टमेंट एकमेकांना पाण्यात बघतात.) पण तो त्याच्या डिपार्टमेंटमध्ये नवीन होता आणि तिथे त्याला फारशी कोणाची मदत मिळायची नाही बहुधा. तर त्याच सुमारास हा सावत्याही रुजू झाला आणि त्या चांडेलने सावत्याशी माझी ओळख करून दिली. सुरुवातीला मी त्याच्याकडे दुर्लक्ष करायचो, कारण तो चांडेल मला 'सर' म्हणायचा, माझ्या टीममधले बाकीचेही आणि हा सावत्या मात्र चक्क अरे तुरे. नाही म्हटले तरी जो काही खरा-खोटा, फुकाचा अहंकार होता तो त्यामुळे डिवचला गेला होता. त्याला गावावरून येऊन बहुधा फार महिने उलटले नव्हते. गावचा अघळपघळपणा त्याच्या वागण्याबोलण्यात असायचा आणि मग आपोआप अशा लोकांना आपण परीटघडीचे लोक सहसा जवळ उभे करीत नाही, त्यातलाच तो प्रकार. त्याला फार जाणवू दिले नाही, पण त्यातलेच. त्यात पुन्हा तो बसमध्ये पाठी येऊन बसायला लागला आणि माझ्या आधीच्या स्टॉपवर चढायचा आणि माझी नेहमीची जागा बळकावायचा. मग मला खिडकीसाठी लोकांच्या मिनतवाऱ्या काढाव्या लागायच्या. आता तो आणखीनच डोक्यात गेला होता. पण एकदा संध्याकाळी बसमधून येताना work pressureविषयी आमची चर्चासत्रे घडत होती आणि खूप शॉट लागला होता डोक्याला! तेव्हा मध्ये पडून सावत्याने फारच करमणूक केली आणि वातावरण निवळले. मग जरा जाणीव झाली की सावत्या हे रसायन काही वेगळे आहे. मग त्या रसायनाचे पृथक्करण करून गुणधर्म जाणून घ्यावेसे वाटू लागले. माझे पृथक्करण सांगते - एकदम पारदर्शक माणूस. आत एक बाहेर एक असे असणे शक्यच नाही. आणि सदानकदा हसरा चेहरा. त्याच्याबरोबर असताना dull वाटणारच नाही आणि म्हणून कदाचित माणसांचा त्याच्याभोवती गराडा आढळून येईल. एक उत्तम कलाकार, उत्तम वक्ता. सगळे गुणधर्म मांडायचे तर कदाचित ग्रंथ लिहावा लागेल, पण आवर्जून सांगायचे म्हणजे उपमा देण्याच्या बाबतीत तर त्याचा हात कोणी ही धरू शकत नाही. कोटीच्या बाबतीत तो थोडा कमी आहे.. पण राहिला असता थोडे दिवस माझ्याबरोबर, तर तेही शिकला असता ;). त्याची बडबड ऐकली म्हणजे माणूस उदास राहूच शकत नाही. अचानक आपल्यातही ऊर्जा येते. ऊर्जेचा स्रोतच जणू !!!!

त्याच्याकडे सांगण्यासारखे किस्से बरेच असायचे. त्यातून हा कलाकार माणूस, त्यामुळे तो हातवारे करून विलक्षण रितीने रंगवून सांगायचा. (थोडक्यात, भूमिकेत शिरला की आवरणे कठीण जायचे). त्या किश्श्यांपैकी दशावतारी नाटकात घडलेले, 'अवंती पुरी नगरीतील राजाचा' आणि 'ठो' हे किस्से आठवले तर अजूनही हसून दमछाक होते. त्याच्या किश्श्यांमुळे सावत्या एकदम प्रसिद्ध झाला आणि हळूहळू तर आख्खी बस सावत्याचे किस्से ऐकण्यास पाठी गर्दी करू लागली. सावत्याकडचे किस्से हळूहळू संपत आले आणि आमची आणखीची भूक काही मिटत नव्हती. मग आम्ही काही न काही (म्हणजे मी, पाटील आणि गिरीश नामक व्यक्तिमत्त्व) कारण काढून किंवा काही विषय काढून सावत्याला गिऱ्हाईक करू लागलो . ९५-९६% हा खेळीमेळीने समोर जायचा आणि आमचा १ तासाचा कंटाळवाणा प्रवास सुखकारक व्हायचा.

रडण्याचा आणि दारुड्याचा अभिनय तर हुकमी. एकदा असेच आम्ही barbeque nationमध्ये जिभेचे चोचले पुरवायला गेलो होतो. तेव्हा इतर कोणाचा तरी वाढदिवस असावा आणि त्यांनी केक कापल्यावर barbeque nationवाल्यांनी 'Happy Birthday to you' हे गाणे वाजवले आणि हा भाई अचानक देहभान आणि जागा विसरून नाचायला लागला. लोकांना वाटले, दारूचा अंमल चढला असावा म्हणून विचित्र आणि सहानुभूतीपूर्वक नजरेने लोक त्याच्याकडे आणि कोणत्या ग्रूपबरोबर आलाय म्हणून आमच्याकडे पाहायला लागले आणि आम्हास एकदम मेल्याहून मेल्यासारखे झाले. ते बेअरिंग त्याने शेवटपर्यंत कायम ठेवले आणि ते एवढे हुबेहूब वाटले होते की आम्ही हॉटेलच्या खाली बिल भरून येणाऱ्यांची वाट पाहत होतो; एक जोडपे बिल भरून खाली आले आणि त्यातल्या बाप्याला काही विसरल्याने परत वरती जावे लागले आणि तो खाली येईपर्यंत त्या बाईने सावत्याचा अभिनय पाहिला असावा. आम्हाला पास होताना ती बिचारी नवऱ्याला बिलगून आणि सावत्याकडे तुच्छतापूर्वक कटाक्ष टाकून पाहत जात होती. माझी हसून हसून वाट लागली आणि जाऊन त्या बाईला सांगावेसे वाटले की "अहो, त्याने अजिबात घेतली नाहीये फक्त तो अभिनय करतोय." आयुष्यभर हा प्रसंग विसरू शकत नाही.

प्राणिमात्रांविषयी त्याचे प्रेम तर एवढे अफाट आहे की त्याचे वर्णन करायला शब्द नाहीत. खासकरून त्याच्या गावच्या घराच्या आसपास किंवा त्यांचे पाळीव प्राणी ह्यांच्याविषयी. म्हणजे गाई- म्हशी, रेडे, कुत्रे इत्यादी इत्यादी. ह्यातल्या कुठल्याही प्राण्याला लांबून पाहूनच तो त्यांना काय झालेय किंवा त्यांचा मूड काय आहे वगैरे व्यवस्थित सांगू शकतो. आमच्या ऑफिसच्या जवळच एक टपरी आहे चहाची. तिथे आम्ही कधी चहा प्यायला गेलो की आजूबाजूचे कुत्रे जमा होतात सावत्याच्या भोवताली (म्हणजे ते भूतदया अंगात भिनवलेले गुज्जू, बिस्कीट घेऊन आले की जसे जमतात, तशातला प्रकार नाही बरं का). प्राण्यांना म्हणे sixth sense असतो. त्या sixth senseमुळेच असेल कदाचित, त्यांना त्यांचा स्वामीच आल्यासारखे वाटत असावे ... म्हणूनच आम्हीही सावत्याला


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

'दत्तगुरू' म्हणतो. सध्या तो मोरोक्कोला गेलाय. त्याला तिथल्या सगळ्याच गोष्टी आवडल्या असणार आणि तिथे तो रुळलाही व्यवस्थित, पण तिथली एक गोष्ट त्याला खटकतेय (तो बोलला नाही कोणाला, पण मला नक्की माहितेय) की तिथे त्याचे सवंगडी नाहीत. त्यांचा तिथे मुक्त वावर नाही. पण नक्कीच तो पुष्पकमधील कमल हसनप्रमाणे त्यांचे आवाज ऐकत असणार आणि दर्शन घेत असणार.

आम्ही त्याला परोपरीने समजावून सांगतो की त्याचे क्षेत्र चुकलेय .बरेचसे वेगवेगळे optionही सुचवतो, पण तो त्याला आमची नेहमीची फालतूगिरी समजतो आणि सोडून देतो. ओमानला आल्यापासून मी मिस करत असलेल्या गोष्टींपैकी एक म्हणजे सावत्या आणि इतर BAGPACKERSबरोबर केलेली धमाल. बाकीच्या सगळ्यांना प्रत्येक भेटीत भेटणं शक्य झालेय, पण सावत्या महाराजांचे काही न काही कारणाने अजून दर्शन झालेले नाही आणि पुढील भेटीतही होईल असे वाटत नाही.

सूर्याचे वर्णन काजवा काय करणार? काजव्याचा प्रकाश लिहून लिहून कमी होत चाललाय, म्हणून इथेच आटोपते घेतो.

सावत्या महाराजांना ह्याच शुभेच्छा की बेलापूर - jacobsप्रमाणे मोरोक्को - Jacobsमध्येही सावत्या महाराज प्रसिद्धीस पावतील. आता त्यांच्यातील मोठेपणास अनुसरून ते म्हणतील की "आता तू नाही, मग मला प्रसिद्धी कोण देणार?" पण त्यास माझे इतुकेच म्हणणे आहे की 'हिऱ्याची चकाकी काही लपून राहत नाही'.

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पड्यारमाम

त्याच्या बोलण्यात मंगलोरी वळण लक्षणीय प्रमाणात होते. कसे कोण जाणे, पण तोपर्यंत मंगलोरहून गोव्यात जन्मात पहिल्यांदा आलेला नमुना मी त्या दिवशी पहिल्यांदाच बघत होते. म्हणजे मंगलोरहून येऊन गोव्यात स्थायिक झालेले काही जण भेटले होते. पण त्यांना गोव्यात बरीच वर्षे झालेली असल्याने त्यांची कोंकणी समजण्यात अडचण येत नसे. याच्याशी बोलताना काही दिवस तरी नीट लक्ष देऊन ऐकावे लागणार आहे, हे लगेच लक्षात आले.

**पैसा**



कवळे शाखेत बदली झाली, तेव्हा शाखा घराजवळ असल्याने मोठ्या उत्साहाने जॉइनिंग टाईम न घेता शाखेत दुसऱ्याच दिवशी हजर झाले. शाखेत पाय ठेवला, तेव्हा मॅनेजरची केबिन रिकामी होती. काउंटरवरचे काही चेहरे ओळखीचे होते. एक नवाच अनोळखी चेहरा 'मे आय हेल्प यू' काउंटरवर बसला होता. त्याचे वय बघता हा नवा क्लार्क नव्हे, हे सहजच लक्षात येत होते. चेहऱ्यावर भरपूर पावडर चिकटून बसलेली, कसला तरी उग्र वासाचा सेंट मारलेला आणि कपाळावर गंध. मात्र चेहऱ्यावर अगदी खरेखुरे हसू होते.

"अरे ज्योती, तू आयले गो?" (अरे, ज्योती, तू आलीस का?) म्हणत मोहिनी भट पुढे आली. तोपर्यंत शरद पेंडसेही माझ्यामागोमाग येऊन पोहोचला. शरद हे एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व. त्याच्याकडे बघून अगदी बाजीराव पेशवा कसा दिसत असेल याची कल्पना यावी. खूपच हुशार. मात्र घरच्या काही अडचणींमुळे कधीच प्रमोशनच्या वाटेला न गेलेला. तो कधीतरी कवळे शाखेत येऊन गेला असावा. कारण त्याने येताच काउंटरवरच्या माणासाला हात दिला. "पड्यारमाम, कसो आसा तू?" (पड्यारमाम, तू कसा आहेस?) "हे ज्योती कामत. हाजीय मज्याबरोबर हांगा ट्रान्स्फर जाल्या." (ही ज्योती कामत. हिचीही माझ्याबरोबर इथे ट्रान्स्फर झाली आहे.")

"यो गो! वेल्कम!"

"जॉईनिंग रिपोर्ट दिउपाक जाय न्ही?" (जॉइनिंग रिपोर्ट द्यायला पाहिजे ना?) मी.

"मॅनेजरु नांति. सोमवारा येउच्याक पुरो. ते रिपोर्ट गिपोर्ट कडेर पळोवका." (मॅनेजर नाहीत. बहुधा सोमवारी येतील. ते रिपोर्ट वगैरे नंतर बघायला हवे."

त्याच्या बोलण्यात मंगलोरी वळण लक्षणीय प्रमाणात होते. कसे कोण जाणे, पण तोपर्यंत मंगलोरहून गोव्यात जन्मात पहिल्यांदा आलेला नमुना मी त्या दिवशी पहिल्यांदाच बघत होते. म्हणजे मंगलोरहून येऊन गोव्यात स्थायिक झालेले काही जण भेटले होते. पण त्यांना गोव्यात बरीच वर्षे झालेली असल्याने त्यांची कोंकणी समजण्यात अडचण येत नसे. याच्याशी बोलताना काही दिवस तरी नीट लक्ष देऊन ऐकावे लागणार आहे, हे लगेच लक्षात आले.

"बरे. माका काउंटर खंचो तो दाखय." (बरं, मला काउंटर कोणता तो दाखव.)

"हांग बैस." (इथे बस) म्हणत मला त्याने सेव्हिंग बँक काउंटरवर नेऊन बसवले. शरदला काउंटर रिकामा नसल्याने पाठीमागे बसून स्टेटमेंट्स, रिटर्न्स कर म्हटले.

संध्याकाळी स्लिपांच्या टोटल चेक करता करता पड्यारमामसोबत बऱ्याच गप्पा झाल्या. तो रिटायरमेंटच्या जवळ पोहोचलेला साधा कुटुंबवत्सल माणूस होता. बँकेतले महत्त्वाचे समजले जाणारे अॅडव्हान्सेस वगैरेची त्याला फार माहिती नव्हती. त्यापूर्वी कित्येक वर्षे आमच्या बँकेत प्रमोशन्स झालेली नव्हती. जेव्हा थोडीफार प्रमोशन्स सुरू झाली, तेव्हा रिटायरमेंटच्या जवळ पोहोचलेल्या लोकांना एखादी ट्रॉफी दिल्यासारखी एकेक प्रमोशन देऊन बँकांच्या दृष्टीने त्यातल्या त्यात चांगल्या सेफ गोवा आणि कोकणात पाठवले होते. त्यात याचाही नंबर लागलेला. आयुष्यात प्रथमच घर सोडून लांब राहिला होता. घरी सगळे छान होते. दोन्ही मुले शिकून नोकरीला. बायको खंबीरपणे सासू-सासऱ्यांना सांभाळणारी. तेव्हा याला बँकेला सोडून दिला होता म्हणायला हरकत नव्हती. तब्बेत छान. सडपातळ, मध्यम बांधा आणि चेहऱ्यावर कायम प्रसन्न हसू.

बोलता बोलता त्यानेही माझ्याकडून सगळी माहिती काढून घेतली. "घरालागी कोण कोण अस्सां?" (घरी कोण कोण आहेत?)

"एक चली आणि एक चलो" (एक मुलगी आणि एक मुलगा.)

"तांका कोणे पळोवचे?" (त्याना कोण बघते?)

"एकटी सर्व्हंट आसां. सकाळी येऊन सांची वतां." (एक सर्व्हंट आहे. सकाळी येऊन संध्याकाळी जाते.)

"व्हय गो, तुगेलो बाम्मुण कसलं करतां?"

यावर मी त्याच्याकडे आ वासून बघत राहिले. त्याचे बोलणे समजून घेताना माझे डोके बंद होणार हे माझी स्टाफमधली नवी मैत्रीण वीणा समजून होती. ती त्याच्याच गावची. लग्न होऊन गोव्यात येऊन तिला बरीच वर्षे झालेली. त्यामुळे गोव्यात चांगली मुरली होती. ती शेजारीच बसली होती. "अगो, बाम्मुण म्हळ्यार घो" (अग, बाम्मुण म्हणजे नवरा) म्हणत ती हसत सुटली. मलासुद्धा हसायला येऊ लागले. "मजो घो पाळे ब्रँच स्टाफ आसां" (माझा नवरा पाळे ब्रँच स्टाफ आहे.)

"मोगान लग्न कित गो!" (प्रेमाचे लग्न की काय गं?)

"हय, म्हणून बँकेन आमका हांगा येऊपाची पनिशमेंट दिल्या." (होय, म्हणून बँकेने आम्हाला इथे यायची पनिशमेंट दिली आहे) म्हटले.

तेवढ्यात काम संपले. घर तसे जवळ असल्याने आम्हाला बायकांनासुद्धा संध्याकाळी फ्रेश वगैरे व्हायची गरज वाटत नसे. मात्र पड्यारमाम ही अजब वल्ली होती. पाच वाजले की वॉशरूममधे जाऊन त्याचा सेंट-पावडरसह साग्रसंगीत मेकप व्हायचा. आम्ही त्यावरून त्याची किती वेळा चेष्टा केली असेल, पण त्याला ढिम्म फरक नव्हता.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

हळूहळू सगळ्या स्टाफशी ओळख झाली. काही जण माझ्या आधीपासून ओळखीचे होते. अंजनीसोबत मी आधी म्हापश्याला काम केले होते. तीही खूप हुशार, पण काम पटापट करून बाहेर पडायच्या फिकिरीत. ते कसं होतंय हे बघायची भानगड नाही. आणि कमालीची फटकळ. तिची सगळीकडे सुपर घाई. तर पड्यारमाम कुठे एक शब्द बोलायला मिळाला की अर्धा तास बोलतच बसणार. मग तिकडे कोण कस्टमर ताटकळत बसू दे की स्टाफ चेकिंगला ये म्हणून बोंबलत बसू दे. हा आपले बोलणे संपवूनच उठणार. मारियान म्हणून एक कॅथॉलिक शिपाई होता. तोही एक नमुनाच. पड्यारमामची मंगलोरी कोंकणी आणि मारियानची साष्टीची कॅथॉलिक कोंकणी यांच्यामध्य आमच्या बाकी लोकांच्या कोंकणी अध्येमध्ये अंग चोरून कुठेतरी उभ्या राहायच्या.

पड्यारमामची पेंडिंग कामांची एक पुस्ती होती. सकाळी स्ट्राँगरूम उघडताना रोज पड्यारमाम धार्मिकपणे ती पुस्ती बाहेर काढायचा. त्यात लोकांचे सह्या घेऊन ठेवलेले लोन अॅग्रीमेंट्स, त्याने सह्या करायचे उरलेले फॉर्म्स, बँकेच्या हेडऑफिसची न वाचलेली सर्क्युलर्स असे काय काय जादुई म्याटर असायचे. बोलण्याच्या नादात यातले काहीच त्याच्या हातून व्हायचे नाही आणि संध्याकाळी ती पुस्ती आणखी चारदोन कागद घेऊन परत आत जायची! पड्यारमामची पेंडिंग पुस्ती हा आमचा कायमचा चेष्टेचा विषय होता. तो मात्र त्याबद्दलची चेष्टा मनाला लावून घेत नसे.

हळूहळू आपण ऑफिसरांना आणि बाकी क्लार्कांना कामाला लावले पाहिजे, हे मॅनेजरने त्याच्या गळी उतरवले. अंजनी आपले काम संपवून बडबड करत बसायची किंवा मग घरी जाते म्हणून निघून जायची. एक दिवस पड्यारमामला काय वाटले कोणास ठाऊक. संध्याकाळी सेव्हिंगचे काम संपल्यावर त्याने अंजनीला हाक मारली.

"व्हय गो अंजनी, कस्सलं करतां तुव्व?" (ए अंजनी, काय करते आहेस?)

"काई ना पड्यारमाम, कस्सलं काम करकां व्हय?" (काही नाही पड्यारमाम, काही काम करायचं आहे का?)

"हय गो, ह्ये लोन अॅग्रीमेंट चिक्के बरोवन दी पळोवया." (हे लोन अॅग्रीमेंट जरा भरून दे बघू.)

"दी हाड पळॉवया. पुणि कशी बरोवकां ते? हांवे जन्मात असले काम केले ना." (दे बघू. पण कसे लिहायचे ते? मी जन्मात कधी असले काम केलेले नाही.)

पड्यारमामने लगबगीने आत जाऊन तिला दुसरे एक अॅग्रीमेंट आणून दिले.

"घे. आसां तश्शी बरय." (घे, आहे तसेच लिहून काढ.)

तिने पटापट लिहून दिले. आणि पाच वाजले तसे आम्ही घरी पळालो.

दुसऱ्या दिवशी बॅंकेत आले, तर पड्यारमाम काउंटरवर कपाळाला आठ्या पाडून चश्मा नाकावर ठेवून चश्म्याच्या वरून अंजनीकडे रागाने बघत असलेला सापडला. रीडिंग ग्लासेस नाकावर ठेवून तो नेहमी त्याच्या वरून समोरच्याकडे बोलायचा. तेही जाम मजेशीर दिसे.

"कन जालें?" (काय झाले?) वीणा म्हणाली.

"वय गो, हिका हांवे कस्लं सांगले? तू अॅग्रीमेंट आस्स्सा तश्शे बरय. हिणे तश्शे बरोवचें वय? मात तरी माथे युज करच्या नजो?" (अग, मी हिला काय सांगितले, आहे तसे लिही. तिने अगदी तसेच्या तसे लिहायचे का? जराही डोके वापरू नये?)

"गलाट नाका. तुवें सांगला तश्शी हांवे सरसरी बरयलां. माका तुवें समां सांगका अशिले. मगली काय मिश्टेक ना." (ओरडू नको. तू जसे सांगितलेस तसेच मी भराभर लिहिले. तू मला नीट सारखे काय ते सांगायचे होतेस. माझी काही चूक नाही.) इति अंजनी ठामपणे.

मी अॅग्रीमेंट हातात घेऊन बघितले. जुन्या अॅग्रीमेंटची कॉपी म्हणजे I XYZ son of ABC residing at H. No. Kavlem Goa वगैरे सगळे तिने जसेच्या तसे - एक अक्षराचा फरक न करता लिहिले होते. दोन्हीत फरक एवढाच की त्यावर सह्या वेगवेगळ्या माणासांच्या होत्या! ते बघून मी पोट धरून हसायला लागले. बाकी सगळ्यांना कळताच आख्खी बँक खुर्चीतून खाली पडायच्या बेताला आलेली. त्या सगळ्यांसोबत पड्यारमामसुद्धा मग आपला राग विसरून मोठ्याने हसायला लागला! कहर म्हणजे तिने काय लिहिले हे न बघताच पड्यारमामने आपली सही करून अॅग्रीमेंट पेपर मॅनेजरला नेऊन दिले होते आणि तिथे अर्थातच त्याची छान तासंपट्टी झाली होती. पण सगळे हसले, तसे पड्यारमाम ते लगेच विसरला! हा "असा तश्शी बरय"चा किस्सा त्या ब्रँचमध्ये लिजंडरी होऊन राहिला आहे.

पड्यारमाम तसा भारी चिकट. मुद्दाम पैसे खर्च करून फार तर कोणाला चहा कधी द्यायचा इतकेच. सगळा स्वयंपाक घरी व्यवस्थित करून नीट डबा घेऊन बँकेत यायचा. त्याच्यामते काही खास केले असेल तर आम्हाला त्यातले नमुने चाखायला मिळत. त्याच्यामुळेच घशी, बेंदी, आंबट, वाळी भाजी, सॉंग वगैरे पदार्थांशी ओळख झाली. संध्याकाळी स्लिपा चेक करता करता "पड्यारमाम, आयज किते रांधले तुवें?" (पड्यारमाम आज काय स्वयंपाक केलास?) म्हटले की हातातल्या स्लिपा तिथेच राहायच्या आणि पड्यारमाम त्या दिवसाच्या पदार्थाची रेसिपी सुरू करायचा. त्यातला एखादा पदार्थ घरी केला तर नवरा कधीतरी आवडीने खायचा, कधीतरी त्याला त्या एकसारख्या वाटणाऱ्या मसाल्यांचा वैताग यायचा.

एकदा त्याने कसले तरी डोसे हल्दी म्हणून सांगितले. सगळ्या डाळी भिजत घालून वाटून काहीतरी प्रकार होता. वीणा त्याच्या गावची असून तिला माहीत नसलेला प्रकार होता. तिने मोठ्या उत्साहाने ते डोसे करून नवऱ्याला खायला घातले. तो मरणाचा फटकळ. त्याने एक घास तोंडात घातला आणि तो वैतागला. "ह्ये कसलं केलं गो तुवे! वच तेकड! त्या पड्यारमामाकच व्हरून दी ते दोसे!" (हे काय केलंस गं तू! जा पळ, त्या पड्यारमामालाच तुझे डोसे नेऊन खाऊ घाल!"

झालं होतं असं की कृती सांगताना पड्यारमाम मीठ घाल हे सांगायला विसरला होता. वीणाने किती शिव्या दिल्या, तरी त्यानंतरही त्याचे रेसिपी सांगणे बंद झाले नाहीच! विचारले की त्याचे सुरू व्हायचे. "एक बटाट घेउका, एक पियांव घेउका..." (एक बटाटा घ्यायचा, एक कांदा घ्यायचा....) हे काही काही त्याचे टिपिकल मंगलोरी कोंकणीतले शब्द तो बोलायचा. त्याला पर्यायी गोव्यात काय म्हणतात ते त्याला आठवायचे नाही. मग वीणा कायमची दुभाष्या. इंग्लिश प्रतिशब्दही त्याला पटकन आठवायचे नाहीत. मग हातवारे करून काही असेल, पण त्याचे बोलणे कधी थांबायचे नाही. येईल ती भाषा धडकून बोलत जाणे हा मोठाच गुण त्याचा. फक्त हिंदीत बोलायची वेळ आली की मात्र जाम गोंधळ व्हायचा. आणि बरेचदा ती वेळ यायची, कारण येणाऱ्या कस्टमर्सना त्याची कोंकणी नीट कळायची नाही. मग एखादा हप्ता चुकवणाऱ्या कोणा धनगराशी पड्यारमाम हिंदीत वाद घालायचा. ते मोठे मजेशीर प्रकरण असायचे. आम्ही स्टाफ एकीकडे हसून लोळतोय, मध्ये गोंधळ वाढवायला मारियानची साष्टीची कोंकणी. शेवट मॅनेजर शुद्ध मराठी बोलून सगळ्यांची सुटका करायचा.

कस्टमर पैसे पुढच्या वेळी भरतो म्हणून मुंडी हलवत गेला की पड्यारमाम डोळे मिचकावत हसून म्हणायचा, "पळयले वय! हांका अश्शी जोर करका. जाल्यार ते पैशे भरतले. " (यांना असेच ओरडले पाहिजे, तरच ते पैसे भरतील.) त्याच्या रिकव्हरीची पद्धत बघून रिकव्हरी एजंटांनीसुद्धा तोंडात बोट घातले असते!


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

एक दिवस संध्याकाळची गोष्ट. एका मोठ्या कॅश क्रेडिटचे रिन्युअल पुरे झाले होते. नियमाप्रमाणे सगळ्या लोन पेपर्सची एक कॉपी रिजनल ऑफिसला पाठवायची असते. मारियानने पेपर्सच्या झेरॉक्स कॉप्या करून आणल्या. त्या सॉर्ट करून झाल्या. आम्ही आपापल्या कामात बिझी होतो. जरा वेळाने मारियानने एक गठ्ठा काउंटरवर आणून ठेवला.

"अय शरद, मातसो लक्ष दोर. हांव फस्का हाट्टां." (शरद, जरा लक्ष ठेव. मी काडेपेटी आणतो.)

"फस्कां कित्या रे?" (काडेपेटी कशाला रे?)

"पड्यारमाम पिसावलो. हांये ह्यो पेपर्स आता झेरॉक्श कोरुनू हाडल्याइ आनि व्हो माका ते पेटय म्हन सांगतां. माका कितें हा? हाव फस्का हाड्नु उजो घालतां." (पड्यारमाम येडा झालाय. आता मी झेरॉक्स करून आणल्यात आणि हा ते 'पेटव' म्हणून सांगतो. मला काय करायचंय? मी काडेपेटी आणून आग पेटवतो.)

"ए, रांव रांव रांव!" (ए, थांब, थांब, थांब!)

बोलता बोलता शरद आणि वीणा खुर्चीतून पडायला आले. पड्यारमामने "पेटय" म्हणजे मंगलोरी कोंकणीत 'पाठव' असे सांगितलेले. मारियान ते गोव्याच्या कोंकणीत 'आग लाव' असे समजला होता! झाले! दोघांची पुन्हा जुंपली आणि मग सगळेच हास्यकल्लोळात बुडून गेले.

मग हळूहळू सगळ्याना मंगलोरी कोकणीची सवय झाली. इतकी की मारियान माझ्या नवऱ्यालासुद्धा कामत माम म्हणायला लागला! खरे तर माम म्हणायची पद्धत मंगलोरची. आदरार्थी माम आणि माई असे संबोधन वापरतात. गोव्यात असे काही म्हणायची पद्धत नाही. पण पड्यारमामची चेष्टा करता करता सगळेच आधी गंमत म्हणून आणि मग सवयीने मंगलोरी कोंकणी बोलू लागले. मी तर इतकी फ्लुएंट बोलायचे की नंतर आलेल्या मंगलोरच्या लोकांना मी त्यांच्या गावची म्हणून जास्तच आपुलकी वाटायची.

पड्यारमाम अतिशय भाविक. आणि शांत. एखाद्याने किती शिव्या दिल्या तरी त्याच्याशी भांडणे त्याला कधी जमले नाही. कवळे मठाच्या स्वामींच्या पाया पडताना त्याला खूप आनंद व्हायचा. स्वामींना भेटल्यानंतर त्याचा चेहरा अगदी भाविकतेने फुलून यायचा. चिकित्सक मी, छुपा नास्तिक शरद पेंडसे कधीही त्याचा आनंद हिरावून घेऊ शकलो नाही. आपण लहान असताना मठाच्या मालकीच्या आंब्याच्या कैऱ्या पाडल्या की जुने स्वामी कसे घाण शिव्या देत अंगावर यायचे, याची स्टोरी एक जण सांगत होता तेव्हाही पड्यारमामची श्रद्धा कमी झाली नाही.

संतापून कोणाला कधी पड्यारमाम फडाफड बोलतोय असे झाले नाही. चुकीचे काही दिसले की आरडाओरड करणारी युनियन कार्यकर्ती मी, जिभेच्या जागी तलवार असलेला शरद पेंडसे, सरळ स्वभावाची आणि तिरकस बोलणारी वीणा, कडक मॅनेजर आणि काही कामचुकार पण जिभेवर साखर पेरलेले नमुने असली सगळी ब्रँचमधली सर्कस, जन्मात पहिल्यांदाच मिळालेले प्रमोशन, संपूर्ण नवे गाव, भाषा या सगळ्याशी जमवून घेत पड्यारमाम कसा राहिला होता, देव जाणे! आणि तरीही सतत चेहऱ्यावर खरेखुरे हसू बाळगणे सोपी गोष्ट नव्हती.

यथावकाश पड्यारमामची एक टर्म शिल्लक राहिली आणि मग त्याच्या गावाला त्याची ट्रान्सफर झाली. जातानाही पड्यारमाम आनंदाने सगळ्यांचा निरोप घेऊन गेला. नंतर एक-दोन वेळा तो ब्रँचमध्ये येऊन गेल्याचे कळले. पण तेव्हा मी पणजीला असल्याने भेट झाली नाही. आता पड्यारमाम पंचाहत्तरीला पोहोचला असेल.

कधीतरी पड्यारमामच्या गावाला जायचे आहे. पड्यारमाम आनंदाने स्वागत करील. "जाणतेली जाली मगो तुव्व" (म्हातारी झालीस ना गं तू!) म्हणेल. वर "खुशाल केली हां!" (चेष्टा केली हां.) त्याच्या गावाला जाऊन आता पंचाहत्तरीला पोहोचल्यावरही पड्यारमाम पावडर तश्शीच फासतो का, हे बघायचे आहे आणि मुख्य म्हणजे त्याचा 'सुखी माणसाचा सदरा' बघायचा आहे पुन्हा एकदा!

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# बाळासाहेब xxx (पाहिजे तर लोखंडे म्हणू!)

कॉलेजमध्ये बाळ्याचा दिवस कॉलेजच्या ग्रंथालयातच जायचा. अवांतर वाचन अफाट. अभ्यास केव्हा करायचा कोण जाणे, पण याचा नंबर कायम पहिल्या पाचात. एकदा रसायनशास्त्राच्या वर्गात बाळ्याने एक गणित सोडवले. त्याचे उत्तर काही सरांच्या उत्तराशी जुळत नव्हते. सरांनी जरा जास्त ताणल्यावर बाळासाहेबांनी भर वर्गात उत्तर दिले, ''सर, इफ आय ॲम राँग, देन बॉईल्स लॉ इज राँग.'' चिडून सरांनी बाळ्याला वर्गातून हाकलून दिले, पण नंतर त्याला बोलावून घेतले....

**जयंत कुलकर्णी**



मागच्या एका कथेत आपण आमच्या मालोजीरावांबद्दल ऐकले. मालोजीरावांची जीवनगाथा म्हणजे एक अद्भुत कादंबरी सहज होईल. पण आज आपण त्यापेक्षाही अद्भुत अशा आमच्या मित्राबद्दल वाचणार आहोत. मालोजीराव काय आणि बाळासाहेब काय, अशी माणसे या पृथ्वीतलावर जन्म घेतात असे कोणी मला आत्ता सांगितले, तर मी त्याला निश्चितच मूर्खात काढेन.

बाळासाहेब काही आमच्याबरोबर इंजीनिअरिंग कॉलेजला नव्हता. तो आमच्याबरोबर होता एफवायपर्यंत. त्याला आमच्याबरोबर इंजीनिअरिंगला प्रवेश मिळाला होता, पण त्याने तो नाकारला आणि परत बी ग्रूप घेऊन एफवायला बसला. बाळासाहेबांना हे असले सहज शक्य होते, कारण ते कमालीचे बुद्धिमान होते. मधून मधून बाळ्या आणि बाळासाहेब म्हटले की अहोजाओ हा घोळ तुम्ही कृपया चालवून घ्या, कारण तो घोळ केवळ त्याच्या नावामुळे आहे. पण त्याची आणि आमची मैत्री नसती, तर मला त्याला आदराने बाळासाहेब म्हणूनच संबोधायला आवडले असते. आमच्या कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये साहेब मालोजीरावांचे रूम पार्टनर म्हणून राहत असत. हॉस्टेलवरील दोन खोल्या म्हणजे १०१ व १०२ म्हणजे आमचा अड्डाच झाला होता म्हणा ना. एकात बाळासाहेब व मालोजीराजे राहत, तर दुसऱ्यात कलीम व भट्या राहायचे.

माझ्यात आणि या मित्रांमध्ये एक जवळीक निर्माण झाली होती ती माझ्या आईवडिलांमुळे. माझे वडील होते भारतीय वायुदलाचे एक निवृत्त सैनिक. कुठल्याही धार्मिक अवडंबरावर त्यांचा काडीचाही विश्र्वास नव्हता. आई थोडेफार देवाचे करायची, पण ब्राह्मणाचे घर असून आमच्या घरात पार स्वयंपाकघरापासून देवघरापर्यंत सगळ्यांना मुक्त प्रवेश असायचा. यात हे माझे मित्रही आले. या गोष्टीचे त्यांना फार अप्रूप वाटायचे. त्या काळात आमच्या शहरात ही बाब तशी विशेष मानली पाहिजे. आमच्या काही नातेवाइकांनी तर आमचे नावही टाकले होते...पण आम्हाला काही फरक पडत नव्हता, कारण नव्या पिढीचा हळूहळू उदय होत होता व अर्थकारणाला देशात व व्यक्तिगत पातळीवर महत्त्व प्राप्त होऊ लागले होते. हे आमचे हॉस्टेलवरचे मित्र हॉस्टेलच्या जेवणाचा कंटाळा आला की हक्काने आमच्याकडे जेवायला येत. पोटभर जेवत. (हॉस्टेलवरच्या जेवणाबद्दल मी लिहीत नाही, कारण जे कुठल्याही हॉस्टेलवर राहिले आहेत, त्यांना त्यात नवीन काही नाही.) आम्हीही सुट्टीत बाळासाहेबांच्या शेतावर असलेल्या घरी जात असू...

बारामतीच्या पुढे एका आडगावात बाळासाहेबांची दहा-बारा एकर जमीन होती. घर चांगले सुखवस्तू होते, कारण बाळासाहेबांसकट त्याचे तीन भाऊ अत्यंत बुद्धिमान होते. सगळ्यात मोठा इंजीनियर झाला व सरकारी नोकरी करत होता. दुसरा इंजीनियर झाला आणि एका मोठ्या कंपनीत चांगल्या हुद्द्यावर होता. तिसरा माझगाव डॉकवर कंटेनर हलवायचे काम करीत असे. त्याच्याकडे भले मोठे वीस ट्रक व ट्रेलर होते असे म्हणतात आणि बाळासाहेब आता त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत कोणीतरी मोठे होण्याच्या मार्गावर होते. सगळी भावंडे हडकुळी, जणू काही दुष्काळातून आल्यासारखी दिसायची. त्यात सगळ्या हडकुळा म्हणजे आमचा बाळ्या. उंच मान, गालफाडे वर आलेली व सदानकदा केसांना लावलेल्या तेलाने केस चमकत. ओठ पातळ. दात पांढरेशुभ्र. बारीक तलवार कट मिशा. बाळ्याच्या हनुवटीवर एक तीळ होता, हे मला अजून आठवते आहे. वाचताना त्याच्या कपाळावर आठ्यांचे जाळे आवळले जायचे व तो थोडासा चिडल्यासारखा दिसे. यावर त्याचे म्हणणे होते, "बरंय ना. कोणी त्रास द्यायला येत नाही." बाळ्या केसांचा भांग अगदी व्यवस्थित पाडायचा. त्याला एकही केस इकडे तिकडे झालेला चालायचा नाही. सकाळची कमीतकमी १० मिनिटे तरी भांग पाडण्यात घालवे स्वारी. बाळ्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याने अंगाला कधीही साधा सदरा लावला नाही. स्ट्राईप्स म्हणजे बाळासाहेबांचा जीव का प्राण. मालोजीच्या बरोबर विरुद्ध. बाळासाहेब पायात कायम कोल्हापुरी पायताणे घालायचा. असा हा बाळासाहेब बाहेर निघाला की आम्हाला धनगरी कुत्र्याची आठवण यायची. आम्ही त्याला तसे चेष्टेने म्हणतही असू. त्यावर त्याचे उत्तर ठरलेले असे, ''धनगरच आहोत आम्ही.'' बाळ्याचे वाचन दांडगे. ज्याप्रमाणे नाव शेवटी बंदराला आसऱ्याला येते, त्याप्रमाणे आमचे बाळासाहेब शेवटी ग्रंथालयात हमखास सापडायचे. मला आठवते आहे, कचऱ्यात पडलेला कागदाचा चिठोराही तो वाचून काढायचा. वाचनामुळे बाळ्याचे इंग्लिश, मराठी उत्तम होते. एखाद्या इंग्लिश पुस्तकाबद्दल ऐकावे तर त्याच्याकडूनच. त्याच्या तोंडून इंग्लिश सिनेमाच्या गोष्टी ऐकताना आम्ही गुंगून जायचो. हे सगळे वैभव असताना त्या घराचे पाय मात्र जमिनीवर होते. एकदा आम्ही त्याच्या वस्तीवर गेलो असताना मी स्वत: माझ्या डोळ्याने पाहिलेय, त्याचे म्हातारे वडील मुंडासे सांभाळत लटपटत गव्हाचे एक पोते ट्रकमध्ये चढवत होते. म्हातारा होता काटक, पण ते आता त्याला शक्य नव्हते. इतरांनी मदत केल्यावर ते पोते कसेबसे गाडीत चढले. गाडीही यांचीच. मी म्हटले, '' बाळासाहेब, आता म्हाताऱ्याला विश्रांती द्या की!''

''अरे, ते ऐकत नाहीत. पहिले पोते मीच चढवणार म्हणतो म्हातारा. जाऊ देत, एक दिवस थांबेल...'' बाळासाहेब कौतुकाने म्हणाले.

बाळ्याच्या घरात गेल्यावर आमची चंगळ असायची. मटण खावे तर बाळ्याच्या आईच्या हातचेच. ताजे मटण व खास धनगरी पद्धत. जरी शहरात शिकायला असले, तरी बाळ्याला शेतीवाडीची पूर्ण कल्पना होती. वडलांचे मुंडासे बाळ्या सहजपणे बांधत असे आणि तेसुद्धा एकदाही न चुकता. धनगरी मुंडासे बांधण्यास किती अवघड असते हे मी तुम्हाला सांगायला नको. अर्थात आता कोणीच त्या पद्धतीने बांधत नाही म्हणा. आपण सध्या जे पाहतो ते सगळे उत्तरेच्या पद्धतीचे. बाळ्याची आई सडपातळ, अंगाने शेलाटी, हालचालीत चपळ. सगळी मुले तिच्यावरच गेली होती. कष्टाला त्या घरात कोणीही हार मानणारे नव्हते. कष्ट शारीरिक असोत किंवा बौद्धिक.

कॉलेजमध्ये बाळ्याचा दिवस कॉलेजच्या ग्रंथालयातच जायचा. अवांतर वाचन अफाट. अभ्यास केव्हा करायचा कोण जाणे, पण याचा नंबर कायम पहिल्या पाचात. एकदा रसायनशास्त्राच्या वर्गात बाळ्याने एक गणित सोडवले. त्याचे


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

उत्तर काही सरांच्या उत्तराशी जुळत नव्हते. सरांनी जरा जास्त ताणल्यावर बाळासाहेबांनी भर वर्गात उत्तर दिले, ''सर, इफ आय ॲम राँग, देन बॉईल्स लॉ इज राँग.'' चिडून सरांनी बाळ्याला वर्गातून हाकलून दिले, पण नंतर त्याला बोलावून घेतले....

''बाळासाहेब, तुमचे बरोबर आहे. पण लक्षात घ्या, माझे चुकले होते. तुम्हाला वर्गातून हाकलले ते तुम्ही बॉईल्सची अक्कल काढली म्हणून. तुम्ही पुढे मोठ्ठे व्हाल, पण कुठल्याही प्रकारचा माज हा वाईटच, हे चांगले लक्षात ठेवा...'' बाळ्याने हे मात्र आयुष्यभर लक्षात ठेवले. पण बाळासाहेबांच्या नशिबाला हे मान्य नव्हते. त्याने माजल्यासारखे बाळ्याला छळायला सुरुवात केली. मधल्या काळत आम्ही इंजीनिअरिंगला गेलो व बाळ्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधे बीएस्सी करायला गेला. त्या काळात संपर्काची सोय आजच्याएवढी नव्हती. संपर्क कमी होत गेला.

मध्ये एकदा भेटला, तेव्हा त्याने त्याच्या घराची कशी धुळधाण उडाली, ते सांगितले. अमानवी शक्ती - म्हणजे आजकालच्या भाषेत डार्क स्पिरिट्स - दुष्ट प्रवृत्ती जन्माला घालतात असे मानायचे काही कारण नाही. तोडीचा दुष्टपणा करण्यास माणूस पुरेसा आहे.... असे कोणी तरी म्हटले होते..

पहिल्या दोन भावांचा खून झाला, तिसरा जीव वाचविण्यासाठी पळून गेला. वडील वारले होते व आईने गाव सोडून माहेरी आसरा घेतला होता. (तीही नंतर खंगून वारली.) हे सगळे झाले भाऊबंदकीमुळे, असे त्याचे म्हणणे होते. दादागिरी करणारे, दडपशाही करणारे, किंवा इतरांचे हक्क हिंसेने पायदळी तुडविणारे हे गुन्हेगार आहेतच, पण त्यांचा सगळ्यात मोठा गुन्हा हा आहे की ज्यांच्यावर त्यांनी अत्याचार केले आहेत, त्यांना ते या नवीन मार्गाची ओळख करून देतात.... त्यामुळे तिसऱ्या भावाने दोन-चार मुडदे पाडले व तुरुंगात गेला. खरे खोटे त्यालाच माहीत. पण बाळासाहेबांनाही अवकळा आली होती, हे खरे.

''काय रे! मग तुझ्या शिक्षणाचे काय?''

''चालू आहे मालोजीराजांच्या कृपेने.'' बाळ्या म्हणाला.

''मी केली असती मदत शक्य असते तर, पण ते म्हणजे 'उघड्यापाशी नागडं गेलं आणि थंडीनं काकडून मेलं' असं झालं..'' मी म्हणालो.

''मग आता काय विचार आहे?''

''मला अमेरिकेत जाऊन संशोधन करायचे आहे... आहेत डोक्यात काही कल्पना. जेनेटिक्समध्ये काम करायचंय मला. मला काजूचे गुणधर्म असणारे शेंगदाणे तयार करायचे आहेत....मालोजीनेही मदत करण्याचं वचन दिलं आहे... बघू या काय होतंय ते.... नाही, म्हणजे करायचंच आहे मला...'' ते ऐकून आम्ही पडायचेच बाकी होतो. इतरांनी त्याची येथेच्छ टिंगलटवाळी उडवली. मी मात्र गप्प होतो. बाळासाहेब मृगजळाच्या मागे धावणाऱ्यांपैकी नाहीत, हे मला पक्के माहीत होते.

''बुडाले म्हणायचे आमचे पैसे!'' मालोजी.

''बाळासाहेब, गंमत केली बरं का...नाहीतर बसाल गप्प...'' मालोजी म्हणाला.

अनेक वर्षे गेली. मालोजी अमेरिकेत गेला आणि त्याने बाळ्यालाही तेथे जाण्यास मदत केली. आमच्यातील अंतर वाढले आणि घसटही कमी झाली. पण शाळा-कॉलेजातील मैत्रीत एक गुण असतो, तो म्हणजे त्या मैत्रीला काळ आणि अंतर याचे बंधन नसते. कितीही वर्षांनी भेटा, कुठेही भेटा, मधली वर्षे गाळून परत त्या भेटीपर्यंत आपण त्याच क्षणी परत येतोच. परिस्थितीशी भांडण्याचे सुरुवातीचे दिवस होते ते. यश-अपयश पचवत सगळ्यांचीच वाटचाल चालू होती. मधेच केव्हा तरी मालोजीचा फोन येई. आम्ही फोन करायचा प्रश्नच नव्हता. परवडणेच शक्य नव्हते. फोनवर आम्ही बाळासाहेबांचीही चौकशी करायचो.

''त्याचे ठीक चालले आहे. एका गोऱ्या मुलीशी प्रकरण चालू आहे. बहुधा लग्न करतील ते. माझे सगळे पैसे व्याजासहित परत केले, बरं का त्याने! मी व्याज नको म्हणत होतो, पण धनगराने ऐकले नाही.'' आम्ही आपापसात आमच्या जातीचा अगदी आरामात उल्लेख करायचो. कोणालाच त्याचे काही वाटत नसे, कारण एकमेकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची व आदराची आम्हाला सगळ्यांनाच खातरी होती. मुख्य म्हणजे आम्ही जेव्हा (एकमेकांची) जात काढत असू, तेव्हा त्या जातीचे फक्त चांगले गुणच आमच्या मनात असत. हिणवण्याचा प्रश्नच नसे.

''मग चांगलंय की. भेटतो की नाही कधी?''

''छे रे! तो दुसऱ्या टोकाला आणि मी दुसऱ्या. विमानानेच चार तास लागतात. बघू या, लग्नाला बोलवतोय का... त्याने बोलावले तर मात्र मी जाणार आहे.''

''तुमचे काय मालोजी? काही प्रकरण?'' मी हसत विचारले.

''आमचे झाले एकदाच प्रकरण... आता काही होईल असे वाटत नाही...'' मालोजी.

''पण त्याचे काय चालले आहे? ते काजू आणि शेंगदाणे... त्याचे पुढे काय झाले?"

''चेष्टा करू नकोस. तो जेनेटिक्समधला बाप माणूस समजला जातो आता. मोन्सँटोमध्ये मोठा साहेब आहे आता तो. काहीतरी म्हणत होता तो की त्याचे संशोधन प्राथमिक अवस्थेत असले, तरी योग्य मार्गावर आहे...''

''येणार आहे का इकडे?''

''त्याचे संशोधन संपत आले की मग तिकडे त्याच्या फील्ड ट्रायलसाठी येणार आहे असे म्हणत होता...''

त्यानंतर बरीच वर्षे त्या दोघांची काहीच खबरबात नव्हती. एक दिवस मीही ॲग्रिकल्चरल कॉलेजमधे जाऊन जेनेटिक्सची व त्याचा बियाणे तयार करण्यासाठी वापर यावर थोडीफार माहिती काढली. एक गोष्ट लक्षात आली म्हणजे ते अवघड होते पण कुठल्याच शास्त्रज्ञाने अशक्य आहे असे म्हटले नव्हते. मग मी तो विचार बाजूला सारला.

अशीच अनेक वर्षं सरली आणि अचानक माझ्या कंपनीत बाळासाहेबांचा फॅक्स आला. वाचून मी गारच झालो. बाळासाहेब, त्याची बायको व दोन मुले पुढच्या महिन्यात भारतात येणार होते. त्याला त्याच्या गावाकडे महत्त्वाचे काम असल्यामुळे तो गावीच मुक्काम टाकणार होता. आम्हाला सगळ्यांना त्याने तेथेच बोलावले होते. त्याची बायको व मुले मुंबईला त्याच्या नातेवाइकांच्या फ्लॅटवर माझ्याच गाडीने परतणार होती. बाळ्याने ड्रायव्हरची सोय केली होती. शेवटचे वाक्य खास माझ्यासाठी होते, '' कोणी आले नाही तरी तू मात्र जरूर येच. महत्त्वाचे बोलायचे आहे.''

बघता बघता बाळासाहेब येण्याचा दिवस उजाडला. तिसऱ्या दिवशी मी त्याच्या वस्तीवर जाणार होतो. त्या दिवशी उठलो तोच मनात हुरहुर घेऊन. कसा असेल बाळ्या? तसाच असेल का, साहेबासारखा बोलत असेल असे अनेक विचार मनात येत होते. त्याच्या त्या काजूच्या संशोधनाचे काय झाले असेल...? एक ना दोन.. पहाटे गाडी काढली आणि बारामतीला निघालो. दहाच्या सुमारास त्याच्या वस्तीवर पोहोचलो आणि मला ते घर ओळखुच येईना. एकच खोली कशीबशी तग धरून उभी होती. बाकी सगळे घर ढासळले होते, पण घराभोवती हिरवागार उस डोलत होता. मला काही उमजेना.... अर्थात त्याचे उत्तर मला नंतर मिळणार


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

होते. गाडीचा आवाज ऐकून काहीही फरक न पडलेला बाळ्या बाहेर आला... मागे लुकलुकणाऱ्या डोळ्यांची दोन गोरी मुले त्याच्या आड लपून मला न्याहाळत होती. त्या सगळ्यांच्या मागे बाळ्याची गोरीपान, निळ्या डोळ्याची बायको आमच्याकडे पाहत उभी होती. बाळ्याने धावत येऊन मला मिठी मारली आणि आम्ही घराकडे वळलो...

''तू फ्रेश हो! तोपर्यंत मीही आवरून घेतो. आपल्याला आमदाराला भेटायला जायचे आहे. तुझी गाडी आहे, तोपर्यंत दोन चार कामे उरकून टाकू. चालेल ना ?''

'' तू म्हणशील तसंऽऽ''

''पण आमदाराकडे काय काम काढलंस बाबा ?''

''ते सगळं तुला गाडीतच सांगतो.'' बाळासाहेब म्हणाला.

थोड्याच वेळा चहापाणी करून आम्ही निघालो. वाटेत बाळासाहेबांनी जे काही सांगितले त्याचा गोषवारा असा... मला त्याने सांगितलेले विशेष काही कळले नाही, कारण त्यात मला समजणारी फक्त क्रियापदेच होती. पण थोडक्यात सांगायचे म्हणजे काजूमधील गुणधर्म कुठल्या जीन्समुळे येतात, हे शोधून काढण्यासाठी त्याने एक लाखाच्या वर डीएनएच्या लाईन्सचा अभ्यास केला होता व शेवटी त्याचे म्युटेशन करण्यात त्याला यश आले होते.

''अरे, मला यश मिळाले असे आपले म्हणायचे, पण जे झाले ते अपघाताने. तो अपघात माझ्या संशोधनात का झाला आणि तसा अपघात परत घडवून आणण्यास काय करावे लागेल, हे शोधण्यात माझी गेली आठ दहा वर्षे गेली. आता यापुढे निरोगी बियाणे तयार करण्यात माझी आणखी दहा वर्षे तरी जातील.''

''काय रे, पण तू म्हणतोस तसे शेंगदाणे जमिनीखाली आले आणि त्या दाण्यांना काजूची चव आली, असं तुला म्हणायचं आहे का?''

''तूच चव घेऊन बघ ना!'' असे म्हणून त्याने बरोबर घेतलेल्या छोट्या पोत्यातून शेंगा काढून माझ्या डाव्या हातवर हातावर ठेवल्या. सामान्य शेंगांसारख्या दिसणाऱ्या त्या शेंगा..फक्त एकच फरक होता, तो म्हणजे त्याचा पृष्ठभाग खूपच गुळगुळीत होता.

''अरे, फोडून दे ना!'' मी म्हटले.

''गरज नाही! बोटाने सहज तुटेल ती. भाजलेली आहे.'' मी अधिर होत ती फोडली आणि त्यातील दाणे तोंडात टाकले. दाताखाली एक तोडला आणि खरेच सांगतो - मी पडायचाच काय तो बाकी होतो. मी गाडी बाजूला घेतली आणि बाळासाहेबाला मिठी मारली. मला काय बोलावे हे कळेना... मी बधिरच झालो होतो. माझ्या त्या अवताराकडे पहात बाळासहेब हसत होता.

''अरे, माझीही अशीच अवस्था झाली होती...''

थोड्या वेळाने सावरल्यावर मी विचारले, ''मग आता आमदाराकडे काय काम काढले आहेस?''

''अरे, पुढचे प्रयोग करायला मला कमीतकमी तीन एकर जमीन पाहिजे आहे. कारण बियाणे तयार करायला एक लॅब उभारावी लागेल. आता ही जमीन ताब्यात घ्यायची म्हणजे आमदाराची मदत घ्यावी लागेल, असे आमचा भाऊ म्हणाला. म्हणून त्याला भेटायला जायचे आहे. ते काम झाल्यावर घर आणि लॅब उभी करण्यात मला तुझी मदत लागेल. नोकरी सोडलीस तरी चालेल. मी परत गेल्यावर तू हा प्लांट बघू शकतोस. त्याची कागदपत्रे कशी करायची इत्यादी... भानगडी नंतर बघू. अर्थात घाई नाही. वहिनींना विचारून निर्णय घे. पण मला वाटते यात मिळेल तेवढा पैसा तुला इतरत्र कुठेच मिळणार नाही.''

''अरे, पण तू मला सांगितलेस त्यातील एकही शब्द मला कळला नाही. माझा उपयोग तुला फक्त उभारणी करण्यातच होईल असं मला वाटतं.''

''त्याची काळजी नको. ती माणसे मी नेमेन. मला इथे एक विश्वासू माणूस पाहिजे आहे. बस्स...''

''बरं, पाहू या नंतर.'' मी म्हणालो.

आमदाराच्या फार्महाउसमध्ये आमची गाडी शिरली. सिक्युरिटीचे सर्व सोपस्कार पार पाडून आम्ही आत पोहोचलो. आगतस्वागत झाल्यावर आमदारांनीच विषयाला हात घातला,

''बाळासाहेब, तुम्हाला इथे जमीन मिळणे शक्य नाही. मान्य आहे तुमचे नाव आहे सातबाऱ्यावर. मी कुठे म्हणतोय नाही? पण परत इथे पाय टाकाल तर तोच तोडून हातात देऊ. काय समजलात? चालू लागा आता. किसन, साहेबांना सोडून ये त्यांच्या घरी. बाळासाहेब, आता घरी गेल्यावर लगेचच पुण्याला निघायचं. काय कळलं? नाहीतर इथेच मुडदा पडंल तुमचा. का, ते तुमच्या भावाला विचारा...''

ते ऐकून आमच्या दोघांचे पाय थरथर कापू लागले. हा माणूस जे म्हणतोय ते सहज करू शकेल याची मला खातरी होती. बाळासाहेब काही बोलणार, तेवढ्यात मी त्याला थांबवले.

''बाळासाहेब, उपयोग नाही. आम्हीच कपाळकरंटे... चल, जाऊ या...''

एवढे बोलून आम्ही परत आलो तर आमदाराची माणसे अगोदरच येऊन थांबली होती. आम्हीही लगेच आवरायला घेतले व पुण्याला टाकोटाक परतलो. बाळासाहेबांनी मग एक शहाणपणाचा निर्णय घेतला, तो म्हणजे बायको-पोरांना लगेचच अमेरिकेला पाठवून दिले. नंतर काय घडले, ते मला फार उशिरा कळले. बाळासाहेबांनी मग कोकणातील खासदारास गाठले व काजूच्या उत्पादनवाढीचा प्रस्ताव ठेवला. पण त्या खासदाराने एकच प्रश्न विचारला, ''बाळासाहेब, हे तुमचे काजू देशात कुठेही येतील ना? म्हणजे आमच्या कोकणातील काजूच्या बागा जाळून टाकल्या तरी चालतील. मला नाही वाटत हे शक्य आहे. मला वाटतं आता आम्ही तुम्हाला हा प्रयोग भारतात तरी करू देणार नाही. माझं ऐका, तुम्ही अमेरिकेला परत जा.'' पण बाळासाहेब हटला नाही त्याने आता मंत्र्यांना गाठण्याची तयारी चालवली.

पण एक दिवस घडले ते विपरीतच. मला फोन आला एका इस्पितळातून. बाळासाहेबांवर कोणीतरी जीवघेणा हल्ला केला होता. मी घाईघाईने तेथे गेलो. माझ्याच्याने बाळासाहेबाकडे पहावेना.

आयसीयूमध्ये तो निपचित पडला होता. जगेल की नाही याचीच डॉक्टरांना शंका होती. पण काटक बाळासाहेब जगला. नुसता जगला नाही, तर हिंडू फिरू लागला. पाच -सहा वर्षे झाली, तो भारतातच राहिला. एक दिवस माझ्याकडे संध्याकाळी आला. येताना बाटली घेऊन आला होता. त्याच्या पिण्याच्या पद्धतीवरून त्याला दारूची सवय लागली असावी असे मला तरी वाटले.

''मला आपल्या देशाने मातीत घातले. मीच केलेले संशोधन मी कंपनीला न सांगता येथे आणले होते. या प्रकारात पाच वर्षं मी येथे घालवली. कंपनी मला परत ये म्हणतेय पण मी हे संशोधन तेथे उघड करू शकत नाही. इतके दिवस ते उघड का केले नाही म्हणून माझी चौकशी होईल. कदाचित एफबीआयकडे प्रकरण जाऊ शकते. तसे झाले, तर मला तुरुंगात खितपत पडावे लागेल. हे संशोधन बासनात गुंडाळून ठेवलेलेच बरे.'' मीही त्याला होकार दिला.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

नंतर बरेच दिवस/महिने/वर्षं बाळासाहेबाचा पत्ता नव्हता. त्याने बायकोलाही काही पत्र लिहिले नव्हते. तिचा व मालोजीचा अनेक वेळा फोनही येऊन गेला. पोलिसात तक्रार झाली...सगळे प्रयत्न झाले. पेपरमध्येही या प्रकरणाची चर्चा झाली, पण बाळासाहेबांचा पत्ता लागला नाही. त्याचे बरेच सामान माझ्याकडे पडले होते, ते मी एका कपाटात नीट ठेवून दिले. बाळासाहेब आत्महत्या करणार नाही याची मला शंभर टक्के खातरी आहे. तो अमेरिकेला परत गेला नाही.. हेही मला माहीत आहे..

मी शोध घेण्याचा बक्कळ प्रयत्न केला, अजूनही करतोय, पण आमचा हा शास्त्रज्ञ मित्र गायब झाला तो झालाच....

ता.क. : बाळासाहेबांचे एक चिरंजीव जेनेटिक्समध्येच काम करत आहेत आणि असे म्हणतात की त्यांनी काजू नाही, पण असलेच काहीतरी संशोधन अमेरिकेत यशस्वी केले आहे. माझ्याकडे एक ट्रंक भरून बाळासाहेबाचे जे बाड पडले आहे, (त्यात त्याचा अमेरिकन पासपोर्टही आहे) ते त्याला द्यावे की नाही, यावर मी अजून विचार करतोय.... कारण त्यावर कोकणातील शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून आहे...

मला वाटते ते जाळूनच टाकावे. मलाच मोह पडला, तर?

(व्यक्तिचित्र व कथा पूर्णपणे काल्पनिक आहे.)

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# सिनेमावाला विज्या

विज्या सांगेल तीच पूर्व दिशा हेच डोक्यात ठेवून आम्ही त्याच्या मागे फिरत होतो. विज्यासुद्धा आपण गावाचा हिरो आहे हे सिद्ध करण्यासाठी विविध धंदे करीत होता. विज्या, विजय देवरावजी चव्हाण, देवरावजींचा आशेचा कंदील, पण हा कंदील सिनेमाच्या अंधारातच जास्त रमत होता. या विज्याने आपल्या बापाचे बारसे करून टाकले होते. तो लोकांना आपली ओळख 'पूरा नाम विजय दीनानाथ चव्हाण, बापका नाम दीनानाथ चव्हाण' अशी करून देत होता.

**मित्रहो**



"विज्या, आज कॉप्या पुरवता नाही येत आपल्याले" मी धावतच सेंटरच्या बाहेर उभ्या असलेल्या विज्याच्या गँगला सांगितले.

"कोण अडवते बे आमाले?” पोरे माझ्यावरच ओरडली.

"थांबा बे पोट्टेहो." विज्याच्या एका आवाजात पोरे चूप. त्याने त्याच्या बच्चन कट केसातून हात फिरविला, डाव्या हाताने मानेवरचे केस उडविले, विडीचा धूर सोडला आणि मला विचारले,

"पण काहून बे बारक्या?"

"मास्तर सांगत होता, आज इन्सपेक्टर येनार हाय."

"पोलीस" विज्या हलकेच हसला. "डॉन का इंतजार तो बारा मुलखोकी...."

"तो इन्सपेक्टर नाही, शाळंतला इन्सपेक्टर."

"हा कोण रायते? अंदर मेरा जिगरी यार पेपर दे रहा है, मालूम? तो पास नाही झाला, तर भाऊ का म्हणन?"

दर वर्षी याचा कोण मित्र पेपर देतो आणि तो मित्र पास झाला काय आन नाही काय, याने भाऊला - म्हणजे साक्षात अमिताभ बच्चनला काय फरक पडतो, हे एक कोडेच होते. तेव्हा मात्र असे विचार येत नव्हते. विज्या सांगेल तीच पूर्व दिशा हेच डोक्यात ठेवून आम्ही त्याच्या मागे फिरत होतो. विज्यासुद्धा आपण गावाचा हिरो आहे हे सिद्ध करण्यासाठी विविध धंदे करीत होता. विज्या, विजय देवरावजी चव्हाण, देवरावजींचा आशेचा कंदील, पण हा कंदील सिनेमाच्या अंधारातच जास्त रमत होता. या विज्याने आपल्या बापाचे बारसे करून टाकले होते. तो लोकांना आपली ओळख 'पूरा नाम विजय दीनानाथ चव्हाण, बापका नाम दीनानाथ चव्हाण' अशी करून देत होता. बाकीच्यांचे नशीब बलवत्तर, नाहीतर अग्निपथच्या नादात कुणाकुणाचे बारसे झाले असते. सिनेमा विज्याच्या अंगाअंगात मुरला होता, त्याच्या श्वासाश्वासात सिनेमा होता, त्याच्या वाक्यावाक्यात सिनेमा होता. विज्याचे विश्व सिनेमापासून सुरू होऊन सिनेमापाशी संपत होते. त्याच्या विश्वातले त्याचे दैवत होते अमिताभ बच्चन. कुलीच्या वेळेला अमिताभला अपघात झाला, तेव्हा विज्याने सोळा शनिवार निरंकार उपास केला होता म्हणतात. अमिताभच्या सिनेमातली अमिताभगिरीच तो आचरणात आणीत होता. अमिताभगिरीच्या नावाखाली गावातल्या पोरांना पास करण्यासाठी कॉप्या पुरविणे, शाळेत मास्तर सांगतील त्याच्या विरुद्ध जाणे, कालच भेटलेल्या मित्राच्या प्रेमासाठी दुसऱ्या गावात जाऊन मारका करून येणे असे धंदे विज्या नेहमीच करीत होता. उद्देश होता गावातला अमिताभ विज्याच आहे अशी प्रतिमा उभी करणे.

"तूले का भेटते बे असे लफडे करून?" असे त्याला विचारले तर तो उत्तर द्यायचा.

"काही गोष्टी फायदा आन नुसकानीच्यावर रायते बारक्या. मेरी पिक्चरका हिरो मै हूं. हिरो हाय तर लफडा होनार, कारण लफडा असन तरच हिरो रायते. लफडा नसन तर साली जिंदगी म्हणजे शो संपलेल्या पिक्चरच्या टिकिटावाणी हाय. तेचा का उपेग?"

तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या माझ्यासारख्या मुलाला त्या वेळी त्याचे हे तत्त्वज्ञान भयंकर आवडायचे. हाच आपला अमिताभ आहे अशी मनातल्या मनात खातरी व्हायची. विज्या तसा माझ्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी मोठा होता. मी लहान असल्यापासून मला विज्या आणि त्याच्या गँगचे प्रचंड आकर्षण होते. हिवाळ्यात गावी गेलो की तिथे दोनच विषय असायचे - सिनेमा आणि विज्या. मुले विज्याचे किस्से सांगायचे. विज्याने कसा टॉकिजमध्ये धिंगाणा घातला, गाण्याच्या वेळेला शिट्ट्या वाजवून सारी टॉकीज डोक्यावर घेतली.... हे असे किस्से ऐकले की मलाही विज्याच्या गँगसोबत फिरावे असे वाटायचे. आजी आधी मला या मुलांबरोबर जाऊ देत नव्हती. सहावी झाल्यानंतरच्या उन्हाळ्यात प्रथमच हिम्मत करून मी विज्याच्या गँगबरोबर शेठजीच्या वाडीतले आंबे तोडायला गेलो होतो. ते चोरून आणलेले आंबे मोठ्या मजेत मी खात होतो

"काय बारक्या, मजा आली का नाही आज?"

मी मान डोलावली आणि त्या दिवसापासून मी विज्याच्या गँगचा बारक्या झालो. सातवीतला शहरी बारीक पोरगा म्हणून विज्याने माझे नाव बारक्या ठेवले होते. मी आधी आजीला न सांगता जात होतो. मग तिला कळले तरीही जात होतो. तशीही मुले उन्हाळ्याच्या आणि दिवाळीच्या सुट्टीतच गावी येतात म्हणून तीही दुर्लक्ष करीत होती. मी जसा विज्याच्या गँगमध्ये रुळत गेलो, तशी माझी आणि विज्याची मैत्री वाढत गेली. आम्ही अमिताभच्या चित्रपटावर चर्चा करायचो. अग्निपथ यायच्याआधी विज्याचा आवडता अमिताभपट होता मुकद्दर का सिकंदर. नावाच्या साधर्म्यामुळे असेल, अग्निपथ आल्यानंतर मात्र तोच चित्रपट विज्याचा आवडता झाला. अग्निपथनंतर तो तसाच आवाज बदलून बोलत होता, सारखा 'पूरा नाम' असेच करीत होता. मला टॉकीजमध्ये जाऊन सिनेमा बघायला परवानगी नव्हती, म्हणून मग मी टीव्हीवर सिनेमा बघायचो. विज्याने सांगितलेला सिनेमा टीव्हीवर कधी येईल, याची वाट बघायचो. विज्याला मात्र टीव्ही हे काय प्रकरण आहे याची अजिबात कल्पना नव्हती. मी विज्याला टीव्ही बघण्यासाठी वर्ध्याला ये म्हणून सांगितले. दर वर्षी गावावरून धान्य वर्ध्याला यायचे, त्या वर्षी विज्या आमच्या बंडीसोबत धान्य घेऊन वर्ध्याला आला. टीव्हीवर क्रिकेटची मॅच सुरू होती. टीव्हीवरची मॅच बघून तो भलताच खूश झाला.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"बारक्या, लय खासच चीज हाय यार तुया टीव्ही. हे बंदं खरं रायते का आपल्या पिक्चरवाणी?"

टीव्हीतली मॅच जरी खरी असली, तरी सिनेमात जे दाखवितात ते वास्तव नसते, त्याचा वास्तवाशी दूरान्वयानेही संबंध नसतो हे विज्याला कोण सांगणार? कुणी चुकूनही असा प्रयत्न केला, तर त्या व्यक्तीच्या आयुष्याचे वास्तव तिथेच संपण्याची शक्यता होती. एक माणूस मात्र रोज विज्याला या वास्तवाची जाणीव करून देत होता, रोज ओरडून विज्याला सांगत होता सिनेमा काही खरे नाही, सिनेमा म्हणजे आयुष्य नाही. ती व्यक्ती म्हणजे विज्याचा बाप, देवरावजी चव्हाण.

"सिनेमे पाहूनच पोट भरनार हाय का तुया लेकराचं?" विज्या झोपला असला, तरीही त्याला ऐकू जाईल अशा आवाजात ओरडल्याशिवाय विज्याच्या बापाचा दिवस उजाडत नव्हता. सिनेमा, अमिताभ हे शब्द जरी जरी कोणी विज्याच्या बापासमोर उच्चारले, तरी तो विंचू चावल्यासारखा चवताळून उठायचा. अमिताभ आणि विज्या दोघांनाही तोंडात येईल त्या शिव्या द्यायचा. अमिताभनेच आपल्या पोराच्या आयुष्याचे वाटोळे केले आहे, अशी त्याची ठाम समजूत होती. झिजून फाटलेल्या चपला त्याने कडूलिंबाच्या फांदीला अडकवून ठेवल्या होत्या.

"येकदिस नाही त्या अमिताभची या खेटरानं पूजा केली, तर माय नाव देवराव नाही." अशा शिव्या देत विज्याचा बाप विडी ओढत खोडावर बसायचा.

मी गावात गेलो की विचारायचो. "काकाजी, इज्या कोठ गेला जी?"

या प्रश्नावर काकाजीचे एकच उत्तर ठरलेले होते. "गेला मसनात." बरोबर बाबा असतील, तर मग देवरावजी आपले दुःख बाबांना सांगत.

"का सांगू बापू तुम्हाले, फुकट हादडाची सवय लागली या पोट्ट्याले. खायले कार आन भुइले भार. येका कामाचं नाही जी हे पोट्टं. मांग याले बैलं चाराले ने म्हटलं, तर यानं हरभऱ्यात बैलं घातले जी. अर्धा हरभरा बैलानं खाल्ला. तुम्ही याले वर्धेले घेउन जा आन द्या चिकटवून कुण्या टाकीजमंधी. गेट किपर म्हणून राहीन सिनेमे पाहत दिवसभर."

बापाच्या अशा बोलण्याचा विज्यावर कधीच काही परिणाम झाला नाही. बापाने कितीही बडबड केली, तर विज्या तेच करायचा जे त्याला करायचे असायचे. दर शुक्रवारी काहीतरी निमित्त काढून सिनेमा बघायला हिंगणघाटला जाणे, रात्रीचा शो बघून उशिरा घरी येणे, सकाळी उशिरा उठणे, आरामात आंघोळ करणे, अर्धा तास भांग पाडणे. शाळा-कॉलेज ह्या गोष्टी कधी विज्याच्या पचनी पडल्या नाहीत. विज्या दहावी पास झाला होता हे ऐकून होतो. पुढे त्याने शिक्षण का सोडले, म्हणून एकदा त्याला विचारले तर त्याने उत्तर दिले.

"याराना, दोस्ती, दुसरं का? आपला दोस्त येका पोरीच्या प्रेमात पडला. लय रडत व्हता. म्या इचार केला, भाऊ का म्हणन. गेलो, त्या पोरीले उचलून आणाले. पण साला पत्ता उलटा पडला. तिच्या भावान पायलं, मारका झाला, पोलीस केस झाली, येका रात्रीची जेल झाली. आता जेलात गेलेल्या माणसाच कॉलेज कायच रायते बे?"

"जेलगिल म्हणजे जास्तच झालं."

"जास्त कायच बे, भाऊ तर किती वेळा जेलमंधी जाते. आपण येक डाव गेलो तर का बिघडलं?" विज्याला अजिबात पश्चात्ताप नव्हता, उलट झाले त्याचा अभिमान होता. मीही मोठा होत होतो, तेव्हा विज्याच्या अशा वागण्याची मला आता भीती वाटत होती. त्याने अमिताभगिरी कमी करावी, असे मला मनोमन वाटत होते. मी समजावून बघत होतो.

"तू इकडं हे असे धंदे करत रायतो आन तिकडं काकाजी बोंबलत रायते न लेका."

"मी माया बुढ्याचं कायले लोड घ्याले जातो बे? बापाचा जन्मच पोट्ट्यायले तरास द्याले झाला रायते. त्याचं कामच ते हाय, पोट्ट्यायले तरास देनं. शराबी नाही पायला, त्याचा बाप कसा तरास देत होता आपल्या पोराले. म्या तुले सांगतो बारक्या, त्या त्रिशूलमंधी बी संजीवकुमारले मालूम रायते हा आपला पोरगा हाय." आपण नकारार्थी मान हलविली, तरी आमचा सलीम जावेद काही ऐकायचा नाही. "त्याले बराबर मालूम रायते. बापाची जात, ते पोट्ट्यायले तरास दिल्याबिगर जमतच नाही त्याले. म्या म्हणतो, आपला पोरगा नाही झाला गुंडा, झाला इन्सपेक्टर, तर का बिघडलं होतं? पण नाही, तो बाप तरीबी पोराले तरास देते. तुले सांगतो बारक्या, भाऊले जेवढा तरास गुंड्यान दिला नसंन, तेवढा तरास बापानं दिला हाय. जिथ भाऊच बापाच्या तकलीपीतून सुटला नाही, तर म्या कसा सुटीन बे?"

विज्याचे हे उत्तर याआधीसुद्धा बऱ्याचदा ऐकले होते. विज्याच्या अशा बोलण्यामुळे माझ्या मनात विज्या म्हणजे शराबीमधला अमिताभ आणि देवराव काकाजी म्हणजे प्राण अशीच प्रतिमा तयार झाली होती. फरक एकच होता - प्राणकडे मोठा बिझनेस होता, तर काकाजीकडे फक्त वीस एकर शेती होती. आपला बाप हेच आपल्या दारू प्यायचे कारण आहे हे विज्या नेहमी सांगायचा.

"आज ये शराब मुझे लेबल की तरह चिपकी है ना, तो उसकी वजह मेरा बाप है बारक्या. ज्या दिवशी माया बाप सकाळी उठून बकबक करनं सोडून देइल नाम त्या दिवशी म्या बी दारू सोडून देइन. गॉडप्रॉमिस." विज्याच्या मागे फिरणाऱ्या आमच्यासारख्यांना हे सारे खरे वाटत होते. त्या वयात माझे असे मत झाले होते की केवळ बडबड करणाऱ्या बापामुळेच मुले दारू प्यायला लागतात. कुणीही दारू पिऊन लोळलेला दिसला की त्याचा सकाळी उठून बडबड करणारा बाप माझ्या डोळ्यासमोर यायचा.

विज्याच्या बापाने बडबड कमी नाही केली, पण एक दिवस विज्यालाच घरातून हाकलून लावले. गावातल्या पोरांना पास करायचे समाजकार्य विज्याच्या अंगलट आले. गणिताच्या पेपरला कॉपी पुरवता आली नाही, तेव्हा आता गावातला पोरगा दहावीला नापास होणार, म्हणून विज्याने बोर्डात ओळख काढून पेपर कुणाकडे तपासायला गेले याचा पत्ता काढला. विज्या आणि मी त्या पोराला घेऊन सरळ त्या मास्तरच्या घरी वायगावला पोहोचलो.

"चावी इकडे आहे मास्तर" विज्याने दरवाजा बंद करीत डायलॉग फेकला. मास्तर वायगावात खोली करून एकटाच राहत होता.

"चावी नाही, मी पेन शोधतोय." असे म्हणत मास्तरने वर बघितले. पायात कथ्थ्या रंगाची पँट, अंगात रंगीत बनियान, त्यावर बटन न लावलेले जॅकेट, गळ्यात मफलर, बच्चन कट अशा अवतारात एक हात कंबरेवर ठेवून आपला कोण विद्यार्थी भेटायला आला, हेच मास्तरला समजत नव्हते. मास्तरने आजूबाजूला बघितले, आणखी दोन पोरे दिसली.

"कोण तुम्ही? काय पाहिजे?"

"तू मुझे वहा ढूंढ रहा है मास्तर और मै तेरा यहा इंतजार कर रहा हूं" विज्याने विनाकारण डायलॉग फेकला. डाव्या हाताने मानेवरचे केस उडविले, तोंडातल्या विडीचा धूर सोडला. मास्तर काही बोलणार, तेवढ्यात विज्याने हातातला चाकू बटन दाबून उघडला. चाकूचे धारदार पाते मास्तराच्या खोलीतल्या दिव्याच्या मंद प्रकाशातसुद्धा चमकत होते. चाकू बघताच मास्तर घाबरला. विज्या हळूहळू चालत मास्तरच्या जवळ गेला. त्याने तो चाकू मास्तरच्या मानेवर धरला. मास्तरला घाम फुटला, त्याचे हातपाय लटलट कापायला लागले. मास्तरने विचारले.

"काय पाहिजे?"


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"पेपर"

"आलमारीत" मास्तरने घाबरतच उत्तर दिले.

"तुझा पेपर काढ बे." आम्ही पेपरावरची अक्षरे ओळखून त्या पोराचा पेपर त्या गठ्ठ्यातून शोधून काढला.

"मास्तर, हा पेपर आणि हा पोरगा. पास झाला पाहिजे."

पोरगा पास झाला, पण विज्या नापास झाला. सहा महिन्यांनी विज्याच्या बहिणीची सोयरीक जुळली. त्याच्या दुर्दैवाने ती जुळली ती नेमकी त्या मास्तरशीच. बोलणी झाली आणि साखरपुड्याला मुलाकडची मंडळी गावात आली. मी त्या वेळेला गावातच होतो. मी मास्तरला ओळखले तसे विज्याला गाठले. त्याला सारी माहिती दिली. लग्न होईपर्यंत विज्याने मास्तरला तोंड दाखवायचे नाही असे ठरले. आता बाहेर कुठे पडला तर कुणाला तरी दिसेल, म्हणून विज्या कुटाराच्या रिकाम्या ढोलीत जाऊन लपला. कार्यक्रमाची जबाबदारी आम्ही उचलली. विज्याच्या बापाला विज्याची कमी भासू द्यायची नाही हाच उद्देश होता. बहिणीचा पानसुपारीचा कार्यक्रम आणि तिचा भाऊ घरात नाही, म्हणून विज्याचा बाप त्याच्या आईजवळ कुरकुर करीत होता. विज्या दिसला का? म्हणून आम्हाला विचारत होता आणि आम्ही सारे एकच उत्तर देत होतो, "येथंच तर व्हता जी काकाजी." सारे ठरल्याप्रमाणे सुरू होते. पण विज्या लघ्वीला गेला आणि घोटाळा झाला. नेमके त्याच वेळेला विज्याच्या बापालासुद्धा लघ्वी लागली. विज्या न्हाणीघरातून बाहेर पडत असताना त्याने विज्याला पाहिले. त्याचा हात धरून त्याची आपल्या होणाऱ्या जावयाशी ओळख करून दिली. मास्तरने विज्याला ओळखले, पण तो काही बोलला नाही. विज्याला वाटले, मास्तर चेहरा विसरला. आपण उगाचच घाबरत होतो. तीन दिवसांनी सोयरीक मोडली म्हणून निरोप आला. विज्याच्या बापाने चौकशी केली, तेव्हा खरे काय ते समजले. विज्याच्या बापाने त्याला बदडून काढले आणि घरातून हाकलून लावले. तेव्हापासून विज्या गावातल्या देवळात राहायला लागला.

पेपर प्रकरणात मी होतो ही गोष्ट आमच्या घरी समजली आणि अपेक्षेप्रमाणे माझे गाव बंद झाले. शिक्षण पूर्ण होईपर्यंत गावात पाय ठेवायचा नाही अशी मला सक्त ताकीद मिळाली. माझे बारावी झाले आणि मी इंजीनियरिंगसाठी अमरावतीला गेलो, त्यामुळे विज्याशी भेट बंदच झाली. सिनेमा बघताना टॉकीजमधे शिट्ट्या ऐकल्या की विज्या आठवायचा. मित्रांसोबत अमिताभच्या सिनेमावर चर्चा करताना विज्याच्या तोंडून ऐकलेले अमिताभचे संवाद आठवायचे. मुकद्दर का सिकंदरमधील अमिताभचे मेमसाहबविषयीचे संवाद बोलताना विज्याचा आवाज कापरा व्हायचा. कुणीतरी मेमसाहब विज्याला आतल्या आत खात असावी, असे आता वाटते; पण तेव्हा हे सार कळावे असे वय नव्हते. विज्याची गोष्ट सांगायची पद्धत आठवायची - 'भाऊनं हवेत उडून येकच फाइट मारली तर च्याभन चार पोट्टे येका झटक्यात खल्लास.' विज्या सिनेमा बघत नव्हता, तर तो सिनेमा जगत होता.

कॉलेज संपल्यानंतर मी गावी गेलो होतो. विज्या अजूनही देवळातच राहत होता, रोजंदारीचे काम करून पोट भरीत होता. त्याच्या तिन्ही बहिणींची लग्ने झाली होती. बापलेकात अजूनही विस्तव जात नव्हता, त्यामुळे विज्याचे लग्न मात्र राहिले होते.

"का इज्या, कंचा पिक्चर पायला येवढ्यात?"

"कोठ बे, पिक्चरगिक्चर बंद. तुले सांगतो बारक्या, आता खिशात पैसे रायते, पण पिक्चर पाहाच मन नाही होत."

"काहून?"

"भाऊचे पिक्चर येनं बंद झालं यार आता."

"भाऊचे नाही, तर शाहरुखचे पाहाचे."

"ह्येट, नाव नको काढू. मांग नथ्था मले तो डर पाहाले घेउन गेलता. तो का साला पिक्चर हाय? मले सांग, भाऊले मेमसाब आवडे का नाही? जवा भाऊले समजते हे आपल्या दोस्ताची लवर हाय, तवा भाऊ त्यायच्या मंधी आला का? भाऊनं मरतवरी आपल्या दोस्ताले समजू देलं नाही का हेच पोरगी भाऊची मेमसाब हाय ते. याले म्हणते लव आन याले म्हणते दोस्ती. नाहीतर तो शारुक आपल्या दोस्ताच्याच पाठीमंधी खंजर खुपसाले जाते बे. हे असं रायते का कधी?"

नोकरीच्या निमित्ताने मी मुंबईला आलो आणि माझा गावाशी संपर्क तुटला. आजीच्या तोंडून गावात काय चाललेय याची माहिती मिळत होती. 'रिश्तेमे हम तो तुम्हारे बाप लगते है' अस म्हणणारा विज्या आता खरेच बाप झाला होता. त्याचा बाप त्याला घरी घेऊन गेला होता. विज्या आता घरची शेती सांभाळत होता. दोन वर्षांपूर्वी गावाला गेलो होतो. अठरा वर्षांनंतर मी गावात पाऊल टाकीत होतो. आजीसुद्धा गावात राहत नसल्याने आमचे गावातले घर आता बंद होते. गावात घरोघरी मोटारसायकली आणि डिश दिसत होती. विज्याच्या घरातूनही टीव्हीचा आवाज येता होता. देवराव काकाजी त्याच खोडावर बसले होते. म्हातारा पूर्ण खचला होता. एका डोळ्यात मोतीबिंदू झाला होता, हातात काठी आली होती.

"कोण बापू व्हय का जी, कोठ चालले?"

"जाउन येतो वावरात, याला वावर दाखवून आणतो."

"हा मोठा व्हय ना तुमचा?"

"हो." बाबांनी सांगितले.

मला राहवले नाही आणि मी नेहमी विचारायचो तो प्रश्न विचारला.

"काकाजी, इज्या कोठ गेला जी?"

"इज्या असन वावरात." 'मसनात'चे आता 'वावरात' झाले होते. सुखद बदल असला, तरी कानाला सवय नसल्याने काहीतरी चुकल्यासारखे वाटत होते. मी लगेच वावराच्या दिशेने निघालो. विज्याच्या वावराजवळ मला एक मोटरसायकल उभी दिसली. त्याच्या नंबर प्लेटवर अमिताभचा फोटो होता. माझी खातरी झाली, विज्या जवळपासच असला पाहिजे. तो लगेच दिसला. सोयाबीनची मशीन लावली होती. गळ्याभोवती मफलर गुंडाळून विज्या कामावर नजर ठेवून होता. खाली एक साधी फुलपँट आणि वर पांढऱ्या रंगाचा शर्ट होता. आता पूर्वीचा बच्चन कट राहिला नव्हता आणि जे केस होते, त्यातले अर्धे पांढरे झाले होते. बोटात विडी मात्र होती. विज्याने मला ओळखले.

"वर्धेवरुन येउन रायला का?"

"हो, आताच आलो."

"तू मुंबईलेच हाय ना आता ?"

"हो."

"का म्हणते तुयी मुंबई?"

"मायी कायची बे, तू येन कधी मुंबईत?"

"म्या का करु तेथ येउन?"


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"पिक्चर पाहू, भाऊचा बंगला पाहू."

विज्या फक्त हसला. अमिताभचे नाव काढल्यानंतर त्याच्या डोळ्यात दिसणारी चमक आता दिसत नव्हती. अमिताभगिरी तर कधीच संपली होती, पण आता आत दडलेला अमिताभसुद्धा हरवला होता. तो सिनेमावाला विज्या संपला होता. वास्तवात जगणारा विज्या हे चित्र सुखावह होते, बुद्धीला आनंद देणारे होते, तरीही माझे मन मात्र त्या सिनेमावाल्या विज्याला शोधत होते.

तेवढ्यात विज्या बोलला, "याले घेउन जा."

मी मागे वळून पाहिले. एक दहा वर्षाचा पोरगा छाती नसली तरीही छाती काढून चालत येत होता. मनगटात मनगटाच्या आकारापेक्षा मोठी चेन होती. मुलाने डावा अंगठा नाकाजवळ नेला, दोन्ही हात कमरेवर ठेवले आणि म्हणाला.

"बाबा, आई तुम्हाले जेवाले बलावून रायली."

मी मनातल्या मनात हसलो. 'सिनेमावाला विज्या' अजूनही संपला नव्हता तर ..

(काल्पनिक)

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पाटील गुरुजी

पाटील गुरुजींच्या अंगात निरीक्षण करण्याची वृत्ती अगदी भिनली होती. एकदा वर्गात त्यांनी एका मुलाच्या हातावर, चेहऱ्यावर काही पांढरे डाग पाहिले. त्यांनी एक टाचणी घेऊन, त्या मुलाला दुसरीकडे बघायला लावून त्या डागांवर टोचले व त्याला काही जाणवते का विचारले. त्या मुलाने "नाही' म्हटल्यावर दुसऱ्या दिवशी शाळेत पालकांना घेऊन यायला सांगितले.

**सौन्दर्य**



१९७०च्या जून महिन्यात आम्ही मालाडहून बोरिवलीला शिफ्ट झालो. पाचवीपर्यंतचे शिक्षण मालाड पश्चिमेच्या म्युनिसिपालटीच्या शाळेत झाले होते आणि सहावीसाठी बोरिवलीच्या सोडावाला लेनमधल्या म्युनिसिपालटीच्या शाळेत मोठ्या आणि धाकट्या भावंडांसहित प्रवेश घेतला. प्रथमदर्शनी ह्या शाळेत आवडण्यासारखे काहीच नव्हते. जुनी बैठी शाळा, ॲस्बेस्टॉचे छप्पर, भिंतींना चुन्याची सफेदी, प्रत्येक इयत्तेचा फक्त एकच वर्ग आणि मुख्य म्हणजे खेळायला मैदानही नव्हते. माझ्या सहावीच्या वर्गशिक्षकांचे नाव होते सुरेश पाटील. त्या वेळी शिक्षकांना 'सर' वगैरे न म्हणता गुरुजीच म्हटले जाई. जो विद्यादान करतो, तो गुरू आणि म्हणून आदराने 'गुरुजी.'

मला वाटते आमच्या पाटील गुरुजींचे वय त्या वेळी २५-३०च्या दरम्यान असावे. उंचीने अंदाजे साडेपाच फूट, सडपातळ शरीरयष्टी, वर्ण सावळा, एका बाजूला भांग पाडलेले, काळेभोर आणि नीट विंचरलेले केस, काळ्या रंगाचाच चौकोनी फ्रेमचा चश्मा, नेहमी पूर्ण बाह्यांचा पांढरा शर्ट, बहुतेक वेळा काळी पँट आणि पायात वहाणा असा त्यांचा पेहराव असे. आमच्या पाटील गुरुजींची खासियत म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच एक मंद स्मित तरळत असे, अगदी चिडले तरी. शाळेतील सगळे फळे लिहिण्याची जबाबदारी त्यांच्यावरच होती. काळ्याभोर फळ्यावर पांढऱ्याशुभ्र खडूने लिहिलेले त्यांचे अक्षर म्हणजे जणू काही मोगऱ्याची फुलेच. एकेक अक्षर अगदी टपोरे, कोठेही खाडाखोड नाही की वेडेवाकडे नाही. दोन शब्दांत तसेच दोन ओळींतील अंतर अगदी एकसमान. मी त्यांना कधीही पट्टी घेऊन ओळी आखताना पाहिले नाही. जे काही लिहायचे असेल, ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत अगदी एकटाकी आणि सुंदर. मला एकदा शाळेत फळ्यावर लिहायचा योग आला होता, त्या वेळी फळ्यावर लिहिणे किती कठीण आहे हे समजले. आपली सुरुवात तर डावीकडून बरोबर होते, पण जसजसे वाक्य पुढे सरकते, तसतसे ते तिरपे होत वरवर जाऊ लागते. हे उमजल्यावर तर पाटील गुरुजींच्या अक्षराचा आणि फळे लिहिण्याच्या त्यांच्या कलेविषयीचा आदर द्विगुणित झाला.

पाटील गुरुजी शिस्तीचे फार कडक होते असे नाही, पण मुलांना त्यांचा एक आदरयुक्त दरारा नक्कीच होता. मी त्यांना कधीही कुणाला मारताना किंवा शिक्षा करताना पाहिले नाही, तरी वर्गातील सर्वात व्रात्य मुलगादेखील त्यांना वचकून असायचा. म्युनिसिपालटीची शाळा असल्याने बहुतेक मुले गरीब घरातून आलेली होती आणि त्यामुळे वयाने थोडी मोठीदेखील होती. वर्गातील बहुतेक मुले शिक्षणाबरोबर पोटापाण्यासाठी, घरखर्चाला हातभार लावण्यासाठी काही ना काही उद्योगधंदादेखील करीत. गणपत सईनकर नावाचा मुलगा मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये बूटपॉलिश करायचा. ह्याचा आवाज अतिशय मधुर होता. वर्गात त्याला गाणे म्हणायला सांगितले की तो 'हाथी मेरे साथी'मधील 'नफरत की दुनिया को छोडकर प्यार की दुनिया में' हे गाणे अतिशय दर्दभऱ्या आवाजात म्हणायचा. रमेश सोंडकर हा फुले विकण्याचा धंदा करायचा. घरचाच व्यवसाय असल्यामुळे तो गजरे, हार, बूके वगैरे छान बनवायचा. सुरेंद्र कोठावळे हा सोन्याचे दागिने बनवणाऱ्या दुकानात काम करायचा. कोणी घरोघरी पेपर्स टाकायचा, तर कोणी फुटपाथवर पेन, पेन्सिल, केसाला लावायची बक्कले, नेलपॉलिश, लिपस्टिक्स वगैरे साहित्य विकायचा. वर्गातल्या काही मुली इतरांकडे घरकाम करायच्या. थोडक्यात - बहुतेक मुले गरीब घरची होती; पण आमच्या पाटील गुरुजींनी अशा प्रत्येक मुलाचे नेहमीच कौतुक केले, त्यांची उदाहरणे देऊन श्रमाचे महत्त्व आमच्या मनावर बिंबवले.

गुरुजींनी आम्हाला शाळेच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अनेक गोष्टी शिकवल्या. बहुतेक म्युनिसिपालटीच्या शाळेत मे महिन्याच्या सुट्टीत मोफत वाचनालय चालवले जात असे, तसे आमच्या शाळेतदेखील होते. पण शाळा लहान असल्यामुळे पुस्तके कमी असायची. मग पाटील गुरुजी बाभईच्या मोठ्या शाळेतून गोष्टींची पुस्तके वाचायला आणून देत. मुलांना शहाणे करून सोडण्याच्या पाटील गुरुजींच्या दुर्दम्य इच्छेमुळे त्या लहान वयात मी अनेक उत्तमोत्तम पुस्तके वाचली.

आमच्या वेळी पाचवीपासून, हिंदी व इंग्रजी हे दोन नवीन विषय सुरू होत असत. हिंदी एकवेळ सोपे जाई, पण इंग्रजी बहुतेक मुलांना कठीण वाटत असे. ह्या कठीण वाटणाऱ्या विषयाची गोडी लागावी, म्हणून सहावीनंतरच्या मे महिन्याच्या सुट्टीत गुरुजींनी इंग्रजी शिकवणारे एक शिक्षक शाळेत आणले. मे महिन्याच्या त्या सुट्टीत, इंग्रजीच्या गुरुजींनी आम्हाला स्पेलिंग कसे बनवायचे, मराठी नावे इंग्रजीत कशी लिहायची ह्याचे शिक्षण दिले. त्यांनी मराठीतील स्वर, व्यंजने व संपूर्ण बाराखडी इंग्रजीत कशी लिहायची ते शिकवले, आणि खरे सांगतो, आजतागायत त्या शिकवण्याचा फायदा मी उपभोगतो आहे.

आपल्यापैकी किती जणांनी पॅरेशूट प्रत्यक्ष पाहिले आहे? हाताळले आहे? आमच्या ह्या आवडत्या गुरुजींनी आम्हाला खरेखुरे पॅरेशूट दाखवले, हाताळायला दिले, ते कसे वापरले जाते ते दाखवले. आमच्या वर्गात शालिनी जाधव नावाची एक मुलगी होती. तिचा मोठा भाऊ सैन्यात होता. गुरुजींनी तिच्याशी बोलून, तिच्या भावाला त्याचे पॅरेशूट घेऊन शाळेत मुलांना दाखवण्यासाठी आणण्यास सांगितले. एक दिवशी शनिवारच्या अर्ध्या दिवसाच्या शाळेनंतर तो सैन्यातला भाऊ पॅरेशूट घेऊन शाळेत आला. ते पॅरेशूट एवढे मोठे होते की ते संपूर्ण उघडून दाखवायला शाळेचा वर्ग अपुरा पडला. मग ते पॅरेशूट शाळेतील ध्वजारोहणाच्या खांबाला बांधून उघडून दाखवण्यात आले. ते पॅरेशूट संपूर्णपणे सिल्कसारख्या सुळसुळीत पांढऱ्या कापडाचे होते, त्याला सिल्कसारख्या दिसणाऱ्या अगणित मजबूत दोऱ्या होत्या. ते उघडल्यावर छत्रीसारख्या दिसणाऱ्या मध्यावर निळ्या रंगाचे एक जाड कापड होते, ज्याला एक लांबलचक दोरी होती. ही दोरी, पॅरेशूट बांधून उडी मारणाऱ्याचा हातात असते. त्या दोरीच्या नियंत्रणाने उडी मारणारा सैनिक पाहिजे त्या ठिकाणी पॅरेशूट उतरवू शकतो, असे ज्ञान आम्हाला त्या सैनिक भावाने दिले. आजही त्या पॅरेशूटचा झुळझुळीत स्पर्श आणि त्याचा अवाढव्य आकार मनात घर करून आहे.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

सातवीत गेल्यावर आम्हाला वर्गशिक्षिका मोडक बाई होत्या. एक दिवस बाई आल्या नव्हत्या. त्यामुळे वर्गात दंगा चालू होता. इतक्यात पाटील गुरुजी वर्गात आले व म्हणाले, "चला, आज आपण एक नवीन खेळ खेळू या. नेहमी शिक्षक मुलांना प्रश्न विचारतात, आज तुम्ही मला प्रश्न विचारा, मी तुम्हाला उत्तरे देईन." पहिली काही मिनिटे गुरुजी खरे बोलताहेत की चेष्टा करताहेत तेच समजेना. साक्षात शिक्षकांना प्रश्न विचारायचे? असे त्याआधी कधीच ऐकले नव्हते. पण गुरुजींनी त्याचा पुनरुच्चार केला आणि आम्हाला खातरी करून दिली, की आम्ही कोणतेही प्रश्न गुरुजींना विचारू शकतो आणि ते त्या प्रश्नाचे उत्तर देणार. एवढे सांगूनही प्रश्न विचारायचे धारिष्ट्य कोणालाही होईना. मग गुरुजींनीच काही प्रश्न उपस्थित केले आणि त्याची उत्तरे दिली. आणि मग काय विचारता, बांध फुटल्यासारखी मुले प्रश्न विचारू लागली. आकाश निळे का असते? समुद्राचे पाणी खारट का असते? पाण्याचा रंग कोणता असतो? गाईंचे रंग वेगवेगळे असतात, मग म्हशीचा रंग काळाच का असतो? न्यूटनच्या चक्रात सात रंग एकत्रित पांढरे दिसतात, मग तेच सात रंग एकत्र मिसळले असता ते मिश्रण पांढरे न होता काळे का दिसते? अणुबॉंबमध्ये काय भरतात? वगैरे. ज्या प्रश्नांची उत्तरे गुरुजी लगेच देऊ शकले नाहीत, त्याची उत्तरे त्यांनी दोन-तीन दिवसांनी दिली. त्यानंतर हा खेळ आम्ही सतत खेळू लागलो. ज्या ज्या वेळी गुरुजींना वेळ मिळे, त्या त्या वेळी आम्ही आधीच लिहून ठेवलेले प्रश्न विचारून त्यांना भंडावून सोडत असू. पण एकदाही ते आमच्या आचरट प्रश्नांवर चिडले नाहीत की कंटाळले नाहीत. आजच्या संदर्भात बोलायचे झाल्यास १९७० सालातील ते आमचे 'गूगल' महाराज होते. काळाच्या कितीतरी पुढे होते आमचे पाटील गुरुजी.

गुरुजींनी आम्हाला निरीक्षण करायला शिकवले, निरीक्षण करून मनात उद्भवणारे प्रश्न निर्भयपणे विचारायला शिकवले. आजही एखाद्या मीटिंगमध्ये, ट्रेनिंग सेशनमध्ये मनात आलेले प्रश्न बिनधास्तपणे विचारायची हिम्मत त्यांच्या शिकवणीमुळेच मी करू धजतो. कित्येक वेळा असे झाले आहे की विचारलेला प्रश्न एकदम साधा आणि कित्येक वेळा बावळटपणाचा वाटतो. खरे म्हणजे तोच प्रश्न इतरांनाही पडलेला असतो, मात्र लाजेखातर विचारायची हिम्मत करायला कोणी तयार झालेला नसतो. अशा वरकरणी बावळट वाटणाऱ्या प्रश्नाचे उत्तर देणारा मात्र जेव्हा, "चांगला प्रश्न आहे तुमचा" असे म्हणून उत्तर द्यायला सुरुवात करतो, त्या वेळी अंगावर मूठभर मास चढते. निर्भयपणे प्रश्न विचारण्याची हिम्मत ही मला मिळालेली पाटील गुरुजींची एक मोठी देणगी आहे, हे मी कृतज्ञापूर्वक सांगू इच्छितो.

पाटील गुरुजींच्या अंगात निरीक्षण करण्याची वृत्ती अगदी भिनली होती. एकदा वर्गात त्यांनी एका मुलाच्या हातावर, चेहऱ्यावर काही पांढरे डाग पाहिले. त्यांनी एक टाचणी घेऊन, त्या मुलाला दुसरीकडे बघायला लावून त्या डागांवर टोचले व त्याला काही जाणवते का विचारले. त्या मुलाने "नाही' म्हटल्यावर दुसऱ्या दिवशी शाळेत पालकांना घेऊन यायला सांगितले. दुसऱ्या दिवशी त्या मुलाचे पालक शाळेत आले, मुख्याध्यापकांच्या कार्यालयात त्यांचे काही बोलणे झाले व ते त्या मुलाला घेऊन घरी निघून गेले. त्यानंतर तो मुलगा शाळेत पुन्हा काही आला नाही. गुरुजींना विचारले असता असे कळले की त्या मुलाला कुष्ठरोगाची बाधा झाली होती, त्याच्या अंगावर पडलेले पांढरे डाग हे त्याचेच लक्षण होते. गुरुजींनी ते वेळीच ओळखले, त्या मुलाला उपचार घेण्यासाठी पाठवले. पुढे तो मुलगा अगदी बरा झाला व त्याला जणू काही जीवनदानच लाभले. त्याला जीवनदान लाभले आणि वर्गातील इतर मुले संसर्गापासून बचावली. हे सर्व शक्य झाले ते आमच्या गुरुजींच्या निरीक्षणशक्तीमुळेच आणि विद्यार्थ्यांविषयीच्या त्यांच्या आत्मीयतेमुळे.

वर्गात एकदा गुरुजींनी एका मुलीला अभ्यासातील एक प्रश्न विचारला. उत्तर देताना उभे राहून उत्तर देणे अपेक्षित असते. इथे ती मुलगी मान खाली घालून बसूनच राहिली, जागची हलेना, काहीच बोलेना. गुरुजींनी वयाने मोठ्या अशा एका मुलीला सोडून वर्गातील इतर सर्व मुलांना बाहेर मैदानावर खेळायला जायला सांगितले. काय झाले ते आम्हाला काहीच कळेना. नंतर खूप दिवसांनी आमच्यातीलच एका मोठ्या मुलाने सांगितले की त्या मुलीला वर्गातच मासिक पाळी सुरू झाली होती, जी गुरुजींनी आपल्या अनुभवावरून ताडली. वर्गातील मोठ्या मुलीची मदत देऊन तिला घरी पाठवून दिले. मासिक पाळी वगैरे म्हणजे काय हे समजण्याचे ते आमचे वय नव्हतेच, पण त्या विषयाचे गांभीर्य आणि गुरुजींनी ज्या प्रकारे तो प्रसंग हाताळला त्याचे आज नुसते कौतुकच वाटते असे नसून गुरुजींविषयी आदर द्विगुणित होतो.

एकदा शाळेत, शाळेतीलच मुलांचे एक छोटेसे चित्रकलेचे प्रदर्शन भरवले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन पाटील गुरुजींच्या हस्ते होणार होते. प्रदर्शन भरवलेल्या वर्गाच्या दारावर एक लाल रिबिन बांधली होती. ती कापून उद्घाटन होणार होते. उद्घाटनप्रसंगी गुरुजींनी ती रिबिन मधोमध न कापता अगदी एका कडेला कापली. लगेच ती रिबिन सोडून एका लहान मुलीला केसांना बांधायला दिली. ती रिबिन जर मधोमध कापली असती, तर तिचा काहीच उपयोग झाला नसता. पण गुरुजींनी ती एका बाजूने कापून त्याचा उपयोग करून दाखवला. गुरुजींनी उपदेशापेक्षा कृतीवरच नेहेमी भर दिला.

सातवी पास झाल्यावर दुसऱ्या शाळेत जाणे भाग पडले, कारण ह्या शाळेत फक्त सातवीपर्यंतच वर्ग होते. सातवीच्या सेंडऑफच्या वेळी त्यांनी केलेले भाषण आजही स्मृतिपटलावर कायम आहे. गुरुजी म्हणाले होते, "प्रत्येकात बुद्धिमत्ता कमी-जास्त प्रमाणात असू शकते; मात्र कष्ट करायची तयारी, प्रामाणिकपणा आणि चिकाटी असेल, तर यश तुमचंच आहे." वर्गातील मुलींना उद्देशून ते म्हणाले होते, "मुलींनो, तुम्ही उद्याच्या गृहिणी आहात. घर इतकं नेटकेपणाने सांभाळा की घरातले दिवे गेले, तरी घरात ठेवलेला सुई-दोरा तुम्हाला अंधारातदेखील अचूकपणे सापडला पाहिजे." आज इतक्या वर्षांनी हे वाक्य आठवते, म्हणजेच त्या वाक्याने माझ्या मनावर किती खोलवर परिणाम झाला असला पाहिजे हे उमजते.

पुढे शिक्षण पूर्ण झाले, नोकरी लागली, लग्नही झाले. पाटील गुरुजी आमच्या घरापासून तसे जवळच राहायचे. कित्येक वेळा ते रस्त्याने येता-जाताना दिसायचे. ज्या वेळी माझे इतर मित्र त्यांच्या गुरुजनांपासून तोंड लपवायचे, त्याच वेळी मी मात्र पाटील गुरुजी कधीही दिसले की न चुकता त्यांच्यापुढे लवून "गुरुजी, नमस्कार" म्हणायला चुकलो नाही. आणि तसे करताना, इतके चांगले गुरुजी आयुष्याच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर आपल्याला लाभले ह्याबद्दल देवाचे आभारच मानीत असे. सहावी-सातवीच्या त्या कोमल आणि संस्कारक्षम वयात मला इतके चांगले शिक्षक लाभले, ह्याला मी माझ्या पूर्वजन्माची पुण्याईच समजतो.

आमचे आवडते पाटील गुरुजी कधीच निवृत्त झाले. आज ती शाळादेखील बंद झाली आहे व आमच्या वर्गांचा उपयोग गोदामे म्हणून होत आहे. पण आजही त्या शाळेवरून जायचा योग आला, तर माझे सहावी-सातवीचे वर्ग बघण्याचा मोह आवरता येत नाही. सहकुटुंब अथवा मित्रपरिवाराबरोबर जाताना, प्रत्येकाला, 'प्रथमदर्शनी न आवडलेली, पण माझ्या जीवनावर दूरगामी परिणाम करणारी' ती म्युनिसिपालटीची शाळा आवर्जून आणि अभिमानाने दाखवतो.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# जीना यहाँ, मरना यहाँ...

एकाच शेलेंद्रमध्ये अनेक कवी वास करून होते. एकीकडे क्रांतीची कविता, जीवनातल्या अनेक कटू प्रसंगांतून गेल्यामुळे जीवनविषयक निराळी दृष्टी असलेली कविता, तर त्याच वेळेस अतिशय हळुवार अशी प्रेमगीत असलेली कविता. प्रेमगीतांचं म्हणायचं झालं, तर यहुदीमधलं 'ये मेरा दिवानापन है, या मोहोब्बत का सुरूर...', मधुमतीमधलं 'दिल धडक धडक के कह रहा है आ भी जा, तुम्हारी हो चुकी हूं मै...', चोरी चोरीमधलं 'ये रात भीगी भीगी, ये मस्त समाये...'

**अभिदेश**



१९७०च्या जून महिन्यात आम्ही मालाडहून बोरिवलीला शिफ्ट झालो. पाचवीपर्यंतचे शिक्षण मालाड पश्चिमेच्या म्युनिसिपालटीच्या शाळेत झाले होते आणि सहावीसाठी बोरिवलीच्या सोडावाला लेनमधल्या म्युनिसिपालटीच्या शाळेत मोठ्या आणि धाकट्या भावंडांसहित प्रवेश घेतला. प्रथमदर्शनी ह्या शाळेत आवडण्यासारखे काहीच नव्हते. जुनी बैठी शाळा, ॲस्बेस्टॉचे छप्पर, भिंतींना चुन्याची सफेदी, प्रत्येक इयत्तेचा फक्त एकच वर्ग आणि मुख्य म्हणजे खेळायला मैदानही नव्हते. माझ्या सहावीच्या वर्गशिक्षकांचे नाव होते सुरेश पाटील. त्या वेळी शिक्षकांना ‘सर’ वगैरे न म्हणता गुरुजीच म्हटले जाई. जो विद्यादान करतो, तो गुरू आणि म्हणून आदराने ‘गुरुजी.’

एक टिपिकल सकाळ. डोळ्यांवर अजूनही असलेली झोप. कोणीतरी हाका मारून उठवतंय. आपल्याला उठवत नाहीये, पण नाइलाज आहे. कसंबसं उठून, अर्धवट झोपेत ब्रश सुरू झालाय आणि तिकडे रेडियोवर 'भूले बिसरे गीत' सुरू झालंय. लता गातेय - कधी 'राजा की आएगी बरात...', तर कधी 'बरसात मे हमसे मिले तुम...'. सत्तरच्या दशकात जन्मलेल्यांच्या आणि खासकरून सकाळची शाळा असलेल्यांच्या घरातलं हे अगदी रोजचं दृश्य. सकाळपासून सुरू झालेला रेडिओ हा रात्री छायागीत, बेला के फूल ऐकूनच बंद व्हायचा. त्या काळी रेडिओ हा मध्यम आणि निम्न मध्यमवर्गाच्या आयुष्याचा अगदी अविभाज्य घटक. नंतर साधारण ७८-७९च्या सुमारास घरात टेलिव्हिजनचं आगमन झालं. इतके दिवस नुसती ऐकलेली गाणी अचानक प्रत्यक्ष दिसायला लागली. रेडिओमुळे गाण्यांचं संगीत, गायक आवडायचे आणि आता प्रत्यक्ष चित्रीकरण बघून पडद्यावरचे कलाकार आवडू लागले. हळूहळू रेडिओ मागे पडायला लागला. तरीही सकाळी रेडिओ हवाच, त्यामुळे 'भूले बिसरे गीत' ऐकू येतंच होतं. नंतर पुढे उच्च शिक्षणासाठी घरापासून दूर गेल्यावर अचानक रेडिओ पुन्हा एकदा मेन स्ट्रीममध्ये आला, पण ह्या वेळेस नुसतं संगीत आणि गायक नाही, तर गीतकारालासुद्धा बरोबर घेऊन. जसजशी गाणी अधिक बारकाईने ऐकायला लागलो, नुसती चालच नाही तर गीतांचे शब्ददेखील ऐकायला लागलो, तसं लक्षात येऊ लागले की खूप साऱ्या गाण्यांमध्ये बराच अर्थ दडलाय. मग गाण्यांचे शब्द ऐकण्याचं हे वेड वाढतच गेलं. हळूहळू मग गीतकारांची माहिती होऊ लागली आणि मग लक्षात आलं की आपल्याला आवडणारी बरीचशी गाणी एकाच गीतकाराची आहेत आणि एवढंच नाही, तर त्याने आपला प्रत्येक मूड पकडणारी गाणी लिहिलीयेत. तो गीतकार म्हणजे कवी शैलेंद्र.

शंकरदास केसरीलाल नावाने रावळपिंडीत जन्मलेला, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेला, जातीयवादाचा शिकार झालेला, रेल्वे वर्कशॉपमध्ये नोकरी करणारा, सिनेमा आणि सिनेसंगीत यांच्याबद्दल तिटकारा असणारा, पण शैलेंद्र ह्या टोपणनावाने कविता करणारा अपघाताने किंवा नाइलाजाने सिने गीतकार बनतो काय आणि अवघ्या १६-१७ वर्षांच्या व्यावसायिक कारकिर्दीत आख्ख्या चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवतो काय - तेही साहिर, हसरत, मजरूह, शकील ह्या दिग्गजांच्या स्पर्धेला तोंड देत..... सगळंच विलक्षण!

हलाखीच्या परिस्थितीमुळे शैलेंद्रच्या परिवाराने रावळपिंडीहून मथुरेला प्रस्थान केलं. तिथे त्यांचे मोठे भाऊ रेल्वेत नोकरीत असल्यामुळे कुटुंबाला आधार होता. तिथेच सरकारी शाळेमधून ते इंटर पास झाले, तेही राज्यात (उ.प्रदेश) तिसऱ्या क्रमांकाने. पुढे शिकायची खूप इच्छा होती, पण घरच्या परिस्थितीमुळे नोकरी करावी लागली आणि ते मुंबईला माटुंग्याला रेल्वे वर्कशॉपमध्ये ट्रेनी म्हणून रुजू झाले. कसं काय ते कोणास ठाऊक, पण त्यांना लहानपणापासूनच कविता लिहिण्याचा आणि डफ वाजवण्याचा छंद लागला होता. खूप उदास वाटायला लागलं की दूर कुठेतरी यमुनातीरी एकटंच बसून कविता लिहायचे, नाहीतर डफ वाजवत बसायचे. (हे डफलीप्रेमच एक दिवस त्यांना राज कपूरचा अत्यंत जिवलग मित्र बनवणार होतं. इतकं की राज कपूरनी पडद्यावर अनेक गाण्यांत डफली वाजवली - श्री ४२०, जिस देश मी गंगा ... इत्यादी). मथुरेत असतानाच साधना, हंस, नया युग इत्यादी मासिकांत त्यांच्या कविता प्रकाशित व्हायला लागल्या होत्या आणि त्या लोकांना आवडतही होत्या. मुंबईत आल्यावर खाण्या-पिण्याचा प्रश्न तर सुटला, पण मशीनच्या कोलाहलात खूप घुसमट होत होती. त्यांच्यातला कवी आतल्या आत कुढत होता. कवितेवरचं प्रेम काही कमी झालं नव्हतं. पण काय लिहायचं आणि कोणासाठी? हा साधारण १९४२चा काळ. स्वातंत्र्यचळवळ अगदी शिखरावर होती. सगळीकडे भारत छोडो आंदोलन, 'करो या मरो'चे नारे चालू होते. ह्या वातावरणाचा शैलेंद्रच्या मनावर परिणाम झाला नसता तरच नवल. त्यांनीही आंदोलनात भाग घेतला आणि तुरुंगवासही भोगला. त्याच वेळेस ठरवलं की आता लेखणीही ह्याच कामासाठी वापरायची. डफली घेऊन तेही इप्टाच्या (इंडिअन नॅशनल थिएटरच्या) नाटकांमध्ये आपल्या स्वातंत्राविषयीच्या, क्रांतिकारक कविता लिहू लागले, म्हणू लागले. पुढे स्वातंत्र्य तर मिळालं, पण फाळणीची किंमत चुकवून. उद्विग्नतेने आणि अत्यंत दुःखी अंत:करणाने त्यांनी लिहिलं -

सुन भैया, सुन भैया

दोनो के आँगन एक थे भैया

कजरा और सावन एक थे भैया

ओढ़न पहरावन एक थे भैया

जोधा हम दोनों एक ही मैदान के

परदेसी कैसे चाल चल गया

झूठे सपनों में हमको छल गया

वो डर से घरसे निकल तो गया


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

पर दो आँगन कर गया मकान के

अनेक कविसंमेलनं, मुशायरे ह्यांमधून त्यांचं काव्यवाचन, गायन चालूच होतं. अशाच एका कविसंमेलनात ते त्यांची प्रसिद्ध 'जलता है पंजाब हमारा ... ' ही कविता सादर करत असताना त्यांना पृथ्वीराज आणि राज कपूर ह्यांनी ऐकलं. हाच तो त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा क्षण. काव्यवाचनानंतर राज लगेच शैलेंद्रना भेटला, म्हणाला, " मी आग नावाची फिल्म करतोय. माझ्या फिल्मसाठी गाणं लिहिशील?" ताडकन शैलेंद्र म्हणाले, "नही. मै पैसों के लिये नहीं लिखता. अशी कोणतीच गोष्ट तुझ्याकडे नाहीये की ती मला तुझ्यासाठी गाणं लिहायला उद्युक्त करेल. जेव्हा मला वाटेल तेव्हाच मी लिहीन." राज म्हणाला, "हरकत नाही. काही मदत लागल्यास सांग."

रेल्वेच्या नोकरीत तुटपुंज्या पगारात कसंबसं आयुष्य चालू होतं आणि त्या वेळच्या रिवाजानुसार घरून लग्न करण्यासाठी सतत विचारणा होत होती. लांबच्या नात्यातली असलेल्या शकुंतलाबरोबर त्यांचं मन जुळलं आणि दोघांचं लग्न झालं. लग्नातसुद्धा सगळ्यांनी बोल लावले, कारण नवऱ्यामुलाकडे घालायला धड कपडेसुद्धा नव्हते. पण शकुंतलाने आणि तिच्या घरच्यांनी खूप साथ दिली. लग्न तर झालं, पण मुंबईमध्ये दोघं राहू शकतील अशी जागा आणि आर्थिक परिस्थिती नव्हती. चारच दिवसांत ते एकटे मुंबईला परतले आणि रोज पत्नीच्या आठवणीत व्याकूळ होत होते. शेवटी परळला रेल्वे कॉलनीत एक छोटीशी खोली त्यांना कशीबशी मिळाली आणि त्यांचा संसार सुरू झाला . वर्षभरातच नव्या पाहुण्याची चाहूल लागली. घरी आधीच चणचण, त्यात कोणाचा आधार नाही, त्यामुळे बाळंतपण शकुंतलेच्या माहेरी - झाशीला - करायचं ठरलं. बायकोला माहेरी पाठवायलासुद्धा पैसे नव्हते. अचानक त्यांना राजचे बोल आठवले आणि तडक ते त्याला भेटायला त्याच्या महालक्ष्मीच्या (तेव्हा आर के स्टुडिओ नव्हता) ऑफिसात गेले. दारवानाला सांगितलं, "जा, जाऊन सांग, कवी शैलेंद्र भेटायला आलेत." राज जेव्हा भेटायला आला, तेव्हा त्याला शैलेंद्र खूप दु:खी, तणावात, चिडलेले वाटले. शैलेंद्र ताडकन म्हणाले, "तू मला त्या दिवशी भेटायला आला होतास. आठवतंय?" राजने "हो" म्हणताच ते म्हणाले, "मला आत्ता ५०० रुपयांची गरज आहे. तुला जे काम करून घ्यायचं असेल ते करून घे." राजने तत्काळ पैसे दिले आणि इथूनच एका महान पर्वाला आणि दोस्तीला सुरुवात झाली. जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत ही दोस्ती टिकली.

काही दिवसांनी शेलेंद्र राजकडे पुन्हा गेले, खिशात हात घातला आणि ५०० रुपये काढले. राजने ते पाहिलं, पैसे परत केले, चेहऱ्यावर मिश्कील हास्य आणून म्हटलं, "अरे बाबा, बरसात बनवतोय. दोन गाणी लिहून दे." शैलेंद्रनी जी दोन गीतं लिहिली, त्यापैकी एक बारसातचं टायटल साँग बनलं, जे भारतीय सिनेमाच्या इतिहासातलं पहिलं शीर्षक गीत (टायटल साँग) मानलं जातं - 'बरसात में हमसे मिले तुम सजन, तुमसे मिले हम, बरसात में...' इथून पुढे मग शैलेंद्रने कधी मागे वळून पाहिलंच नाही. घरातदेखील पैशांची कमी पडली नाही, जणू काही घरीसुद्धा 'पैसों की बरसात' सुरू झाली. नवीन बांधलेल्या बंगल्याचंदेखील नाव ठेवलं गेलं 'रिमझिम'. इथूनच मग पुढे राज कपूर, शैलेंद्र, शंकर-जयकिशन असं त्रिकूट जमलं ते अगदी शेवटपर्यंत. आवारा, आह, चोरी चोरी, श्री ४२०, अनाडी ते मेरा नाम जोकरपर्यंत. एक दिवस राज बळेच शैलेंद्रना घेऊन गेले के. अब्बासांकडे, चित्रपटाची कथा ऐकायला. अब्बासनी ह्या साधारण दिसणाऱ्या आणि अतिसामान्य कपडे घातलेल्या शैलेंद्रकडे अजिबात लक्ष दिलं नाही... हा कोण, काय करतो हेदेखील विचारलं नाही. अब्बासनी दोन-अडीच तास कथावाचन केलं आणि मग राजने शैलेंद्रना विचारलं, "क्यों कविराज, कुछ समझे?" शैलेंद्र म्हणाले, "हो, चांगली आहे कथा." पण राज म्हणाला, "नही.. और बताओ, क्या समझ में आया?" शैलेंद्र एकदम म्हणाले, "बेचारा गर्दिश मे था, पर आसमान का तारा था, आवारा था।" हे ऐकून अब्बासनी एकदम चमकून पाहिलं आणि विचारलं, "राज, हा नक्की कोण आहे? नीट ओळख करून दे. माझ्या अडीच तासांच्या कथेचं सार ह्याने एका वाक्यात सांगितलं." अशा रितीने आणखी एका अजरामर शीर्षक गीताचा जन्म झाला. शैलेंद्रनी तर पुढे अनेक शीर्षक गीतं लिहिली. इतकी की त्यांच्यापेक्षा कोणी चांगलं शीर्षक गीत लिहिणारा अजून जन्मलाच नाही. उदा., 'बरसात में हमसे मिले तुम सजन..', 'आवारा हूं ...', 'सबकुछ सीखा हमने, ....... , सच है दुनियावालो के हम है अनाड़ी... ', 'चाहे कोई मुझे जंगली कहे ...', 'मेरे मन की गंगा और तेरे मनकी जमुना का ... संगम होगा के नहीं...', 'भैया मेरे राखी के बंधन को निभाना... छोटी बहेन को ना भुलाना...', 'हम उस देस के वासी हैं जिस देस में गंगा बहती हैं...', 'दिल अपना और प्रीत परायी, किसने हैं ये रीत बनायी...' एकाच वाक्यात सांगायचं, तर 'ही वॉज किंग ऑफ टायटल साँग्ज'.

शेलेंद्रचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अतिशय सोपे पण गहन अर्थ मांडणारे शब्द, तरीही गेयता असलेलं गीतलेखन. आता हेच उदाहरण घ्या ना - लोकशाहीचं अगदी सोपं वर्णन करणारं हे गाणं - 'होंगे राजे राजकुंवर, हम बिगड़े दिल शहजादे, हम सिंघासन पर जा बैठे, जब जब करे इरादे...' थोडीशी डावी विचारसरणी असलेली त्यांची लेखणी सामाजिक विषमता, दारिद्र्य, शोषण ह्याविषयी कायमच हळवी राहिली आणि ते त्यांच्या गीतांमधून, कवितांमधुन हे विषय घेऊन लिहीतच होते. लहानपणी वाट्याला आलेला संघर्ष, गरिबी ते कायम पडद्यावर मांडायचे. श्री ४२०चं हे गाणं - 'छोटे से घर के गरीब का बेटा, मै भी हूं माँ के नसीब का बेटा, रंज और गम बचपन के साथी, आँधियो में जली जीवनबाती, भूख ने बड़े प्यारसे पाला... दिल का हाल सुने दिलवाला .. ' घ्या, किंवा दूर गगन की छावमेमधलं हे 'कोई लौटा दे मेरे बिते हुए दिन' घ्या. तसंच सरळ आणि सोपे शब्द वापरून जीवनविषयक सूत्र सांगणारी अनेक गाणी त्यांनी लिहिली. सीमामधलं 'तू प्यार का सागर है, तेरी एक बूंद के प्यासे हम...' किंवा बंदिनीमधलं 'ओ जानेवाले हो साके तो लौट के आना' आणि अनाडीमधल्या 'सबकुछ सीखा हमने'मधला हा अंतरा घ्या - 'असली नकली चेहरे देखे, दिल पे सौ सौ पहेरे देखे, मेरे दुखते दिल से पूछो, क्या क्या ख्वाब सुनहरे देखे... टूटा जिस तारें पर नज़र थी हमारी, सबकुछ सीखा हमने...', तिसरी कसममधलं 'सजन रे झूठ मत बोलो, खुदा के पास जाना है, ना हाथी हैं ना घोड़ा हैं, वहा पैदल ही जाना है'... किती किती उदाहरणं द्यायची....

एकाच शेलेंद्रमध्ये अनेक कवी वास करून होते. एकीकडे क्रांतीची कविता, जीवनातल्या अनेक कटू प्रसंगांतून गेल्यामुळे जीवनविषयक निराळी दृष्टी असलेली कविता, तर त्याच वेळेस अतिशय हळुवार अशी प्रेमगीत असलेली कविता. प्रेमगीतांचं म्हणायचं झालं, तर यहुदीमधलं 'ये मेरा दिवानापन है, या मोहोब्बत का सुरूर...', मधुमतीमधलं 'दिल धडक धडक के कह रहा है आ भी जा, तुम्हारी हो चुकी हूं मै...', चोरी चोरीमधलं 'ये रात भीगी भीगी, ये मस्त समाये...', काला बाजारचं (हे गाणं काडेपेटीच्या तालावर सुचलेलं शीघ्रकाव्य.) 'खोया खोया चांद, खुला आसामां...', आणि पडद्यावरचं सर्वोत्तम प्रेमगीत 'प्यार हुआ इकरार हुआ है , प्यार से फिर भी डरता है दिल... आणि अजरामर झालेली त्यातलीच ही ओळ 'हम ना रहेंगे, तुम ना रहोगे, फिर भी रहेगी निशानिया....'

एवढंच नाही, तर नवं नवे शब्द वापरूनही गाणं लिहिण्याचा त्यांना नाद होता. उदा. 'जिंदगानी' हा आधी कधीच न वापरलेला शब्द. नेहमीचे शब्द म्हणजे जीवन, जिंदगी. पण जिंदगानी हा अतिशय गेय शब्द वापरून लिहिलेलं श्री ४२०चं 'मुडमुड के ना देख मुडमुडके, जिंदगानी के सफर मी तू अकेला ही नही है...' किंवा आहमधलं 'छोटीसी ये जिंदगानी रे, चार दिन की जवानी तेरी' ऐका, कानाला किती गोड वाटतं.

जशी शंकर-जयकिशनबरोबर त्यांची जोडी जमली, तशीच एस.डी . बर्मनबरोबरही छान जोडी जमली आणि त्यांनी एकत्र अनेक चित्रपट केले. पण ह्या जोडीचा सर्वोच्च आविष्कार म्हणजे 'गाइड'. खरं तर गाइडची गाणी हा एक स्वतंत्र लेखाचाच विषय आहे. एकापेक्षा एक सरस अशी ९ गाणी, एकीकडे 'वहाँ कौन है तेरा, मुसाफिर तू जायेगा कहा', 'रामा मेघ दे, छाया दे'सारखी करुण रसातली, तर दुसरीकडे 'गाता रहे मेरा दिल', 'तेरे मेरे सपने अब एक रंग हैं' यासारखी प्रणयप्रधान गाणी. तसंच सगळी बंधनं तोडून सांगणारं, मुक्त 'काटो से खीचके ये आचल, तोड के बंधन बांधी पायल...', तर तसंच विरहरसातली लागोपाठ येणारी 'मोसे छल किये जा', 'क्या से क्या हो गया'. पण सर्वोत्तम हे 'दिन ढल जाये हाये , रात ना जाय'.. प्रेमभंगामुळे, अपेक्षाभंगामुळे उद्ध्वस्त झालेल्या नायकाच्या मन:स्थितीचं अतिशय परिणामकारक वर्णन करणारं. माझ्या मते भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासांत सर्वोत्तम ५ गाण्यांपैकी एक. दिग्दर्शक विजय आनंद, देव आनंद, एसडी, शैलेंद्र

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

असेच एका गाण्याच्या प्रसांगाबद्दल चर्चा करत बसले होते. विजय आनंद सांगत होता, "नायिका नायकावर रागावलीये आणि त्याच्याशी बोलत नाहीये, त्याला टाळतीये. नायकाला हे सहन होत नाहीये, अत्यंत विमग्न अवस्थेत तो बसलाय. बाहेर पाऊसही पडतोय. इथे मला एक गाणं पाहिजे." शैलेंद्रनी डोळे मिटले आणि झरझर शब्द लिहिले -

प्यार में जिनके, सब जग छोड़ा और हुए बदनाम

उनके ही हाथों, हाल हुआ ये, बैठे है दिल को थाम, अपने कभी थे अब हैं पराये

नंतर येणारं हे कडवं -

ऐसी सी रिमझिम,ऐसी फ़ुहारें , ऐसी ही थी बरसात ,

खुद से जुदा और जग से पराये, हम दोनो थे साथ, फिर से वो सावन अब क्यों ना आये

मग शेवटचं कडवं , अक्षरश: काटा आणणारं

दिल के मेरे, पास हो इतने, फिर भी हो कितने दूर

तुम मुझसे, मै दिलसे परेशां, दोनों हैं मजबूर, ऐसे में किसको कौन मनाये

आणि सगळ्यात शेवटी लिहिलेला हा मुखडा

दिन ढल जाएं, हाये रात ना जाय

तू तो ना आये तेरी याद सताये , दिन ढल जाएं

सलाम त्या शैलेंद्रला आणि रफीला. कधीही हे गाणं ऐकलं आणि आपली कुठलीशी एक हळवी आठवण जागी झाली नाही असं होत नाही . कोणाला सांगूनही खरं वाटणार नाही की हे आख्खं गाणं शैलेंद्रनी अवघ्या अर्ध्या तासात लिहिलंय. हेही शैलेंद्रचं एक वैशिष्ट्य. कधी कोणतीच अडचण त्यांना गीतलेखनापासून रोखू शकली नाही. एकदा लिहिता लिहिता त्यांच्या पेनामधली शाई संपली, दुसरं पेन जवळ नाही, तर काडेपेटीतल्या खाली पडलेल्या १०-१२ जळलेल्या काड्या उचलल्या आणि सुपरहिट गाणं लिहिलं 'ए मेरे दिल कही और चल, गम की दुनियासे दिल भर गया, ढूंढ ले अब कोई घर नया...'

शैलेंद्रनी नुसती चित्रपट गीतंच नाही, तर अनेक गैरफिल्मी कवितासुद्धा लिहिल्या, ज्या कधी प्रकाशित झाल्याच नाहीत. त्यामुळेच त्यांना साहिर, कैफी आझमी यांच्यासारखा सरकार दरबारी कधीच सन्मान मिळाला नाही, ह्याचं खूप दु:ख वाटतं. समाजानेसुद्धा थोडीसुद्धा परतफेड केली नाही, ह्याचं राहून राहून वाईट वाटतं.

अशा ह्या शैलेंद्रनी पडद्यावर एक कविता जिवंत करण्यासाठी जिवाचं रान केलं, आपलं सर्वस्व अर्पून एक काव्यात्मक कथा पडद्यावर जिवंत केली.... 'तिसरी कसम.' बिहारचे सुपुत्र फणीश्वरनाथ 'रेणू ' ह्यांनी एक कथा लिहिली 'मारे गये गुलफाम', जी शेलेंद्रनी वाचली आणि लगेच रेणूंना एक चिठ्ठी लिहिली आणि ह्या कथेवर चित्रपट करण्याची परवानगी मागितली. रेणूंनी होकार देताच शैलेंद्रनी त्यांना १०,०००/- रुपये देऊन हक्क विकत घेतले आणि रेणूंना चित्रपटाची पटकथा लिहायला सांगितली. ही १९६० सालाची गोष्ट. चित्रपटाच्या नायकासाठी राज कपूर सोडता कोणी दुसरा कोणी डोळ्यापुढे येणं शक्यच नव्हतं. राजनेही होकार दिला, पण दिग्दर्शन करण्यास असमर्थता व्यक्त केली, कारण तेव्हा तो दुसऱ्या चित्रपटात व्यग्र होता. नायिका म्हणून वहिदा रेहमान नक्की झाली. दिग्दर्शकाचा शोध बासू भट्टाचार्यापाशी संपला. मोठ्या उत्साहात चित्रपटाचा मुहूर्त झाला. शैलेंद्रचा पहिलाच चित्रपट म्हणून सगळ्या चित्रपटसृष्टीने खूप कौतुक केलं. पण ह्या ना त्या कारणामुळे चित्रपट रखडत गेला. तब्बल ५ वर्षं झाली, तरी चित्रपट पूर्ण होत नव्हता. खूप लोकांनी त्यांना फसवलं. खर्च ४-५ लाखांवरून २५-२६ लाखांवर गेला. फिल्म एडिट करायलासुद्धा पैसे उरले नव्हते. ते अखंड कर्जात बुडालेले होते, पण त्यांना ती फिल्म चालण्यावर खूप विश्वास होता. त्याच वेळेस रेणूदेखील आजारपणामुळे त्यांच्या मूळ गावी परतले आणि शैलेंद्र एकदम एकटे पडले. शेवटी कशीबशी फिल्म पूर्ण झाली. खरंच दृष्ट लागावी अशी झाली होती. गाणी तर एकापेक्षा एक. बैलगाडीवान हिरामण आणि नौटंकीत नाचणारी हिराबाई ह्यांच्यामधल्या अव्यक्त आणि असफल प्रेमाची कहाणी. राज आणि वहिदा दोघांनी जीव तोडून कामं केली. पण ही फिल्म सर्वसामान्य लोकांसाठी नव्हतीच. वितरकांनी हात आखडता घेतला. कोणीच फिल्म रिलीज करायला तयार नव्हतं. लावलेली सगळी पुंजी अक्षरश: मातीमोल झाली होती. ह्या धक्क्यातून शैलेंद्र सावरलेच नाहीत. शेवटी एक-दोन वितरक उत्तर प्रदेशात आणि बिहारमध्ये फिल्म रिलीज करायला तयार झाले. आपली फिल्म मोठ्या पडद्यावर बघणं, प्रीमिअर शो करणं हे स्वप्नचं राहिलं.

असाच एक दिवस स्वतःला कसंबसं सावरून शैलेंद्र राज कपूरला भेटायला गेले. दोघेही नुसतेच एकमेकांकडे बघत नुसते गप्प बसून राहिले, निःशब्द. शेवटी मृतवत मनाने ते घरी आले. आता जगावंसं वाटत नव्हतं. एवढी हार कधीच झाली नव्हती. ह्या दिवसापासून त्यांनी कोणाशीही बोलणंच टाकलं. आतल्या आतच घुसमट वाढत होती. १३ डिसेंबरची सकाळ. शैलेंद्रची अस्वस्थता वाढतच चालली होती. शेवटी शकुंतलानी राज कपूरला फोन लावला. त्याने लगेच शैलेंद्रना डॉक्टर कपूरकडे न्यायचा सल्ला दिला. हॉस्पिटलमध्ये निघालेच होते, वाटेत शैलेंद्रना वाटलं, एकदा राज कपूरला भेटून घ्यावं. दोघं भेटले, भरपूर गप्पा झाल्या. राजने विचारलं, "रे कविराज.. जीना यहा, मरना यहा, इसके सिवा जाना कहा.. कब पूरा कर राहे हो?" राज तेव्हा 'मेरा नाम ज़ोकर'मध्ये व्यग्र होता. शैलेंद्र हसून म्हणाले, "कल का तमाशा निपटा लूँ, तभी पूरा कर लूंगा..." दुसऱ्या दिवशी राज कपूरचा वाढदिवस होता आणि नेहमीप्रमाणे त्याची जंगी पार्टी. शैलेंद्रचा इशारा ह्याच गोष्टीकडे होता.

नंतर मग हॉस्पिटलला पोहोचले, डॉक्टरांनी लगेच अॅडमिट केलं. तब्येत ढासळलीच. कशीबशी रात्र सरली. दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच त्यांना राजला भेटून त्याचं अभिष्टचिंतन करावंसं वाटत होतं, पण डॉक्टर सोडायला तयार नव्हते. राजची पत्नी कृष्णा आणि गायक मुकेश त्यांच्याबरोबर हॉस्पिटलमध्ये होते. शैलेंद्रना बरं वाटावं म्हणून तिकडे आर के स्टुडिओमध्ये विशेष पूजा, हवन चालू होतं. शेवटी दुपारी १२नंतर शैलेंद्रनी अखेरचा श्वास घेतला, डोळे कायमचे मिटले. वणव्यासारखी ही बातमी सगळीकडे पसरली. कोणाचा विश्वासच बसेना. एवढा उमदा कलाकार, असा अचानक कसा काय निघून जाऊ शकतो? राज कपूर तर अगदी पुतळ्यासारखा बसून होता, जणू काही त्याचा आत्माच निघून गेला होता. शेलेंद्रच्या घरी पोहोचल्यावर तर त्याची अवस्था कोणालाच बघवत नव्हती. शेलेंद्रच्या मृत शरीरापासून दूर हटायलाच तयार नव्हता हा त्यांचा जिवलग मित्र. आपल्या वाढदिवसाच्या दिवशीच शैलेंद्रचं असं निघून जाणं त्याला सहनच होत नव्हतं. ह्यानंतर प्रत्येक वाढदिवसाला हमसून हमसून रडत शैलेंद्रची आठवण काढल्याशिवाय त्याचा दिवस जात नसे. काही दिवसांनी धर्मयुग मासिकात राजने शैलेंद्रवर एक लेख लिहिला, त्यात त्याने म्हटलं, "माझं शरीर आर के स्टुडिओत होतं, पण आत्मा तर शैलेंद्रबरोबर निघून गेला होता."


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

योगायोगाची गोष्ट म्हणजे शैलेंद्रने लिहिलेलं शेवटचं पूर्ण गीत म्हणजे 'हम तो जाते अपने गाव, अपनी राम राम राम....' काय न्याय म्हणावा देवाचा, शैलेंद्रच्या मृत्यूनंतर वितराकांनी 'तिसरी कसम ' विकत घेतली आणि फिल्म भारतभर रिलीज केली, भरपूर पैसे कमावले. एवढंच नाही, तर चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. राज, वहिदा , रेणू सगळ्या सगळ्यांनी हे यश बघितलं, पाहायला नव्हते तर ते फक्त शैलेंद्र. त्यांच्याच शब्दांत सांगायचं तर 'पथ भूला इक मुसाफ़िर, लेके मेरा मन दूर चला , बिखरे सपने, रह गयी यादें, रात से पहले चाँद ढला....'

जाता जाता --- जीना यहाँ , मरना यहाँ , इसके सिवा जाना कहा... हे गाणं अर्धवटच राहिलं होतं. अनेक गीतकारांनी ते पूर्ण करायाचा प्रयत्न केला, पण राज कपूरना कोणतंच पसंत पडत नव्हतं. शेवटी शैलेंद्रचाच मोठा मुलगा शैली शैलेंद्रने ते पूर्ण केलं, जे राजना पसंत पडलं. आज जे आपण पूर्ण गाणं ऐकतो, ते शैलेंद्रचं नाही. शैलेंद्रनी जवळजवळ ८०० चित्रपट गीतं लिहिली आणि अनेक गैरफिल्मी गीतं / कविता.

संदर्भ :

- आंतरजाल.
- आतापर्यंत वाचलेले , लक्षात राहिलेले लेख आणि किस्से.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# एका माणसाची गोष्ट

चिक्या आबाचे मूळ नाव तुकाराम, पण गावातील सगळे त्याला 'चिक्या' या नावानेच हाक मारीत. त्याच्या 'चिक्या' या नावाचीसुद्धा एक कहानीच आहे. एकदा जवळच्या गावात देवीची जत्रा होती. जत्रेत तमाशाचा फड आला होता. तुकाराम चिकुलाल मारवाड्याबरोबर तमाशा पाहायला गेला असता त्या दोघांची इतकी दोस्ती जमली की चिकुलाल मारवाड्याने तुकारामला 'चिक्या' असे नाव ठेवले. पुढे चिकुलाल मारवाडी मरण पावला, पण तुकाराम तिथून पुढे 'चिक्या' या नावानेच ओळखला जाऊ लागला.

**किरण गायकर**



चिक्या आबा आपली टोकराची लांब काठी टेकत सरकंवरून जाऊ लागला की गावातील उसाट पोरे घरात लपून 'चिक्या, ये चिक्या' असे ओरडायला लागत. म्हाताऱ्याला चिडवून त्याची टिंगल करून त्याच्या शिव्या आइकने हा या उसाट पोरांचा खेळच. चिक्या आबाही मग वयतागून "तुझ्या आयला मी xxx" अशा शिव्या देत दात-ओठ खात तणतणत निघून जायचा.

अंगात मलकट कफनी, खाकी रंगाची हाफ पँट, डोक्यावर गांधी टोपी, खाकेत शबनम बॅग असा चिक्या आबाचा एकूण पेहराव. केसांची पार अनारकली झालेली. तोंडात हिरड्याच शिल्लक राहिलेल्या. असा हा चिक्या आबा रस्त्यावरून जाऊ लागला की उसाट पोरे घरात लपून आरडायची, कारण जर कोणा पोराला प्रत्यक्ष ओरडताना चिक्या आबाने बघितले, तर त्याच्यावर टोकराची लांब काठी फेकून शिव्या ठरलेल्याच.

चिक्या आबाचे मूळ नाव तुकाराम, पण गावातील सगळे त्याला 'चिक्या' या नावानेच हाक मारीत. त्याच्या 'चिक्या' या नावाचीसुद्धा एक कहानीच आहे. एकदा जवळच्या गावात देवीची जत्रा होती. जत्रेत तमाशाचा फड आला होता. तुकाराम चिकुलाल मारवाड्याबरोबर तमाशा पाहायला गेला असता त्या दोघांची इतकी दोस्ती जमली की चिकुलाल मारवाड्याने तुकारामला 'चिक्या' असे नाव ठेवले. पुढे चिकुलाल मारवाडी मरण पावला, पण तुकाराम तिथून पुढे 'चिक्या' या नावानेच ओळखला जाऊ लागला.

चिक्या आबा सोळा-सतरा वर्षांचा असल्यापासूनच शेठलोकांकडे स्वयंपाकी म्हणून काम करू लागला. स्वयंपाक त्याला छान जमायचा - मग तो मटनाचा असो की तरकारी. आज या शेठकडे, तर उद्या त्या शेठकडे असा सतत फिरतीवरच असल्याने तुकारामच्या लग्नाचा योगच कधी आला नाही. त्याची सतत फिरस्ती चालू असायची. मात्र एका बोर्डिंगमध्ये मुलांचे जेवण बनवायचे काम मिळाल्यावर तो स्थिर झाला. तिथेच एका बाईशी त्याचे सूत जमले व तो लग्न न करताच तिच्यासोबत राहू लागला. तीही बोर्डिंगमध्ये साफसफाईचे काम करायची. परंतु ती बाई थोडी नखऱ्याची होती. एकदा तुकारामने तिला एका दुसऱ्या पुरुषाबरोबर पाहिले. त्यावरून त्या दोघांत भांडण होऊन तुकारामने तिला खूप बडवली. लग्नाची बायको नाही म्हणून ती थोडीच त्याच्याकडे राहणार होती? ती तुकारामला सोडून निघून गेली. तुकाराम आता एकटाच राहू लागला.

बोर्डिंगच्या मुलांना उन्हाळ्याची, दिवाळसणाची सुट्टी लागली की तुकारामलाही काही काम नसायचे व म्हणून तो आपल्या गावी लहान भावाकडे यायचा. लहान भावाचे लग्न होऊन त्याला दोन मुलेही होती व ती आता शाळेतही जात होती. तुकाराम सुट्टीत गावी आला की भावाच्या मुलांसाठी भरपूर खाऊ घेऊन यायचा. कारण त्यांच्याशिवाय त्याचे होते तरी कोण?

तुकाराम सुट्टीत घरी आला म्हणजे आपल्या भावाकडे लग्नाचा विषय काढायचा. कारण मोठा असूनही अजून त्याचे लग्न झाले नव्हते.

"लोड्या, आरं, आता मला एकट्यानं राहावत नाय. दीस खायला उठतो, लगीन करावं म्हणतो."

"आरं चिक्यादा, मंग आमी तुला काय नाय म्हणतो का? कर की लगीन." लोड्या काहीसा नाखुशीनेच म्हणाला.

"पण नवरी बगायला गेलो तर घरची मानसं तर संग पायजेत."

"आता आगोट आले. आजून राबनी बाकी हाये. पटकन पानी पडला तर इसपायचं की सगलच. म्हणून म्या काय म्हणतो, ही आगोट जाऊ दे, बगू की पुढच्या टायमाला. शिमगा उगवला की लवकरच जाऊ पोरगी बगायला." लोड्या टाळाटाळ करत म्हणला.

लोड्याला तुकारामचे लगीनच करायचे नवते. कारण तुकारामचे लगीन केले तर त्याला मुले होतील व नंतर तो जागेची वाटणी मागेल. त्यापेक्षा त्याचे लगीनच जर केले नाही तर त्याचा हिस्साही आपल्यालाच मिळेल, असा विचार लोड्या करत होता. शेवटी झालेही तसेच. लगीन शिमग्याला करू, माईला करू असे करता करता वरसं पुढे जात राहिली व तुकाराम आता म्हातारा दिसू लागला. त्यातच तुकारामला मोतीबिंदू झाल्याने त्याची नजरही कमी झाली. शिवाय बोर्डिंगमध्ये जेवण बनवताना धुरामुळे त्याच्या डोळ्यांतून सतत पाणी येऊ लागले. त्यामुळे बोर्डिंग चालकाने त्याला त्याचा पगार देऊन कामावरून काढून टाकले.

आपला बाड-बिस्तरा गुंडाळून तुकाराम गावी आला व लोड्याकडे राहू लागला. जवळ पैसे होते तोपर्यंत लोड्याला आधार दिला. लोड्याची बायकोही "किराणा संपलंय; जरा भावोजींकडून पैकं मागा की, नायतरी आपणच पोसतोय त्याला" असं म्हणून तुकारामकडून पैसे घेऊ लागली. काही दिवसांनी तुकारामकडचे पैसे संपल्यावर, "थेरडा सारका गिळायला बसलाय. इकडं आमचंच खायाचं वांदं झालंत" असं तुकारामला सतत आयकवू लागली.

"चांगला धडधाकट व्हता, तवा इकरं तिकरं भिकोटला व आता हातपाय आडल्यावर भाव दिसला" अशी लोड्याच्या बायकोची तुकारामच्या मागे सारखी भुणभुण असायची.

तुकारामला विड्या फुकायची सवय असल्याने तो रात्रभर खोकत बसायचा.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"मेली रातभर डोळ्याला झोप नाय. हे थेरडं सारकं खोकतंय," लोड्याची बायको लोड्याला म्हणाली.

"मंग काय करू म्या?"

"म्या काय सांगत्ये, आपला ढोरांचा गोठा हाये ना, त्याच्या एका खोपट्यात राहू दे की त्याला. नायतर आपल्या पोरास्नी काई रोग व्हयाचा."

अशा प्रकारे तुकारामची रवानगी ढोरांच्या गोठ्यात करण्यात आली. तुकारामला घरातून बाहेर काढल्यावर त्याच्या जेवणाखाण्याचीही आबाळ होऊ लागली. जेवून उष्टे शिल्लक राहिले, तर ते ताटात वाढून कधीतरी खोपट्यात नेऊन दिले जाई. जेवणानंतर तुकारामचे जेवणाचे ताट व पाण्याचा तांब्याही वेगळाच ठेवला जाई.

एके दिवशी खूप वाट पाहूनही तुकारामला दुपारचे जेवण मिळाले नाही. जेवण होऊन बायामाणसांचा भांडी घासण्याचा आवाज येऊ लागला.

"लोड्या, आरं आज जेवायला मिलंल का नाय?" तुकाराम खोपट्यातून ओरडत म्हणाला. लोड्या व त्याच्या बायकोने जेवून अंग टाकले होते. आवाज ऐकूनही त्यांनी न ऐकल्यासारखे केले. तुकारामच्या पोटात मात्र कावळे ओरडत होते, कारण सकाळी फक्त वाडगाभर कणेरी त्याला मिळाली होती. तुकाराम उठला व काठी टेकत टेकत खालच्या आळीतील भग्याकडे गेला. भग्याची बायको मागच्याच वर्षी वारल्याने व मुलगा बाहेर नोकरीला असल्याने तो एकटाच राहत होता.

"ये भगेदा, काय जेवायचं शिल्लक आहे का?" भग्याचे जेवण होऊन थोडे उरले होते ते त्याने तुकारामला वाढले. जेवण झाल्यावर तुकाराम तेथेच थोडा वेळ खाटेवर पहुडला व भग्याला सांगू लागला, "मामलेदाराला अरजं करून आता म्या माजी जमीनच सरकारजमा करून टाकतो."

"आरं, पण असं का करतुयास?" भग्या चिंतेने म्हणाला.

"माज्या हिश्श्याची जमीन लावून खातात व मलाच खायला देत नाईत" तुकारामचा राग अनावर झाला.

"हे बग चिक्या, असं करू नगंस. तुजाच तर सक्का भाव हाये त्यो. दुसरा तर कोनी लावून खात नाय तुजी जिमिन?" भग्या तुकारामला समजावू लागला.

"आरं, पण लोड्याला त्याची शरम वाटली पायजे."

"चिक्या, शांत व्हय पाहू! असा डोसक्यात राग घालून घेऊ नगंस." भग्याने तुकारामला शांत केले.

ज्या दिवशी लोड्या तुकारामला जेवायला देत नसे, त्या दिवशी तुकाराम गावात कोणाच्याही घरी मागून खाऊ लागला. जसजसे दिवस पुढे सरकू लागले, तसतसे तुकारामला चालता येणेही अशक्य होऊ लागले. तो आता पडाव झाला होता, त्यामुळे खोपट्यातच पडून राहू लागला.

कित्येक दिसापास्न त्याच्या अंगाला पाणी नवते. केसही वाढलेले, त्यामुळे त्याच्या केसात उवा पडल्या. त्यातच तुकाराम एकदा पाय घसरून पडल्याने त्याच्या गुडघ्याला मोठी जखम झाली. गोठ्यातील माश्या त्या जखमेवर बसू लागल्या, त्यामुळे जखम अधिकच चिघळत गेली. जखम पिकून वास येऊ लागला.

एके दिवशी खोपट्यातुन काहीच आवाज येत नाही, ते पाहून लोड्याने आपल्या धाकल्या मुलाला काय झालेय ते पाहायला धाडले, तर ते पोरगे बोंबलतच घरात पळत आले, कारण हाका देऊनही काका उठत नव्हता. लोड्याला समजून चुकले की काहीतरी इपरीत घडलेय. जाऊन पाहतो तर तुकाराम आपल्यास वळकटीवर निपचित पडलेला होता. त्याची प्राणज्योत रात्रीच्या अंधारात कधीच मालवली होती.

लोड्या धाय मोकलून रडू लागला. "आरं भावा, मला सोडून तू कसा गेलास?" रडताना त्याच्या डोळ्यात पाण्याचा एक टिपूसही नव्हता. त्याला मनातून एक असुरी आनंद झाला होता, कारण आता सर्व त्याचेच झाले होते.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पाटील मालक

मालक खानदानी रईस. घरची बक्कळ शेती. यांच्या एकट्याच्या शेतीतील ऊसावर आमच्या गावातला एक मोठा कारखाना तीन दिवस चालतो..! मोठा वाडा, ट्रॅक्टर, जनावरे वगैरे व्याप होता. यांचे जमीनदारी घराणे आणि राजकारण या गोष्टीही एकमेकांमध्ये गुंफलेल्या. त्यामुळे निवडणुका हा जिव्हाळ्याचा विषय.

**मोदक**



पाटील मालक.

".....या माणसाने एकही सल्ला न देता किंवा एका पैशाचीही मदत न करता मला अनेक गोष्टी शिकवल्या !" असे मी एखाद्याविषयी म्हणालो तर नक्कीच विचारात पडाल की याने नक्की काय केले असेल?

..विचारलं तर मलाही नीट सांगता येणार नाही, पण ओळख झाल्यापासून अवघ्या एक-दीड वर्षांतच या व्यक्तीने कांहीही न बोलता माझ्यावर प्रचंड प्रभाव टाकला.. आणि आज ओळख होऊन बारा तेरा वर्षे सहज झाली असावीत. आजही तो प्रभाव कमी झाला नाहीये.

त्या दिवसात मी कॉलेज करून पार्ट टाईम जॉब करत असे. संध्याकाळी ७ वाजता ऑफिसची वेळ संपली की आंम्ही सहा सात जण एकेठिकाणी जमत असू. एक एक करत सहा ते सात जण आपआपली कामे आवरून तिथे भेटायचे हा रोजचा शिरस्ता. मी त्या ग्रुपमध्ये वाट चुकून आल्यासारखा दिसत असेन कारण तेथील प्रत्येकजण वयाने माझ्यापेक्षा मोठा, व्यवस्थित बस्तान बसलेले त्यांचे व्यवसाय, एक जण मुख्याध्यापक तर एक जण चक्क स्वत:चा ट्रक चालवायचे. अशा वेगवेगळ्या लोकांमध्ये मी शाळकरी मुलासारखाच, पण दोस्ताना असा की, मला वयाच्या फरकाची कधीच कुणी जाणीव करून दिली नाही.

तिथेच माझी मालकांशी ओळख झाली. पाटील मालक याच मित्रपरिवारामध्ये होते. त्यांच्या शेतावरचे लोक त्यांना मालक म्हणायचे म्हणून मी मजेने मालक म्हणत गेलो आणि नंतर त्यांचे तेच नांव रूढ झाले.

मालकांची आणि माझी घनिष्ठ मैत्री, पण 'माझा मित्र' अशी त्यांची ओळख करून देऊ शकत नाही कारण आमच्या वयात २५/२६ वर्षांचा फरक आहे ! नाते अगदी मैत्री म्हणावे असेही नाही. वयाच्या फरकामुळे मी त्यांच्याकडे, एक वडीलधारे सल्लागार, अशा दृष्टीकोनातूनच बघत होतो. त्यांनीही ही भूमीका पुरेपूर निभावली.

मालक खानदानी रईस. घरची बक्कळ शेती. यांच्या एकट्याच्या शेतीतील ऊसावर आमच्या गावातला एक मोठा कारखाना तीन दिवस चालतो..! मोठा वाडा, ट्रॅक्टर, जनावरे वगैरे व्याप होता. यांचे जमीनदारी घराणे आणि राजकारण या गोष्टीही एकमेकांमध्ये गुंफलेल्या. त्यामुळे निवडणुका हा जिव्हाळ्याचा विषय.

आम्हाला सर्वसाधारणपणे आवडणाऱ्या साहित्य, वाचन, पुस्तक, कविता वगैरे गोष्टींशी यांचा फारसा संबंध आला नाही. पण म्हणून आमच्या चर्चा सुरू असल्या की मुद्दाम विषयांतर करणे किंवा "कसल्या ह्या चर्चा?" हा प्रकारही नाही. मुळात हा माणूस बोलायला नाखूश. शब्द कमीत कमी वापरणे हा खाक्या. शेती, बांधकाम, गाड्या वगैरे त्यांच्या आवडीचे विषय सुरू झाले तरी, अगदी नाईलाज झाला तरच बोलणार. अन्यथा त्यांना काय म्हणायचे आहे ते त्यांच्या चेहऱ्याकडे बघून समजून घ्यायचे.

बोलण्याच्या बाबतीत मितभाषी असले तरी त्यांच्या एकंदर देहबोलीमध्ये जरब असे. पुलंनी रंगवलेल्या रावसाहेबांच्या तोंडातून शिव्या आणि व्यक्तीमत्वातून सर्व प्रकारची व्यसने बाजूला काढली की पाटील मालक तयार होतील.

कॉलेजच्या वयात असताना डोक्यात अनेक विषय असतात. जगाचा फारसा अनुभव नसतो. कांहीतरी वेगळे करायची खुमखुमी असते, अनेक प्रश्न पडत असतात. अशा मनस्थितीत मी त्यांच्याशी गप्पा मारत असे. गप्पा म्हणजे मी एकटाच बोलणार, ते शांतपणे सगळे ऐकून घेणार आणि फक्त "चल" म्हणणार किंवा मी बोलत असलेली एखादी गोष्ट मान्य नसेल तर एकदाच "नाही" असे मानेने नकार देणार.

"चल" म्हटल्यानंतर, त्यांच्या गाडीला किक मारायची इतकेच मी डोक्यात ठेवले होते. सुरूवातीला "कुठे जायचे?" वगैरे (त्यांच्या दृष्टीने) फालतू प्रश्न मी विचारत असे, नंतर नंतर तेही बंद केले. त्यांच्या या "चल" नंतर आंम्ही बाहेर पडत असू. मग एकतर माझ्या प्रश्नाचे उत्तर शोधणे किंवा त्यांचे एखादे काम आवरणे असे ठरून गेल्यासारखे होते. या "चल" नंतर आंम्ही काय काय उद्योग केले होते.. !

.. ऐन भरात आलेले पीक बघण्यासाठी शेतात जाणे, वीटभट्ट्यांना भेटी देणे, जवळचे एखादे खेडेगांव गाठून नदीतून उपसा होणारी वाळू बघणे, गोबरगॅस प्लँट बघणे, पावसाळ्यात नदीचा पूर बघायला जाणे, त्यांच्या एखाद्या नातेवाईकाकडे जेवायला जाणे असे अत्यंत अनपेक्षित कांहीतरी सामोरे येत असे. माझी कामे म्हणजे कॉलेज किंवा क्वचित सरकारी कचेरीतली कामे असत. त्यावेळी त्यांना फक्त कामाचे स्वरूप सांगायचे, ते शांतपणे एक फोन नंबर देत असत आणि "माझे नांव सांग" इतकेच बोलत. फक्त त्यांच्या नांवावर अनेक कामे लीलया होतात हा अनुभवही अनेकवेळा घेऊन झाला.

एकदा माझ्या दाताचे कांम निघाले, डॉक्टर ओळखीचेच. नवीन नवीन दवाखाना होता. त्या डॉक्टरांकडे यांनी दोनच महिन्यांपूर्वी रूट कॅनलचे काम केले होते पण नेमके शेवटच्या सिटींग नंतर कॅप नीट बसत नव्हती. फक्त कॅपसाठी तीन चार सिटींग झाल्या आणि नंतर यांनी दुसरे डॉक्टर पकडून कॅप बसवून घेतली. माझे काम सुरू असताना डॉक्टरांनी विषय काढला, "तुमचे मित्र पाटील साहेब परत आले नाहीत" मी कांहीतरी थातूर मातूर कारण देऊन वेळ मारून नेली. संध्याकाळी भेट झाल्यावर त्यांना सांगितले की डॉक्टर असे असे म्हणत आहेत. "त्याला सांग कॅप बसवता येत नाही म्हणून आलो नाही" असे उत्तर मिळाले.

मी अवाक्.. "मी असले कांही सांगणार नाही" असे म्हटल्यावर "त्याला हेच सांगायचे आणि असेच सांगायचे" असा मलाच दम मिळाला. माझ्या पुढच्या सिटींग नंतर डॉक्टरांनी पुन्हा विषय काढल्यावर "सोडा हो.. कशाला पाटलांच्या नादाला लागताय.." असे बोलल्यावर ते डॉक्टर माझ्यावरच उखडले आणि उगाच वाद घालू लागले.. मग मी "तुम्ही कॅप नीट बसवली नाही" वगैरे


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

बोलल्यावर डॉक्टर वैतागून म्हणाले की "त्यांना सांगा ट्रीटमेंटचे पैसे परत घेऊन जावा"

"आंम्ही असले उद्योग करत नाही" असे मीही त्या डॉक्टरांना सुनावले.

पुढच्या सिटींगला पुन्हा हाच प्रकार.. मी म्हणतोय "कशाला प्रकरण वाढवताय?" डॉक्टर म्हणाले की "अहो खरंच सांगतोय, पैसे घेऊन जावा म्हणावं - मला काम जमले नांही ना..? मग मी का त्या कामाचे पैसे घेऊ..?" मी त्यावेळी "नक्की ना..?" असे विचारून खात्री करून घेतली व 'एकदम तत्ववादी डॉक्टर दिसतोय' असे मनात म्हणून "पैसे न्यायला येतो" बोलून निरोप घेतला.

"डॉक्टरांनी उगाच प्रकरण वाढवले आहे तर आता आपण पण पैसे सोडायचे नाहीत" हे मी मालकांच्या तोंडून ऐकले आणि मी उगाचच या प्रकरणात मध्ये अडकलो असा विचार डोकावला. पण आता पर्याय नव्हता.

पुढच्या आठवड्यात झालेला प्रकार आयुष्यात कधी विसरणार नाही.

दुर्दैवाने (!) डॉक्टर त्यांच्या दवाखान्याबाहेरच भेटले. डॉक्टरांनी पैशाबाबत माझ्यासमोरच सपशेल घुमजाव केले. मालकांनी फुल्ल आवाज सोडून (पण एकही शिवी न देता) डॉक्टरांचा उद्धार केला, डॉक्टरांच्या मदतीला त्यांच्या आजुबाजूची लोकं आली. "ही काय बोलायची पध्द्त आहे का?" टाईप वाक्ये कानावर पडू लागली. आंम्ही दोघेच आहोत म्हणून मालकांनी कुणालातरी फोन केला आणि "पोरं घेऊन ये रे" असा हुकूम सोडला. बघता बघता चौकात गर्दी जमा झाली आणि पोरांनी डॉक्टरांच्या बाजूने आमच्यावर गुरकवणाऱ्या लोकांना "दुकानात जाऊन बसा" असे शांतपणे सांगितले. शेवटी डॉक्टरांनी चूक कबूल केली आणि प्रकरण मिटले.

यानंतर साधारण आठवडाभराने पैसे घेऊन डॉक्टर स्वत: आंम्हाला भेटायला आल्यावर मात्र, "पैसे नकोत आता आम्हाला" असे सांगून मालकांनी त्यांना वाटेला लावले !

एकदा रविवारी सकाळी मालकांचा फोन, "कुठंय साहेब..? बाहेर या"

मी घरातून बाहेर पडताच समोर कुठलीतरी कार घेऊन हे थांबले होते. तेच "चल" कानांवर पडले आणि गाडी सुरू झाली. थोड्या वेळाने कळाले की आंम्ही त्यांच्या मित्राच्या बंगल्यासाठी मार्बल व ग्रॅनाईट बघायला कोल्हापूरला चाललो होतो.

बंगला तिसऱ्याचा, ग्रॅनाईट पसंत करणार मी आणि पैसे देणारे पाटील मालक. असा अजब व्यवहार होता. "तुम्ही पैसे का देताय?" असे विचारल्यावर, उत्तर ... "त्याने आपल्या अडचणीच्या वेळी मदत केली होती"..!

मधेच मी पार्ट टाईम जॉब मध्ये गॅप घेतला होता तेंव्हा तर त्यांच्यासोबत रोजच कुठे ना कुठे भटकत असे. त्याच दरम्यान त्यांनी सहज बदल म्हणून पॉवर स्टिअरींगचे ट्रक घेऊन मालवाहतुकीचे कराड-कोल्हापूर असे आटोपशीर काँट्रॅक्टही मिळवले होते त्यामुळे अगदीच कुठे गेलो नाही तर त्यांच्यासोबत ट्रकमध्ये बसून जाणे होत होतेच.

एकदा आईने अत्यंत काळजीने "अहो जरा मोदकला सांगा, ट्रकमध्ये बसून फिरत असतो, ट्रकवाले काय चांगले असतात काय?" असे त्यांनाच सांगून मला सपशेल कानकोंडे केले होते. त्यावर त्यांनी हसत हसत, "अहो, मीच असतो बरोबर, नका काळजी करू" असे सांगितले !

नंतर मी नोकरीसाठी पुण्याला आल्यानंतर कांही महिने फक्त फोनवर संपर्क राहिला आणि मी घरी गेलो की त्यांच्याकडे चक्कर ठरलेली असे.

यथावकाश त्यांच्या पुण्यातल्या दौऱ्यांच्यावेळी आमची भेट होऊ लागली. पुण्यात ते आले की तेच चिरपरिचित "कुठंय साहेब..?" फोनमधून ऐकू येऊ लागले.

तो शनिवार आणि रविवार पण असाच धक्कादायक होता. शुक्रवारीच त्यांचा फोन आला. त्यांची एक बहिण आणि तिच्या तीन मैत्रिणी कोणत्यातरी स्पर्धा परिक्षेसाठी शनिवार-रविवारी पुण्यात येणार होते. "त्यांच्यासाठी रूम बुक कर" असा हुकूम आला. मी दोन रूम बुक केल्या आणि स्वारगेटला त्यांना घ्यायला गेलो. तिथे यांचा लवाजमा उतरला. त्या चार मुलींसाठी सोबत म्हणून त्यांचे भाऊ / दाजी असे आणखी पांच कार्यकर्ते आले होते. मी हैराण झालो. मी त्यांना तिथेच स्वच्छ शब्दात सांगितले की मी इतक्या लोकांची सोय केलेली नाही, फक्त मुलींची आणि तुमची सोय केली आहे. यावर, "ते त्यांचे ते बघूदेत आपण ठरल्यासारखीच सोय बघायची आहे" असा त्यांनी मला दिलासा दिला.

आंम्ही स्वारगेटहून डेक्कनला सगळा लवाजमा घेऊन येईपर्यंत त्यांच्या ओळखीच्या कुणीतरी एक दुचाकी आणून हजर केली. त्या दिवशी रात्री पर्यंत आंम्ही परिक्षा केंद्र कुठे कुठे आहेत ते बघून ठेवले. आंम्ही तिथे नसताना त्या मुलींनी मुक्काम केलेल्या हॉटेलबाहेर दोन जण "कांही हवे नको बघायला (!) “ थांबले होते !

दुसऱ्या दिवशी त्या मुली आणि त्यांचे सोबत असलेले भाऊ नि दाजी मंडळी जिकडे तिकडे रवाना झाले. नंतर परिक्षेच्या आधी दीड तास आंम्ही दोघेजण सर्व परिक्षार्थी आपआपल्या ठिकाणी बसले आहेत की नांही हे बघणे आणि "सगळे ठीक आहे ना..?" असे विचारण्यासाठी प्रत्येक परिक्षा केंद्राला भेटी दिल्या होत्या.

ते निघताना, "इतके घोळ घालायची काय गरज होती, मुली काय परदेशात चालल्या होत्या का..?" असे मी माफक कुरकुरून पाहिले, यावर "पाटलांचे काम असेच असते, आपण डोके चालवायचे नांही, भावकी असते" असे सांगून मालकांनी माझी समजूत घातली !

आणखी एकदा असाच शनिवारी सकाळी सकाळी फोन , "कुठंय साहेब..? अमुक अमुक ठिकाणी या.."

मी यांना भेटायचे म्हणून गोल गळ्याचा घरातील टीशर्ट घालून जांभया देत देत तिथे पोचलो तर सगळे पांढऱ्या कपड्यातले लोकं दिसत होते आणि त्यांच्यात मी म्हणजे "एखादी गाडी वाट चुकेल पण ट्रेन वाट कशी चुकेल..?" असा प्रश्न पडण्या इतका वेगळा दिसत होतो. पुढच्या १५ मिनीटात मी पुण्यातल्या एका अग्रगण्य शिक्षण संस्थेच्या प्रिन्सिपलच्या केबीनमध्ये होतो. आणि काम काय..? कांही नांही. "चार दिवस याच लोकांबरोबर चहा पीत होतो.. आज इकडे होतो म्हणून तुला बोलावले" असे उत्तर. प्रिन्सिपल साहेब बाकीच्या मंडळींशी बोलत होते, पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या संदर्भात प्रश्नोत्तरे चालली होती, हशे उसळत होते आणि आंम्ही दोघे त्या सगळ्याकडे दुर्लक्ष करून चहा पीत गप्पा मारत बसलो होतो !

नंतर एकदा पुण्यात आल्यानंतर "कुणासाठी तरी मार्बल आणायला राजस्थानात चाललो आहे, जाताजाता तुला भेटतोय" असे सांगून एका सोन्याने मढवलेल्या नेत्यासोबत भेटले.

एकदा कमांडर जीप घेऊन असेच चार पांच कार्यकर्ते घेऊन मोशीला किसान प्रदर्शन बघायला मला नेले होते.

दर वर्षी पंढरपूरच्या वारीमध्ये त्यांचे दोन टँकर आणि एक ट्रक सहभागी असतो. त्यांच्यासोबत एकदा टँकरमधून वारीही अनुभवली आहे !

अशा पुण्यात अनेक संस्मरणीय भेटी झाल्या आणि आणखीही होत राहतील....


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"मालकांनी मला शिकवले" असे म्हणताना हे लक्षात येते की त्यांनी माझ्या अत्यंत अवखळ वयात सोबत राहून मला व्यसनांपासून ठेवले, अनेक वेगवेगळ्या लोकांच्या भेटी घडवल्या आणि ओळखी वाढायला मदत केली. मात्र हे करताना स्थानिक राजकारणाचा कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याचीही काळजी घेतली. मला दुचाकी चालवायला शिकवण्यापासून ते दुचाकीवरून लांब लांब अंतरे कापताना काय चुकते आहे ते स्वतः मागे बसून सांगितले. हे आणि अशा अनेक गोष्टी करताना चुकूनही कोणत्याही गोष्टीचा आव आणला नाही. गावाकडे भल्यामोठ्या वाड्यात रहाणारा हा माणूस; पुण्यात मी रहात होतो त्या छोट्याश्या कॉट बेसीसवरच्या खोलीतही तितक्याच सहजतेने राहिला. आहे हे असे आहे असा सरळसोट खाक्या !

कमी शब्दात प्रचंड बोलणारे अतिशय दुर्मिळ व्यक्तीमत्व, म्हणजे मालक !!.

अजुनही एखाद दिवशी, दिवसाच्या कोणत्याही वेळी फोन वाजतो.. मालकांचा आवाज येतो.. "कुठंय साहेब..?"

आणि आता कुठे ‘चलायचं’ आहे, याचा विचार करत मी बाहेर पडतो !!

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# हेईनरिश हारर: पराक्रमाची आश्चर्यकारक गाथा

लहानपणापासून भूगोलाची आवड असलेल्या हाररने तेविसाव्या वर्षी, म्हणजे १९३५ मध्ये गिर्यारोहणामध्ये कारकिर्द घडवण्यास सुरुवात केली. लवकरच त्याने आल्प्स पर्वतरांगेतले एक कठीण शिखर पादाक्रांत केले. तेव्हा ऑस्ट्रियावर नाझी जर्मनीचा ताबा झालेला असल्यामुळे हिटलरच्या हस्ते त्याचा सन्मान करण्यात आला. युरोपावर आणि जगावरच युद्धाची छाया असलेले ते दिवस होते.

**मार्गी**



एखाद्या माणसामध्ये जिद्द असेल, हिंमत असेल, तळमळ असेल तर नियती त्याला कुठून कुठे नेते, ह्याचे अतिशय तेजस्वी उदाहरण म्हणजे हेईनरिश हारर! स्वामी विवेकानंदांनी निर्भयता हा गुण धार्मिकतेचा मुख्य सद्गुण सांगितला गेला आहे. कशालाही आणि मृत्यूलाही न घाबरणारा माणूसच खर्‍या अर्थाने धार्मिक असतो. आणि जेव्हा एखादा माणूस असा असतो, तेव्हा नियतीसुद्धा त्याला जीवनाच्या रंगमंचावर अतिशय अद्वितीय अशी भूमिका बहाल करते!

अतिशय अस्थिर व नाट्यमय अशा विसाव्या शतकाच्या सुरुवातीला १९१२मध्ये युरोपात ऑस्ट्रिया देशात हाररचा जन्म झाला. त्याचे वडील टपाल खात्यामध्ये होते. अशा सामान्य परिस्थितीतून हाररने शब्दश: जीवनातील शिखराकडे जाणारा मार्ग शोधून काढला आणि शरीर थकेपर्यंत व वयाची सत्तरी ओलांडेपर्यंत पराक्रमाची व कर्तृत्वाची अनेक शिखरे पादाक्रांत केली. आणि हे करताना त्याने तितकीच आध्यात्मिक साधनाही केली. अशा ह्या विलक्षण अवलियाच्या जीवनाची सुरुवात ग्राझ ह्या ऑस्ट्रियन गावातून झाली. योगायोग म्हणजे ग्राझ ह्या गावीच कुप्रसिद्ध नरपशू हिटलरसुद्धा वाढला होता. त्याच ग्राझ गावच्या हाररमध्ये पाश्चात्त्य पराक्रम व पौर्वात्य अध्यात्म ह्यांचा दुर्मीळ संगम घडून आला.

लहानपणापासून भूगोलाची आवड असलेल्या हाररने तेविसाव्या वर्षी, म्हणजे १९३५ मध्ये गिर्यारोहणामध्ये कारकिर्द घडवण्यास सुरुवात केली. लवकरच त्याने आल्प्स पर्वतरांगेतले एक कठीण शिखर पादाक्रांत केले. तेव्हा ऑस्ट्रियावर नाझी जर्मनीचा ताबा झालेला असल्यामुळे हिटलरच्या हस्ते त्याचा सन्मान करण्यात आला. युरोपावर आणि जगावरच युद्धाची छाया असलेले ते दिवस होते. पुढे ऑगस्ट १९३९मध्ये भारताच्या तत्कालीन वायव्य सरहद्द प्रांतातील (आजचा पाकव्याप्त कश्मीर) नंगा पर्वतामध्ये एक गिर्यारोहण मोहीम करण्यासाठी काही गिर्यारोहकांसोबत हारर भारतात आला. त्यांनी नंगा पर्वतावर चढाई केली व मोहीम पूर्ण केली. इथेसुद्धा हारर हिमकड्यामध्ये कोसळता कोसळता बचावला. ऑगस्टच्या शेवटी हारर सहकार्‍यांसोबत ऑस्ट्रियाला जाणार्‍या जहाजाची प्रतीक्षा करत कराची बंदरामध्ये थांबला होता. बराच काळ प्रतीक्षा करून त्यांनी इराणमार्गे ऑस्ट्रियाला जायचा निर्णय घेतला. आणि नियतीच्या नाट्याची सुरुवात झाली. सिंध प्रांतातून प्रवास करत असताना ब्रिटिश पोलिसांनी ह्या गिर्यारोहकांना ताब्यात घेतले. कारण तोपर्यंत युद्धाची नांदी झालेली होती व ऑस्ट्रियन गिर्यारोहक ब्रिटिशांच्या शत्रू देशाचे नागरिक ठरले होते. सुरुवातीला स्थानबद्धता आणि नंतर ब्रिटिश तुरुंगवास! ब्रिटिश भारतातील एका तुरुंगातून दुसर्‍या तुरुंगात ह्यांची रवानगी सुरू झाली. परंतु हाररने ऑस्ट्रियाला जावे हे नियतीला जसे मान्य नव्हते, तसे तो ब्रिटिशांच्या तुरुंगात खितपत पडावा, हेही मान्य नव्हते.

हाररने व त्याच्या सहकार्‍यांनी ब्रिटिशांच्या तुरुंगवासातून पळून जाण्याचे प्रयत्न सुरू केले. अनेकदा ते पळून गेले आणि पकडलेसुद्धा गेले. त्यामध्येच तीन वर्षे गेली. ह्या काळात हाररने जुजबी हिंदी भाषा शिकून घेतली. उत्तर भारतातले काही रीतीरिवाज शिकून घेतले. बाहेर युद्धाचा डाव सगळीकडे पसरला होता. जर्मनीचे मित्रराष्ट्र असलेल्या जपानच्या ताब्यात तेव्हापर्यंत ब्रह्मदेश आणि चीन हे देश होते. त्यामुळे त्या दोन दिशांनी जाण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू ठेवला. अखेरीस बर्‍याच मेहनतीने व बुद्धिचातुर्याने ब्रिटिशांची पोलादी पकड भेदून भारतीय मजुराच्या वेषात हारर व त्याच्या गिर्यारोहक मित्रांनी हृषीकेशजवळील ब्रिटिश कँटोनमेंटमधून पळ काढला. काही जण कलकत्तामार्गे ब्रह्मदेशला जाण्यासाठी दक्षिणेकडे निघाले, तर काही जण तिबेटमार्गे चीनला जाण्यासाठी निघाले. हारर व अन्य दोन जण तिबेटला जाण्यासाठी निघाले!

तिबेटच्या सुवर्णकाळाचा साक्षीदार

एप्रिल १९४४मध्ये हारर व तिबेटी भाषा येणारा अन्य एक साथीदार असे दोघे तिबेटकडे निघाले. तिबेट तटस्थ देश असल्यामुळे आश्रय देईल, असा त्यांना विश्वास वाटत होता. अखेरीस मे १९४४मध्ये एका साथीदारासोबत हाररने सुमारे सहा हजार मीटर उंचीचा खडतर आडवाटेचा घाट पार करून तिबेटी भूमीवर पाय ठेवला! मुरलेला ट्रेकर असल्यामुळेच त्याला हे कसेबसे शक्य झाले. त्या काळातला तिबेट जगापासून अतिशय विलग असल्यामुळे त्यांना कोणीच थारा दिला नाही. पण तरीही मजल दरमजल करत, आणि सोबत असलेले एक तिबेटी चिन्ह लोकांना दाखवत तिबेटी भाषा येणार्‍या साथीदाराबरोबर तो पुढे जात राहिला. त्याचे काही साथीदार प्रतिकूल वातावरणामुळे परत माघारी परतले. एक साथीदार नेपाळमध्ये परतला. हारर अखेरीस दीड वर्षांनी - म्हणजे जानेवारी १९४६मध्ये ल्हासाला पोहोचला.

सुरुवातीला अर्थातच सर्वांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. काही जणांनी त्याची कुचेष्टा केली. विलग असलेल्या कोणत्याही समाजामध्ये इतर समाजांविषयी अज्ञान असते व त्यामुळे गैरसमजही असतात. तिबेटने फारच थोडे पाश्चात्त्य लोक बघितले होते. त्यामुळे पाश्चात्त्य लोक अतिशय स्वार्थी आहेत, ऐहिक आहेत, अशा त्यांच्या धारणा होत्या. शिवाय आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोत आणि हे कोण कुठले दूरचे लोक, अशीही एक अहंमन्य भावना होती, जी आपण आपल्यामध्येही बघू शकतो - आपणही अमेरिकन लोकांना ऐहिक, स्वार्थी समजतो. पण हाररने सर्व स्थितीमध्ये टिकाव धरला. तिबेटमधल्या जाणत्या लामांनी निश्चितपणे त्याच्यावर नियतीने सुपुर्द केलेले कार्य ओळखले असणार. तिबेटी लामांना पूर्वीपासूनच भविष्यात येणार्‍या चिनी परचक्राची जाणीव होती व त्या दिशेने त्यांनी तयारीही सुरू केलेली होती. अशा वेळेस अशा युरोपियन व्यक्तीचे आगमन होणे, हासुद्धा ह्या तयारीचा भागच ठरला. कालांतराने त्याने मग तिथे फोटोग्राफर म्हणून काम सुरू केले. वंदनीय दलाई लामा तेव्हा वयाने लहान होते. पाश्चात्त्य जग, भूगोल, प्रवास, इंग्लिश असे विषय हाररने त्यांना शिकवले. तो त्यांचा शिक्षक बनला. पाश्चात्त्य व आधुनिक जगाचा परिचय त्यानेच त्यांना करून दिला. त्यांच्या शिकण्याच्या तयारीमुळे तोही प्रभावित झाला. तिबेटमध्ये आल्यापासून सात वर्षे, म्हणजे १९५१पर्यंत तो तिबेटमध्ये राहिला. पूर्वीचा शांत तिबेट आणि चिनी आक्रमणानंतरचा तिबेटही त्याने बघितला. अखेरीस अनिश्चित राजकीय स्थितीमुळे त्याला तिबेट सोडावा


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

लागला. परंतु तोपर्यंत ह्या पराक्रमी पुरुषाला वंदनीय दलाई लामांचा सत्संग काही काळ मिळाला. तिबेटी जीवनपद्धतीशी परिचय झाला आणि तिबेटला विसाव्या शतकातील जगामध्ये येण्यासाठी मदत करण्याचे महान कार्यही त्याच्या हातून घडले. तिबेटी समाज तोपर्यंत अतिशय स्वमग्न होता. तिबेटमधले पाश्चात्त्य जगताबद्दलचे अज्ञान, गैरसमज, आत्मप्रौढी अशा विविध मुद्द्यांसंदर्भात हाररने पाश्चात्त्य जगताचा करून दिलेला परिचय व तिबेटी संस्कृती अंगीकारण्यामध्ये हाररला आलेले यश ही गोष्ट अतिशय मोलाची ठरली. विशेष म्हणजे हाररने तिबेटला आधुनिक जगाशी नाते जोडण्यासाठी मदत केली. 'तिबेट हे जगाचे छप्पर, म्हणून आम्ही तिबेटी इतरांपेक्षा श्रेष्ठ' अशी जी भावना होती, त्यामध्ये हाररने बदल घडवला. बाहेरून संस्कृतीचे, वातावरणाचे, पार्श्वभूमीचे असंख्य बदल असले, तरी आतमध्ये खोलवर माणूस म्हणून सर्व मानवजात समान आहे, हे त्याने त्यांना दाखवून दिले. त्या अर्थाने कोणीही उच्च नाहीत, कोणीही नीच नाहीत ही सुधारणा तिबेटमधल्या धर्मगुरूंच्या मानसिकतेमध्ये घडवून आणली.

१९३९नंतर तब्बल १३ वर्षांनी, म्हणजे १९५२मध्ये तो स्वदेशी - ऑस्ट्रियाला परतला. तोपर्यंत युद्धानंतरचे जगही बदलले होते आणि हाररही बदलला होता! १९५२मध्येच त्याने 'सेव्हन इयर्स इन तिबेट' हे आपले पुस्तक प्रसिद्ध केले, ज्याचा लवकरच त्रेपन्न भाषांमध्ये अनुवाद झाला. ह्या पुस्तकामध्ये हाररने नंगा पर्वतावरील मोहिमेपासून वंदनीय दलाई लामांना भेटेपर्यंतच्या सर्व प्रवासाचे सुंदर वर्णन दिले आहे. तत्कालीन तिबेटी समाजाच्या तपशीलवार वर्णनासह त्यामध्ये पश्चिम तिबेटमधून ल्हासापर्यंत प्रवास करतानाच्या प्रवासाचे वर्णन रौद्र आहे. भारतातील पहाड ओलांडून प्रतिकूल परिस्थितीमध्ये तिबेटमध्ये केलेला प्रवेश, अन्नपूर्णासारख्या विविध हिमशिखरांचे घडलेले दर्शन आणि कैलास पर्वताची परिक्रमा ह्याविषयी त्याने अतिशय जिवंत वर्णन केले आहे. स्थानिक पौर्वात्य व्यक्तींपेक्षा हा पाश्चात्त्य पौर्वात्य जीवनामध्ये खोलवर गेला होता. पौर्वात्य जीवनपद्धतीचा त्याने आदर केला आणि काळानुरूप त्यामध्ये नवीन जोड देण्याची भूमिकाही पार पाडली.

पुढे तो परत ऑस्ट्रियाला गेला; त्याने नंतर गिर्यारोहणही केले. गिर्यारोहणाच्या क्षेत्रामध्ये अनेक खंडांमधील अवघड अशी अनेक शिखरे पादाक्रांत केली. अगदी वयाची पन्नाशी ओलांडली, तरी तो मोहिमांचे नेतृत्व करत राहिला. पर्वतांशी असलेले त्याचे नाते शेवटपर्यंत टिकून राहिले. भारतातील हिमालयामध्येही त्याने उत्तरायुष्यात भटकंती केली. त्यावर त्याने 'लदाख : मॉर्टल्स अँड गॉड्स बिहाइंड हिमालयाज' हे पुस्तकही लिहिले. भूतानमध्येही त्याने भ्रमंती केली. त्याने आयुष्यात जे विलक्षण अनुभव घेतले, ते वीसपेक्षा जास्त पुस्तकांद्वारे आणि कित्येक डॉक्युमेंटरीजद्वारे त्याने जगासमोर ठेवले. अर्थातच हे साहित्य प्रचंड लोकप्रिय झाले आणि भाषेच्या व देशाच्या सीमा ओलांडून जगभर पसरले. त्या अर्थाने लेखक आणि अभ्यासक म्हणूनही त्याचे कर्तृत्व 'उत्तुंग' आहे.

असे असले, तरीही तिबेट हा नेहमीच त्याच्या जिव्हाळ्याचा विषय राहिला. 'सेव्हन इअर्स इन तिबेट' हे त्याचे पुस्तक अतिशय प्रसिद्ध झाले. त्याने नंतर तिबेटचे स्वातंत्र्य व तिबेटी जनतेचा प्रश्न 'असंवेदनशील' जगाला कळावा, म्हणूनही अनेक पुस्तके लिहिली. ऑस्ट्रियामधील त्याचा स्टुडिओ त्याने तिबेटला समर्पित केला. अनेक दशकानंतर १९८०मध्ये तो पुन: तिबेटला जाऊन आला. वंदनीय दलाई लामांसोबत त्याची मैत्री घट्ट राहिली. २००७मध्ये त्याचे निधन झाले. पण तिबेटच्या इतिहासामध्ये आणि वंदनीय दलाई लामांच्या जडणघडणीमध्ये त्याची भूमिका नेहमीच स्मरणात राहील. कालांतराने हेईनरिश हाररचे चरित्र 'सेव्हन इयर्स इन तिबेट' नावाच्या दोन चित्रपटांमधून पडद्यावर आले. असे चरित्र नेहमी आपल्याला एक प्रेरणा आणि दिशा देण्याचे काम करते. कारण ज्यामध्ये हिंमत आहे, धैर्य आहे, सामर्थ्य आहे, त्याला जीवन अतिशय वेगळी भूमिका देते, हे अशा माणसांकडून दिसते. प्रत्येकामध्ये हे असामान्यत्व असते. परंतु हे असमान्यत्व बाहेर आणण्यासाठी एखादा वाटाड्या लागतो, एखादा प्रेरणास्रोत लागतो. हाररसारखी माणसे येणाऱ्या पिढ्यांना जीवन खोलवर जाऊन जगण्याची प्रेरणा देतात.

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# कोलाज

१९९५ ते २००८ या तेरा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत रोजच्या जीवनाचा अविभाज्य अंग असलेला तो नाका माझ्या अगदी जिव्हाळ्याचा विषय होता. भारतातल्या निरनिराळ्या शहरातून आलेले हे लोक, त्यांचे निरनिराळे स्वभाव, त्यांच्या रोजच्या जगण्याच्या पद्धती हे सगळं मला मनसोक्त अनुभवता आलं.

**किसन शिंदे**



फार पूर्वी नव्वदीच्या सुरूवातीला दूरदर्शनवर 'नुक्कड' नावाची हिंदी मालिका लागायची. बहुरंगी आणि बहुढंगी असलेली पात्रं आणि त्यांच्या रोजच्या जगण्याभोवती गुंफलेली कथा यामुळे नुक्कड मालिका लहानपणी आवर्जून पाहायचो. आता पटकन डोळ्यासमोर येणारी नावं म्हणजे गुरू, गणपत हवालदार, अट्टल दारूड्या असलेला खोपडी, कादरभाई, तो पानवाला, ही आणि यातली सगळी पात्रं या मालिकेच्या निमित्ताने माझ्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य अंग बनली होती. त्यावेळी कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं की, खऱ्या आयुष्यात रोजच्या जगण्याचा भाग म्हणून अशा अनेक व्यक्ती आणि वल्ली माझ्या आयुष्यात मला भेटतील.

कालांतराने ही मालिका संपली आणि ही सगळी पात्र काही काळ विस्मृतीत निघून गेली. पण काही काळानं, शाळेतलं प्राथमिक शिक्षण संपता संपता, अशाच एका गजबजलेल्या नाक्याचा मी अविभाज्य भाग कधी बनलो हेही कळलं नाही !

नोकरीला राजीनामा देऊन बाबांनी शहरातल्या एका आडबाजूच्या नाक्यावर लहानसे हॉटेल सुरू केले होते. सकाळचं कॉलेज सुटलं की वयाने मोठा असलेला भाऊही त्यांच्या मदतीसाठी रोज जायचा, म्हणून मग शाळा शिकत असलो तरी कधी कधी सुट्टीच्या दिवसांत बाबांना मदत म्हणून मी त्यांच्यासोबत हट्टाने जायला सुरूवात केली होती. हट्टाने यासाठी कारण तिथे येणारे एकापेक्षा एक इरसाल नमुने आणि त्यांच्या गमती जमती मला पाहायला आवडत असत.

अगदी नाक्यावरच असणाऱ्या आमच्या हॉटेलात नाना प्रकारची लोक येत आणि त्यांच्याही नकळत मला त्यांची निरीक्षणं करायला आवडे. अगदी काल परवा पाहिलेल्या एखाद्या चित्रपटासारख्या त्यातील काही व्यक्ती आणि प्रसंग अजूनही मनावर कोरले गेले आहेत..

साऊथवरून मोठ्या हॉटेलात शेफची नोकरी मिळेल या आशेने आलेला, पण दुर्दैवाने पानाची गादी चालवत असलेला जया पानवाला. तृतीयपंथी असल्यामुळे लोकांच्या कायम थट्टेचा आणि चेष्टेचा विषय असलेला पद्या. घरदार वैगेरे सगळं जुगारावर उधळून सदासर्वकाळ नशेतच वावरणारा अट्टला दारूडा शंकऱ्या. ग्रॅज्युएट होऊनही नाक्यावर दादागिरी करून नाक्यावरच्या छोट्या दुकानदारांकडून हप्ते गोळा करणारा नित्या उर्फ नितिन. जेव्हा पाहावं तेव्हा खराट्याच्या काड्यांनी ताशा वाजवण्याचा अभिनय करणारा वेडसर नान्या. नाक्यावर येताच सगळ्यांच्या नजरा खिळवून ठेवणारी बारबाला अंजू. चरसी, दारूडे, जुगारी ज्याला पाहून पॅन्टमध्येच फळाफळा मुतायचे असा नाक्यावरच्या चौकीतला धिप्पाड हवालदार लारा.

आणि हातावर पोट असूनही आपला रिक्षाचा धंदा सोडून दिवसच्या दिवस कसोटी क्रिकेटचे सामने आवर्जून पाहणारा क्रिकेटवेडा रामदास.

**रामदास**

या सगळ्या लोकांमध्ये माझ्या मनात ठसलेला अंत्यत इरसाल नमुना म्हणजे रिक्षावाला रामदास !!

ऐंशीच्या दशकात कधीतरी उत्तर प्रदेश सोडून पोटापाण्याची खळगी भरण्यासाठी मुंबईत दाखल झालेला हा भैय्या म्हणजे एक अजब रसायन होतं. सकाळी शुचिर्भूत होऊन आला कि पेपरवाल्याच्या स्टॉलवरून नवभारत टाईम्स आणायचा आणि मग आमच्या हॉटेलसमोरील नाक्यावर किंवा कधी कधी हॉटेलमध्ये चहाचे घुटक्यांसोबत पनामा सिगरेटचे झुरके घेत क्रिकेटवरच्या गप्पा ठोकणे आणि जोडीने नवभारत टाईम्स वाचणे हा त्याचा नित्याचा दिनक्रम. मग उशीराने रिक्षा काढून दिवसभर ती चालवल्यानंतर रात्री ९-१० च्या सुमारास तो नाक्यावर परते, गप्पा मारण्यासाठी. गप्पाचे विषयही मर्यादितच पण त्यातही प्रामुख्याने भारतीय क्रिकेट, अजहरूद्दीन, सचिन तेंडूलकर यावर जास्त भर असे. कसोटी सामन्याच्या पाचही दिवस स्वत:चा धंदा बुडवून तो कधी त्याच्या कळकट रेडिओला चिकटलेला असायचा किंवा एखाद्या टीव्हीच्या दुकानासमोर ठाणं मांडून बसलेला असायचा. घरी बायका पोरांचे जेवणाचे हाल होत अगदी, पण हा मौला त्याच्या मस्तीतच मग्न असे.

आमच्या हॉटेलसमोरचा नाका म्हणजे रामदास सारख्या अनेक लोकांच गप्पा मारण्याचं, कुटाळक्या करण्याचं हक्काचं आश्रयस्थान. भारतीय क्रिकेट आणि त्यातही भारताचा कॅप्टन मोहम्मद अजहरूद्दीच्या फलंदाजीवर हा जौनपुरी भैय्या कमालीचा फिदा होता. अगदी डाय हार्ड फॅन! त्यातही एकदिवसीय क्रिकेटपेक्षा पाच दिवसाच्या पारंपारीक कसोटी क्रिकेटवर रामदासचा खूप जीव!!

१९९८ च्या रणरणत्या उन्हाळ्यात मार्क टेलरच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाचा संघ बॉर्डर-गावसकर चषका-अंतर्गत तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळण्यासाठी भारतात आला होता. तीन सामन्यांपैकी पहिल्या कसोटीत १७९ धावांनी विजय मिळवून भारताने मालिकेत आधीच आघाडी घेतली होती. अन दुसर्या कसोटीत कांगारूंना पहिल्या डावात २३३ धावात गुंडाळल्यानंतर भारताने धुवाँधार फलंदाजी केली होती. दुसर्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने ३ गडी बाद ३६९ धावा केल्या होत्या. द्रविड अर्धशतक आणि अजहरूद्दीन नाबाद ९ धावा करून खेळपट्टीवर उभे होते.

तिसरा दिवस...

हाफ बाह्यांची कळकट्ट बनियन, कमरेभोवती लुंगी गुंडाळलेली, गालावर दाढीची खुटं वाढलेली, एका हातात टमरेल आणि दुसर्या हातात 'नवभारत टाईम्स' अशा अवतारात भर सकाळी रामदास आमच्या हॉटेलसमोर येऊन उभा राहिला होता.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

अनं आल्या आल्या माझ्यासमोर त्याने नेहमीप्रमाणे अजहरूद्दीनचे गोडवे गायला सुरूवात केली.

"अय पप्पू, देखना तुम ! आज अजहर सेंचुरी बनाकेही रहेगा. ओर इंडियाको जितायेगा भी !"

सकाळची वेळ. हॉटेल उघडल्यानंतर सकाळचा नाश्त्याचा मेनू पाहण्यासाठी बाबा आत भटारखान्यात गेले आणि मी गल्ल्याचा ताबा घेतला होता तोच हा अवलिया हॉटेलच्या दारात उभा ठाकला होता.

"अरे छोडो यार. तुम क्या कोई जोतिषी वैगेर हो क्या? जो इस मॅच का भविष्य जानते हो."आता मी रामदासची थट्टा सुरू केली होती. एव्हाना महाशय हॉटेलात शिरून त्याच्या नेहमीच्या जागेवर येऊन स्थानापन्न झाले होते. मला त्याची सवय माहित होती. "एक कडक स्पेशल चाय...रामदासके लिये" तो काही बोलायच्या आतच अशी ठेवणीतली आरोळी मारून मी पोर्याला त्याच्याकरता चहा आणायला सांगितला.

"अरे नही पप्पुवा, अभी पेहेले मॅचमे हाफ सेंचुरी बनाके, अभी फोरम मे आया है अजहर. और देखना वो मारकेही रहेगा !" अझरूद्दीनविषयी कमालीचा आत्मविश्वास त्याच्या वाक्यातून डोकावत होता.

"अच्छा !! ठिके ठिके. देखते है. वैसे घोडामैदान अब दूर नही."

तिसर्या दिवसाचा खेळ सुरू झाला. दणादण चौकार आणि षटकार लगावत मोहम्मद अजहरूद्दीनने नाबाद १६३ धावा ठोकल्या आणि आपल्या भक्ताचा विश्वास सार्थ ठरवला. अजहरच्या या दिडशतकी खेळीच्या साहाय्याने भारताने ऑस्ट्रेलियासमोर जिंकण्यासाठी ४०१ धावांचे अशक्यप्राय लक्ष ठेवले. मग त्यांच्या दुसर्या डावात कुंबळेने ५ विकेट घेत त्यांच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. परिणामी भारत तो सामना २१९ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला.

तीन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशी खिशात घातलेल्या भारतीय संघासाठी त्या संध्याकाळी रामदास आनंदाने बेभान होऊन नाक्यासमोर रस्त्यावर नाचला !!

....आणि त्याच वेळी झोपडीत एकाकी बसलेली त्याची बायको पोटच्या मुलांच्या खपाटीला गेलेल्या पोटात रात्रीचा घास कसा घालायचा हा प्रश्न सोडवण्याची खटपट करत होती !!

**पद्या**

तिशीतला गोरागोमटा पद्या खरं तर नावालाच पुरुष होता, त्याचे बाकी हावभाव सगळे बायकांसारखेच! आपण धड पुरुषही नाही अन् बाईही नाही हे ज्या दिवशी त्याला कळलं, त्या दिवशी घरच्यांचा त्याग करून त्याने मुंबईचा रस्ता पकडला. सहसा लोकांमध्ये जाणं टाळणारा अबोल पद्या दिवसभर भाड्याने घेतलेल्या त्याच्या लहानश्शा गाळ्यात लता, किशोर, रफी यांची गाणी ऐकत आराम करायचा. एखाद्या रामबाण औषधासारखी या मंडळींची गाणी खोलवर झिरपलेल्या त्याच्या जखमेवर हळुवारपणे मलमपट्टी करण्याचं काम करत. संध्याकाळी झाली की सगळं आवरून कुठेतरी कामाला जायचा, ते पहाटे कधीतरी परत यायचा.

असा हा पद्या म्हणजेच प्रदीप आमच्या हॉटेलात आला की, नाक्यावरचे रिक्षावाले, हॉटेलातली पोरं, बाजूला असलेले पानवाले ही सगळी जमा व्हायची आणि त्याची मस्करी सुरू करायची. कुणी एखादा मुद्दाम डोळा मारत "और, फिर कल रात को क्या किया?" विचारून गडगडाटी हसायचं, तर कुणी जिभल्या चाटत त्याच्या पाठीवरून हात फिरवायचं, तर कुणी त्यांच्या पार्श्वभागावर मुद्दाम चापट मारायचं. लोकांच्या या किळसवाण्या थट्टेची, घाणेरड्या स्पर्शाची पद्याने सवय करून घेतली होती. तोही या सगळ्या गोष्टी हसण्यावारी घेऊन जाई आणि मुद्दाम लोचटासारखा वागे. इतरांशी तो कसाही वागत असला, तरी माझ्याशी तो प्रेमाने वागे. हॉटेलात आला की माझ्या शाळेची चौकशी करे, "नियमित अभ्यास करत जा रे" असं आवर्जून सांगताना शाळेत जायला न मिळाल्याची खंत त्याच्या बोलण्यातून डोकवत असे.

अशाच एका दुपारी, पांढऱ्या रंगाचा शर्ट आणि खाली राखाडी रंगाची पॅन्ट, शर्टाची वरची दोन बटनं उघडी अशा अवतारात पद्या हॉटेलात जेवायला आला. वर्दळ तशी नव्हतीच, त्यामुळे मोठ्या भावाकडे गल्ल्याचा ताबा देऊन बाबा घरी आराम करायला निघून गेलेले. मान खाली घालून मुकाटपणे पद्या एका टेबलावर जेवायला बसला, तसं संज्या नावाचा रिक्षावाला हटकून त्याच्यासमोर येऊन बसला. पद्याच्या एकूण वागण्यावरून त्याचं काहीतरी बिनसलं असावं असं वाटतं होतं आणि म्हणूनच अगदी शांतपणे तो जेवत होता.

"क्या कर रहा है पद्या?" संज्याने मस्करीच्या मूडमध्ये पद्याला विचारलं.

"दिखता नय क्या, खाना खा रहा हू." मस्करीच्या मूडमध्ये नसलेल्या पद्याने अगदी शांतपणे त्याला उत्तर दिलं.

"वयसे आज शामको क्या कर रहा हे, आयेगा क्या पिच्चर देखने." पद्याच्या उघड्या असलेल्या शर्टाच्या बटनातून आत डोकावत संज्याची नजर काहीतरी शोधत होती.

"नय, मेरा मूड नईये बिल्कूलबी." समोर बसलेला माणूस आपल्याकडे कोणत्या नजरेने पाहतोय हे बहुदा पद्याला कळालं असावं.

"अरे बस क्या. चल ना. मै निकालताय ना तेरा टिकिट. तू कायको टेन्शन लेता." संज्याची नजर अजूनही पद्याच्या छातीवरून हटत नव्हती.

"ए क्या देखताय रे संज्या? मै क्या औरत नैय रे, जो मेरे छाती को देख रहा हे." "देखना है क्या..दिखावू शर्ट उतारके..हां..बोल देखना है क्या? स्साऽऽला हरामी कही का."पद्याचा आवाज अचानक वाढला. नेहमीच्या थट्टा मस्करीला वैतागून त्याच्या आत धुमसत असलेली आग बाहेर पडू पाहत होती.

पद्याला चिडलेलं पाहून मोठ्या भावाने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, त्याच वेळी संज्याने तिथून हळूच काढता पाय घेतला आणि ते प्रकरण तेवढ्यावरच थांबलं खरं, पण मला मात्र वासनेने बरबटलेल्या आपल्या चेहऱ्यावर शालीनतेचे मुखवटे लावून फिरणारा माणूस किळसवाणाच वाटला. कालांतराने पद्याने भाड्याचा गाळा सोडला आणि त्याच्यासारख्या लोकांमध्ये राहण्यासाठी मुंब्र्याला राहण्यासाठी निघून गेला. लोकही हळूहळू त्याला विसरून गेले.

**सिंगर**

त्याचं खरं नाव कोणालाच माहीत नव्हतं. नाक्यावरचे सगळे लोक त्याला 'सिंगर' म्हणूनच ओळखायचे. साधारण साडेपाच फुटाची उंची, केसांची आणि कपड्यांची ठेवण सिनेमातल्या हिरोंप्रमाणे, हसरा चेहरा, गोड बोलायचा सगळ्यांशी. वर्षातले काही महिने दुबईला कुठल्याशा एका रेस्टॉरंटमध्ये गायकाची नोकरी करणारा सिंगर, नाक्यावरचा एकमेव माणूस होता जो भारताच्या बाहेर जाऊन आला होता. 'मी दुबईला असतो' हे त्याच्या वागण्या-बोलण्यातूनही तो कायम समोरच्या माणसाला दाखवून द्यायची संधी तो केव्हाच सोडत नसे.

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

सिंगर म्हणजे जया पानवाल्याचं नेहमीचं गिऱ्हाइक! प्रत्येक वेळी आल्यावर तिथे उभे राहून गप्पा मारता मारता दोन-तीन पानं खायचा की गिळायचा हे ठाऊक नाही, पण त्यासोबतच दोन तीन घरी बांधून घरी न्यायचा. कमीत कमी चाळीस-पन्नास रुपये तरी होत असावेत, पण सिंगर एक छदामही द्यायचा नाही त्या खाल्लेल्या पानांचा आणि याचं मला कायम आश्चर्य वाटत राहायचं.

एका संध्याकाळी गल्ल्यावरचा फोन खणखणला

"अरे वो जयाको बुला ना फोनपे." पलीकडून सिंगर बोलत होता दुबईवरून..

"हां रूको.."म्हणत मी जया अण्णाला आवाज दिला "अण्णा, तुमारे लिए फोन हे शिंगरका."

तसं पळतच जया पानवाला गादी सोडून फोन उचलण्यासाठी आला.

"हा बोलो सिंगर."

"......"

"अरे नय नय, उसकी क्या जरूरत है."

"......"

"अरे नय भाय, नय चैय्ये, आपने फोन किया यादसे, येही काफीहे, कुच मत लाना."फोनवर जयाची नकारघंटा सुरूच होती.

"......"

"हां..हां..पक्का. कुच मत लाव." म्हणत फोन ठेवून दिला.

"अरे क्या हुवा जया.? क्या बोल रहा था सिंगर?" बांबानी चौकशी केली, तेव्हा जयाने सगळ्या गोष्टी विस्ताराने सांगितल्या.

"अरे क्या बोलू सेठ. वो सिंगरको लगता है हम लोग चुत्या है."

"हमेशा की तरह पुछ रहा था मुझे, कुछ लाना है क्या दुबईसे."

"अरे तो अच्छा है. बोलना था जो चीज चाहिये वो."

"अरे क्या खाक बोलू.? लेके आता है वहां से चीजे मुझे देने के लिए. पैसा देता हूं तो उस चीजका, तो नही लेता है, बोलता है गिफ्ट है तेरे लिए."

"अरे तो अच्छा है ना जया! बेचारा यादसे तेरे लिए गिफ्ट लेकर आता है दुबईसे."बाबांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

"नय ना सेठ, ये हरामी सिंगर गिफ्ट लेके आता है साल में एक बार, लेकिन साल भर मेरे दुकानेपें फोकटमें पान खाके जाता है. एक रुप्या भी देता नय."

"उसके एक गिफ्टके पैसेसे मेरे यहाँसे खाके गये हुये पान का पैसाही ज्यादा होता, जो मुझे परवडता नय." सिंगरने खाल्लेल्या पानांचा वर्षाचा ताळेबंद जयाने एका वाक्यात बाबांपुढे मांडला आणि निरुत्तर झालेल्या बाबांमागे उभे असलेल्या मला त्याच्या नेहमी फुकट खाण्यामागचं गुपित कळलं होतं.

१९९५ ते २००८ या तेरा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत रोजच्या जीवनाचा अविभाज्य अंग असलेला तो नाका माझ्या अगदी जिव्हाळ्याचा विषय होता. भारतातल्या निरनिराळ्या शहरातून आलेले हे लोक, त्यांचे निरनिराळे स्वभाव, त्यांच्या रोजच्या जगण्याच्या पद्धती हे सगळं मला मनसोक्त अनुभवता आलं. शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या निमित्ताने या वर्तुळातून पडत असताना एक गोष्ट मात्र नक्की जाणवत होती, ते म्हणजे नाक्यावर या इरसाल वल्लींसोबत आयुष्यातली अगदी महत्त्वाची वर्षं घालवल्यानंतर त्यातून मिळालेल्या अनुभवांनी माझं आयुष्य आणखी समृद्ध झालं. या कडू-गोड आठवणींचा एक कप्पा कायम माझ्या हृदयात राहील. कालांतराने रस्ता रुंदीकरणात आमच्या हॉटेलची जागा गेली. मात्र तो नाका आणि तिथली ही सगळी पात्रं माझ्या स्मृतिपटलातल्या पुस्तकावर कायमची विराजमान झाली.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# सतिश पिंपळे: एक ऋषीरंग

काकांबद्दल मला हळूहळू कळत गेलं. G.D. आर्ट झाल्यावर काकांनी याच क्षेत्रात अध्यापन केलं. राष्ट्रीय पातळीवरचे ते अतिशय मोठे चित्रकार आहेत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची अनेक चित्रं पोहोचलेली आहेत. जहांगीर आर्ट गॅलरी, बालगंधर्व इ. प्रसिद्ध ठिकाणी त्यांची कित्येक प्रदर्शनं भरली होती. अशा महान चित्रकाराने आमच्या गावात येऊन आमचा मान वाढवला होता.

**नवल**

३१ डिसेंबरचा दिवस होता. आम्ही सगळे न्यू इयर सेलिब्रेशनच्या तयारीत होतो. खाण्याचा एखादा मस्त बेत आणि टीव्हीवरचे कार्यक्रम बघत बसणं असा नेहमीचा प्लॅन. आज आमच्याकडे एक चित्रकार येणार होते. आजवर मी आमच्या घरी खूप लेखक, कवी मंडळी आलेली पाहिली होती, पण एका चित्रकाराला पहिल्यांदाच पाहणार होते. मला चित्रं काढण्याचं फार वेड, त्यामुळे मी फार खूश होते. वर्तमानपत्रात आणि टी.व्ही.मध्ये पाहून चित्रकारांविषयी काही कल्पना तयार झालेल्या होत्या - लांब केस, दाढी, झब्बा असं काहीतरी... संध्याकाळच्या सुमारास ते आमच्या घरी आले. माझ्या या कल्पनांपेक्षा एकदम वेगळे अगदी साधे. सतीश पिंपळे त्यांचं नाव.



काही वेळातच काका आमच्या सगळ्यांमध्ये मिसळून गेले. जेवढे मृदुभाषी, तेवढेच मिस्कील. घरातल्या छोट्यांपासून ते माझ्या आजोबांपर्यंत सगळ्यांशी त्यांचा फार सुंदर कनेक्ट होता. काका आमच्या छोट्या गावात चित्रप्रदर्शन भरवायला आले होते. आमच्या गावच्या इतिहासातलें कदाचित ते पहिलंच प्रदर्शन. त्यासाठी भलीमोठी कॅनव्हास पेंटिंग्ज फार सांभाळून आणलेली होती. काका मूळचे अकोल्याचे. इतक्या दूर ही पेंटिंग्ज आणण्याचा खर्चही खूप आला असणार , हे आता कळतं. कलेच्या व्यावहारिक पैलूचं ज्ञान झाल्यावर विचार करते की, जिथे आपली पेंटिंग्ज विकली जातील याची शक्यता अगदी नसल्यात जमा, तिथे लोकांना अशी पेंटिंग्ज बघायला मिळावीत या आग्रहाखातर ते तयार झाले होते. या प्रदर्शनाचा अनुभव आम्ही अगदी जवळून घेत होतो. ती चित्रं ठेवावी कुठे इथपासून प्रश्न होते. काही ठिकाणी खिळे मारून, काही मोठी पेंटिंग्ज खुर्च्या-टेबल यांच्यावर ठेवून, तर काही ठिकाणी सुतळीने बांधून चित्रं मांडण्यात आली. आर्ट गॅलरीमधून या गोष्टीची नीट व्यवस्था असते. पुरेशी आणि साजेशी प्रकाशव्यवस्थाही तिथे असते, ज्यामुळे चित्रं अधिक उठावदार दिसतात. आमच्या या प्रदर्शनात अनेक गोष्टींची त्रुटी असून लोकांसाठी ती पर्वणी होती, हीच महत्त्वाची बाब होती. त्यात प्रदर्शनात मुख्यतः काकांची अॅब्स्ट्रॅक्ट पेंटिंग्ज ठेवल्याने लोकांसाठी हा आणखी एक वेगळा अनुभव ठरला. बरेच लोक असं काही पहिल्यांदाच बघत होते. अॅब्स्ट्रॅक्ट चित्र बघताना त्यांच्या प्रतिक्रिया, हावभाव अगदी बघण्यासारखे होते. मी आणि माझा भाऊ तिथे बॅक स्टेज कलाकार होतो. हा अनुभव आम्हीही नव्याने घेत होतो आणि सोबत काकांचा विलक्षण सुंदर सहवास. लहान मुलांना इतकं महत्त्व देऊन वागवणारा पहिलाच मोठा आणि थोर माणूस पाहत होतो आम्ही. काकांशी बोलताना एखादी मिश्कील कॉमेंट करून दुसऱ्याच क्षणी अत्यंत गंभीरपणे ते प्रदर्शन पाहायला आलेल्या लोकांशी बोलायला लागत. त्यांच्या निरागस प्रश्नांना अतिशय सहजतेने हाताळत. एखाद्या चित्राबद्दल स्वतःचा दृष्टिकोन दुसऱ्यांवर लादण्यापेक्षा "तुम्हाला काय वाटलं ते सांगा" असं म्हणून त्याला बोलतं करायचे. कुठेही आपण किती थोर याचा आव नाही.

काकांबद्दल मला हळूहळू कळत गेलं. G.D. आर्ट झाल्यावर काकांनी याच क्षेत्रात अध्यापन केलं. राष्ट्रीय पातळीवरचे ते अतिशय मोठे चित्रकार आहेत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची अनेक चित्रं पोहोचलेली आहेत. जहांगीर आर्ट गॅलरी, बालगंधर्व इ. प्रसिद्ध ठिकाणी त्यांची कित्येक प्रदर्शनं भरली होती. अशा महान चित्रकाराने आमच्या गावात येऊन आमचा मान वाढवला होता.



संध्याकाळी घरी परतल्यावर आम्ही सगळे काकांभोवती कडं करून बसायचो. कित्ती विषय, कित्ती किस्से आणि त्यांना सांगण्याची अचाट विनोदबुद्धी. चेहरा नेहमी हसरा आणि डोळे मात्र जणू एखादा संथ प्रवाह आणि त्यात तरंगणारी एक संथ होडी. त्यात नेहमी एक दिव्यता जाणवायची मला. मी चित्र काढते हे


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

त्यांना कोणीतरी सांगितलं, तेव्हा खरं तर मी अवघडले होते. इतक्या मोठ्या माणसासमोर काय दाखवायची आपली चित्रं? मी काढलेली चित्रं काकांनी मला आवर्जून दाखवायला लावली. त्यात मी एक टोपले घेऊन जाणारी बाई काढली होती. तिची हुबेहूब सावली काकांनी फार appreciate केली होती. चित्र जिवंत आणि प्रभावी वाटण्यासाठी चित्रातला प्रकाश आणि सावली यांचा किती महत्त्वाचा रोल आहे, हे त्या वेळी त्यांनी मला सांगितलं. "कुठलंही चित्र समोर ठेवून त्याची कॉपी करू नकोस, त्यामुळे तुला तुझी शैली कधीच सापडणार नाही" हा त्यांचा सल्ला फार मोलाचा ठरला मला. माझ्या आजोबांशी काकांची विशेष गट्टी जमली होती. तेही चित्रकार, त्यामुळे काकांकडून एखाद्या विद्यार्थ्यांसारखं आम्ही दोघे शिकत होतो. माझे आजोबा खूप सुरेल आणि पहाडी गळ्याचे. त्यांना काका भजनाच्या फर्माइश करायचे आणि दोघांची ती मैफल अगदी रंगून जायची. भजन म्हणतानाच्या त्यांच्या मुद्रा काकांनी त्यांच्या स्केचेसमधून फार सुंदर टिपून ठेवलेल्या आहेत.

पुढे काकांचं औरंगाबादला प्रदर्शन भरणार होतं. त्यात त्यांचा वाढदिवस जवळ आलेला, म्हणून आम्ही तिथे जाऊन धडकलो. मी तर त्या चित्रप्रदर्शनात चित्रकार काकांना फार जवळून पाहिलं. काका नेहमी स्केचेस काढण्यात व्यग्र असायचे. ते कुठेही जावो, त्यांचं स्केचबुक हातातच असायचं. हे प्रदर्शन एका पंचतारांकित हॉटेलमध्ये भरलं होतं. तिथली वर्दळ, शाही झुंबरं, सुंदर अशी सजावट काही काही काकांच्या नजरेतून सुटलं नाही. प्रदर्शनाचं मीडिया कव्हरेज घ्यायला मीडियाची माणसं येणार असं कळलं. काका मजेत मला म्हणाले, "तूच उभी राहा रसिक म्हणून." मी एकदम गांगरून गेले. मुळात स्वभाव बुजरा, त्यामुळे मी तयार नव्हते. तर काका म्हणाले, "अगं  काय त्यात अवघड? बे एके बे चा पाढा म्हणायचा, झालं." मी म्हणाले, "कसा काका?" तर एकदम ते सिरियस चेहरा करून म्हणाले,"हे बघ, कसं असतं माहिते का, बे एक बे आणि बे दुणे चार असतं. बे त्रिक सहा हेही लक्षात घ्यायला हवंय." हे ऐकून मी एकदम हसायला लागले. मग हसू आवरत त्यांच्यात मिसळायचा प्रयत्न करत म्हणाले, "म्हणजे बे चोक आठ का?" काका लगेच म्हणाले, "हां... आणि बे पंचे दहा असं हे सगळं आहे." आम्ही दोघेही हसायला लागलो, अर्थात नंतर काकांचा मीडियासमोर अतिशय सुंदर interview झाला आणि रसिकही फार उत्तम लाभले त्यासाठी. तेव्हाच काकांचे जवळचे मित्र गझलनवाझ भीमराव पांचाळे काका तिथे काकांना भेटायला आले. भीमराव काकांनी मराठी गझलला फार मोठं स्थान मिळवून दिलं आहे. दोन महान कलाकारांची मैत्री, दोघांमध्ये काही कॉमन गोष्टी होत्या, त्या म्हणजे त्यांच्यातली सादगी, आपल्या कलेविषयीच समर्पण आणि अलौकिक प्रतिभा. कलेचा प्रकार कोणताही असो - दोन सर्जनशील व्यक्तींमध्ये एका विशिष्ट पातळीवर जो संवाद चालतो, तो ऐकणं केवळ अवर्णनीय! काकांसोबतची पहिली ट्रिप म्हणजे जेव्हा आम्ही औरंगाबादजवळच्या निपट निरंजन लेण्या पाहायला गेलो होतो. लेण्या कशा बघाव्या, हे काकांकडून समजावून घेत होतो. त्यात सोबत इतिहासकार ब्रह्मानंद देशपांडे काका. मग तर काय, लेण्यांचा इतिहास आणि त्यातली सौंदर्यस्थळं बघत समृद्ध होत होतो. याबरोबर काकांचं स्केचिंग बघणं! अहाहा!



आम्ही त्यांच्या घरी अकोल्याला गेलो, ते फार संस्मरणीय दिवस होते. अतिशय अगत्यशील कुटुंब, साधी प्रेमळ माणसं. घरात सगळीकडे चित्रं, पारितोषिकं अगदी भरभरून. घरातच कॅनव्हास, फ्रेम्स, म्युरल्ससाठी लागणारं सामान यांनी भरलेला त्यांचा स्टुडिओ. मला तर मिठाईच्या दुकानात गेलेल्या एखाद्या छोट्या मुलासारखं होत होतं. काकांच्या पत्नी पद्माकाकू स्वतः एक उत्तम चित्रकार. त्या दोघांची जोडी मी पाहिलेल्या आदर्श जोड्यांपैकी एक. त्या मुख्यतः वारली हा कलाप्रकार हाताळतात. त्यांची दोन्ही मुलं अमित आणि अंजली उत्तम कलाकार आहेत. अमित एक प्रसिद्ध चित्रकार आणि आर्किटेक्ट आणि अंजली एक नृत्यांगना आहे. कलेच्या देवतेने या घराला भरभरून दिलं आहे. काका आपल्या मुलांचे किती चांगले मित्र आहेत, हे त्यांच्याबरोबर राहताना लगेच लक्षात येतं. काका आणि त्यांचे सगळे भाऊ एकत्र राहतात. सगळ्यांचं मिळून एक मोठ्ठं कुटुंब आहे. बाकी भाऊदेखील याच कलेशी निगडित आहेत.

सकाळी उठल्यावर चहा पिणं ही तर 'तबियत से' करायची गोष्ट. एक कप संपला की त्याच कपात लगेच दुसऱ्यांदा चहा, त्यासोबत स्नॅक्स आणि गप्पा. या मुक्कामात आम्ही अकोल्याच्या आजूबाजूचे काही स्पॉट फिरायला गेलो. सहलीला जाताना काकांसारखी कंपनी नाही. गाडीत आम्ही गाणी म्हणून तर धुडगूस घातला. आपण एका मोठ्या माणसाबरोबर आहोत, याची ते जाणीवच होऊ देत नाहीत. गाणी तर इतकी पाठ, तीही त्यातल्या म्युझिक पीससकट . तिथेही भटकताना काका आमच्या सगळ्यांच्या पुढे असायचे. ते पोलिओग्रस्त आहेत याची कुठलीच जाणीव न बाळगता, कुणाचा कुठे आधार न घेता काका मनसोक्त फिरत होते. उलट शारीरिक ताकदीच्या बाबतीत ते कित्येकांना सरस ठरतात.




काकांच्या चित्राबद्दल काही लिहिण्याची माझी पात्रता नाही. पण एक रसिक प्रेक्षक म्हणून जे जाणवलं ते लिहायचा प्रयत्न करते. त्यांची अॅब्स्ट्रॅक्ट पेंटिंग्स खूपच vibrant. प्रकाश, तेजस्वी रंग आणि त्यांच्यातल्या गतिमान हालचाली यांचा थरार प्रत्यक्ष अनुभवण्यासारखा. त्यांचे अत्यंत पॉवरफुल स्ट्रोक्स, रंगाची एकमेकांमधली प्रभावी गुंफण मनाच्या कॉम्प्लेक्स अशा प्रवासाला प्रभावीपणे कॅनव्हासवर साकारतात. चित्रातून मुख्यतः जाणवते ती काकांची आधिभौतिकतेची, अध्यात्माची ओढ, स्वतःला जाणून घेण्याची ओढ... बाहेरच्या जगाकडून आतल्या गूढ, अनाकलनीय जगाकडे त्यांचा प्रवास आपण रसिक म्हणून दृश्य पातळीवर चित्राच्या रूपात बघू शकतो, हे केवढं भाग्य!

अॅब्स्ट्रॅक्ट पेंटिंगबद्दल मला नेहमीच उत्सुकता वाटत आलीये. हुबेहूब चित्र काढणारा एखादा चित्रकार अॅब्स्ट्रॅक्ट पेंटिंग करताना  नक्की काय विचार करत असेल? अॅब्स्ट्रॅक्ट पेंटिंग म्हणजे हळूहळू रेषा विरघळत जाऊन अगदी कमी शब्दात आशय मांडणारी कविताच असते जणू. त्याची निर्मिती प्रत्यक्ष बघणं खरंच अद्भुत. काकांनी स्वतःच्या चित्रनिर्मिती प्रक्रियेबद्दल लिहिलेलं वाक्य इथे सांगावंस वाटतं - "माझ्या मनाच्या विस्तीर्ण अंगणात असंख्य रंग एकमेकांचा हात धरून नाचतच असतात. बाहेर पडण्याची प्रत्येकाला घाई झालेली... हा त्यांचा बालिशपणा की समजूतदारपणा... माहीत नाही. पण मी ते होऊ देतो...


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

त्यांचं ते कागदावर किंवा कॅनव्हासवर उतरणं तटस्थतेने पाहणं खूपच इंटरेस्टिंग असतं....!"



त्यांच्या 'रूट्स' पेंटिंगमधलं ते जमिनीखालचं अद्भुत जग, मुळांमध्ये झिरपलेलं पाणी, त्यात पसरलेला दिव्य प्रकाश, अप्रतिम!



'केव्ह्ज ' हे त्यांचं अवॉर्ड विनिंग पेंटिंग, वेरूळच्या १० नंबरच्या लेण्यावर काढलेलं. लेण्याची भव्यता, गूढता त्यातल्या ब्लॅक ग्रीन रंगाने ठळकपणे जाणवते आणि लेण्या बघत असताना जणू त्या गूढतेत सामावून गेलेलं आपलं अस्तित्व दाखवणारा तो लाल रंग ...



अंकोरवट या चित्राबद्दल SPECIALLY लिहायला हवंय. कंबोडियाजवळ अंकोरवट हे प्राचीन बौद्ध मंदिर आहे. त्याच्या आजूबाजूला इतके प्रचंड वृक्ष वाढले. त्या झाडांच्या फांद्यांनी, मुळ्यांनी मंदिराला तडे गेले आणि त्याच फांद्यांनी आणि मुळांनी त्या इमारतीला धरून ठेवलं आहे. मंदिर आणि वृक्ष अगदी एकजीव झाले आहेत. पेंटिंगमध्ये दिसतो तो हास्य टिकवून असणारा बुद्धाचा चेहरा.



काकांची चित्रं देशीविदेशी पोहचलेली आहेत. एखादं चित्र विकलं गेल्यावर त्याला अलविदा करण्याचा सोहळाही फार सुंदर. 'कॅव्हेस' विकलं गेलं, तेव्हा मी तिथे होते. एका विदेशी माणसाने ते घेतलं. त्या माणसाला औक्षण करून चित्राला त्याच्या हातात फार प्रेमपूर्वक सुपुर्द केलं गेलं. अगदी त्याला गाडीपर्यंत काळजीपूर्वक पोहोचवलं गेलं. जणू 'माझ्या लेकराची काळजी घ्या हं' असच सांगत असावे.

गेली ४० वर्षं ते चित्र काढतायत. चित्रांबरोबरच म्युरल्स हा फॉर्मदेखील ते फार लीलया हाताळतात. त्यांनी बनवलेले भव्य असे म्युरल्स अनेक महत्त्वाच्या ठिकाणांची शोभा वाढवत आहेत.

'अकोला आर्ट अकॅडमी' या संस्थेची स्थापना करून कलेचा प्रसार अगदी सामान्य लोकांपर्यंत करण्याचं महत्त्वाचं काम ते करत आहेत. काकांनी आपल्या करियरच्या सुरुवातीच्या काळात औरंगाबादच्या यशवंत कला महाविद्यालयात


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

अध्यापन केलं. पण पुढे आपल्या गावाच्या ओढीने ते अकोल्याला परतले आणि तिथेच आपला एक स्टुडिओ उभा केला. काकांचं अकोला प्रेम त्यांच्या ई-मेल आयडीपासून सगळीकडे जाणवतं. विदर्भातील अनेक कलाकारांना त्यांनी एका व्यासपीठावर आणण्याचं महत्त्वपूर्ण काम केलं. दर वर्षी त्यांच्या अकादमीतर्फे भव्य चित्रकला स्पर्धेचं आयोजन केलं जातं. विशेषतः अपंगांसाठी त्यांनी केलेलं काम मोठं आहे. मी जवळून पाहिलेल्या बऱ्याचशा कलाकारांना अतिशय समाजविन्मुख आणि आत्मकेंद्री आयुष्य जगताना पाहिलं आहे. पण काकांनी कलाकारांविषयीचे हे रूढ समज पार बदलून टाकले. सामाजिक जाणिवेचा कलाकार म्हणून ते सुपरिचित आहेत.

माझी काकांबद्दलची सगळ्यात सुंदर आठवण म्हणजे माझ्या लग्नाच्या आदल्या दिवशी काका सीमंतीसाठी पोहोचले होते. मी तयार होऊन वधुपक्षाच्या एका रूममध्ये तयार होऊन बसलेली. बाहेर नवरोबांची वरात निघालेली देवदर्शनाला. आईबाबा, भाऊ कामात गर्क. माझ्याजवळ घुटमळणाऱ्या बहिणी, मैत्रिणीसुद्धा वरात पाहण्यासाठी निघून गेल्या. मी एकटीच बसलेली. लग्नाच्या आधी मनात एक वेगळीच घालमेल असते. घसा कोरडा पडत होता, गलबलल्यासारखं होत होतं. तेवढ्यात काका मला शोधत रूममध्ये आले आणि माझ्याजवळ येऊन बसले. त्यांच्या हातात त्यांनी माझ्यासाठी बनवलेलं एक वूडन आर्ट आणि काकूंचं एक पेंटिंग होतं. ते मला दाखवलं आणि तिथेच थोडा वेळ बसून राहिले. माझा उतरलेला चेहरा त्यांच्या लक्षात आला असावा. काही न बोलता नुसता त्यांच्या 'प्रेझेन्स'नेच मला खूप बरं वाटलं. मग "कित्ती छान दिसतीये गं नवरीबाई' असं म्हणून मला हसवून माझ्या डोक्यावर हात ठेवून ते बाहेर निघून गेले. ही आठवण माझ्या मनातल्या एका गोल्डन फ्रेममध्ये चिरंतन राहील.



काकांसोबत राहताना सतत जाणवतो तो एक प्रसन्न शांतपणा, सगळ्यांमध्ये राहूनही एक विरक्तपणा . आयुष्याकडे बघण्याचा एक साक्षीभाव. 'अवघा रंग एक झाला ' या त्यांनी लिहलेल्या पुस्तकाचा उल्लेख केल्याशिवाय हे व्यक्तिचित्र अपुरं आहे. काकांचे गुरू श्री वासुदेव महाराज यांच्या कार्यावर लिहलेल्या पुस्तकातल्या परिच्छेदातून काकांची जीवनाविषयीची दृष्टी, चित्रकार म्हणून बघण्याचं वेगळेपण आणि त्यांची समर्पित वृत्ती दिसते. त्यांच्या पुस्तकातला एक परिच्छेद - 'निसर्गाची कमाल पाहा किती अद्भुत. प्रत्येक व्यक्ती भिन्न आहे. एकासारखी दुसरी नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपली अर्धी बाजू आपल्याच दुसऱ्या अर्ध्या बाजूसारखी नाही. हे सांगितले तर चट्कन विश्वास बसणार नाही. समोर मॉडेल बसवून केलेल्या अभ्यासामुळे मला चित्रकलेच्या उच्च शिक्षणादरम्यान असंख्य पोर्ट्रेट तयार करता आली. बारकाईने त्यांचा अभ्यास करता करता हे लक्षात आलं. आरशासमोर उभे राहिल्यास आणि एक उभी काल्पनिक मध्य रेषा मानली किंवा आपला चेहरा वहीने अर्धा झाकल्यास डावी आणि उजवी बाजू भिन्न आहे हे लक्षात येईल...असे सर्वसाधारण रूप जन्मतः लाभते व त्यामध्ये कालानुरूप बदल घडत जातो. कर्मानुसार त्याची वागणूक ठरत जाते. त्यामध्ये विचार, विवेकाच्या भाग मोठा. साथसंगत, पूर्वसुकृत आजूबाजूचे वातावरण, शिकवल्या जाणाऱ्या गोष्टी आणि महत्त्वाचे म्हणजे स्वतःहून आत्मसात केलेल्या गोष्टी त्याचा जीवनक्रम ठरवतात."

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ मॅस्लोच्या HIERARCHY OF HUMAN NEEDSनुसार अन्न, वस्त्र, निवारा या भौतिक गरजा आणि त्याबरोबर प्रेम आणि सुरक्षितता या मूलभूत गरजा भागल्यानंतर प्रत्येक माणसाला ओढ लागते ती SELF ACTUALISATIONची, 'कोहं?' या प्रश्नाची. तो प्रश्न आपल्याबरोबर आयुष्यभर नुसता जरी बाळगला, तरी आपलं आत्मभान जागं राहायला मदत होते आणि जीवनाच्या कुठल्याही प्रसंगातला साक्षीभाव सुटत नाही. काकांच्या आयुष्यात सुरुवातीपासूनच असणारी आत्मज्ञानाची ओढ त्यांच्या गुरूंच्या सान्निध्यात अधिक उजळून निघाली. 'कोहं?' या प्रश्नाचं 'सोहं' हे जरी उत्तर असलं, तरी त्याला शोधण्याचा प्रत्येकाचा प्रवास वेगळा. इथे एक गोष्ट आठवते... नुकतेच पंख फुटलेलं एक पिल्लू आपल्या आईला विचारतं, "आई, या आकाशाचा अर्थ काय?" आई म्हणते, "तूच शोध बाळा." ते पिल्लू उडून जातं, तेव्हा दुसरं एक पाखरू त्या आईला विचारतं, "या आकाशाचा तर काहीच अर्थ नाही हे का नाही सांगितलंस त्याला?" आई म्हणते, "त्याच्या शोधाच्या शेवटी त्याला हे कदाचित कळेलही, पण म्हणून तो अर्थ शोधण्याचा प्रवास तो अनुभवू शकणार नाही. आकाश निरर्थक असलं तरी ते शोधण्याचा प्रवास मोठा सुंदर आणि अर्थपूर्ण आहे."

काकांच्या विचारांमध्ये आणि वागण्यात नेहमीच एक सुसंगतता राहिली. त्यामुळेच कदाचित ते आम्हाला आदरणीय वाटत राहिले आहेत. खऱ्या अर्थाने प्रगल्भ होत जाणं काय आहे, हे मी त्यांच्याकडे पाहून शिकते. आयुष्याच्या योग्य टप्प्यावर मनाच्या योग्य अवस्थांना ते अनुभवत आहेत. त्यांच्या आयुष्यातलं समाधान, समर्पित वृत्ती एखाद्या ऋषीसारखी... काकांचा आणि माझा जो काही सहवास राहिला, त्यात हिमनगाचा जो काही भाग मी समजू शकले, तो इथं मांडला आहे. माझ्या आवाक्यापलीकडचे काका अजून शिल्लकच राहतील. खऱ्या अर्थाने ज्ञानी झालेली व्यक्ती अधिक नम्र, अधिक सुलभ होत जाते हे मी त्यांना बघून समजले. माझी त्यांच्याबद्दलची भावना पूर्णपणे कधीच व्यक्त होऊ शकत नाही. शब्द इथे अपुरे पडतात... लहानपणी आजीने सारवलेल्या तुळशी वृंदावनाच्या कोनाड्यात संध्याकाळी ती दिवा लावायची. त्या दिव्याने तो कोनाडा, वृंदावन उजळून निघायचं. ओट्यावर बसून मी त्याच्याकडे बघत राहायची. एखाद्या लखख मंदिरातल्या नक्षीदार ,सुंदर ,भव्य दिव्यांपेक्षा मातीचा तो साधासा दिवा मला अधिक आवडायचा. स्वतःत शांतपणे तेवत राहून आजूबाजूचा छोटासा परिसर उजळून टाकत मनात मांगल्याचे भाव जागवणारा तो दिवा. माझ्यासाठी सतीश काका म्हणजे तोच साधेपणा, तेच मांगल्य, तोच शांतपणा आणि तोच तो तुळशीपुढचा दिवा!

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# महाबळेश्वर-खेड परिसरातील सह्यभ्रमंती: दाभीळटोक घाट आणि निगडा घाट

"सह्याद्रीतल्या २ दिवसातल्या टॉनिकवर शहरातले २८ दिवस आरामात जातात, हे इतक्या वर्षांच्या अनुभवाने आम्हाला कळून चुकलेय :) ".

**स्वच्छंदी मनोज**



'टिंग'.. अर्धवट झोपेतल्या कंडक्टरने बेल मारली आणि झोपेतच आम्हाला म्हणाला, "चला उतरा, उशीर होतोय (???)." बाहेर मिट्ट काळोख. आजूबाजूला कुठेही गावाच्या खुणा नाहीत. कदाचित स्टॉप असावा असे वाटू शकेल अशा टपऱ्यांशेजारी गाडी थांबली. आता दाभीळ फाटा स्टॉप कुठे आहे, हे आमच्यापैकी कोणालाच माहीत नव्हते. गाडीतले लाईट लागले तेव्हा बघितले, तर सगळे झोपले होते. पोलादपूरला कंडक्टरने सांगितले होते की मी सांगतो तिथेच उतरा. करता काय, वरच्या रॅकवरच्या बॅगा घेऊन आम्ही उतरलो.

आम्ही आठ जण जमलो होतो एका वेगळ्या वाटेवरच्या रेंज ट्रेकसाठी. जवळजवळ दोन महिने आणि पावसाचा मेन सीझन ट्रेकविना घालविल्यावर एखादा भन्नाट ट्रेक करावा असे मनात होते. कुठे करता येईल? असा विचार करतानाच माझ्या मित्राने काही वर्षांपूर्वी सांगितलेला धबधबा डोळ्यासमोर आला. ह्याला बघायला जायचे, म्हणजे पावसाळ्यातच आणि जायचे तर ह्याला जोडून आणखी काहीतरी हवे, म्हणून हा रेंज ट्रेकचा घाट घातला होता. सावित्री घाट - दाभीळ - किनेश्वर - पार घाट - कुमठे - कुडपण - वडगाव असा हा दणकट दोन दिवसांचा प्लॅन. थोडेसे जुजबी प्लॅनिंग केले होते, पण काय अनुभव आले, कसा सह्याद्री अनुभवला, कसे गावकरी भेटले ते सर्व येईलच पुढे.

**दिवस पहिला**

उतरलो, तेव्हा पहाटेचे चार वाजले होते किंवा असावेत. दिवसा ऑक्टोबर हीट जरी जाणवत असली, तरी रात्री मात्र मस्त हुडहुडी भरविणारी थंडीच होती. मुंबई सोडल्यावर तर ती जास्तच जाणवत होती. एस्टीने पोलादपूर सोडून महाबळेश्वर रस्त्याला वळण घेतल्यावर ड्रायव्हर जास्तच रंगात आला होता. पाऊस असा नव्हता, पण हवेत मस्त गारवा होता. ज्या ठिकाणी उतरलो, ते ठिकाण कुठे आहे ह्याचा काहीही पत्ता नव्हता. एक माहीत होते की पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावर वाडा-कुंभरोशी गावाच्या अलीकडे दाभीळ फाट्याला उतरून पायवाटेने जायचे. हाच तो सावित्री घाट. (ह्या नावाची काय गंमत झाली ते शेवटी सांगतोच). पण आम्ही उतरलो तिथे कोणी चिटपाखरूही नव्हते. (पहाटे चार वाजता आमच्या स्वागताला कोण असणार म्हणा :) ). नाही म्हणायला, दिवसा चालू असणाऱ्या दोन-चार बंद टपऱ्या दिसत होत्या. आमचा प्लॅन होता की जरासे दिसायला लागले की वाट पकडून खालच्या गावात जायचे. पण कसचे काय! आम्हाला कंडक्टरने अशा ठिकाणी उतरवले होते की वाट सोडाच, समोर अशी 'आ' वासून दरी होती :) . आता या दरीतून सावित्री घाट असेल तर आम्ही मेलोच, असा विचार करत मी आणि इम्रान दोन दिशेला रस्ता शोधायला गेलो. पण रस्त्यावरून एक कि.मी. चालत गेलो, तरी कोणालाच खाली उतरायची वाट सापडेना. काय करता, बसून राहिलो तशाच अंधारात. थोड्या वेळाने पाच-साडेपाच वाजता समोरच्या डोंगरावर अचानक लाईट लागला. आम्ही नीट बघितले, तेव्हा समोर एक झोपडे दिसले.

आम्ही बॅटरीच्या उजेडात गप्पा मारत बसलो होतो, तेवढ्यात "ओ, कोणेय?" "थांबा तितंच" करत हाका ऐकू यायला लागल्या. थोड्याच वेळात बॅटऱ्या, कंदील घेऊन काही माणसे खाली उतरायला लागली. नाही म्हटले तरी आम्ही थोडेसे घाबरलोच. थोड्याच वेळात ती लाठ्या काठ्या घेतलेली माणसे आमच्याजवळ आली आणि उलगडा झाला. आम्ही त्यांना घाबरलो होतो आणि ते आम्हाला :) . झाले होते काय, की काही दिवसांपूर्वीच ह्या रस्त्यावरच्या होटेल्सवर काही भुरट्या चोरांचा दरोडा पडला होता. आता इतक्या पहाटे जवळ कुठलाही गाव आणी बस थांबा नसताना बॅटऱ्यावाली माणसे बघितल्यावर त्याना आम्ही भुरटे चोर वाटलो होतो. (कर्म आमचं. नशीब, चौकशी न करता हाणले नाही ते :) :) ). पण ह्या नादात आम्हाला एक वेगळाच फायदा झाला. आम्ही कोण कुठले, कुठे जाणार ते सांगताच गावकऱ्यांनी सांगितले की आम्ही चुकीच्या ठिकाणी उतरलोय. (आम्हाला ते जाणवायला लागले होतेच.) आणि दाभीळगाव फाटा आणि घाटाची सुरुवात चार कि.मी. पुढे आहे :( :(. त्यांच्या म्हणण्यानुसार आम्ही होतो तिथूनही एक वाट खाली 'करंदी घाटाने' खाली हळदुले गावात उतरते, पण ती पावसाळ्यात बंद असते.

आम्ही अशा गप्पा मारत होतो, तो गावकऱ्यांच्या घरातल्या बायका आणि मुले हंडे घेऊन खाली रस्त्यावर उतरले. आम्ही विचारले, "आता इथे कुठले पाणी भरणार? ओढ्याचे काय?" उत्तर आले, "ओढा कशाला, टाके आहे ना? लय जुनं हाय." जुने टाके म्हटल्यावर आमचे कान टवकारले आणि आम्ही लगेच ते टाके बघायला गेलो. बघतो तो खरेच, शिवकालीन टाके आणि आत थंडगार पाणी. व्वाव.. लॉटरीच लागली. या वाटेवर असे इथे कुठे टाके असेल असे वाटलेही नव्हते. शिवकालीन टाकी म्हणजे नक्कीच दाभीळ ते प्रतापगड, कुंभरोशी, पार गावाला जोडणारा हा रस्ता. टाके बघून गावकऱ्यांकडून रस्ता समजावून घेत आम्ही कुंभरोशीच्या दिशेने निघालो. नुकतेच उजाडायला लागले होते. इतक्या सकाळी चार कि.मी. चढणाचा डांबरी रोड तुडवणे म्हणजे शिक्षाच की हो. पण काय करता, ती शिक्षा भोगतच, महाबळेश्वरला जाणाऱ्या-येणाऱ्यांच्या थोड्याशा आश्चर्यकारक आणि बऱ्याचश्या दुर्लक्षित नजरा झेलत जेव्हा चार कि.मी. चालत आलो, तेव्हा एका वळणावर 'दाभीळ फाटा' असा बोर्ड दिसला आणि पायवाटही सापडली. आता स्पष्ट उजाडले होते. समोर महाबळेश्वरची डोंगररांग अंग झटकून सकाळच्या सूर्याचे स्वागत करायला तयार होती.

आम्ही लगेच वेळ न घालवता पायवाटेने चालायला लागलो. साधारण १० मिनिटे पठारावरून सरळ चालत गेल्यावर टोकाशी आलो तो अफलातून नजारा डोळ्यासमोर उघडला गेला. कसल्या जबरदस्त जागी आम्ही उभे होतो! पायाखाली महाबळेश्वरवरून उगम पावणारी सावित्री नदी पूर्ण भरात नागमोडी वाहत होती. सभोवताली आणि तळात सगळीकडे हिरव्या रंगाचे साम्राज्य होते. नदीच्या अल्याड-पल्याड हळदुले, दाभीळ, लहुळसे, करंजे, देवळे अशी गावे आळस देऊन उठत होती. शेते पूर्ण भरात आली होती आणि सूर्याचे तिरपे


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

किरण त्यांचे रंग आणखीनच खुलवत होते. समोर करंजे गावाची डोंगररांग होती, जिच्या पलीकडे ढवळीचे खोरे आणि ढवळे गाव दिसत होते. उजवीकडे जुन्या महाबळेश्वरची डोंगररांग आणि पठार दिसत होते. अगदी उजवीकडे कुंभरोशी, जावळी, दरे एरियाचा नजारा आम्हाला फ्रेश करून गेला. चार कि.मी. चालण्याने आलेला थकवा कधी पळाला, कळलेच नाही.

वाटेवरचे गवत जरी उंच वाढले असले, तरी भराभर वाट पायाखाली घालत आम्ही दाभीळ गावात उतरायला लागलो. झिग-झॅग, मध्येच कड्याकाठाने, मधेच कारवीतून असे तासा-दीड तासात आम्ही गावापाठच्या शेतात उतरलो आणि शेतावरच्या बांधावरून गावात दाखल झालो. प्लॅनप्रमाणे आम्ही जरी लेट (एस्टीच्या कंडक्टरची कृपा :) ) झालो असलो, तरी जरासा जोर केला तर आम्ही आमच्या पुढच्या गावात किनेश्वरला वेळेत पोहोचू शकलो असतो. गावात चौकशी केली, तर कळले की एस्टीशिवाय कुठलेही पब्लिक वाहन गावात येत नाही :( . आमच्या सुदैवाने ८ वाजता पोलदपूरहून एस्टी येणार होती. जरासे चालून एस्टीच्या स्टॉपजवळ आलो आणि जवळचे थोडेसे खाऊन घेतले. ८.३० झाले आणि बस आली. आम्हाला आता पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील कापडा गावात उतरून पोलादपूर-किनेश्वर बस पकडायची होती. ९.३०ला फाट्याला उतरलो आणि १०.०० वाजता येणाऱ्या गाडीला वेळ आहे म्हणून मिसळीची ऑर्डर देऊन पावाचा पहिला घास घेतला, तो समोर गाडी येऊन ५ सेकंद थांबून आमच्यावर धुळ उडवून निघून गेली. आम्ही बघतच बसलो :) :).

**१.दाभीळ फाट्यावरून दिसणारे पहाटेचे दृश्य**



**२.दाभीळटोक घाटाच्या सुरुवातीहून दिसणारे सावित्री नदीचे खोरे आणि पायथ्याची गावे**



**३.दाभीळ गावातून दिसणारा सूर्योदय आणि पाठीमागे महाबळेश्वर रांग**



आता काय? असा विचार करत होतो, तोच एक सिक्स सिटर रिक्शावाला आम्हाला विचारता झाला, "किनेश्वरला जायचंय काय?" आम्ही चकित झालो. म्हटले, हा काय आमची बस चुकायचीच वाट बघत होता की काय? आम्ही त्याला सांगितले की एवीतेवी बस गेलीच आहे, तो आता मिसळ आणि तर्री मन लावून खाऊ दे, मग जाऊ निवांत. सावकाश मिसळ आणि कटींग मारून त्याच्याबरोबर निघालो. मनात एक विचार आला होता की आडच्या फाट्यावर उतरून चालत जावे काय? पण म्हटले, नको. जाऊ तसेच. (पुढे तो निर्णय अत्यंत योग्य ठरला). आडगावाला बगल देऊन मेन रस्ता सोडून आम्ही किनेश्वरच्या 'आड'रस्त्याला लागलो आणि शपथेवर सांगतो - कसला डेंजर रस्ता होता. ही अशी अंगावर येणारी वळणे. एका मागोमाग नुसती वळणेच वळणे. ह्या एवढ्याशा बारीक रस्त्यावरून बस चालवणे म्हणजे कौशल्याची सीमाच. सतत रस्ता चढण चढत होता. आमच्या सहनशक्तीची परीक्षा घेऊन २५ मिनिटांनी रस्ता संपला, तेव्हा किनेश्वर गाव आलेले होते.

किनेश्वर गाव शिवकालापासून प्रसिद्ध आहे ते शिवकालीन शंकर मंदिरामुळे आणि गावात उतरणाऱ्या पारघाटामुळे. पार, कुमठे, डोंगर वरदायनी मंदिर करत करत हा जुना पार घाट प्रतापगडावरून खाली कोकणात उतरतो. आम्हाला तोच वर चढून कुमठे गावात जायचे होते आणि पुढे कुडपणला. आमच्यापैकी कुणीच या वाटेने गेले नसल्याने गावात चौकशी केली की कुणी आमच्या बरोबर येईल का? तर धक्काच बसला. "आम्ही येऊ, पण २००० रुपये होतील" अशी स्वच्छ आणि स्पष्ट ऑफर :) :). आता यापूर्वी आम्ही गाईड घेऊन घाटवाटा केल्यात आणि न घेताही केल्यात. पण पार घाट मोडलेला, गवत मरणाचे वाढलेले आणि पूर्वी कोणीच गेले नसल्याने हातातील वेळ बघता गाईडशिवाय शोधाशोध करणे मूर्खपणाचे होते आणि किनेश्वरवाले म्हणत होते की "शहरातले तुम्ही, २००० तुम्हाला जड हयेत व्हय." थोडीशीही घासाघीस करायला तयार न झाल्यामुळे आम्ही परत फिरण्याचा निर्णय घेतला. पारघाट हुकल्याचे दु:ख तर होतेच, पण त्याहून गावकऱ्यांनी दाखवलेल्या माजाचा आणि मस्तीचा राग जास्त होता. गावात आलेल्याला साधे पाणीही विचारण्याचे सौजन्य किनेश्वरवाल्यांनी दाखवले नाही.

आताशा हा अनुभव सर्वत्र यायला लागला आहे. "१००० घेईन", "२००० घेईन", "ते देतात तर तुम्ही का नाई", "तुम्हाला काय कमी" "अर्धाच रस्ता दाखवू" अशी पूर्वी ट्रेकिंग करताना कल्पनाही न केलेली वाक्ये सररास ऐकू यायला लागलीत. दोष कुणाचा यावर चर्चा झडतील, दोन्ही बाजू बरोबर अशी मते व्यक्त होतील, पण हाती येणाऱ्या पैशाने आणि शहरातल्या चमचमाटामुळे गावात पैशाचे विष पसरले आहे, हे नक्की. असो.

नशिबाने आम्ही सिक्स सिटरवाल्याला परत पाठवले नव्हते :) . त्याच्याच बरोबर परत त्याच रस्त्याने 'आड'ला आलो. सकाळपासून तीनदा प्लॅन गंडला होता.

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

एकदा बसवाल्याने त्याच्या मर्जीच्या ठिकाणी उतरवले, एकदा किनेश्वर बस समोरून निघून गेली, एकदा किनेश्वरवाल्यांनी झटका दिला. (तसे किनेश्वरहून कुमठ्याला न जाता कोंडोशीवरून कुडपणला डायरेक्ट जाता येते, पण तो पर्यायही प्रचंड गवतामुळे बारगळला होता). पारघाटाने कुमठ्याला जायचा प्लॅन हुकल्याने आता आमच्यासमोर वाडा कुंभरोशीवरून परत एकदा जीप करून कुमठ्याला जाण्याशिवाय पर्याय नव्हता. आम्ही तसेच केले. एका बसमधून कुंभरोशीला उतरून दुसऱ्या जीपमधून कुमठ्यात उतरलो, तेव्हा १.३० वाजला होता. आम्ही आमच्या पूर्‍ नियोजित वेळेत कुमठ्यात दाखल झालो होतो, पण अर्थात पार घाटाचा बळी देऊन :) :)

**४.किनेश्वर गावातून दिसणारा रडतोंडी घाट.मध्यभागी डोंगराच्या पाठीमागे कुमठे गाव.**



कुमठ्यात चौकशी केली तेव्हा कळले की आता कुडपणला जायला अर्ध्यापर्यंत कच्चा रस्ता झालाय. व्वा! हे तर मस्तच काम झाले. रस्ता वळण वळण घेत हळूहळू चढत होता. गाव सोडताच जंगल लागले, त्यामुळे ऑक्टोबर हीटचा त्रास जाणवत नव्हता. आहा, काय मस्त चाल होती. जंगलातून रस्त्याने चालत चढत केव्हा टॉपला आलो, कळलेच नाही. वाटेत एक मोठा सहा-सात फुटी साप आडवा गेला, पण मी काय 'जॅक डनियल' नसल्याने त्याला ओळखता आले नाही :) :) . टॉपला आल्यावर एक रस्ता सरळ कोंडोशीला जातो, तर डावीकडचा रस्ता एक-दीड कि.मी. पुढे एका झोपड्यापर्यंत जातो. आम्हाला डावीकडेच जायचे असल्याने आम्ही न थांबता तसेच पुढे निघालो. रस्ता संपून धनगराच्या झोपड्यापाशी आलो, तर २.३० वाजले होते. सकाळच्या मिसळीने आम्हाला इथपर्यंत तर आणून सोडले होते, पण पुढे जायचे तर जेवणाचा ब्रेक घेणे आवश्यक होते. तिथेच झोपडीच्या सावलीत जेवण केले. मी नको म्हणत होतो तरीही बाकीचे भिडू झोपण्याचा वेळ कमी होतो म्हणून पाचएक मिनिटात जेवण उरकून घोरायला लागलेही. मग मीही त्याना आणि स्वतःला नाराज केले नाही :) :).

३.३० वाजता कसेबसे बळेच उठून कुडपणच्या वाटेला लागलो. वाट पठारावरून आहे आणि पठार शेवटपर्यंत ठळक आहे. पठार संपता संपता समोर सह्याद्रीचा रौद्र पण तेवढाच लोभस कॅनव्हास समोर आला. आम्ही हरखून गेलो. ऐन सह्याद्रीच्या गाभ्यातला, सह्याद्री पर्वतरांगेच्या क्रेस्टलाईनवरचा हा प्रदेश. कुठे कुठे चुकार गावे सोडली, तर तसा निर्मनुष्यच. आत्ता कुठे गाडीचाकांचा स्पर्श इथल्या निसर्गाला होतोय. डावीकडून उजवीकडे नजर फिरवली, तर नजर संपेपर्यंत घनदाट जंगलच जंगल. डावीकडे अस्पष्टसा मधु मकरंद दिसत होता, हातलोट घाट जाणवत होता, समोर नवप्रसिद्ध भिवाची काठी सुळका आणि खडशीचा धबधबा (ह्याचा खास उल्लेख पुढे येईलच) दिसत होता, पायथ्याशी कुडपण गावाची कौलारू घरे आणि भातशेती दिसत होती. पण पुढे नजर जाईल तिकडे अफाट जंगल, खोल खोल दऱ्या. ढग दरीत उतरले होते. पलीकडे सूर्य अस्ताला चालला होता, पायाखालच्या पठारावर मऊ हिरवे गवत पायांशी खेळ करत होते. आहाहा... नजरबंदी व्हावी तशी आम्ही तिथे त्या क्षणाला ते सर्व डोळ्यांतून पिऊन घेत होतो आणि तरीही समाधान होत नव्हते.

पठार संपले, जंगल उतार सुरू झाला आणि वाट गायब झाली. पण आम्हाला आता तशी फार चिंता नव्हती. एकतर ५.३० वाजले होते आणि खाली कुडपणची घरे दिसत असल्याने अंधार पडायच्या आत गावात पोहोचू शकणार होतो. थोडे इकडे, तिकडे करत खाली उतरायची वाट शोधत असताना अगम्य भाषा बोलणारे एक आजोबा गुराखी तिथे आले. त्यांनीच मग योग्य वाट दाखवली. त्या वाटेच्या घसाऱ्यावरून वाटेतल्या एका धनगराच्या झापावरून ४५ मिनिटात कुडपण गावात एंट्री मारली. गावात देवळाची चौकशी करता कळले एक देऊळ ओढ्यापलीकडे आहे. गावातल्या एका घरी गरमागरम चहाची विनंती करून १५ मिनिटांत गावाबाहेरच्या देवळात दाखल झालो, आणि पहिल्या दिवसाचा ट्रेक संपवला, तेव्हा ६.३० झाले होते.

देवळात आलो, तर देऊळ बघून आश्चर्यचकित झालो. इतक्या आडवाटेला रिमोट गावात इतके मस्त देऊळ असेल असे वाटलेच नव्हते. भिंतीना मस्त रंग दिलेला, चकचकीत संगमरवरी लाद्या, नवीन पंखे, नवीन लाईट बघून हे नुकतेच जिर्णोद्धारित मंदिर आहे हे कळले. मंदिराशेजारून एक डोंगरातून येणारा थंडगार पाण्याचा ओढा वाहात होता. मग काय, वेळ न दवडता बॅगा एका कोपऱ्यात लावून तिकडेच पळालो. मस्त आंघोळ करून आलो तो दिवसभराचा सगळा शिणवटा पळून गेला होता. आजच्या दिवसात बरेच काही घडले होते. अचानक सापडलेले पाण्याचे टाके, अनावश्यक करायला लागलेली पायपीट, दाभीळ टोकावरून दिसलेले सावित्री खोऱ्याचे नयनरम्य दृश्य, चुकलेली बस, किनेश्वरचा कडवट अनुभव, कुमठे ते कुडपण मस्त चाल, कुडपण पठारावरून अनुभवलेला सह्याद्री आणि सरतेशेवटी रात्री पाठ टेकायला असे मस्त मंदिर. व्वाह!

**५.कुमठाहून कुडपणकडे जाताना पाठीमागे दिसणारा प्रतापगड आणि पारगाव**



 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

**६.कुडपणकडे जाणारा कच्चा रस्ता**



**७.कुडपण पठाराहून होणारे मुख्य सह्यधारेचे आणि कोकण खोऱ्याचे होणारे पहिले दर्शन**



**८.कुडपणकडे जाणारा रस्ता**



**९. कुडपणकडे उतरण्यापूर्वीचे शेवटचे पठार**



**१०.कुडपण पठार. मध्यभागी इंग्लिश व्ही म्हणजे कुडपण ३वरून वडगावला उतरणारा म्हारखिंडीचा रस्ता**



**११. कुडपणकडे उतरणारा शेवटचा टप्पा. मध्यभागी भिवाची काठी सुळका आणि निगडा घाट. फोटोच्या मध्यभागी सर्वात पाठीमागे वडगाव.**




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

पण दिवसाचा शेवट इथेच झाला नाही. आणखी धक्के बाकी होतेच. देवळातल्या घडाळ्याने सातवर काटा नेला आणि लिटरली "हर हर महादेव"च्या आवेशात घटना घडल्या. अचानक गाभाऱ्यापासून सभामंडपातले आणि आजूबाजूचे लाईट लागले, नगारा सुरू झाला, स्पीकरवर भजन सुरू झाले. आम्हा सगळ्यांना हे असे अचानक काय झाले हे कळेचना. विचार केला की कुठेतरी एकच बटन असेल आणि संध्याकाळच्या पुजाऱ्याने ते चालू केले असेल. पण ७.३० झाले, तरी मंदिरात कोणी येईचना. मग आम्ही बुचकळ्यात पडलो. ७.४५ झाले तशी जसे एकदम सुरू झाले होते, तसे एकदम सगळे बंद झाले. आम्ही टरकलोच, म्हटले, ही काय भानामती झाली?? ८.०० वाजता एक गावकरी आम्ही सांगितलेला चहा घेऊन आला, पण तो तर नॉर्मल वाटत होता :) :) . आमचा त्याला पहिलाच प्रश्न की हे काय होते? त्याचे अतिशय कॅज्युअल उत्तर - "ह्या, ते होय. ते टायमरवर चालते".. हे भगवान.. कुडपणसारख्या अतिशय दुर्गम खेड्यात असे टायमरवर ऑपरेट होणारे देऊळ आणि त्याची व्यवस्था आम्ही कल्पिलेही नव्हते.

तो गावकरी आला थोडाच वेळ, पण आमचा मस्त बनलेला मूड खराब करून गेला. पहिल्यांदा त्याने आम्हाला घाबरवले, म्हणाला की तुम्ही ज्या वाटेने कुमठ्यावरून आलात त्या एरियात हल्ली अस्वलांचा आणि रानडुकरांचा वावर भयानक वाढला आहे. तुमचे नशीब की तुम्ही सुखरूप आलात. असे म्हणून त्याने गेल्या आठवड्यातल्या एका गावकऱ्याच्या झालेल्या शिकारीचा फोटो मोबाइलवर दाखवला. अत्यंत भयावह दृश्य, एका सुळेवाल्या रानडुकराने त्याला अक्षरशः उभा फाडला होता. जागच्या जागी खलास :( :( . हे बघितल्यावर आम्ही किती सुदैवी ठरलो याची आम्हाला जाणीव झाली. त्याला विचारले की उद्या आम्हाला इथून वडगावला जायचे तर कोकणात कसे उतरू? त्याचा प्रतिप्रश्न, "वडगावला उतरून काय करणार?", "तिथून पुढे खेड आणि पुढे मुंबई" - आम्ही. "मंग मुंबईला जायला वडगावला कशाला जायला लागतेय? इथूनच १०ची पोलादपूर एस्टी पकडा आणि जा की मुंबईला." जा की काय कप्पाळ. आता आम्ही त्याला आमचा प्लॅन समजावण्याच्या भानगडीत पडलो नाही. विचारले की इथून वडगावला जायला वाटा किती? त्याच्या म्हणण्यानुसार दोन, महारखिंडीची एक वाट आणि दुसरी निगडा घाटाची. महारखिंडीची वाट पावसाळ्यात अतिशय अडचणीची आणि लांबची. निगडा घाट जवळचा पण जंगलातला. पण प्रॉब्लेम असा होता की शेतीची कामे आणि शहराकडे गेलेले असल्याने वाटेने सोबतीला येणारे गावातले कोणी नव्हते. अस्वलाच्या आणि रानडुकरांच्या भीतीने आम्हीही गावकऱ्यांशीवाय जायचा धोका घेऊ इच्छित नव्हतो.

शेवटी नाइलाजानेच चौथ्यांदा प्लॅनमध्ये बदल करून सकाळी लवकर उठून फक्त कुडपणशेजारचा खडशीचा धबधबा आणि भिवाची काठी सुळका बघून १०.०० च्या गाडीने पोलादपूरमार्गे परतायचे ठरले. मग बॅगेतले रेडी-टू-ईट काढून जेवून झोपून गेलो.

**दिवस दुसरा**

सकाळी जाग येण्याकरता वेगळे काही करावेच लागले नाही. देवळाचा टायमर होता ना :) . ठरल्याप्रमाणे सकाळी ६.००ला सगळे सुरू झाले :) . भिवाची काठी सुळका आणि खडशी धबधबा कुडपण गावापासून थोडासा लांब आहे. रस्त्यावरून पोलादपूरच्या दिशेला गेल्यावर १ ते १.५ कि.मी.वर आणखी एक कुडपण आहे. ही कुडपण बौद्धवाडी, तिथेच हा धबधबा आहे आणि एक्झॅक्टली समोर भिवाची काठी सुळका. (हा सुळका साधारण ६०० फुट आहे आणि मुख्य डोंगररांगेपासून सुटावलेला आहे. यावर आरोहणदेखील झाले आहे.). तसे तिसरे कुडपणही आहे, त्याला 'मोऱ्यांचे कुडपण' म्हणतात. ते डोंगराच्या पलीकडे आहे. आम्ही राहिलो ते कुडपण बु. किंवा शेलारांचे कुडपण. (पूर्वी ह्या तिन्ही गावांना कुडपण १, कुडपण २, कुडपण ३ अशी सिंपल नावे होती :) :) ).

देवळातून बाहेर पडून डांबरी रस्त्याने कुडपण १कडे चालायला लागलो, अर्धा रस्ता चालल्यानंतर सगळा नजारा समोर आला. काय जबरदस्त व्ह्यू.. अफलातून.. वर्णन करायला शब्द अपुरे. डावीकडे भिवाची काठी, उजवीकडे खडशी धबधबा, मध्ये प्रचंड खोल दरी आणि तळापासून समोर लांबवर पसरलेले वेडेवाकडे घनदाट जंगल. समोरच्या जंगलाच्या टोकाला कुठेतरी वडगाव होते. जरा पुढे गेलो तर खडशी धबधबा समोर आला. पाऊस उणावल्याने बारीक धारेचा जरी पडत असला, तरी मी इतकी वर्षे भटकताना बघितलेल्या धबधब्यात याचा नंबर फार वरचा. वरुन तो जो सुटलाय, तो सरळ थेट १००० फूट दरीत कोसळतो. ऐन पावसाळ्यात रौद्र पण लोभसवाणा दिसतो. याचे आंतरजालावर फोटोही उपलब्ध आहेत.

**१२.कुडपण गाव**



**१३.खडशी धबधब्याचा पहिला व्ह्यू**



**१४.खडशी धबधबा, भिवाची काठी सुळका, जगबुडी नदीची दरी आणि वडगाव**




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

इथे फोटोग्राफी करून पुढे गेलो, तो कुडपण १ वस्ती लागली. कोणाच्यातरी घरी चहा प्यावा म्हणून आम्ही वस्तीवर गेलो, तर गावकरी म्हणाले, "इकडे कुठे?" मग सगळा सविस्तर प्लॅन त्यांना सांगितला आणि वडगावला कोकणात उतरता येत नसल्याचे दु:खदेखील बोलून दाखवले. मग अचानक काय कसे झाले, पण बोलण्याची गाडी अचानक निगडा घाट उतरण्याकडे वळली. फासे मनाजोगते पडले म्हणा की आणखी काही, गावातला एक जण त्याच्या दिवसभराच्या मजूरीवर यायला तयार झाला. आम्ही नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. पण मुख्य अडचण वेळेची होती. आत्ता वजले होते ९.००. वडगावला खेडवरून एस्टी येते १.३० वाजता. म्हणजे आमच्या हातात होते जेमतेम ४ तास. आमच्या गावकऱ्यांच्या मते जर आम्ही त्याच्या चालीने चाललो, तर साडेतीन-चार तासांत वडगावला पोहोचणे शक्य होते. बरोबरच्यांचा कौल घेतला. सगळे एका पायावर तयार झाल्यावर चहा घेऊन ९.३० ला निघालो. ह्या बौद्धवस्तीतूनच एक वाट खडशी धबधब्याच्या टॉपला जाते, तिकडे दुर्लक्ष करून पलीकडील भिवाच्या काठीकडे नजर टाकून निघालो. वस्तीच्या पाठीमागे भातशेती आहे, तिथेच एका मळ्यात माझा पाय भसकन फूटभर एका मोठ्या खेकड्याच्या बिळात गेला आणि मी शेतात आडवा झालो :) . मला लागले नव्हते, पण सगळा चिखलात बरबटलो होतो. तसाच पुढे निघालो.

वस्तीच्या पाठीमागे लगेचच निगडा घाट सुरू होतो. हे दिसते तेवढे साधे प्रकरण नाही, हे लगेच लक्षात आले, कारण घाट सुरू झाल्या झाल्या पहिल्या वळणांवरच आम्ही ८-१० फूट खाली उतरलो. अक्षरशः एकमेकांच्या डोक्यावरून उतरतोय की काय, असा भास व्हावा असा ग्रॅडिएंट होता. पण थांबायला वेळ कुठे होता? अंधुकशी वाट झाडाझुडपांतुन जात होती आणि बरी होती म्हणण्यापेक्षा एकच होती आणि गावकरी पुढे होता. तो तर सटासट स्लीपरवर उड्या मारत झाडे बाजूला करत जात होता आणि आम्ही त्याच्या मागे धडाधड उतरत होतो. वाटेच्या एकंदर अवस्थेवरून असे वाटत होते की शिकारी किंवा अस्सल भटके ट्रेकर याशिवाय ह्या वाटेचा कोणी क्वचितच वापर करत असेल. आम्ही दुसऱ्या प्रकारातले, तर आमच्या गावकरी पहिल्या प्रकारातला :) :). धबधब्याला समांतर एकेक पावलाला ३-४ फूट उतरत चाललो होतो. चाललो होतो म्हणण्यापेक्षा उभे उतरत होतो. शेजारीच खडशी धबधबा जणवत होता आणि मधूनच त्याचा आवाज येत होता. असाच एक तास उतरल्यावर पार तळात आलो आणि पहिली सपाटी आली. इथे दोन वाटा फुटत होत्या - डावीकडची वाट धबधब्याच्या पायथ्याला जात होती (गावकऱ्यांच्यामते तिथे मोठे कुंड आहे आणि बारमाही पाण्याचा साठा. शिकारीच्या वेळेला त्यांचा तो रात्रीचा अड्डा.) आणि सरळ जाणारी वडगावकडे. आम्ही सरळ जाणारी वाट पकडली आणि जंगलात घुसलो.

रच्याकने : हा धबधबा आणि भिवाची काठी यांच्यामधली दरी म्हणजेच खेडच्या प्रसिद्ध जगबुडी नदीचा उगम.

जंगल कसले, ते मिनी ॲमेझॉनच होते ते. पायाखालची अस्पष्ट अशी वाट, ओला पालापाचोळा तुडवत आम्ही चालत होतो. २ तास झाले होते निघाल्यापासून, पण जराही ब्रेक घेतला नव्हता. एका बऱ्या ठिकाणी बघून आम्ही १० मिनिटे विसावा घेतला. पाठीमागे वळून बघितले, तर आम्ही कसे आलो ते कळत होते. समोर नाळ (हाच तो निगडा घाट, जो उतरून आम्ही आलो होतो), शेजारी दरी आणि पलीकडे भिवाची काठी सुळका. हाच धबधबा, दरी, सुळका काही तासांपूर्वीच आम्ही वरून बघितला होता आणि आता खालून बघत होतो. डोळे फिरवणारे दृश्य होते ते. दरीच्या पायथ्याला नदीशेजारी घनदाट जंगलाच्या मध्यभागी असा ब्रेक घेणे ही कल्पनाच जरी जबरी रोमांचकारी असली, तरी आम्हाला जास्त वेळ घालवून चालणार नव्हता. एव्हाना आमचे आणि गावकऱ्याचे मस्त ट्यूनिंग जमले होते. आता पार नदी पळाशी आल्याने जंगल चालत राहणे हाच एक कार्यक्रम राहिला होता.

असे जात असताना प्रथमच नदी ओलांडायची वेळ आली. मग तिथे संधी न दवडता फ्रेश झालो. अहाहा... नदीचे वाहते जंगलातील थंड पाणी. सुख अगदी... :) . पलीकडील तीरावर आल्यावर जंगल चालण्याचा कार्यक्रम परत चालू. असेच १० मिनिटे चालल्यावर परत नदी ओलांडून अलीकडे आणि परत सुरू. असे दोन-तीन वेळा घडले. तुम्हाला सांगतो, गावकऱ्यावर १००% विश्वास होता, म्हणून बिनधास्त चालत होतो त्याच्यामागून. गावकरी घेतला नसता, तर आम्हाला हे वडगाव निगडा घाटाचे कोडे सोडवणे अशक्य होते. हा भागच असा आहे ना, की माहीतगाराशिवाय या अशा भयकारी जंगलात शिरणे म्हणजे जिवाशीच खेळ. केवळ गावकरी होता, म्हणून आम्ही आरामात चालत होतो. साधारण एक तास असे चाललो असू, तरी गावाच्या खुणा काही येईनात. पण आता पुर्वी कधीतरी वहिवाटीतील असावेत असे वाटणारे शेतांचे चौकोनी तुकडे सुरू झाले होते. असे वाटत होते की वडगाव जवळच आहे, पण आमचा गाईड "वडगाव आले हो" हे शब्द काही उच्चारायला तयार नव्हता. सकाळी ७ला चाल सुरु केली होती आणि आत्ता वाजले होते १२.३०. छोटे छोटे एखाद-दोन ब्रेक सोडले, तर सतत चालत होतो. शेवट १ वाजायला आल्यावर गावाच्या खुणा दिसायला लागल्या आणि अखेरीस १.१५ वाजता वडगावला पोहोचलो.

**१५.निगडा घाटाची सुरुवात**



**१६.निगडा घाट उतरताना**



**१७.अत्यंत घनदाट जंगलातून निगडा घाट उतरताना. मध्यभागी वडगाव गावाची दिशा**




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

**१८.वाटेवरचे घनदाट जंगल. निगडा घाट उतरून तळाशी आल्यावर रस्ता अशा नदीकाठाने जंगलातून वडगावकडे जातो**



**१९.जगबुडी नदी आणि जंगल**



**२०.जगबुडी नदी**



**२१.निगडा घाट उतरून आलो ती नाळ मध्यभागी**



**२२.भिवाची काठी सुळका तळातून**



**२३.घनदाट जंगलातून वडगावकडे जाताना**




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

**२४.वडगावकडे. फोटोच्या मध्यभागीच्या डोंगराच्या पाठीमागे वडगाव गाव आहे.**



वडगाव गावाची घरे दिसायला लागल्यावर गाईडला बिदागी देऊन परत पाठवले आणि १.३०ची एस्टी पकडायला निघालो. तो बस स्टॉपही गावाच्या पार पलीकडे होता. १.३०ला - म्हणजे निघाल्यापासून बरोब्बर चार तासांनी वडगाव बस स्टॉपवर पोहोचलो. कसला परफ़ेक्ट अंदाच वेळेचा! अर्थात हा अंदाज चुकला असता, तर वडगावात वस्ती करण्याशिवाय पर्याय नव्हता, कारण १.३० वाजताची ही शेवटची एस्टी होती खेडला जाणारी. पाठीमागे वळून बघितले, तर केवळ अफलातून, अशक्य अशी वाटणारी चाल अशा भयाकारी घनदाट जंगलातून केवळ स्थानिक गावकऱ्याच्या भरवशावर आम्ही हाणली होती.

वडगाव सह्यकुशीत अगदी अंतर्भागात डोंगरदरीच्या बेचक्यात वसले आहे. गाव तसे मोठे, खेडवरून बस येते (येते म्हणजे काय, तर एस्टी हेच प्रवासाचे एकमात्र साधन, कारण इथून खेडला पोहोचायला अडीच तास लागतात. म्हणजे इथल्या लोकांना शहराचा पहिला संपर्क अडीच तास लांब आहे :( ), वीज आहे, पण एकंदरीतच बेसिक सुविधांची कमरतता.

हे वडगाव म्हणचेच ट्रेकर्समध्ये प्रसिद्ध असणाऱ्या महिपतगडाच्या पूर्वेकडील पायथ्याचे गाव. महिपतगडावरून वडगावला यायला अशीच साडेतीन तासांची जंगल वाटचाल करावी लागते. १.३० वाजताची बस चक्क १.४५ वाजता आली आणि यू टर्न करून निघून गेली. आम्ही बघतच बसलो. नंतर कळले की शेजारच्या वस्तीपर्यंत जाऊन परत फिरून येणार आहे. २० मिनिटांत ती परत फिरून आली आणि आम्हाला खेडला घेऊन गेली. खेडला उतरल्यावर शहरी झटके बसायला सुरू झाले. मुंबईची एकही बस न थांबणे, प्रचंड गर्दी, मग अशाच कुठल्यातरी बसमधून उभ्याने पेण, पनवेल करत मुंबई गाठणे यात नेहमीप्रमाणेच घरी पोहोचायला रात्रीचा १ वाजला.

पण खेड ते मुंबई हा प्रवास त्रासदायक झालाच नाही, कारण आम्ही ह्या दुनियेत नव्हतोच मुळी! आम्ही हरवलो होतो दाभीळ टोकावर, किनेश्वरच्या गवतात, कुमठ्याच्या वाटेवर, कुडपणच्या ऑटोमॅटिक देवळात ( :) ), खडशी धबधब्याच्या अजस्रपणात, भिवाच्या काठीच्या भव्यपणात, निगडा घाटाच्या निबिड अरण्यात. असे हरवण्यातही असणारे सुख सह्याद्रीतल्या ट्रेकिंगने आम्हाला असंख्य वेळा दिलेय.

"सह्याद्रीतल्या २ दिवसातल्या टॉनिकवर शहरातले २८ दिवस आरामात जातात, हे इतक्या वर्षांच्या अनुभवाने आम्हाला कळून चुकलेय :) ".

भेटू अशाच एका ट्रेकला.
लेखनसीमा.

ह्या लेखासाठी मोदक आणि वल्ली यांचे आभार. खासकरून वल्लीचे. त्यांनीच मागे लागून लागून हा लेख माझ्याकडून लिहून घेतला.

सर्व फोटो माझ्या मोबाइल कॅमेऱ्यातून...

रच्याकने : दोन वर्षांपूर्वी हा ट्रेक केल्यापासून ह्या वर्षीच्या पावसाळ्यापर्यंत मी आमच्या पहिल्या केलेल्या घाटाला सावित्री घाटच समजत होतो. पण माझा एक ट्रेकर मित्र पावसाळ्यात ह्या भागात ट्रेक करून आला आणि त्याने खातरी केली की आम्ही केला तो दाभीळ टोक घाट आणि सावित्री घाट दुसरा आहे, पण सध्या अनेक वर्षांमध्ये कोणी न गेल्यामुळे संपूर्ण मोडला आहे. काही का नाव असेना, नाव बदलले म्हणून आमच्या आनंदात शतांशानेही फरक पडला नाही :)

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# लोकसाधना: एका रुजव्याची गोष्ट

वेड म्हटलं की बंडखोर वृत्ती आलीच. अडचणींना आव्हान देण्याचा स्वभाव आलाच. हा स्वभाव राजा दांडेकरांशी बोलताना सतत जाणवतो. पुण्यात असताना कॉलेजमध्ये विद्यार्थी संघटनेचं अध्यक्षपद भूषवणाऱ्या या माणसाने अणीबाणीच्या काळात तुरुंगवासही सोसलेला आहे. समाजासाठी काहीतरी करणं, चळवळीचा भाग होणं हा स्वभावच त्यांच्या पुढच्या कार्याचं इंधन ठरला.

**वेल्लाभट**



१९८२ साली एक दांपत्य पुण्याहून दापोलीजवळच्या चिखलगाव इथे वास्तव्यास आलं. मुलगा बी.ए.एम.एस. होता, मुलगी एम.ए. होती. पुण्यासारख्या शहरात व्यवस्थित चाललेलं, चालू शकणारं जीवन सोडून हे तरुण जोडपं धड रस्ते, वीज नसलेल्या गावात आलं.

गावातच जन्म झालेला त्यातला मुलगा. वयाच्या सहाव्या वर्षी शिक्षणासाठी घराबाहेर पडला होता. पुढे याच्याकडे राहा, त्याच्याकडे राहा अशा एकूण २४ घरांमध्ये राहून त्याने शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर पुण्यात आला. वैद्यकीय शिक्षण घेऊन बी.ए.एम.एस.ची पदवी प्राप्त केली. परंतु समाजाचं ऋण फेडण्याची तळमळ स्वस्थ बसू देत नव्हती. शिक्षण, ग्रामकल्याण आणि आरोग्य या विषयांत कार्य करण्याचं वेड ज्याला गावाकडे घेऊन आलं आणि १९८२पासून आजतागायत ज्याने या वेडाला जागृत, शाश्वत ठेवलेलं आहे, तो माणूस म्हणजे डॉ. राजा दांडेकर.

वेड म्हटलं की बंडखोर वृत्ती आलीच. अडचणींना आव्हान देण्याचा स्वभाव आलाच. हा स्वभाव राजा दांडेकरांशी बोलताना सतत जाणवतो. पुण्यात असताना कॉलेजमध्ये विद्यार्थी संघटनेचं अध्यक्षपद भूषवणाऱ्या या माणसाने अणीबाणीच्या काळात तुरुंगवासही सोसलेला आहे. समाजासाठी काहीतरी करणं, चळवळीचा भाग होणं हा स्वभावच त्यांच्या पुढच्या कार्याचं इंधन ठरला.

लोकसाधना, लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या नावाने लोकमान्य टिळकांच्या जन्मगावी, चिखलगाव इथे शिक्षण आणि ग्रामकल्याणाचा एक वटवृक्ष उभा आहे. राजा दांडेकर आणि रेणू दांडेकर या दांपत्याने तो वसवलेला आहे, त्यांच्याच भाषेत म्हणायचं तर 'रुजवलेला आहे.' कॉलेजनंतर संघटनात्मक काम न करता पुढे केवळ रचनात्मक काम करायचं, हे मनाशी पक्कं ठरवून हे दोघे चिखलगावी आले आणि १ ऑगस्ट १९८२ रोजी एका गोठ्यात त्यांची पहिली शाळा भरली.

राजा दांडेकर अतिशय बोलके आहेत. कुणाला शिकवण्याआधी "मी स्वतः विद्यार्थी आहे, आजन्म विद्यार्थी आहे" असं ते म्हणतात. लोकमान्यांचेच हे शब्द ते खरे करतात. गावकऱ्यांना शाळेचं महत्त्व पटवण्यापासून त्यांचा प्रवास सुरू झाला. जेम्स लेनची पाच सूत्रं ते आवर्जून नमूद करतात - १. लोकांच्यात जा. २. लोकांसारखं राहा ३. लोकांपासून शिका. ४. तुम्हाला काय येतं हे विसरा. ५. लोकांच्या गरजांसाठी काम करा. ही सूत्रं घेऊन त्यांनी काम सुरू केलं. गावातल्या प्रत्येकाशी निर्माण झालेले संपर्क, संबंध यांनी समाजकार्याची पायाभरणी केली. शिक्षण हा जरी राजा दांडेकरांच्या कामाचा अग्रक्रम असला, तरीही आरोग्य, समाजमन या बाजूंनाही पैलू पाडणं हे त्यांच्या कामाचा भाग होतं.

लोकमान्य टिळक विद्यामंदिर ही इतर कुठल्याही शाळेसारखी नसलेली शाळा असण्याचं कारण म्हणजे वेगळा विचार करायची दांडेकर पती-पत्नींची आग्रही भूमिका. गोठ्यात सुरू झालेली शाळा आज शासनाची दाद मिळवतेय. तिच्या वेगळेपणामुळे खुद्द युनायटेड नेशन्सने तिला प्रमाणित केलेलं आहे. हसत खेळत, वेगवेगळ्या पद्धती, खेळ खेळत इथे शिक्षण चालतं. शाळा म्हणून कसला जाच नसतो, पण विद्यार्थी म्हणून जबाबदारी मात्र असते. शिक्षक म्हणूनही शाळेबद्दल आपलेपणाची भावना जपणारे इथले सगळे लोक आहेत.

"आम्ही काहीही वेगळं केलं नाही. आम्ही शासनाच्या चौकटीत राहून सगळं केलं. आमची शाळा एसएससी बोर्डाचीच आहे, त्यांचाच अभ्यासक्रम आहे. परंतु आपण असं काम करावं की शासनालाच आश्चर्य वाटलं पाहिजे की अरे! आपला अभ्यासक्रम इतका चांगल्या प्रकारे राबवला जाऊ शकतो! मी देशभरातल्या शाळा बघितल्या. त्यांच्यातलं जे चांगलं आहे ते निवडलं." राजा दांडेकर सांगतात, "आम्ही इथे आलो, तेव्हा एक ट्रेंड होता की १४व्या वर्षी गावातली मुलं शहरात जायची, मुंबईला जायची. १७-१८व्या वर्षी लग्न. पुन्हा बायको गावाकडे आणि मुलगा शहराकडे. मग शिमगा-गणपतीपुरतं गावाला परत यायचं. आय.टी.आय.सारख्या संस्थांचं अपयश तिथून बाहेर पडणाऱ्या मुलांमध्ये दिसत होतं. त्यांना एक आणि एकच गोष्ट येत असायची. बाहेरच्या देशांसारखी 'मल्टि स्किल्ड वर्कर' किंवा 'हँडी मॅन' प्रकारची मुलं आपण निर्माण करायला हवीत, म्हणून शाळेतच तांत्रिक शिक्षण द्यायला सुरुवात केली. आज शासनासकट अनेक संस्थांनी, कंपन्यांनी आमच्या 'डिप्लोमा इन बेसिक रूरल टेक्नॉलॉजी' या संस्थांना मान्यता दिलेली आहे, तोशिबासारख्या कंपन्यांबरोबर आमच्या शाळेने जॉईंट प्रॉडक्ट डेव्हलपमेंट केलेली आहे."

प्रचलित शिक्षणपद्धतीत ज्या प्रकारे शाळा चालतात, त्या प्रकारे डॉ. दांडेकरांना ही शाळा चालवायचीच नव्हती. त्यांनी वर्गात जाऊन कधीच शिकवलं नाही. मुलांच्या खांद्यावर हात ठेवून गप्पा मारणारे असे ते शिक्षक. 'मुलांना देण्याकरता माझ्याकडे काय आहे?' हा प्रश्न ते सतत स्वतःला करत. एका मुलाखतीत त्यांनी संत तुकडोजी महाराजांचं उदाहरण दिलेलं आहे. 'करावे काय शिक्षणाचे जे कधी कामास येईना' असं तुकडोजी महाराज म्हणून गेलेत. तुकडोजी महाराज स्वतः तीन महिने जपानला शिक्षणपद्धतीचा अभ्यास करायला गेले होते. आणि तिथल्या तीन महिन्यांचं डायरीवजा पुस्तक दांडेकरांकडे आहे. जपानच्याच उदाहरणासारखं, शिक्षण हे प्रयोगशील आणि उत्पादक कसं होईल हा त्यांचा विचार होता. शिक्षणाची प्रयोगशाळा, प्रयोगशाळेची कार्यशाळा आणि कार्यशाळेची उद्योगशाळा झाली पाहिजे, असं ते म्हणतात. "आम्ही मुलं हेरत असतो. एखाद्याला नसते शिक्षणाची आवड; पण हातात कला असते. अशा मुलाला आर्टिस्टच झालं पाहिजे. स्किल बेस्ड एज्युकेशन आपल्या देशात क्वचितच मिळतं. आपण आजही मॅकॉलेच्या शिक्षणपद्धतीचे गुलाम असल्यासारखे आहोत. अगदी आत्ता - म्हणजे २०१२मध्ये आसाममध्ये लॉर्ड मॅकॉलेे हायस्कूल निघतं, यातच सगळं आलं." दांडेकर सांगतात.

लोकमान्य टिळक विद्यामंदिरात शिक्षणाचं माध्यम मराठी आहे. मातृभाषेतून शिक्षण व्हावं ही दांडेकर सरांची आग्रही भूमिका आहे. या शाळेत पाचवीपासूनच मुलांना कौशल्याभिमुख किंवा स्किल बेस्ड शिक्षण दिलं जातं. व्यवसायाभिमुख शिक्षणपद्धतीचं महत्त्व आज हळूहळू वाढतंय, पण लोकमान्य


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

टिळक विद्यामंदिरात ते गेली ३० वर्षं मिळतं. इथे होम सायन्स, एनर्जी अँड एन्व्हायर्न्मेंट, मेकॅनिकल इत्यादी विषयक वेगवेगळ्या प्रयोगशाळा आहेत. उदाहरणार्थ, होम सायन्समध्ये भाजी चिरण्यापासून केक बनवण्यापर्यंत, ओव्हन, मिक्सर वापरण्यासारख्या गोष्टींचं शिक्षण मुलांना दिलं जातं. जीवनोपयोगी शिक्षण - उदा., बटण तुटलं तर ते आपलं आपण लावता येणं - या शाळेतल्या प्रत्येकाला मिळतं. त्यामुळे इथल्या कुठल्याच विद्यार्थ्याचं फारसं कुठे अडत नाही. ही आणि अशी सगळी 'स्किल्स' शिकलेल्या मुलाला 'पुढे काय करायचंय?' या प्रश्नाचं उत्तर शहरात पंधरा वर्षं शिकूनही त्या प्रश्नावर रेंगाळणाऱ्या मुलांपेक्षा बरंच आधी मिळालेलं असतं.

इथे आठवी ते दहावीच्या मुलांना आय.बी.टी. म्हणजेच इंट्रोडक्शन टू बेसिक टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाचा पर्याय मिळतो. हा एसएससी बोर्डाने मान्य केलेला व्यावसायिक अभ्यासक्रम आहे. आठवड्यातला एक दिवस ही मुलं विविध तंत्रज्ञान प्रत्यक्षात वापरण्यात घालवतात. त्यापुढील विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा इन बेसिक रूरल टेक्नॉलॉजी हा अधिक प्रगत अभ्यासक्रम आहे, ज्यात शेतीपासून ते बांधकामापर्यंत सर्व तंत्रांचं शिक्षण त्यांना मिळतं. ही शाळा हाच एक कारखानाही बनतो. विजेवर चालणारे दिवे इत्यादी अनेक उपकरणं मुलं शिकता शिकता बनवतात. यातली काही उपकरणं विक्रीसाठीही उपलब्ध असतात. यातून मुलं आपल्यासाठी, कुटुंबासाठी, गावासाठी अनेक गोष्टी करू शकतात. आपण काहीतरी करू शकतो हा आत्मविश्वास जर शिक्षणाने दिला नाही, तर मग काय अर्थ आहे? असं राजा दांडेकरांचं म्हणणं. त्यामुळे चिखलगावच्या शाळेत प्रत्यक्ष करून मुलं इतकं काही शिकतात की त्यातून कायमचा आणि कधीही न ढळणारा आत्मविश्वास त्यांना मिळतो.

आत्मविश्वासाचं, जबाबदारीचं हे बीज प्राथमिक शिक्षणातच पेरलं जातं. मुख्याध्यापक थोरात सर सांगतात, "हसत खेळत शिक्षण हा साधा सोपा नियम इथे आहे." इथे गोल आकाराचे हवेशीर वर्ग आहेत. वर्गातल्या भिंतींवर काही चित्रं, जमिनीपासून तीन फुटांपर्यंत फळा अशी रचना आहे. इथे शिक्षक एकाच जागी असतात, आणि तासानुसार मुलं वेगवेगळ्या वर्गात जातात. त्यामुळे मराठीच्या वर्गात पहिली ते दहावीचं मराठीचंच साहित्य असतं. मोजकाच गृहपाठ, अतिशय प्रेमळ, मनमिळाऊ शिक्षक आणि मोकळं वातावरण यामुळे मुलांमधली चौकस वृत्ती बहरत जाते. गणिताचे कल्पक खेळ, इतिहासाच्या गप्पा अशा अभ्यासाचं दडपण येतच नाही मुळी. एकेक विषयाची कपाटं इथे असतात आणि त्या त्या विषयाचं साहित्य त्या कपाटात असतं. मुलांवर आलटून पालटून त्या कपाटांची जबाबदारी दिली जाते. हे आपलं कपाट आहे आणि हे आपण नीट ठेवायचं आहे, ही 'ओनरशिप'ची भावना लहानपणापासून त्यांना समजते. इथल्या भावे बाई संस्कृतप्रवीण आहेत, त्यामुळे इथली मुलं संस्कृतमध्येही संभाषण आत्मसात करताना दिसतात. अशा या निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या आणि तितक्याच साध्या दिसणाऱ्या शाळेत फेरफटका मारताना आपलीच आपल्याला नवीन ओळख होत जाते.

इथून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथाही तितक्याच प्रेरक आहेत. 'अशी घडली माणसं' या राजा दांडेकरांनीच लिहिलेल्या पुस्तकात त्या संकलित केलेल्या मिळतात. 'मला लोकांशी बोलण्याचा आत्मविश्वास नाही' असं म्हणणारा, आय.टी.आय.ची परीक्षा उत्तीर्ण झालेला एक विद्यार्थी जेव्हा एक वर्ष लोकसाधनेच्या या संकुलात घालवतो आणि पुढे काही वर्षांत आपल्या कोट्यवधीच्या व्यवसायाची गाथा सरांना येऊन सांगतो, तेव्हा वाचकालाच इतका अभिमान वाटतो की सरांना किती वाटला असेल याची फक्त कल्पनाच करू शकतो. लोकसाधनेने चालवलेल्या या माणसांच्या शेतीचं हे टवटवीत, तेजस्वी पीक आहे. राजा दांडेकरांशी बोलत असताना त्यांचा तत्त्वनिष्ठपणा पदोपदी जाणवत होता. ते म्हणाले, "मी इथे शाळा सुरू करतानाच ठरवलं होतं, की २५ वर्षं मी कुठलंही भाषण देणार नाही, कुठल्याही माध्यमात काहीही लिहिणार नाही. मी फक्त काम करत राहणार." हा बाणा, हा व्रतस्थपणा एखाद्या योग्याला शोभेल. त्यांचं नाव जरी राजा असलं, तरी त्यांच्याशी बोलताना मात्र सतत त्यांच्यातला योगी दिसत राहतो.

डॉ. राजा दांडेकर व रेणू दांडेकर यांना दोन मुलं, एक मुलगा व एक मुलगी. मुलगी भारतीय सैन्यात कॅप्टन पदावर आहे आणि मुलगा वकिली शिक्षण घेतलेला असूनही 'कॉर्पोरेट लाईफ'चं जोखड झुगारून गावात स्थायिक झालेला आहे. २५हून अधिक वर्षं चाललेल्या या लोकसाधनेच्या साधकांशी माझा नुकताच परिचय झाला. कोकणात गेलो असता आवर्जून या शाळेला भेट दिली आणि दांडेकर सरांशी थोडाच पण फार प्रेरित करणारा संवाद घडला. खरं तर हे व्यक्तिचित्र म्हणावं असं नाही, आणि या व्यक्तीचं कार्यही इतकं अफाट आहे की ते शब्दात मांडणं कठीण. रेणू दांडेकरांशिवाय ते अर्थपूर्णही नसेल. तेव्हा हे खरं तर एक छोटंसं कार्यचित्र आहे. आणि झालीच तर एका असामान्य दांपत्याची ओळख आहे. त्यांच्या कामाला एकवटून त्याकडे बघायला बराच काळ जाईल. पण दापोलीला गेलात तर लोकसाधनाच्या लोकमान्य टिळक विद्यामंदिराला आवर्जून भेट द्या. शिक्षणाबरोबरच त्यापलीकडे जाऊन एक व्यक्ती लोकांवर किती प्रभाव टाकू शकते, ते बघता येईल. आणि आपल्या आयुष्याला दिशा देण्याची प्रेरणा तुम्हाला दांडेकर दांपत्याशी बोलून मिळेल. बाबा आमट्यांचं मार्गदर्शन लाभलेल्या दांडेकर सरांशी बोलताना आणि त्यांचा आणि रेणूताईंचा प्रवास ऐकताना तुम्हाला व्यक्तींमधलं, कार्यांमधलं आणि विचारांमधलं साम्य शोधायचा मोह नक्कीच आवरणार नाही.



**संबंधित माहिती:**

डॉ. राजा दांडेकर आणि रेणू दांडेकर
लोकसाधना, पोस्ट चिखलवाडी.
तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी
पिन - ४१५७१२
भ्रमणध्वनी ९४२२४ ३१२७५

संस्थळ: http://www.loksadhana.org

**संबंधित यूट्यूब दुवे:**

पाषाणपालवी:
https://www.youtube.com/watch?v=GdCGJCEB5Jw

मुलाखत भाग १:
https://www.youtube.com/watch?v=ZrGVjsk3skw

मुलाखत भाग २:
https://www.youtube.com/watch?v=vuULd9WcuaE

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# एक उनाड दिवस..

एगरकिंगन, ते चिमुकलं गाव आता अगदी समोर आलं होतं. एका बाजूला डोंगरांच्या माळा आणि समोरच्या दरीतच खाली उतरून आमचं हॉटेल होतं. हॉटेल फक्त दुमजली. तळमजल्यावर चारी बाजूंनी खोल्या आणि मधल्या चौकात मोठ्ठं हिरवळीचं अंगण.

**स्वाती दिनेश**





एगरकिंगनच्या फॅक्टरीमध्ये दिनेशची व्हिजिट होती. तो गाडीने जाणार हे ठरल्यावर मीही त्याच्याबरोबर जायचं ठरवलं. ए ५वरून आमची गाडी बासेलच्या दिशेने पळू लागली. कार्ल्सरुह मागे पडलं, आता स्ट्रासबुर्गकडे जाणारा रस्ता दिसू लागला. ए५ वरूनच पुढे जात फ्रायबुर्ग ओलांडून आम्ही बासेलकडे कूच केलं. मध्येच एकदा आमच्या आणि गाडीच्या टाक्या भरल्या. जरी ही काही माझी पहिली स्विस ट्रिप नव्हती, तरीही तिकडे जायचं असलं की वेगळाच उत्साह मनात असतो. त्यातून अनवट ठिकाणी जायचं असलं की बघायलाच नको.. बासेल क्रॉस करून आम्ही स्विसमध्ये प्रवेशलो आणि एगरकिंगनच्या वाटेला लागलो. दोबाजूला डोंगर, त्यावर चरणाऱ्या गाई, त्यांच्या गळ्यातल्या घंटांची किणकिण.. "इथे फॅक्टरी आहे? इतक्या सुंदर खेड्यात?" माझ्या प्रश्नाला "हो" उत्तर देताना दिनेश म्हणाला, "तिकडे बघ डावीकडे.." उजवीकडे डोंगर ठेवून डाव्या बाजूच्या दरीत खोल पाहिलं, तर टुमदार गाव खाली वसलं होतं. कौलारू लहान घरं आणि एखाद्याच चर्चचा उंच कळस दिसत होता.एक वळण घेऊन पुढे गेल्यावर चित्र आणखीनच स्पष्ट दिसायला लागलं.

एगरकिंगन, ते चिमुकलं गाव आता अगदी समोर आलं होतं. एका बाजूला डोंगरांच्या माळा आणि समोरच्या दरीतच खाली उतरून आमचं हॉटेल होतं. हॉटेल फक्त दुमजली. तळमजल्यावर चारी बाजूंनी खोल्या आणि मधल्या चौकात मोठ्ठं हिरवळीचं अंगण. प्रत्येक खोलीचं दार त्या अंगणात उघडत होतं आणि दाराबाहेरच बागेत बसायच्या खुर्च्या, टेबलही .. वरच्या मजल्यावरच्या खोल्यांना मोठा वऱ्हांडा होता, जो ह्याच हिरवळीच्या चौकात उघडत होता. दिल बाग बाग व्हायला त्या बागेतच गेलं एकदम.. त्या अंगणात खुर्च्या टाकून मस्त गाणी ऐकत संध्याकाळ सरली.दुसऱ्या दिवशी दिनेशची फॅक्टरी व्हिजिट होती. ह्या, अशा सुंदर गावात रूक्ष कारखाना आहे हेच मुळी पटत नाही. पण मध्येच दिसणाऱ्या चिमण्यातला निळसर धूर ते सत्य सांगतो.भरपेट न्याहारी करून दिनेश कामाला आणि मी भटकायला बाहेर पडले.



काल दुरून पाहिलं होतं, आज ह्या गावाला भेटायचं होतं. रिसेप्शनवरून नकाशा घेतला आणि चर्चच्या दिशेने चढू लागले. सगळं गाव मुळी डोंगरात आहे. सरळ रस्ता नाहीच, सारखेच चढ-उतार.. समोरच्या डोंगरावर चरणाऱ्या गाई, त्यांच्या गळ्यातल्या घंटांचा किणकिणाट ऐकू येऊ लागला. युरोपातलं गाव म्हटलं की एक चर्च, एक नदी, तिच्यावरचा एक पूल, नाहीतर मग एखादं सरोवर, हिरवे डोंगर, डोंगरातली चिमुकली घरं असं दृश्य डोळ्यापुढे येतंच. हे गावही त्याला अपवाद नव्हतं. रस्ता ओलांडून समोरच्या टेकडीच्या दिशेने चालायला लागले. हातातला नकाशा डावी घेऊन समोर चढायला सांगत होता. पुढे गेले आणि चर्चचा कळस दिसायला लागला, पण तिथेच वळणावर थबकले. नुकताच पाऊस पडून गेला होता. हवेत ओलसर गारवा होता. पाऊस पडून हिरव्या गवतावरची रंगीत रानफुलं वाऱ्यावर डोलत होती. तिथे किंचित रेंगाळून कॅमेऱ्याच्या चिमटीत तिथला निसर्ग पकडण्याचा प्रयत्न करून हातातला नकाशा आणि चर्चच्या कोपऱ्यावरच्या पाट्या ह्यांची सांगड घातली आणि सरळ थोडं चढायचं ठरवलं.



समोरच्या रस्त्याने सरळ वर चढत गेलं, तर इतकं सुंदर काही समोर येत होतं की मी चित्रकार असते, तर तिथेच एका कोपऱ्यात कॅनव्हास उभा केला असता


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

आणि दिवसभर चित्रं काढत बसले असते. कॅमेऱ्यात किती बंदिस्त केलं, तरी काहीतरी उरत होतं, सुटत होतं.. हिरव्या गवतावरची फुलं, कुरणात चरणाऱ्या गाई, त्यांच्या किणकिण घंटा आणि वातावरणातला पक्ष्यांचा किलबिलाट.. हे सगळं धावत्या गाडीतून नव्हे, तर हात लांब केला की स्पर्श होईल एवढ्याच अंतरावर होतं. एका दिव्याच्या खांबाला एका वेलीनं लपेटून घेतलं होतं आणि निवांत फुललीही होती. रेंगाळत टेकडी पायवाटेने चढत होते, तर मुलांचा किलबिलाट ऐकू आला. जरा कानोसा घेतला, तर चार-पाच मुलांचा घोळका पाठीवर दप्तर अडकवून शाळेत चालला होता. मुलं कसली? रंगीत फुलांच्या गुच्छालाच पाय फुटून तो चालला आहे, असं वाटत होतं. एका बैठ्या घराची बेल त्यांनी वाजवली, तर आतून एक गोडुला कोबीचा गड्डा लुटूलुटू आला आणि त्यांच्यात मिसळला. सगळे पुढे धावू लागले आणि माझी चाहूल लागून एकदम थबकले. त्या एवढ्याशा गावात ही कोण परकी बाई? असं परग्रहावरून आलेल्या व्यक्तीकडे बघावं तसं माझ्याकडे पाहू लागले. मी आपलं हसून त्यांना गुटन मॉर्गन करत "शुलं.?"म्हणजे शाळेत चाललेत का? असं विचारलं, तर माझ्या अभिवादनाला जेमतेम उत्तर देत धूम पळाली सगळी, अगदी कोबीच्या गड्ड्यासकट..









स्वतःशीच हसून तशीच थोडी पुढे गेले आणि डोळे विस्फारून पाहतच राहिले. मी बऱ्यापैकी वर आले होते. खालच्या झाडांचे शेंडे आता माझ्या आय लेव्हलला आले होते. सफरचंद, प्लम्स, पेअर यांनी ती सगळी नुसती लदली होती. मी सहज हात पुढे केला, तर हाताला येतील अशी.. कोणाला विचारून एखादं ॲपल, एखादं प्लम तोडावं, असा विचार करत मी तिथल्या बांधावर बसले. बराच वेळ झाला, कोणीच दिसेना.. न राहवून मग मी मनाला येतील तेवढे प्लम्स आणि ॲपल्स तोडले, काही खाल्ले, उरलेले पाठीवरच्या पिशवीत टाकून पुढे जायला लागले. वाटेतल्या सुंदर सुंदर घरांचे, झाडापानाफुलांचे फोटो काढत सुटले. एका बैठ्या घराच्या समोर बेडूक राणीचा दोन-अडीच फुटाचा हिरवा पुतळा दिसला. मुकुटावर अगदी 'लारा' असं लिहिलं ही होतं. गंमतच वाटली. त्याचं इथे काय प्रयोजन असेल असा विचार करत पुढे गेले. एका तिठ्यावर एका घराच्या खिडक्या इतक्या सुंदर सजवल्या होत्या आणि चक्क खिडकीच्या बाहेरच्या जागेत एक पिटुकली सायकल, काही पक्षी मांडून ठेवले होते. सहज हाताला येतील असे! घराला कुंपण बिंपण काही नव्हतं. अगदी मोठ्या रस्त्यावर सहज हाताला येईल अशा त्या शोभेच्या, चिमुकल्या वस्तू इतक्या निरखून बघत आणि त्या तिथे टिकल्या कशा, याचं आश्चर्य बाळगत मी पुढे चालू लागले.






कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



त्या सुंदर खिडकीच्या आणि तिच्यातल्या वस्तू बघण्याच्या नादात मी रस्ता चुकले. आता समोर फक्त झाडं, टेकडी, जंगल होतं. घरं खूपच मागे राहिली असावीत. माझ्या हातातला नकाशा आणि रस्त्यावरच्या खुणांच्या पाट्या ह्याचा आता मेळ बसेना. डोंगरात ढग उतरत होते आणि समोरची वाट धुक्यात हरवत चालली होती. धुकं वाढलं असतं तर रस्ता सापडणं आणखी अवघड झालं असतं. एव्हाना चालून, चढून तीन तासाच्या वर होऊन गेले होते. इतका वेळ ह्या चित्रासारख्या देखाव्यात मीच हरवून गेले होते, आता रस्ता हरवला होता.

एवढ्यात टोकाच्या घरापाशी गाडीचा प्रकाश दिसला आणि त्यातून कोणीतरी उतरलं. लगबगीने तिथे जाऊन पत्ता विचारला आणि पुढे चालू लागले. एक-दोन वळणं पार केल्यावर ओळखीच्या - म्हणजे आत्ताच ओळखीच्या झालेल्या खुणा दिसू लागल्या. हरवलेला रस्ता सापडल्याच्या आनंदात पावसाचे तुषार अंगावर घेतले. हळूहळू पाऊस वाऱ्याचा झिम्मा सुरू झाला. गार, बोचरा वारा आणि पाऊस टोचू लागला. आता गरम गरम कॉफी आणि भजी मिळतील तर काय बहार येईल.. असा विचार मनात आला. पण त्या रानातल्या पायवाटेत असं काहीही मिळणार नव्हतं. पण पुढच्या वळणावरून खालच्या रस्त्यावर दूरवर दिवे दिसले आणि चक्क मॅकदादाही.. मस्त वाफाळती कॉफी घेतली आणि भज्यांची तल्लफ नगेट्सवर भागवली. एक कोपऱ्यातली खुर्ची पकडून ते पाऊसगाणं पाहत आणि ऐकत राहिले. किती वेळ तंद्री लागली कोण जाणे.. पाऊसवाऱ्याचा खेळ संपला आणि लख्ख ऊन पडलं. मग मीही तिथून उठले आणि परत चालायला लागले. एव्हाना संध्याकाळ झाली होती. दिनेशचा फॅक्टरीतून निघाल्याचा फोन आला. माझा आजचा उनाड दिवस पावसात चिंब भिजून हिरव्या टेकड्यांवरच्या त्या पायवाटांत मस्त आनंदात उधळला होता.



❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# ...उर्फ सुग्रणीचा सल्ला: पोळ्या - एक अर्वाचीन छळ

कबूल आहे. हा व्यक्तिगत चवीढवीचा-आवडीनिवडीचा मामला आहे. वास्तविक इतक्या क्षुल्लक नावडीमुळे मी पोळीला इतकं खलनायकी फूटेज दिलंही नसतं. पण 'पोळी आवडते-केली-खाल्ली-ढेकर दिली-गपगुमान झोपलं'असं करून लोक थांबत नाहीत. ते पोळीचे देव्हारे माजवतात.

**मेघना भुस्कुटे**



माझ्या स्वैपाकघरात घुसून वर आपला साटोपचंद्रीपणा पाजळणाऱ्या भोचक लोकांच्या खालोखाल त्रास जर मला कुणी दिला असेल, तर पोळीप्रेमी लोकांनी.

आय हेट पोळी. चपाती. फुलका. घडीची पोळी. पुरणपोळी. आपापल्या सांस्कृतिक-राजकीय इतिहास-भूगोल-वर्तमानासह जे काय समजायचं असेल ते समजून घ्या. सगळ्याच्या सगळ्या इंटरप्रिटेशन्सना माझा तिरस्कार लागू आहेच.

पहिलं कारण अत्यंत साधं आहे. मला पोळीची चव आवडत नाही. इथे अनेक 'तव्यावरून-पोळी-ताटात' पंथातले लोक जागीच अस्वस्थ झाले असतील. त्यांना तसंच तडफडू दे. पण नाही आवडत मला पोळीची चव. फाशी देणार आहात? द्या. तरीही बाणेदारपणे हेच्च सांगीन. मला पोळी आवडत नाही. हरितक्रांतीनंतर शिरजोर होऊन बसलेल्या कणीक या फ्याशनेबल अर्वाचीन पदार्थाचा वास, पोत, चव, रंग यांतलं काहीच मला प्रिय नाही. कणीक भिजवायला घेतल्या-घेतल्या पाण्याचा स्पर्श झाल्यावर त्या पिठाला एक प्रकारचा उबदारपणा आणि मग सूक्ष्म बुळबुळीतपणा येतो, तिथपासून ते तव्यावरची पोळी उलटताना पोळीतून कणकेच्या वाफेचा एक भपकारा येतो, तिथपर्यंत. कोण ते, ग्लूटेन ग्लूटेन म्हणून ओरडतंय? वैज्ञानिक स्पष्टीकरण गेलं गाढवाच्या गावात. आत्ता-आत्ता साठच्या दशकापर्यंत ज्वारी-बाजरी-तांदुळाचा भाकरतुकडा खाऊन आपण ढेकर देत असू आणि अगदी आजही आपल्या पितरांना घालायला कणकेच्या बाट्या न भाजता भाताचे पिंडच शिजवतो हे पोळीमाहात्म्य गाणारे लोक विसरले असतील. मी नाही विसरलेय.

आप्ल्याला-आव्डत-नाई.

कबूल आहे. हा व्यक्तिगत चवीढवीचा-आवडीनिवडीचा मामला आहे. वास्तविक इतक्या क्षुल्लक नावडीमुळे मी पोळीला इतकं खलनायकी फूटेज दिलंही नसतं. पण 'पोळी आवडते-केली-खाल्ली-ढेकर दिली-गपगुमान झोपलं'असं करून लोक थांबत नाहीत. ते पोळीचे देव्हारे माजवतात.

तुम्ही स्वतः कधी पोळी करून पाहिली आहे का? 'आज जेवायला काय ऑस्ट्रेलिया आहे की इंडोनेशिया?'छाप थुतरक निष्क्रिय वरवंटा विनोदांचा वीट येऊन मी पौगंडावस्थेतच माझं बंडनिशाण फडकवलं होतं, 'मला पोळी आव्डत नाही. मी कर्णार नाही.' मला कुणी तसा पर्याय दिला, तर मी जन्मभर भात बोकाणून माझ्या कोस्टल एलिमेंटीय पूर्वजांना मोक्ष मिळवून देईन याची जाणीव 'आकाशवाणी'ला असल्यामुळे तिकडून कोणत्याही प्रकारचा अल्टिमेटम आला नाही. एवढ्यावरच माझे आणि पोळीचे संबंध थांबू शकले असते. पण एका मैत्रिणीच्या आईचं एक चतुर मत ऐकलं आणि मी थोडा पुनर्विचार करायला सुरुवात केली. तिचं म्हणणं होतं, "कुठे कुणाच्या स्वैपाकघरात मदतीला उभं राहायची वेळ आलीच, तर मी दणादण पोळ्या करून टाकते. मीठ कुठे गं, तिखट कुठे गं, तेल कुठे गं नि साखर कुठे गं, असल्या ताशी छप्पन्न विचारणा करायला अडून न बसता एकठोकी काम होतं आणि शिवाय 'केवढ्या पोळ्या लाटल्यात बाई!' असं एक हातासरशी गुडविल तयार होतं, जे नंतर वाढण्यासारखं भावखाऊ आणि तापदायक काम निघाल्यावर हक्कानं हॉलमध्ये पाय पसरून गप्पा ठोकायला नैतिक बळ पुरवतं." हे फारच बरोबर आणि सोयीस्कर होतं. त्यामुळे आपल्याला ही कृती शिकून टाकली पाहिजे, असं माझ्या मनानं घेतलं.

इथून पुढे रानावनांनी, काट्याकुट्यांनी, दऱ्याखोऱ्यांनी आणि श्वापदांनी भरलेला प्रदेश सुरू होतो. सावधान.

**पहिला धडा:** 'डिसाइड ॲज वी गो' हा पर्याय घेऊन कधीही कणीक भिजवायला घेऊ नये.

इतकी कणीक, इतकं पाणी, इतकं तेल, इतकं मीठ अशी सुनिश्चित, मोजणेबल प्रमाणं तय्यार हवीत. नपेक्षा 'मी कर्णार नाही, मला आव्डत नाही' मोडवर जाणं श्रेयस्कर. प्रमाणं नसली तर अनेक अभिजात आणि कंटाळवाणे गोंधळ होऊ शकतात. पीठ-पाणी-पीठ चिकट-पुन्हा पीठ-पीठ कोरडं-पुन्हा पाणी.... ही साखळी कितीही काळ चालू राहू शकते. कोणत्याही प्रकारचं पीठ भिजवणं या कृतीबद्दल क्रॉनिक नफरत पैदा होऊ शकते. तुम्ही पुरेसे निर्ढावलेले नसाल, तर घरी येणाऱ्या भोचक मोलकरणीपासून आकाशवाणीपर्यंत अनेक जण तुमचं मनोधैर्य आणि ज्ञानपिपासा नेस्तनाबूत करू शकतात. हे टाळायचं असेल, तर प्रमाण वाजवून घ्यावं. मी हे शिकण्यासाठी माझ्या गिनिपिगांना मात्र प्लाष्टिकी ते इलाष्टिकी अशा सग्गळ्या पोळ्यांतून जावं लागलं. असो. बाकी नुसतं प्रमाण कळून उपयोग नसतो. नक्की काय नि कसं केलं की पोळ्या 'मऊसूत, रेशमी, तलम' होतात त्याबद्दल बाजारात जे सल्ले मिळतात, ते सगळे ऐकायचे म्हटले तर आपण पोळ्या करणार आहोत, की काडेपेटीत राहू शकणारी नि अंगठीतून बाहेर निघू शकणारी ढाक्क्याच्या मलमलीची साडी विणणार आहोत अशा गोंधळात पडण्याचा धोका असतो. कुणी म्हणतं, आधी पाणी घालावं. कुणी म्हणतं, आधी तेल घालावं. कुणी साजूक तुपावर अडून असतं. एका बाईंनी सांगितलं होतं, की आधी पीठ चाळून घ्यावं. मग त्यावर चमच्या-चमच्यानं तेल सोडावं, थोडं मीठ भुरभुरवावं आणि मग सगळ्या पिठाच्या कणांना ते तेलमीठ लागेल अशा प्रकारे पीठ दोन्ही हातांनी नीट चोळून घ्यावं. मग लागेल तसतसं किंचित कोमट पाणी घालत.... होय. संताप होऊ शकतो. बरोबर आहे. तर - ते सल्ले फाट्यावर मारून आपली स्वतःची अशी एक क्रमवार कृती निश्चित करून घ्यावी आणि कणीक भिजवावी. गोळा म्हणता येईल, अशा प्रकारचं काहीही जमलं म्हणून खूश होऊन हात धुण्यातही अर्थ नसतो. तो गोळा भिजवून, दहा मिनिटं झाकून ठेवून, मग स्वच्छ धुऊन कोरडं केलेलं बोट त्या गोळ्याच्या पोटात खुपसलं असता - अ) जोर न लावता बोट सहज आत गेलं पाहिजे आ) बोटाला कणीक न चिकटता तेलाचा अंश आला पाहिजे. हे जमणं अत्यंत क्रिटिकल आहे, कारण त्यातल्या अपयशाचे परिणाम पोळी मरेस्तोवर मिरवणार असते. ते जमल्यावर पुढची पायरी. पोळ्या लाटणे.

**दुसरा धडा:** विनोद डोक्यात जाण्याच्याच लायकीचे असले, तरीही पोळी गोल होणंच मानसिक-शारीरिक-भौतिक-आर्थिक-सामाजिक अशा सर्व बाजूंनी सोयीस्कर असतं.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

या पायरीवरही बाजारात अनेक सल्ले मिळतात. कणकेच्या गोळ्याची गोल लाटी करून ती थेट लाटावी; तिचा लंबगोल लाटून मग तिला चिमटा काढावा आणि दोन्ही अर्धुकांत तेलाचा ठिपका टेकवून ती अर्धुकं मिटवावीत व मग त्याची पोळी लाटावी; तिचा लहान गोल लाटून मग त्यावर तेल लावावं, अर्धी घडी करावी, पुन्हा तेल लावावं आणि चतकोर घडी करावी नि ही नानसदृश घडी लाटून गोल करावी (अगदीच वेळ जात नसेल, तेव्हा ही कृती करण्यासारखी आहे. टोकं वाढत वाढत समभुज-समद्विभुज-विषमभुज असे नाना प्रकारचे त्रिकोण मिळणं, भलत्या ठिकाणी पोळी जाड होऊन बसणं, भलत्या ठिकाणी ती अर्धपारदर्शक होऊन पोळपाट दिसू लागणं या सामान्य लिळा तर साधतातच. पण विशेष एकाग्रता साधलीत, तर आपल्या दिशेच्या पोळपाटाच्या अर्धवर्तुळाभोवती कबड्डीपटू फिरतात तसं गोलगोल फिरत पोळीला चुचकारण्यासारखा नाच-ग-घुमा खेळप्रकारही अनुभवायला मिळू शकतो. असो.); मधे तुपाचं बोट फिरवावं; तेल आणि पीठ यांची पेस्ट लावावी... होय, इथवर आल्यावर मला क्षणभर भीती चाटून गेली, की 'पटकन पंचामृताचं मिश्रण करून ते चटकन ब्रशनं हलक्या हातानं लावून घ्यावं' असंही कुणीतरी सांगायचं. पण मग मी सावरले आणि फाटा जवळ केला. लोकांना चार, आठ, सोळा, बत्तीस, चौसष्ट... अशा कितीही घड्या घालून, त्यात तेल-तूप-मध-लोणी-मस्का-मेयॉनीज काय वाट्टेल ते घालून, त्याच्या पोळ्या लाटून, मग त्यांचे पदर सोडवण्याचे अश्लील चाळे करण्यासाठी वेळ असतो. आपण असल्या वायझेड उद्योगात पडायलाच हवं असं नाही. त्यामुळे मी गपचूप एक लाटी घेतली, भरपूर पीठ घेतलं आणि लाटणं फिरवलं. पोळी गोल झाली. इथे मी पहिला विजय मानला. सी, इट्स नॉट दॅट डिफिकल्ट?! पण यानं होतं काय, की तुम्ही गाफील राहू शकता. तसं न होऊ देता लक्ष्यात ठेवायचं असतं, की एकच पोळी गोल होता उपयोगी नाहीय. शिवाय ती सगळीकडे एकसारख्या जाडीची असली पाहिजे. तिच्यावर इतकंही पीठ नको, की ती तव्यावर टाकताना आजूबाजूला खकाणा उडेल. पुढेही उरलेल्या पोळ्या याच दर्जाच्या नि आजच व्हाव्यात इतकाच वेळ आणि धीर आपल्याला या पोळीसाठी उपलब्ध आहे. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे या पोळीपर्यंत 'पोळी नीट लाटणे' या एकाच कृत्याचे पालक असलेल्या आपल्याला आता 'पोळी लाटणे' आणि 'पोळी भाजणे' ही जुळी कार्टी जोपासायची गोड कामगिरी करायची आहे. हे सगळं नीट करायचं असेल, तर पोळी गोल असणं सर्वाधिक रास्त आणि कमी कष्टाचं ठरतं.

**तिसरा धडा:** जगाची इंधनबचन गेली खड्ड्यात, तव्याखालची आच काही-केल्या कमी करायची नाही.

पोळी पापडासारखी कडक किंवा मैद्याच्या थंडगार रोटीसारखी चामट व्हायला नको असेल, तर व्यवस्थित तापलेल्या तव्यावर कमीत कमी वेळात पोळी भाजून होणं अत्यावश्यक असतं. उमेदवारीच्या काळात पोळपाटावरची पोळी गोल, आवश्यक तेवढी पातळ, एकसारख्या जाडीची, अगदीच लाज वाटणार नाही इतपत मोठ्या आकाराची आ.....णि पोळपाटाला वा लाटण्याला न चिकटणारी करण्यालाच मी पोपटाचा डोळा मानला होता. त्यामुळे झाली काय गंमत, की तव्यावर टाकलेल्या पोळीनं थेट तव्याशी काटा भिडवला. त्यांचं लफडं चांगलंच गरम होऊन धूर यायला लागल्यावर मला परिस्थितीचं भान आलं. पण तोवर पोळी मरून पडली होती. पुढच्या पोळीला हे टाळायचं म्हणून तव्यावर डोळा ठेवून बसले. परिणामी ती पोळी भाजून झाल्यावर तव्यावर वेकन्सी निर्माण झाली ती झालीच. तिकडे पुढची कच्ची पोळी पडेस्तोवर तवा इतका गरम झाला होता, की.... असो. तर टायमिंग इज ऑफ ग्रेट इम्पॉर्टन्स हिअर. गरम तव्यावरच पोळी भाजायची, चटकन भाजायची आणि ती भाजून होईस्तो खाली पोळपाटावर दुसरी पोळी तयार ठेवायची.

हे सगळं नीट जमलं, तर पोळीला काही भवितव्य असू शकतं.

आता मला सांगा, हे मुदलात किती लोकांनी करून जमवलेलं असतं? अर्धी लोकसंख्या तर सरळच बाद. या बाबतीत ते अत्यंत कुचकामीच असतात. उर्वरित अर्ध्या लोकसंख्येला कदाचित स्वानुभव असू शकतो. पण तरीही पोळ्यांचं सांस्कृतिक महत्त्व हे लोक ज्या प्रमाणात वाढवून ठेवतात, त्याचं समर्थन होऊच शकत नाही. उदाहरणार्थ -

**मिथ क्रमांक एक:** पोळीमुळे पोषण होतं.

हा काय फंडा आहे? पोळीमुळे होतं ते पोषण आणि इतर अन्नधान्यांमुळे काय उपोषण होतं काय? एकदा एका मित्रदाम्पत्याचा त्यांचा लेकीशी चाललेला संवाद ऐकला होता. त्या लेकराला भात जेवायचा होता. आणि दाम्पत्य पोळीवर अडून होतं. म्हणजे लक्ष्यात घ्या, भाजी विरुद्ध पिष्टमय पदार्थ, प्रथिनं विरुद्ध पिष्टमय पदार्थ, स्निग्ध पदार्थ विरुद्ध पिष्टमय पदार्थ - असं या लढ्याचं स्वरूप नव्हतं. एक पिष्टमय पदार्थ विरुद्ध दुसरा पिष्टमय पदार्थ असं ते होतं. काय लॉजिक आहे? तर पोळी खाल्ली की पाय दुखत नाहीत हे मित्राच्या सासूबाईंचं ठाम मत. आपण जगात मूल आणलं, तर आणि तेव्हा त्याला अन्नाच्या बाबतीत इतपत तरी निर्णयस्वातंत्र्य असेल अशी शपथ मी मनातल्या मनात वाहिली, ती तेव्हा. भलेही ते पोळी का खायला मागेना! मी ती देईन.

**मिथ क्रमांक दोन:** भातानं वजन वाढतं, पोळी खावी.

इथे मी भिवया उंचावून रोखून पाहते आहे असं कल्पावं. म्हणजे, हॅलो? सगळा दक्षिण भारत एव्हाना वजनवाढीचे रोग होऊन ठार नसता झाला अशानं? बासमती सोडून भाताच्या इतर जाती असतात, त्यात कोंडा असतो, चमक नसलेली आवृत्ती खाल्ली तर बी जीवनसत्त्व मिळतं, शिवाय आपण जे उष्मांक गिळतो ते जाळले नाहीत, तर कणकेचे गोळे गिळूनही वजन वाढतंच... वगैरे वगैरे सामान्यज्ञान वाटलं जात असतं तेव्हा हे लोक नक्की कुठल्या पिठाच्या चक्कीसमोर गव्हाचे डबे घेऊन उभे असतात?

**मिथ क्रमांक तीन:** पोळीभाजी हेच सर्वोत्तम अन्न आहे.

डोंबलाचं सर्वोत्तम अन्न. वैविध्य या गोष्टीची इतकी मारून ठेवणारं याच्याइतकं रटाळ, नीरस, कंटाळवाणं जेवण दुसरं कुठलं असूच शकत नाही. किंबहुना माझं तर असं मत आहे की अन्नाचा फार लळा मुदलातच लागू नये म्हणून शाळांमध्ये हेच जेवण देण्याची काळजी पहिल्यापासून घेत असावेत.

**मिथ क्रमांक चार:** पुरणपोळी हे मराठी अस्मितेचं व्यवच्छेदक लक्षण आहे.

एकतर हे म्हणणाऱ्या माणसानं ती स्वतः करावी आणि खावी. मला तितके कष्ट घेऊन चाखण्याइतकी ती आवडत नाही. ज्यांना आवडते, त्यांनी ती करावी आणि चाखावी. मेरा मूड बना, तो मैं भी चाखूंगी. पण माझ्यावर तुमच्या अस्मितेचं ओझं नको. माझं मराठीपण पुरणपोळीकडे ओलीस ठेवायला मी तयार नाही. मी मराठीच आहे. आणि मला नाहीच काही घेणंदेणं तुमच्या सांस्कृतिकदृष्ट्या बळंच उन्नत होऊन बसलेल्या पुरणपोळीशी. इट इज ओव्हररेटेड. जा, काय करायचं ते करा.

पुरणपोळीसारख्या मराठीच्या सांस्कृतिक गळवाला हा असा धसमुसळा धक्का लावल्यामुळे मला नोटीस बजावण्याची तयारी आता सुरू झाली असेलच. आन देव्. आपण काही तुमच्या पोळीला टाळी वाजवणार नाही.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# ईशान्य भारत : मणिपूर

भौगोलिकदृष्ट्या, हिमालयाच्या पूर्वेकडील रांगा ब्रह्मपुत्रेच्या वळणाने दक्षिणेस वळत कमी उंचीच्या टेकड्यांच्या शृंखलेच्या रूपात खाली गंगासागरापर्यंत जातात, त्या रांगांमध्ये वसलेल्या नागालँड-मणिपूर-मिझोराम या त्रयीतले हे मधले राज्य. इथले भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे चौकोनी आकाराचे हे राज्य एखाद्या बशीप्रमाणे आहे. काश्मीरमध्ये श्रीनगर परिसर जसा 'व्हॅली'मध्ये आहे, तसेच येथे राजधानी इंफाळ व परिसर खोलगट भागात असून भोवती चारही बाजूंनी डोंगराळ भाग आहे.

**समर्पक**

मणिपूर! ईशान्य भारतातील एक अलौकिक रत्न! भारत व आग्नेय आशिया यांच्यातील सांस्कृतिक दुवा. भौगोलिक व सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय संपन्न प्रदेश. ईशान्य भारतावर लिहिण्यास सुरुवात केली, तेव्हा मागे त्रिपुरावर एक लेख प्रकाशित केला होता. त्यातील हे पुष्प दुसरे.



मणिपूर हे प्राचीन राज्यांपैकी एक, महाभारतातील अर्जुन-चित्रांगदेच्या कथेमुळे परिचित, पुढे पुराणांत व काही जुन्या ग्रंथांतही उल्लेखित प्रदेश. मध्ययुगीन काळात भारत-ब्रह्मदेश-चीन शांत व्यापारी मार्गावरील एक नागरी स्थान. 'कांगलीपाक' हे या काळातील नाव. हिंदुबहुल असूनही परिचित भारतीय किंवा हिंदू चालीरितींशी तसा या समाजाचा फारसा संबंध नाही. परंतु ही बाब अगदी नर्मदेकाठच्या किंवा गोदेकाठच्या वनवासी बांधवांच्या बाबतीतही सत्य आहे. त्यांच्याही देवदेवता किंवा रितीरिवाज अपरिचित वाटू शकतील इतके वेगळे आहेत. त्यामुळे रोजच्या दृष्टीपलीकडचे समाजजीवन जर अनुभवायचे असेल, तर अशा प्रदेशांचा प्रवास जरूर करावा आणि त्यातील अग्रणी असे हे मणिपूर!

बहुतांशी दुर्गम असलेल्या ईशान्य भारतात अधिकांश वन्य व भटक्या जातीजमातींचेच वर्चस्व असलेले लहान लहान टोळ्यांचे प्रदेश आहेत. अविश्वसनीय प्रमाणात वैविध्य हे इथले वैशिष्ट्य. असे बऱ्याचशा भागाविषयी सत्य असले, तरी मोठ्या भूभागावर एकछत्री वर्चस्वाखाली नागरी संस्कृतीचा विकास असा येथे तीन प्रदेशांत झाला - आसाम, त्रिपुरा व मणिपूर. तिन्ही प्रदेशांत स्वतःची अशी सांस्कृतिक ओळख शतकानुशतके उत्क्रांत होत अधिक प्रगत, गडद व दृढ होत गेली. मणिपूरमध्ये सतराव्या शतकात परिचित हिंदू पद्धतीशी साम्य असणारी पहिली छटा इथे उमटली ती चैतन्य-वैष्णव संप्रदायाच्या राजाश्रयामुळे. या काळात ही उपासनापद्धती लोकप्रिय झाली ती आजतागायत. आजही येथे बहुतांश लोक याच पूजापद्धतीचे उपासक आहेत आणि त्याचबरोबर प्राचीन 'सनामाही' संप्रदायातील उत्सव, विधीसुद्धा साजरे होतात. अशी बहुरंगी बहुढंगी सर्वसमावेशक समाजरचना इतर ईशान्य भारतीय लघु-राज्यांच्या तुलनेत बरीच टिकून आहे. ख्रिस्तीकरणाची कीड इथेही लागलेली आहेच, परंतु तूर्तास ते क्रमांक दोनवर आहेत. समृद्ध प्राचीन परंपरा असलेले व नंतर ख्रिस्तीकरणाच्या वरवंट्याखाली भरडले गेलेले डझनभर प्रदेश बारकाईने पालथे घातलेले आहेत. त्यामुळे ईशान्य भारताच्या वास्तवाची धग व भविष्याची जाणीव फार-फार अस्वस्थ करते, परंतु... असो...

ब्रिटिश काळातही त्रिपुरा व जैंतिया राज्यांप्रमाणे मणिपूर स्वतंत्र राज्य होते. १९४७च्या नंतरही दोन वर्षे त्यांनी स्वतंत्र राजेशाही राखण्याचा प्रयत्न केला, परंतु १९४९मध्ये भारताबरोबर करार करून 'क' वर्ग राज्य म्हणून भारतात सामील झाले. पुढे केंद्रशासित प्रदेश व १९७२पासून पूर्ण राज्य. त्या वेळी काही घटकांनी भारतात विलीनीकरणास विरोध केला होता, त्यातून पुढे प्रादेशिक अशांततेस कारणीभूत ठरणाऱ्या काही चळवळी उदयास आल्या. विलीनीकरणाच्याच सुमारास नवस्वतंत्र ब्रह्मदेशाशी बोलणी करून सीमावादही संपवण्याची चांगली संधी होती, ती आपण गमावली. अनेक सलणाऱ्या जखमांपैकी ही फारशी चर्चेत नसणारी एक. छिंदवीन नदी ही भारत व म्यानमारमधील खरी भौगोलिक सीमा. अनेक नागा व इतर जमाती आजही या नदीपर्यंतच्या प्रदेशात विखुरलेल्या आहेत. परंतु कृत्रिम आंतरराष्ट्रीय सीमा ही नदीच्या बरीच अलीकडे असल्याने अनेक परिवार दोन भिन्न देशांत राहतात. तुलनेत ही युद्धग्रस्त सीमा नसल्याने, त्याचा सुरुवातीस त्रास न व्हावा असे वाटलेही असेल; परंतु अमली पदार्थांची तस्करी व नक्षलवाद्यांची लपण्याची जागा म्हणून याचा वापर होऊ लागल्याने आता या प्रश्नाचे परिणाम दृश्य आहेत.

भौगोलिकदृष्ट्या, हिमालयाच्या पूर्वेकडील रांगा ब्रह्मपुत्रेच्या वळणाने दक्षिणेस वळत कमी उंचीच्या टेकड्यांच्या शृंखलेच्या रूपात खाली गंगासागरापर्यंत जातात, त्या रांगांमध्ये वसलेल्या नागालँड-मणिपूर-मिझोराम या त्रयीतले हे मधले राज्य. इथले भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे चौकोनी आकाराचे हे राज्य एखाद्या बशीप्रमाणे आहे. काश्मीरमध्ये श्रीनगर परिसर जसा 'व्हॅली'मध्ये आहे, तसेच येथे राजधानी इंफाळ व परिसर खोलगट भागात असून भोवती चारही बाजूंनी डोंगराळ भाग आहे. कदाचित त्यामुळेच येथील निवासी 'मेइतेई' किंवा 'मणिपुरी' संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन झाले. सखल भागात वैष्णव मेइतेई लोक व भोवताली डोंगराळ भागात वनवासी जमातींचे (आता) ख्रिस्ती लोक अशी राज्याची कायमस्वरूपी विभागणी झालेली आहे.

**पूर्वतयारी :** त्रिपुरावरील लेखात लिहिल्याप्रमाणे एकंदर ईशान्य भारत प्रवासाचा प्रवास हा मुख्यतः त्रिपुरा व मणिपूर या राज्यांवर केंद्रित होता. परंतु प्रवासाची सोय व साधने, खिशाला सोपे पडतील असे पर्याय व एकट्याने सुरक्षित असेल असे मार्ग हे सर्व लक्षात घेता त्याहून थोडे अधिक या प्रवासात समाविष्ट केले. मणिपूरमध्ये रेल्वे नाही (सध्या बांधली जात आहे). हवाईमार्गासाठी इंफाळमध्ये विमानतळ. रस्त्यामार्गे आसामातून नागालँडमार्गे एक महामार्ग, तर सिल्चरमार्गे दुसरा. मूळ योजनेत मी जाताना गुवाहाटी-कोहिमा-इंफाळ व परतीसाठी इंफाळ-सिल्चर-अगरतला असे मार्ग निवडले. तुमच्या योजनेला मणिपूर काडीचीही



कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

किंमत देत नाही हा अनुभव पुढे आलाच, पण तीच तर खरी प्रवासाची मजा आणि शिकण्याची संधीही. नागालँडमार्गे जायचे म्हणजे त्यासाठी परवाना (इनरलाईन परमिट) पाहिजे, त्याविषयी अधिक माहिती त्या राज्याविषयीच्या लेखात बघू, परंतु ते एक आवश्यक. दिल्लीतल्या ब्रह्मदेशाच्या दूतावासाकडे व्हिसाविषयक माहितीसुद्धा विचारून ठेवली. परंतु ई-व्हिसा हा फक्त मंडले व रंगून येथे विमानाने जाणाऱ्यांसाच मिळतो, व भूमार्गाने जाण्यासाठी दिल्लीतल्या दूतावासाकडून रीतसर व्हिसा घेणे आवश्यक आहे, हे कळले. ते कदाचित लागणार नव्हते, परंतु माहिती असलेली बरी. जीवविविधतेसाठी हा प्रदेश फार विशेष असल्याने त्याविषयीचा थोडा अभ्यास, सीमावर्ती भागातील सद्य परिस्थितीच्या माहितीसाठी त्याविषयीचा अभ्यास व थोडा अन्नविषयक, असा प्राधान्याने प्राथमिक पूर्वतयारीचा आवाका. या प्रवासामध्ये भाषेवर फारसा जोर दिला नाही, परंतु तरीही बंगालीची थोडी तयारी केली होती. आसाम, त्रिपुरा, दिमापूर (नागा.)मध्ये त्याचा उपयोग बराच होतो. मणिपूर व नागालँडमध्ये इतरत्र अनेक भाषा असल्याने किती शिकले तरी कमीच असे असल्याने तो सगळाच विषय ऑप्शनला टाकला. सीमावर्ती भाग असल्याने पासपोर्ट बाळगणे हितकर होते, ते पुढे फायद्याचेही ठरले. एकंदर प्रवासाचा आराखड, कोहिमाहून इंफाळकडे प्रयाण, इंफाळमध्ये वास्तव्य, पुढे एकेका दिवसाच्या लहान मोहिमा. प्रमुख गंतव्य मोइरांग, लोकताक सरोवर, ब्रह्मदेश सीमा, इंफाळ शहर इत्यादी.




**भटकंती :** ईशान्य भारताचे प्रवेशद्वार, गुवाहाटी, माझ्याही प्रवासाचे प्रारंभस्थान. तेथून नागालँड एक्स्प्रेस, कामाख्या-दिमापूर, नंतर नागालँड प्रवास. पुढे कोहिमा-इंफाळ सार्वजनिक प्रवासी वाहतूक. ही लहानशी राज्ये अगदी दाटीने एकमेकांलगत असूनही थेट प्रवास सुविधा फारशा नाहीत, असे एकंदर दिसले. म्हणजे, कोहिमाहून मणिपूर सीमेपर्यंत एक वाहन, पुढे सीमेपासून पहिल्या शहरापर्यंत दुसरे, आणि मग बस वगैरे, इंफाळपर्यंत. नागालँड प्रवास थोडक्यात पण समाधानकारक झाला. तिथल्याही योजनेचे बारा वाजवणाऱ्या गोष्टी नंतरच्या भागात पाहूच. कोहिमाहून सार्वजनिक वाहतुकीची साधने सकाळी फार लवकर गाठावी लागतात. आधीच हा भाग अतिपूर्वेकडे असल्याने दिवस फार लवकर सुरू होतो. त्यात कोहिमाचे हवामान अत्यंत आल्हाददायक. या सगळ्यात हे सकाळी लवकर आवरून बाहेर पडणे अंमळ अनिच्छेनेच. पण इलाज नाही. नकाशावर प्रवास खूप लहान वाटत असला, तरी प्रत्यक्षात बराच वेळ खाणारा असणार आहे हे माहीत असल्याने सकाळीच निमूट सुरुवात. येथील रस्ते सीमावर्ती महामार्ग प्राधिकरणातर्फे बांधले व राखले जातात, त्यामुळे लहान असले तरी दर्जा उत्तम आहे. पण तरीही डोंगराळ भाग असल्याने सगळा घाटरस्ता आहे व त्यामुळे वेग फारच कमी ठेवावा लागतो. पहिला टप्पा कोहिमा ते माओ, मणिपूर सीमा. नागा वाहने येथून मणिपूरकडून येणाऱ्या लोकांना घेऊन परत जातात. माओपासून सेनापतीपर्यंत दुसरा टप्पा. हे दोन्ही टप्पे डोंगराळ भागातले. मार्गावर अनेक लहान लहान खेडी. पण लक्षणीय स्वच्छता. सगळ्या खेड्यांत मोठाली चर्च व फुटबॉल मैदान. शेती प्रामुख्याने भाताची, व उतरणीवरच्या खाचरातली. जीप व तत्सम वाहनांतून येथील मुख्य वाहतूक होते. इतरत्र ग्रामीण भागात असलेल्या प्रवासी सोयीप्रमाणेच येथेही जास्तीत जास्त लोक घेऊन ही सेवा चालते. सेनापती हे पहिले मोठे शहर व तिथपासून पुढे सखल भाग सुरू होतो. रस्तेही तसे मोठे होतात व येथपासून बस वाहतूक उपलब्ध आहे.





वाहतुकीचे साधन, स्वच्छ गाव


डोंगरउतारावर वसलेली गावे


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.


उतरणीवरची शेती


फुटबॉल मैदान



स्वागत!

**इंफाळ:** इंफाळ सर्वात मोठे व राजधानीचे शहर. मध्यभागी ऐतिहासिक 'कांगला' किल्ला. शहराचे जुने नावही 'कांगली' असून मणिपूरसुद्धा 'कांगलीपाक' नावाने ओळखले जाई. इथे पर्यटन व्यवसाय तसा फारसा विकसित नसल्याने सोई बेताच्याच आहेत. मला योगायोगाने एका फोरमवर येथील यूथ हॉस्टेलचा संपर्क मिळाला व तेथेच मी पुढले काही दिवस मुक्काम ठोकला. सर्वात उत्तम गोष्ट म्हणजे राहण्याची जागा मध्यवर्ती कांगलाच्या मागील बाजूस लगतच, त्यामुळे वाहतूक व इतर महत्त्वाच्या गोष्टी सहज उपलब्ध. शेजारीच आसाम रायफल्सचा मोठा तळ, त्यामुळे सुरक्षित (असे मानसिक समाधान).

**कांगला कोट :** तीन बाजूंनी खंदक व एका बाजूने इंफाळ नदी असा हा भुईकोट शहराच्या मध्यावर आहे. आकर्षक मणिपुरी शैलीतली प्रवेशद्वारे, कोटातील सनामाही पंथाची देवस्थाने व गोविंदजी मंदिर ही प्रेक्षणीय स्थळे. सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे आत फिरण्यासाठी सायकल भाड्याने मिळते, त्यामुळे सगळा भाग कमी कष्टात बघता येतो व वाहनांची कटकट नाही. सरकारने चांगली देखभाल ठेवलेली आहे.


कांगला प्रवेशद्वार


राजवाड्याचा प्रवेश, व्याळाप्रमाणे काल्पनिक प्राणी 'कांगला-शा'च्या मूर्ती. समोर ठेवलेल्या सायकलवरून भव्यतेची कल्पना येईल. मणिपूरच्या राजमुद्रेवरही हा प्राणी आहे.


गोविंदजी मंदिर, मणिपूर शैली


गोविंदजी मंदिर, अन्य अवशेष


सनामाही पंथाचे मंदिर


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.


सनामाही देवता

**ईमा मार्केट :** मणिपूरचे वैशिष्ट्य, संपूर्णपणे स्त्रियांनी चालवलेली बाजारपेठ. एक बाजू भाजीपाला व खाद्यवस्तू, तर रस्त्याच्या पलीकडे दुसरी बाजू कपडे व इतर सामान. एकूणच स्त्रियांचा सहभाग दैनंदिन व्यवहारात बाकीच्या राज्यांच्या तुलनेत लक्षणीय प्रमाणात अधिक आहे.


ईमा मार्केट


ईमा मार्केटमधील सनामाही देवता

**आर के सी एस आर्ट गॅलरी :** शहरात फिरत असताना योगायोगाने इथे जाणे झाले, पण नक्की भेट द्यावी अशी ही जागा आहे. चित्रकलेचे हे प्रदर्शन असून चित्रातून मणिपूरच्या इतिहासाची, संस्कृतीची, लोकजीवनाची खूप उत्तम ओळख होते.

**एक अनुभव :** एका संध्याकाळी पायी हॉस्टेलवर जात असताना या कलादालनाचा फलक दिसला. सहज म्हणून गेलो असता एक मध्यमवयीन मनुष्य तल्लीनतेने चित्र रंगवत होता. विचारपूस झाली. मुंबईहून, फिरायला, आणि एकटा हे थोडे नेहमीचे नसलेले विवरण ऐकून कदाचित त्यांना कुतूहल वाटले. पुढे बोलता बोलता समजले की ते स्वतः मालक व कलाकार आहेत. श्री बुद्धिमंत. ते स्वतः बोलत बोलत दालनाकडे घेऊन गेले व प्रत्येक चित्राविषयी भरभरून माहिती दिली. स्वतः कलाकारांकडून त्याच्या आविष्काराविषयी ऐकण्याचे भाग्य काही वेगळेच. मुख्य म्हणजे त्यांची शैली ही मला सर्वात आवडणारी, वास्तवदर्शी आहे. म्हणजे, राजा रविवर्मांसारखी, जशी व्यक्ती तसे चित्र. भाव, अलंकार, वेषभूषा, चित्राची आपली एक कथा असे अगदी जिवंत दर्शन. मणिपुरी नृत्याचे एक सुंदर चित्र होते, त्यांनी त्याचा इतिहास सांगण्यास सुरुवात केली. "महाराज भाग्यचंद्र नावाचे एक राजे होऊन गेले..." मी म्हणालो, "हो, माहीत आहे मला त्यांच्याविषयी. त्यांनी नाट्यशास्त्राच्या अभ्यास करून मणिपुरी नृत्याच्या प्रमुख रासलीलांची रचना केली. आम्ही भारतातील श्रेष्ठ व्यक्तींची नावे असलेले एक स्तोत्र म्हणतो, त्यात त्यांचा उल्लेख आहे (एकात्मता स्तोत्र, 'कलावंतश्च विख्याताः... भागातले 'भाग्यचंद्रश्च भूपती:' )." त्यांचा विश्वासच बसेना. एक तर 'मुंबईचे लोक' म्हणजे मॉडर्न, आगाऊ, श्रीमंत व पर्यायाने माजखोर व बेपर्वा अशी काहीशी प्रतिमा अप्रगत भागात असते. त्यात त्यांचा दोष नाही. बऱ्याच प्रमाणात ते सत्य आहे. हे प्रदेश आणि लोक आपल्यासारख्यांच्या खिजगणतीतही नाहीत, याची त्यांना कल्पना आहे. त्यातील कोणाला मणिपूरचा इतिहास... त्याही पलीकडे, मणिपुरीचा इतिहास (नृत्य) असे काही माहीत असेल ही कदाचित अपेक्षा नव्हती. (आपल्यातीलच किती लोकांना ईशान्येतील सर्व राज्यांची नावे माहीत आहेत? (काही इथेच नापास होणार.) त्यातल्या कितींना त्यांच्या राजधान्या माहीत आहेत? (अर्धे गळाले.) आणि शेवटी उरलेल्यातल्या किती जणांना त्यांचे मुख्यमंत्री किंवा एक प्रसिद्ध किंवा अगदी सामान्यसुद्धा, व्यक्ती माहीत आहेत? एक नाव... मिझोरामच्या बाबतीत मीही नापासच... असो... ) पण या संभाषणाने असा काही स्वर लागला की पुढील दोन तास मी मणिपूरच्या इतिहास-वास्तवाशी अगदी एकरूप झालो. शेवटच्या दालनात राजघराण्यातील व्यक्तींची चित्रे होती. एकेकाची ओळख करत शेवटी ते म्हणाले, "भाग्यचंद्रांसारखे श्रेष्ठ कलाकार जन्माला घालणाऱ्या राजवंशाचा मी एक सामान्य वंशज!" वाह, काय योग यावा! चौकस वृत्ती व चौफेर दृष्टी प्रवासामध्ये मोठा अनपेक्षित लाभ देते, तशातला हा अनुभव. उगीच इथे-तिथे 'जाऊन तर बघू' अशी वेळ देऊन केलेली भटकंती अशी फायद्याची.


श्री बुद्धिमंत व कलाकृती. त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्रामवरून साभार.

**प्राणिसंग्रहालय :** खरे पाहता मी मौजेसाठी किंवा प्रदर्शन म्हणून प्राण्यांना असे कृत्रिम वातावरणात ठेवण्याच्या पूर्णपणे विरोधात आहे. परंतु क्वचित कुठे काही चांगली निष्पत्ती अशा संग्रहातून झाली आहे, त्याचे मणिपूरचे प्राणिसंग्रहालय एक उदाहरण आहे. येथील दुर्मीळ सांगाय हरणे नामशेष झाली असे वाटू लागले असता १९५३मध्ये त्यांच्या तीन जोड्या आढळून आल्या. त्यांचे संगोपन करून


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

पुढे हळूहळू प्रजाविस्तार झाला, तशी ती हरणे पुन्हा त्यांच्या नैसर्गिक आवासात सोडण्यात आली. ताज्या गणनेनुसार सध्याची संख्या २६०च्या वर आहे. या प्रकल्पाची माहिती घेणे हा इथे भेट देण्याचा एक उद्देश. दुसरा, येथील पक्ष्यांच्या प्रजाती - विशेषतः 'फिझन्ट' किंवा तित्तर वर्गातील पक्षी, अतिशय अनोखे असून त्यांची भटकंतीच्या आधी किमान तोंडओळख होणे महत्त्वाचे वाटले व नंतर ते अतिशय उपयुक्तही ठरले.



नॉनगीन किंवा ह्युम्स फिजन्ट, मणिपूरचा राज्य-पक्षी

**सीमावर्ती भागाची सफर :** हा एक प्रवासाचा विशेष उल्लेखनीय भाग. मणिपूरच्या सीमेवरील मोरे गाव म्हणजे महत्त्वाकांक्षी (सिंगापूर)-बँकॉक-दिल्ली-(इस्तंबूल) महामार्गावरले भारताचे प्रवेशद्वार. या महाप्रकल्पाचा दिल्ली-बँकॉक हा भाग लवकरात लवकर कार्यरत होईल, अशी सध्यातरी तिन्ही देशांची इच्छा, तयारी व प्रयत्न दिसताहेत. पुढे याच मार्गावर रेल्वेसुद्धा धावेल, परंतु त्यासाठी बरेच काम म्यानमारमध्ये करावे लागणार आहे. एकंदरच पर्यटनाच्या दृष्टीने मणिपूर फारसे प्रगत नाही. त्यात सीमावर्ती भागात कोणीच फिरकत नाही, त्यामुळे या भागाविषयी फारशी माहिती उपलब्ध नव्हती. परंतु एक-दोन ठिकाणी येथील सीमा व्यापार व तस्करी दोन्हीच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याचे उल्लेख वाचले होते. तसेच येथे ब्रह्मदेशात प्रवेशही करता येतो असेही वाचले होते. इथेही जाण्यास इंफाळमधून जीपसारखी वाहने मिळतात. आधी उल्लेख केल्याप्रमाणे, इंफाळ हे सखल भागात असून भोवताली डोंगररांगा आहेत. त्यामुळे हा सर्व प्रवास चढाचा व नंतर घाटाचा. वाटेत अनेक लहान-मोठी खेडी. इथल्या नक्षली कृत्यांची बातमी अध्येमध्ये झळकत असते. नंतरच्या काळात इथेच आपल्या लष्करी तुकडीचे दुर्दैवी शिरकाण झाले होते व त्यानंतर ब्रह्मदेशातील प्रथम 'सर्जिकल स्ट्राईक', त्यांच्या हद्दीत घुसून अतिरेक्यांना कंठस्नान घालण्यात आले. थोडक्यात, अशांत व फारसा सुरक्षित नसलेला प्रदेश. एअरटेलचे नेटवर्क या भागात चांगले असल्याने ते प्रवासी कार्ड घेऊन गेलो होतो, आणि त्याचा फार उपयोग झाला. शक्यतो एकल प्रवासात मी रोज एखादे चित्र किंवा संदेश फेसबुकवर प्रकाशित करतो, जेणेकरून प्रवासाच्या पाऊलखुणा मागे राहतील व त्याबरोबरच जरा शो ऑफ कधी-कधी. इतरांना काय वाटेल याच्याशी देणे घेणे नाही, परंतु अशा पाऊलखुणा मागे ठेवणे एकल प्रवासात महत्त्वाचे आहे. तसेच ज्यांना खरेच तुमच्याविषयी काळजी आहे, त्यांना दिलासा मिळत राहतो की सर्व ठीक आहे. या प्रवासाचा दिवस मात्र असा होता की जेव्हा कधी खेडे येईल व नेटवर्क असेल, तेव्हा मी चेक इन करत होतो. एकंदरच आसाम-नागालँड-मणिपूर अशी काही दिवसांपासून चालू असलेली ही चेक-इन मालिका आता बरीच लोकप्रिय झाली होती. या दिवशीची गावे मात्र कोणाच्याच ओळखीची नव्हती. त्यामुळे 'चर्चा तर होणारच'... "काय, भारत दर्शन का?", "अरे नोकरी सोडलीस का?", "घरातून हाकलून दिलंय का?", "तिथे कशाला गेलायस मरायला"पासून "मेरी कोमला भेटून ये"पर्यंत नुसती धमाल... असो. घाटात एका सीमा सुरक्षा दलाच्या चौकीवर गाडी रोखली. मी सवयीप्रमाणे उतरलो, दरीच्या कडेला जाऊन दृश्य टिपायला सुरुवात केली. एक संगीनधारी आला धावून, "या दिशेत फोटो घ्यायला बंदी आहे". दूरवर एक पुढली चौकी त्या दिशेस होती. माझे आधीचे फोटो तपासण्यात आले, कागदपत्रे तपासली गेली. 'पर्यटक आहे' हे फारसे पटण्यासारखे नव्हते. माझे कंपनीचेही ओळखपत्र मी जवळ ठेवले होते ती एक उत्तम गोष्ट केली. इथला इथला रहिवासी, सामान्य नोकरदार माणूस, मुंबईहून मणिपूर बघायला आलो आहे इत्यादी प्रस्तावना, गुवाहाटीचे तिकीट, इंफाळमधील पत्ता, पासपोर्ट/पॅन कार्ड, कंपनी आय कार्ड, नागालँड सरकारचे परवानापत्र हे सर्व आता प्रत्येक चौकीवर, व शेवटी 'काय काय येडे लोक असतात'पासून 'एकट्याने म्हणजे कौतुक आहे'पर्यंतचे शेरे व कटाक्ष.






उगवतीचा उजाळा



देवीचे देऊळ



नयनरम्य निसर्ग

...करता करता, सीमेपासून साधारण २० किलोमीटरवर एक मोठी चौकी 'खुडेंगथाबी'. रस्त्याच्या कडेला मस्त छोटेखानी छप्पर टाकलेली हवेशीर चौकी, मागे खुली दारी व नयनरम्य निळसर हिरव्या टेकड्या. मोठे कार्यालय बाजूलाच जरा उंचावर. इथे प्रवाशांना उतरवून त्यांची व वाहनांची वेगळी आणि कसून तपासणी केली जाते. सैनिक वाहनाचा ताबा घेतात व अगदी सीट कव्हरपासून सगळे तपासले जाते. माझी आता परिचयाची झालेली सगळी चौकशी सुरू झाली. एकंदर अवतार पाहून शेजारी बसलेल्या अधिकाऱ्याने वेगळे बोलावले. कागदपत्रे तपासली आणि खणखणीत मराठीत प्रश्न "या भागात फिरण्याचे



कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

धोके माहीत आहेत का? मजा म्हणून असो वा माज म्हणून असो, एकट्याने भटकण्याचा हा प्रदेश नव्हे." मी अवाक आणि खूशही. पाटणकर म्हणून पुण्याचे अधिकारी, आसाम रायफल्सच्या सीमा सुरक्षा सेवेतील अधिकारी. एवढ्या दूर आपल्या प्रदेशातील माणूस भेटणे हा आनंद (त्यांना अधिक) आणि त्यात रोजच्या कामात त्यांना तस्कर, पारधी अशा लोकांशी डील करावे लागत असल्याने अशा वेगळ्या कारणासाठी इथे लोक आले की त्यांचे फार कौतुक. हा एकट्यादुकट्याने फिरण्याचा प्रदेश का नाही यावर त्यांनी प्रेमळ कानउघाडणीही केली, परंतु अतिशय उपयोगाची माहिती व मदत देऊ केली. पुढे कुठे लागले तरी माझे नाव सांगून आसाम रायफल्सकडे आश्रय घे असेही सांगितले.. त्याचा जरा विपरीत परिणाम झाला, त्याचीही कथा पुढे येईलच. अतिशय स्पष्ट शब्दात त्यांनी सावध मात्र केले. "सहप्रवाशाकडेही काही वावगे सापडले तर नाहक नको त्या जाळ्यात अडकशील. त्यामुळे सावध राहा. सीमेपर्यंत आपले लोक आहेत ते काळजी घेतील, पण पहिला सल्ला तर सीमा ओलांडूच नये हा. आणि जर गेलास, तर हे ध्यानात राहू दे की पलीकडे मिलिटरी राज आहे. त्यामुळे फार सौहार्दाची वा मदतीची अपेक्षा ठेवू नये. जसे आम्ही तिकडच्या लोकांना संशयाच्या भिंगातून पाहतो - आमचे सुरक्षेचे कामच आहे ते - तसेच तेही तुला तशीच वागणूक देणार आहेत. आम्ही सीमेपलीकडे कोणत्याही प्रकारची थेट मदत करू शकणार नाही." तोपर्यंत बाजूच्या एकदोघांना पिटाळून सैन्याच्या कँटीनमधून चहा-सामोसा अशी व्यवस्था झाली. निरोप घेऊन आमची गाडी सीमेकडे. तासाभरात मोरे गाव. मुख्य चौरस्त्यावरच एक मोठी चौकी. सीमापार जाण्यासाठी पुढील कागदपत्रांची सोय करण्यासाठी एका अधिकाऱ्यांना विचारले असता ते स्वतःच सही-शिक्का देत असल्याचे समजले व काम लगेचच झाले. भारत-म्यानमार मैत्री करारानुसार दोन्ही देशातील नागरिक १० मैलांपर्यंत मुक्त ये-जा करू शकतात, असा कायदा अलीकडे झाला त्याचा उल्लेख या पत्रात असतो, व त्याबरोबर वैयक्तिक माहिती. पुढे सीमा ओलांडण्यासाठी पुलावरून वाहनाचा मार्ग व बाजारपेठेत पायी मार्ग. सीमेवरचा लहानसा पूल बघून बाजारपेठेतून सीमेपार. तिथे भारत-ब्रह्मदेश मैत्रीच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक द्वार अलीकडे उभारले आहे.



भारत-ब्रह्मदेश मैत्रिद्वार


सीमासेतू. पिवळा भाग ब्रह्मदेश व पांढरा भाग भारत

**सीमोल्लंघन :** सीमेवरील ब्राह्मी अधिकारी पासपोर्ट व सरकारी पत्र ठेवून घेतो. अतिशय साधी व्यवस्था. झाडाखाली कचकड्याची एक खुर्ची आणि तुटके टेबल अशी ही आंतरराष्ट्रीय 'चेक पॉईंट' चौकी. भारताच्या बाजूला जरा बरी परिस्थिती. एक काँक्रीट शेड, त्यात सुरक्षा स्कॅनर, पंखे वगैरे. त्या तुटक्या टेबलवर एका कोपऱ्यात ब्राह्मी अधिकाऱ्याने ज्या प्रकारे माझा पासपोर्ट टाकला, त्या वेळी दहा विचार मनात येऊन गेले, पण आता काही तासांसाठी त्याच्यावर हवाला. पुढे भव्य बाजारपेठ. चिनी मालाने भरलेली. नेपाळ व भूतानमधून स्थायिक झालेले हिंदू, स्थानिक नागा व ब्राह्मी लोक आणि रोहिंग्या मुसलमान असे एकंदर लोक. स्वस्त कपडे, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादींनी भरलेला बाजार. भारतीय रुपयातील व्यवहार. व एक लक्षणीय गोष्ट - प्रचंड प्रमाणात कॅश. ठिकठिकाणी १००-५००-१०००च्या गड्ड्यांचे ढिगारे घेऊन बसलेले लोक. ते नक्की काय करतात ते समजू शकले नाही. कदाचित बाहेर जाऊन पांढरा होणार काळा पैसा असावा किंवा बाहेरून येणारा खोटा पैसाही असू शकतो, परंतु नोटबंदीने या लोकांचे चांगलेच कंबरडे मोडले असणार. इथे क्षुल्लक खरेदी केली, परंतु परतीचे पैसे ब्राह्मी चॅट्समध्ये घेतले, तेवढेच तिथले चलन गाठीशी, ते पुढे ब्रह्मदेशाच्या दौऱ्यात खर्च करून टाकले. ही ब्रह्मदेशाची पहिली झलक. पुढे एक विस्तृत दौरा आखायचे डोक्यात होते, त्याचा हा तयारी/अभ्यास दौरा. संध्याकाळी सीमेवरून पासपोर्ट त्याच कोपऱ्यात थोडी 'विदेशी' धूळ लेऊन पडलेला होता, तो ताब्यात घेत परत.



तामू बाजारपेठ, ब्रह्मदेश

परतीचे वाहन हा आणखी एक किस्सा. एक पोरगा गाडी घेऊन तयार होता. त्या गाडीत एक मुसलमान जोडपे शेंगांचा प्रचंड मोठा ढिगारा घेऊन बसलेले. आख्खी गाडी हिरव्या शेंगांनी भरलेली, व कोपऱ्यात ते दोघे. परतीचा प्रवास त्याच मार्गाने, पण वेगळा थरार. पहिल्या चौकीपासून जरा जास्तच तपासणी होत होती. कदाचित सीमेकडून येणारी गाडी असल्याने असेल कदाचित, असे वाटले. पण दुसऱ्या-तिसऱ्या चौकीनंतर लक्षात आले की ते कोणा 'मुंबईवाल्याची गाडी' म्हणून विशेष तपासत आहेत. झाले असे - पाटणकरांनी


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

पुढच्या मागच्या चौक्यांना निरोप धाडला, 'एक मुंबईचा प्रवासी असलेल्या गाडीवर लक्ष ठेवा.' मूळ हेतू 'चौकशी झालेली आहे तेव्हा फार त्रास न देता गाडी बाकीच्यांच्या आधी लवकर काढा' असा होता, परंतु तो नेमका उलट अर्थाने घेतला गेला. साहेबांनी सांगितलंय मुंबईवाल्याच्या गाडीवर लक्ष ठेवा, म्हणजे काहीतरी गडबड आहे. दर चौकीवर प्रश्नांचा सुळसुळाट. शेवटी हे लक्षात आल्यावर एका चौकीवरून पाटणकरांना फोन लावला. सैनिकी खाक्यात बिचाऱ्या चौकीवाल्या शिपायांना जाम शिव्या पडल्या, पण तेव्हा कुठे हा उलगडा होऊन पुढे गाडी सुरळीत गेली. पण या सर्वात आमचे तीन एक तास गेले. गाडी चालकही हैराण. कुठे हा कार्टा बसवला गाडीत असे झाले. पण पुढल्या चौक्यांत विशेष श्रेणीत गाडी लवकरही काढण्यात आली, त्यात त्याची भरपाई झाली. निळसर हिरव्या डोंगरदऱ्यांचे सौंदर्य आणि भारताच्या एका सीमेला प्रत्यक्ष भेट याव्यतिरिक्त या प्रवासात फार असे पाहण्यासारखे नाही, परंतु अनुभव म्हणून हा प्रवास फारच वेगळा. या मार्गावर फारशी रहदारी नाही व सैन्याचा वचक आहे, त्यामुळे इथले जंगल फार सुंदर. इंफाळच्या प्राणिसंग्रहालयात पाहिलेले पक्षी येथे मुक्त वातावरणात बागडताना दिसले. एके ठिकाणी एक आळसावलेले अस्वल, हरितमयूर, रंगीबेरंगी चिमण्या व तित्तर हे विशेष.


अस्वलभाऊ


हरितमयूर Green Peafowl


सुवर्ण तित्तर Golden Pheasant Male-female


परतीच्या वाटेवर, संधिप्रकाश


इंफाळ इस्कॉन

**मोइरांग :** इंफाळहून दक्षिणेस साधारण दीड तासावर मोइरांग हे छोटे शहर आहे. इथेही इंफाळहून स्थानिक सहा सीटर वाहने चालतात. रोजच्याप्रमाणे सकाळी लवकर इंफाळहून प्रस्थान ठेवले. जवळच नेताजी व आझाद हिंद फौजेच्या स्वातंत्र्यलढ्याचे स्मारकही आहे, परंतु ते नूतनीकरणासाठी बंद असल्याने पाहता आले नाही. नेताजींनी अंदमान-निकोबार पाठोपाठ स्वतंत्र


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

भारताच्या प्रयत्नातील पहिला तिरंगा फडकवला तो या गावात. १४ एप्रिल १९४४! दुसरे महायुद्ध प्रत्यक्ष भारतभूमीवर आले ते या इंफाळ व कोहिमा येथील लढायांमुळे. आझाद हिंद सेनेचे जे खरे 'स्वातंत्र्यसैनिक' होते, त्यांचे आज नावही शिल्लक नाही. त्यांच्याविरुद्ध ब्रिटिशांकडून मोर्चा सांभाळणारी तुकडी होती 'मराठा लाईट इन्फन्ट्री'. पुढे ते जिंकलेही, व आझाद हिंद सेनेस विविध कारणांनी माघार घ्यावी लागली. पण भारताच्या इतिहासातील हे एक करडे पान... खरे कोण जिंकायला हवे होते? आपण आपल्याच लोकांचे प्रयत्न ओळखण्यात कमी पडलो का? स्वातंत्र्याच्या केवळ ३ वर्षे आधीदेखील आपल्या अस्मिता जागृत झाल्या नव्हत्या काय? जे हरत असूनही प्राणपणाने लढले, ते कोणासाठी? आज आपण त्यांचे कृतज्ञ आहोत का? असे अनेक प्रश्न... काही अनुत्तरित... स्मारके जेत्यांचीच उभी राहिली. आझाद हिंद सेनानी भुकेने मेले आणि विस्मृतीत गेले. स्वातंत्र्यपर्वातील स्फूर्तिस्थाने म्हणून सेल्युलर जेल, मंडले, झाशीचा किल्ला, ऑगस्ट क्रांती मैदान, जलियाँवाला बाग, लाल किल्ला, साबरमती, लाहोर जेल अशी अनेक ठिकाणे लोकांच्या डोळ्यासमोर आपापल्या विचारसरणीनुसार येत असतील, पण मोइरांगचे अनन्यसाधारण महत्त्व असतानाही त्या यादीत त्याचे नाव फारच क्वचित मिळेल, ही सल आहे. असो...





मोइरांगच्या वाटेवर

**कैबुल लामजाव राष्ट्रीय अभयारण्य :** मोइरांगमध्ये न्याहारीच्या वेळेपर्यंत पोहोचून पुढे कैबुल लामजाव राष्ट्रीय अभयारण्यात - म्हणजेच सांगाय हरणांच्या तरंगत्या जंगलात जायचे, असा बेत. इथले लोकताक सरोवर एका विशेष गोष्टीसाठी प्रसिद्ध आहे. येथे पाण्यावर तरंगणारी गवताची एक प्रजाती वाढते. जसजसे गवताचे रान जुने होत जाते, तसे त्यात अन्य वनस्पती, चिखल, माती इत्यादी जमा होत होत एक तरंगते बेटच तयार होते. अशा बेटाला येथे 'फुमडी' अशी संज्ञा आहे. अशा तरंगत्या वस्तुमानाला आकार देत येथे शेतीही होते. पण सरोवराचे पाणी वाढले की दिसणारे दृश्य फारच मनोहर असते. इथे आढळणारी हरणेही या तरंगत्या बेटांवर संचार करतात व अशी भू-जल स्थिती केवळ इथेच असल्याने फक्त याच भागात आढळून येतात. मागे लिहिल्याप्रमाणे त्यांच्या संवर्धनाच्या प्रयत्नास चांगलेच यश आले आहे.



मोइरांगच्या वाटेवर

मोइरांग गावात नाश्ता आटोपून स्थानिक वाहनाने लोकताक सरोवराकडे प्रस्थान केले. सरोवराच्या मधोमध एक लहानशी टेकडी आहे, तिथून सरोवराचे विहंगम दृश्य दिसते. पायथ्याच्या एका खेड्यात उतरून मिळेल त्या उनाड वाटेने टेकाडावर चढून काही चांगली चित्रे टिपली व पुढे सांगाय हरणांच्या जंगलात जाण्यासाठी उतरून दक्षिणेकडे चालू लागलो.


टेकडीवरून दिसणारे लोकताक सरोवर


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



दूरवर पसरलेली तरंगती गवताची बेटे - एक अनोखे दृश्य







**सांगाय हरणांच्या प्रदेशात :** अंतराचा अंदाज होता, परंतु गावाबाहेर काही साधन मिळणे दुरापास्तच होते, त्यामुळे पुढे एका दुचाकीवाल्याला थांबवले. एकल प्रवासातील 'हिच-हायकिंग' अथवा 'अंगठा दाखवा - गाडी थांबवा' स्वारी एक फार महत्त्वाचा घटक. पैसे वाचतातच, शिवाय स्थानिक लोकांची ओळख होते, प्रवासात गप्पा होतात. कधी कधी त्याहीपेक्षा लाभदायक योग येतात, त्यातला इथे एक. ज्या गाडीवाल्यास थांबवले, तो येथील अभयारण्यात काम करत होता. त्यामुळे तो बरोबर घेऊन गेलाच, व नंतर माझ्याबरोबर त्याची होडी घेऊन हरणे दाखविण्यासही आला त्याची दुर्बीण घेऊन! सहा सहा फूट वाढणाऱ्या इथल्या गवतामध्ये हरणे दिसावीत म्हणून गवत कापलेले चर तयार केले आहेत. त्यामुळे एका भागातून दुसऱ्या भागात जाताना हा चार आडवा आल्याने हरणे उघड्यावर येतात व पाहता येतात. पहिल्यांदा खूप दुरून काही हरणे टिपली व नंतर पावलांचा माग काढत एका ठिकाणी जरा जवळून. फार छान दुपार. पट्टेरी वाघांपेक्षा दुर्मीळ प्राणी जवळून पाहायला मिळणे हे विशेष.



गवताळ दलदलीतून मार्ग



दूरवर पहिले हरीण दिसले


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.


खुरांचे ठसे शोधत मागावर


नर सांगाय


मादी सांगाय


हरणांची वाट पाहताना टिपलेले काही


रंगीत कोळी

**मणिपूरचा निरोप :** मणिपूर वास्तव्यात सर्व काही सुरळीत चालले असताना शेवटच्या दिवशी मणिपूरच्या कुप्रसिद्ध बंद पुकारण्याचा सवयींचाही अनुभव घेतला. साधारण दुपारी सिल्चरकडे निघायचे, म्हणून सकाळी फेरफटका मारायला बाहेर पडलो, तर सगळीकडे घाई गडबड दिसली. कोणत्यातरी संघटनेने बंद पुकारला म्हणे. १०पासून सगळे बंद. मणिपूरमधले असे संप अक्षरशः महिनोन्महिने सुद्धा चालतात व सगळी वाहतूकच थांबली तर कुठेच ये-जा अशक्य होऊन बसते. अशा वेळी पलायन हा उत्तम उपाय. लगेचच सामान उचलले, थोड्या विचारान्ती सरळ विमानतळ गाठला व सिल्चर कार्यक्रम रद्द करून थेट अगरतला, त्रिपुरा. पुढे हा संप ५ दिवसांनी संपला व पलायनाचा निर्णय योग्य होता हे नक्की झाले.

तर अशी ही मणिपूरची बरीचशी थ्रिलिंग भटकंती. सीमावर्ती भाग सोडला, तर बाकी सर्व सुरक्षित व सुंदर आहे. ईशान्येतले प्रत्येक राज्य म्हणजे अगदी वेगळा देशच पाहिल्यासारखे आहे.


विमानतळ

**मणिपूरच्या बाकी विशेष गोष्टींची ओळखही करून घेऊ...**
**अन्न :** मणिपूर - ईशान्य भारतातील एक अग्रणी शाकाहारी राज्य. सतराव्या शतकापासून वैष्णव संप्रदायाच्या प्रभावामुळे येथील राहणीमानावर बराच फरक पडला. केळीच्या पानाचे इथे फार महत्त्व आहे व त्याचेच विविध आकाराचे द्रोण

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

व ताटे बनवून पारंपरिक प्रकारे अन्न वाढले जाते. दक्षिणेतही केळीच्या पानाचे महत्त्व व वापर दोन्ही आहे, परंतु कलात्मक वापरामध्ये मणिपुरी लोक फार पुढे व तरबेज आहेत. हा प्रदेश जगातील सर्वात तिखट मिरच्या पिकवणारा व खणाराही. भूत झलोकिया, नागा मोरीच अशा सर्वात तिखट मिरच्यांच्या जाती येथे सररास वापरल्या जातात. मी जिथे राहत होतो, तिथे उत्तम मणिपुरी जेवण रोज रात्री मिळत होते. त्याचाही एक मजेदार किस्सा. जेव्हा मी यूथ हॉस्टेलमध्ये रात्री चेक इन केले, तेव्हा एकतर थकवा होता आणि अंधार असल्याने मी आजूबाजूस फार लक्ष दिले नाही. पण दुसऱ्या दिवशी समजले की २०० लोक राहू शकतील एवढ्या जागेत मी एकटाच होतो. आणि एकच मॅनेजर+सिक्युरिटी+स्वयंपाकी. दुसऱ्या दिवशी जेव्हा हे लक्षात आले, तेव्हा थोडा धोका वाटला, पण पुढे सर्व सुरळीत पार पडले. हाही एक वेगळा अनुभव. वीज तर वारंवार जात येत होती, तेव्हा अधिक काळजी वाटे. आता लिहायला मजा वाटतेय... जेवण काही रोजच्या भाड्यामध्ये नव्हते, पण तो भला माणूस रोज दोघांसाठी करत असे.

वेगळी फळे, वेगळ्या भाज्या. त्यामुळे मुळातूनच येथील अन्नाची चव अतिशय वेगळी असते. आपल्याकडे परिचित असलेल्या मसाल्यांचा एकंदरच वापर फार कमी किंवा नाहीच. इथल्या मिरच्या व सुवासिक वनस्पती खाण्याला वेगळाच स्वाद आणतात. काही विशेष पाककृती :

**इरोमबा :** कोवळे बांबू, बटाटे, भेंडी, शिंगाडे, वालासारखे पाचपट आकाराचे एक धान्य यॉन्गचाक व इतर काही स्थानिक भाज्या, दोन चार प्रकारच्या मिरच्या हे एकत्र शिजवून पावभाजीप्रमाणे घट्ट रस्सा, व त्यात इथले एक प्रकारचे ब्याडगी मिरचीबरोबर भाजलेले मासे, अशी काहीशी ही भाजी.

**चक-हाओ अमुबी :** काळ्या तांदळाची खीर : काळे तांदूळ व सुकामेवा तुपावर परतून दुधात आटवले की ही सोपी खीर तयार! तांदळामुळे काळपट जांभळा रंग हे या खिरीचे वैशिष्ट्य!

**मंगान उटी :** चना/पिवळा वाटाणा मसाला : स्थानिक मसाले घातलेली उसळ

**सिंगजू :** सॅलड किंवा कोशिंबीर : कोबी, यॉन्गचाक बिया, कोवळा बांबू इत्यादी कच्चे बारीक कापून त्यात मिरच्या व स्थानिक ताजे मसाले.

**येथील काही फळेसुद्धा विशेष**
**सो-शांग :** अत्यंत आंबट, ऑलिव्हएवढे फळ.
यॉन्गचाक : या हिरव्या शेंगा सर्वत्र मिळतात. व याला इतकी मागणी आहे की मोठ्या प्रमाणात ब्रह्मदेशातूनही मागवल्या जातात. यातील हिरव्या मोठ्या बिया कच्च्या किंवा शिजवून वापरतात.


चित्रात, १. लिची स्थानिक जात, २. सो-शांग व बोरे, वर चिमणीची अंडी, ३. लाल गाजर व मसाले, ४. यॉन्गचाक शेंगा


घोस्ट पेपर, भूत जलोकिया मिरच्या. जगातली सर्वात तिखट प्रजाती


मंगान उटी


पारंपरिक मणिपुरी थाळी


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

**भाषा व लिपी :** मणिपुरी किंवा मेइतेई भाषा येथील प्रमुख. साईनो-तिबेटी मूळ असलेली भाषा काही प्रमाणात बंगाली व आसामी भाषेने प्रभावित आहे. या भाषेची स्वतंत्र लिपी वापरात होती. काही काळाने बंगाली लिपीने तिची जागा घेतली. परंतु अलीकडे पुन्हा जुन्या लिपीचे चांगले दिवस आले आहेत. शाळांतून तर त्या लिपीतच शिक्षण दिले जाते. परंतु लोकसहभागाने सार्वजनिक फलकसुद्धा त्याच लिपीत लिहिले जातात. (आपण मात्र मोडी अगदीच मोडीत काढली, याचे दुःख वाटते. व्यवहारातली लिपी नाही बनवली, तरी प्रत्येकाच्या हाताखालून किमान एक शालेय वर्ष तरी ती गिरवली जावी, असे माझे मत.)

**साहित्य :** मणिपुरी साहित्य परंपरा मराठीइतकीच जुनी आहे. प्राचीन सनामाही पंथाचेही काही हस्तलिखित साहित्य होते व त्याचा वैष्णव पंथाच्या आगमनानंतर त्याग अथवा नाश झाला. येथील साहित्यात स्थानिक खंबा-थोईबीची प्रेमकथा फार प्रसिद्ध आहे. विशेष उल्लेख अशासाठी की या कथेने अनेक लोकगीते, चित्रशैली, नाट्य, नृत्य अशी अनेक कलांगे प्रभावित केलेली आहेत. मणिपूरच्या अगदी नसानसात भिनलेली ही कथा. खंबा हा नायक, गरीब व पोरका परंतु शूर व स्मार्ट. थोईबी ही थोडी वयाने मोठी राजकुमारी. दोघांचे प्रेम. एक व्हिलनसुद्धा, त्याला वाघ खाऊन टाकतो. पुढे या दोघांच्या गाठीभेटी वाढतात. विवाह होतो. पुढे काही काळ सुखी संसार. एकदा खंबा आवाज बदलून थोईबीला मजेत पुकारतो, तेव्हा बेसावध थोईबी घाबरून आवाजाच्या दिशेने भाला फेकून मारते, त्यात त्याचा मृत्यू होतो, पुढे दुःखाने थोईबीही प्राण सोडते अशी ही कथा. घरात/समाजात काही आनंदी प्रसंग असेल, तर त्यांच्या प्रेमप्रसंगाची, विवाहाची कथा सादर होते व काही दुःखद घटना घडली असेल तर त्यांच्या मृत्यूचा प्रसंग. ही कथा लोकजीवनाचा फार महत्त्वाचा भाग बनून गेली आहे.

**क्रीडा :**

**मुकना कुस्ती :** स्थानिक कुस्तीचा प्रकार. स्पर्धक कापडी कमरबंध बांधून खेळतात. यामध्ये एकमेकांचा कमरबंध पकडून चीत करण्याचा डाव असतो.

**पोलो :** सद्य रूढ पोलो या खेळाचे मणिपूर हे जन्मस्थान. इथे ब्रिटिशांनी पुलु खेळ सर्वप्रथम पहिला व पुढे थोड्याफार बदलाने पोलो खेळाची बांधणी करण्यात आली. भारतातील पहिले पोलो क्लब सिल्चर मणिपूर कलकत्ता भागातलेच.

**प्रसिद्ध खेळाडू :** सर्वश्रुत मेरी कोम, वेट लिफ्टर कुंजूरानी देवी व संजिता चानू , बॉक्सर सरिता देवी, देवेंद्र सिंग व डिंको सिंग, जुदो चॅम्प कल्पना देवी, आर्चर बोम्बयला देवी, मिस्टर वर्ल्ड सौष्ठवपटू गंग्बाम मैतेई अशी विविध क्षेत्रांतील तारांकित नावे या राज्याशी निगडित आहेत. याशिवाय आय लीग व इंडियन सुपर लीग फॉलो करणाऱ्यांना तेथील बोइथान्ग हाओकीप व इतर फुटबॉलपटू परिचयाचे असतीलच! क्रीडा क्षेत्रात महान कीर्तीचे हे लहान राज्य आहे.

**कला:**

**वस्त्र :** अत्यंत तलम सुती वस्त्रे हे मणिपूरचे वैशिष्ट्य. पारंपरिक पुरुष वेषभूषा अतिशय साधी - धोतर किंवा गोल सारोंग/लुंगी, कुर्ता/सदरा व मुंडासे; शक्यतो पांढरेच. स्त्रिया अतिशय कलात्मक व रंगीबेरंगी वस्त्रे वापरतात. गोल सारोंगसारखे 'फनेक', वर ब्लाउज व ओढणीप्रमाणे तलम इंनाफी. इंनाफीवर शक्यतो सुरेख नक्षीकाम असते व हाताने विणलेले असते. मायेक नैबी ही जरा फॉर्मल इंनाफी आडवे पट्टे असलेली व काठाला नक्षी. येथील वैष्णव नाकापासून वर टिळा लावतात व त्यांच्या एकंदर लहान डोळे, पीत वर्ण अशा रूपात ते एक विशेष शोभून दिसते.

**अलंकार :** सुती धाग्यापासूनच बनवलेले हार इथे फार लोकप्रिय आहेत. याशिवाय स्थानिक पद्धतीने बनविलेले दागिने- विशेषतः केशाभूषणे भारत व आग्नेय आशिया यातील मणिपूर हा सांस्कृतिक दुवा आहे याची ओळख पटवून देतात.

**नृत्य :** प्रसिद्ध मणिपुरी नृत्य ही येथील खासियत. प्राचीन जागोई नृत्यशैलीत भरतऋषींच्या नाट्यशास्त्राच्या आधारे भर घालून सतराव्या शतकात महाराज भाग्यचंद्रांनी या नृत्यशैलीस आज ओळखतो ते स्वरूप दिले. यात प्रामुख्याने उग्र 'तांडव' व सौम्य 'लास्य' असे दोन प्रमुख प्रकार. मणिपुरी मृदुंग, करताल व गायक यांच्या साथीने कृष्णाच्या जीवनातील प्रसंग किंवा खंबा-थोईबी आख्यानातील प्रसंग असे हळुवारपणे प्रेक्षकांसमोर उलगडले जातात. पाच प्रमुख 'रास'लीला या नृत्यप्रकाराचे मुख्य अंतरंग. गोपिकांचा गोल आकाराचा 'कुमिल' एखाद्या मोठ्या घराच्या कडक स्कर्टप्रमाणे दिसतो, त्यावर भरजरी कपडे दागिने व झिळमिळीत पदर. सुती धाग्यांचे रंगीत हार व गोंडे हाही पोशाखातील प्रमुख व वेगळा भाग. अतिशय नाजूक व वाहत्या हालचाली हे या नृत्यशैलीचे वैशिष्ट्य व त्याचबरोबर थोडा मर्यादित जागेतील सादरीकरण हेही वेगळेपण. याशिवाय केवळ पुरुषांचे मृदुंगासहित केलेले नटसंकीर्तन हा आणखी एक प्रकार.

**संगीत :** मणिपुरी राजांनी वैष्णव संप्रदाय स्वीकारल्यानंतर त्याचा प्रभाव ललितकलांवरही झाला. संकीर्तन लोकप्रिय झाले. शास्त्रीय संगीतावर दाक्षिणात्य संगीताचा आश्चर्यकारक प्रभाव दिसून येतो, व त्याचबरोबर एक पौर्वात्य लकब सहज लक्षात येते. येथेही आग्नेय आशियाच्या संगीताशी असलेला जवळचा संबंध अधोरेखित होतो. पारंपरिक एकतारी (बेना) व बहुतारी तंतुवाद्ये, बंगाली व मणिपुरी पद्धतीचे ढोलक तालवाद्य (खोल), मंजिरा-झांजा इत्यादी वाद्ये व गायन असा संच असतो. आधुनिक व्हायोलिन, गिटार व बासरी यांचाही समावेश अलीकडे करतात.

सध्या प्रसिद्ध असलेल्या कलाकारांपैकी मंगका ही माझी विशेष आवडती. घरातच शास्त्रीय संगीताचे धडे घेत व आधुनिक संगीताशी त्याची जोड देत काही सुंदर रचना तिने केल्या आहेत. आपल्या कानांना वेगळ्या संगीताची कितपत सवय असेल कल्पना नाही, परंतु माझ्या आग्रहाखातर ही चलचित्रे जरूर पाहा व पूर्ण पाहा.

**काय पाहाल :** मणिपुरी वाद्ये; अलंकार
**काय ऐकाल:** पारंपरिक शैलीतले गीत.
https://www.youtube.com/watch?v=v2li7TVCQ28

**काय पाहाल :** मणिपूर व पोलोचे नाते, मणिपूरचा निसर्ग
**काय ऐकाल:** पारंपरिक शैलीतले गीत व पाश्चात्त्य गीत यांचा मिलाफ.
https://www.youtube.com/watch?v=Rgp7lzYlT-4

**काय पाहाल :** पारंपारिक मणिपुरी घर, जुन्या पिढीतील महिलेची वस्त्रे ल्यायची पद्धत, इंनाफीवरील सुबक काम, नव्या पिढीत साधे फनेक व इंनाफी ल्यायची आधुनिक पद्धत!
**काय ऐकाल:** जुने मणिपुरी संगीत, नवे मणिपुरी संगीत व पाश्चात्त्य संगीत यांचे पृथक परंतु एकत्र गुंफलेले गीत.
https://www.youtube.com/watch?v=eutM86tFz9w

मणिपुरी शास्त्रीय नृत्याची झलक, आंजावरून साभार
https://www.youtube.com/watch?v=XQI0T5Kjw9E

**संकीर्ण :** माझ्या एकल प्रवासादरम्यान माझ्या अनुभवाचा व अभ्यासाचा काही भाग थोडा अधिक आकर्षक बनवून फेसबुकवर पोस्ट करण्याची मला एक सवय आहे. त्यामुळे एक औत्सुक्य निर्माण होतेच, तसेच त्यानिमित्ताने त्या प्रदेशाविषयी इतरांनाही माहिती होते. मणिपूरविषयक हे पोस्ट इथेही समाविष्ट करून या लेखाची सांगता...


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.










❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# दोन वैमानिकांच्या मैत्रीची एक अनोखी कहानी

चार्ल्स आणि फ्रान्झ हे एका अनोख्या मैत्रीच्या नात्यात गुंफले गेले ते त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत. योगायोग असा की दोघेही २००८ साली काही महिन्यांच्या अंतराने मृत्यू पावले. फ्रान्झ स्टिगलरने युद्धासारख्या क्रूर वेळीदेखील आपल्यातील माणुसकी जिवंत ठेवली.

**श्रीरंग जोशी**

अमेरिकन वायुदलातून निवृत्त होऊन लेफ्टनंट कर्नल चार्ल्स उर्फ चार्ली ब्राउन परिपूर्ण असे आयुष्य जगत होता. १९७२ साली अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातून निवृत्त झाल्यावर मायामी येथे स्थायिक झाला. १९८६ सालच्या एका कॉम्बॅट पायलट रीयुनियन सोहळ्यात त्याला वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. तेथे त्याला एकाने विचारले की "दुसऱ्या महायुद्धातील तुमचा सहभाग असलेल्या एखाद्या कामगिरीची आठवण सांगता का?" त्यावर त्याने 'ती' घटना सांगितली. ती घटना सांगितल्यावर चार्ल्स ब्राउनला वाटले की त्या घटनेतील एका व्यक्तीचा शोध घ्यायला हवा. म्हणून मग त्याने एक शोधमोहीम सुरू केली. मात्र त्यात समस्या अशी होती की दुसऱ्या महायुद्धातील ती घटना घडून बराच काळ लोटला होता. बरे, शोध तरी कसा घेणार? कारण त्या व्यक्तीचे नावही त्याला ठाऊक नव्हते. त्याला फक्त एवढेच माहीत होते की ती व्यक्ती एक वैमानिक होती. सुमारे चार वर्षे झाली, तरी ही शोधमोहीम कोणत्याच निष्कर्षापर्यंत येत नव्हती. अखेरचा उपाय म्हणून मग त्याने कॉम्बॅट पायलट असोसिएशनच्या नियतकालिकाला एक पत्र पाठवले. त्याव्यतिरिक्त आता करण्यासारखे फारसे काही उरले नव्हते.




लेफ्टनंट कर्नल चार्ल्स ब्राउन यांचे हे छायाचित्र जालावरून साभार.

काही महिन्यांचा काळ लोटला आणि त्याला एक पत्र आले. ते आले होते कॅनडास्थित फ्रान्झ स्टिगलर याचे. त्याने पत्रात लिहिले होते की तुम्ही ज्या व्यक्तीच्या शोधात आहात, ती मीच आहे.



फ्रान्झ स्टिगलर यांचे हे छायाचित्र जालावरून साभार.

फोनवर त्या दोघांचे बोलणे झाले अन चार्ल्सची खातरी पटली की त्याचे शोधकार्य यशस्वी झाले आहे. आता मात्र चार्ल्स भूतकाळातल्या आठवणींमध्ये दंग झाला. १९४१ साली अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली, त्या वेळी सेकंड लेफ्टनंट चार्ल्स ब्राउन अमेरिकन हवाईदलातला एक उमदा तरुण वैमानिक होता. इंग्लंडमधल्या एका तळावर त्याची नेमणूक करण्यात आली होती. तो B-17F या बॉम्बर प्रकारच्या विमानाचा वैमानिक होता. तो ३७९व्या बंबार्डमेंट ग्रूपचा एक सदस्य होता. यात Ye Olde Pub या नावाच्या टीमचे चार्ल्स धरून १० सदस्य होते.

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



चार्ल्स ब्राऊन आणि त्याचे Ye Olde Pubचे इतर सहकारी. हा फोटो जालावरून साभार.

२० डिसेंबर १९४३ रोजी या ग्रूपला एक कामगिरीवर पाठवले गेले होते. यात त्यांना जर्मनीतल्या ब्रेमेन येथील एका विमानाच्या उत्पादन स्थळाला उद्ध्वस्त करायचे होते. मात्र ब्रेमेन येथे मोठ्या संख्येने जर्मन लढाऊ वैमानिक तैनात होते. या मोहिमेत त्यांना 'पर्पल हार्ट कॉर्नर' या व्यूहरचनेत उडायचे होते. यात धोका असा होता की या व्यूहरचनेतील कडेच्या विमानांना असलेल्या जोखमीची तीव्रता मधल्या विमानांपेक्षा अधिक होती. कारण त्यांना जर्मन वैमानिकांकडून जास्त धोका होता. जर्मन सैनिकांना थेट आतल्या विमानांवर हल्ला करायच्याऐवजी कडेच्या विमानांवर हल्ला करणे अधिक सोपे जायचे. मोक्याचा क्षणी त्यांच्यापैकी एका वैमानिकाला माघार घ्यावी लागल्याने चार्ल्सला व्यूहरचनेत कडेची जागा घ्यावी लागली. हा हल्ला अमेरिकन वैमानिकांसाठी यशस्वी झाला, तरी परतीचा मार्ग चार्ल्ससाठी एवढा सुकर नव्हता. ज्या वेळी चार्ल्स आपल्या विमानातून बॉम्ब डागणार होता, त्या क्षणी विमानविरोधी तोफांकडून त्याच्या विमानाच्या नाकाचे नुकसान झाले. तसेच त्याचे क्रमांक दोनचे इंजीन कामातून बाद झाले आणि चौथ्या क्रमांकाचे इंजीनही बाद झाले, जे आधीच जरा कमकुवत झाले होते.

यामुळे चार्ल्सच्या विमानाचा वेग चांगलाच मंदावला आणि ते ग्रूपच्या इतर विमानांबरोबर राहू शकले नाही. चार्ल्सचे विमान आकाशात हेलकावे खाऊ लागले होते. आता त्याच्यावर जर्मन लढाऊ विमानांच्या हल्याचा धोका आणखीनच वाढला. अन झालेही अगदी तसेच. अचानक जवळजवळ १५ जर्मन लढाऊ विमानांनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात चार्ल्सच्या विमानाचे तिसरे इंजीनही बाद झाले. विमानातील प्राणवायूची प्रणाली काम करेनाशी झाली. तसेच आतील विद्युत प्रणालीही बिघडल्या होत्या. त्यामुळे विमानच्या आतून हल्ला करायच्या बहुतेक सर्व प्रणाल्या जाम झाल्या. फक्त समोरील काही बंदुका काम करत होत्या. याखेरीज त्याच्या विमानात बसलेले अनेक सहकारी जखमी झाले होते. Eckenrode हा विमानविरोधी तोफांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाला. Yelesanko यालाही पायाला दुखापत झाली होती. ब्लॅकफोर्ड्चे पाय गोठले होते, Pechoutच्या एका डोळ्याला गंभीर दुखापत झाली होती. तसेच चार्ल्सच्या उजव्या खांद्याला दुखापत झाली होती. प्रथमोपचारासाठी ठेवलेले मॉर्फिनही गोठले गेले. त्यामुळे जखमींवर त्वरित उपचार करण्यात अनेक अडचणी येत होत्या. विमानातील रेडियोही उद्ध्वस्त झाला होता. विमानाच्या अंतर्गत प्रणाली बहुतकरून निकामी झाल्या होत्या. तसेच विमानाचे बाहेरून खूप नुकसान झाले होते.




B-17 जातीचे एक विमान. चार्ल्स बॉऊन उडवत असलेले B-17 बॉम्बर विमानही असेच होते. हा फोटो जालावरून साभार.

जमिनीवरून हे हेलकावे खात असलेले बॉम्बर विमान जर्मन वैमानिकांना दिसत होते. या वैमानिकांपैकी एक म्हणजे फ्रान्झ स्टिगलर. त्या वेळी तो त्याच्या विमानात इंधन भरत होता. लवकरच त्याने उड्डाण केले आणि चार्ल्सच्या विमानाजवळ पोहोचून त्याच्या समांतर रेषेत स्वतःचे विमान उडवू लागला. आता मात्र चार्ल्स अधिकच चिंताग्रस्त झाला, कारण त्याला एक जर्मन लढाऊ विमान त्याच्या विमानाच्या अगदी जवळ आल्याचे दिसत होते. फ्रान्झला मोडकळीला आलेल्या विमानात जखमी झालेले आणि अडकलेले अमेरिकन हवाईदलातील सैनिक दिसत होते. एकमेकांना मदत करायची त्यांची केविलवाणी धडपड दिसत होती. एका जर्मन विमानाला आपल्या इतके जवळ पाहून मग चार्ल्सने त्याच्या एका सहकाऱ्याला त्याच्यावर बंदूक रोखून तयार राहायला सांगितले. मात्र हल्ला करण्यास मनाई केली. आश्चर्याची बाब म्हणजे अशा हालचाली पाहूनही फ्रान्झने त्यांच्यावर हल्ला चढवला नाही. तो काही काळ त्यांच्या बाजूने उडत राहिला. तो अशा प्रकारे त्यांच्या बाजूने उडत राहिला की जेणेकरून जर्मन विमानविरोधी तोफा B-17ला लक्ष्य करू शकणार नाही.

फ्रान्झ खुणावून चार्ल्सला काहीतरी सांगायचा प्रयत्न करत होता. मात्र चार्ल्सला काहीच कळत नव्हते. त्याने मग त्यांना उत्तरेकडील समुद्रापर्यंत साथ दिली. फ्रान्झला असेही भय वाटत होते की जर कुणा जर्मन अधिकाऱ्याने त्याला हे करताना पहिले, तर काय होईल? त्याच्यावर देशद्रोहाचा आरोप सिद्ध होईल. वेळ हातातून निसटत चालला होता. आता निर्णय घेणे आवश्यक होते. फ्रान्झने चार्ल्स व त्याच्या विमानातल्या सैनिकांना एक सलाम ठोकला आणि आपल्या मार्गाने निघून गेला.




या प्रसंगाचे नाट्यमय रूपांतर दर्शवणारा फोटो. हा फोटो जालावरून साभार.

त्यानंतर चार्ल्सने त्याचे B-17 जवळजवळ २५० मैल समुद्रावरून (नॉर्थ सी) उडवत नेले अन आपल्या एका बेसवर यशस्वीरित्या उतरवले. मात्र यादरम्यान Eckenrode याचा मृत्यू झाला आणि बाकी सारे जिवंत राहिले. पुढे चार्ल्सने त्याच्या कमांडिंग ऑफिसरला ही गोष्ट सांगितली. मात्र त्या अधिकाऱ्याने हा


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

किस्सा इतर कोणास सांगायला मनाई केली. कारण त्याला जर्मन सैनिकांच्या चांगुलपणाबद्दल गोष्टी प्रसिद्ध होऊ द्यायच्या नव्हत्या. जर्मनीला या युद्धात नेस्तनाबूत करणे आवश्यक होते. फ्रान्झनेही हा किस्सा कोणाला सांगितला नाही, अन्यथा त्याच्या जिवालाही धोका निर्माण झाला असता.




फ्रान्झने दाखवलेल्या माणुसकीच्या सन्मानार्थ हे चित्र काढले गेले. त्याचा हा फोटो जालावरून साभार.

पुढे चार्ल्सने युद्धात अनेक कामगिऱ्या पार पाडल्या. फ्रान्झनेही युद्ध संपेपर्यंत आपली कामगिरी बजावली. १९८६नंतर चार्ल्सने फ्रान्झचा शोध घेतला. फ्रान्झ युद्ध संपल्यानंतर व्हॅंकुंवर, कॅनडा येथे स्थायिक झाला. पुढे झालेल्या प्रत्यक्ष भेटीत चार्ल्स म्हणाला की त्याला असे वाटत होते की ४० वर्षांनी त्याला त्याचा हरवलेला भाऊ परत भेटला. फ्रान्झ म्हणाला की तो चार्ल्सला हाताने खुणावून एखाद्या जर्मन बेसवर उतरून शरण यावे अथवा स्वीडनच्या दिशेने उडत जावे असे सांगत होता. मात्र फ्रान्झ काय सांगत आहे ते चार्ल्सला त्या वेळी कळले नव्हते. त्या वेळी फ्रान्झने शत्रुपक्षाच्या सैनिकांना जिवंत जाऊ दिल्याचे कारण सांगितले. तो म्हणाला की त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने त्याला एकदा सांगितले होते की त्याने जर पॅराशूटमधून उडणाऱ्या एखाद्या सैनिकाला मारले, तर तो स्वतः (वरिष्ठ अधिकारी) त्याला (फ्रान्झला) जिवंत सोडणार नाही. फ्रान्झच्या मते त्या वेळी चार्ल्स आणि त्याचे सहकारी त्याला पॅराशूटमधील माणसांसारखे वाटले आणि त्याच्यातील माणुसकीचा विजय झाला. मात्र जसे त्याला जर्मन युद्ध तळ दिसले, तसे त्याने चार्ल्स आणि त्याच्या सहकाऱ्यांना सलाम ठोकला आणि निघून गेला.




चार्ल्स आणि फ्रान्झ यांच्या सन्मानार्थ फ्लोरिडा राज्याचे तत्कालीन गव्हर्नर जेब बुश यांनी त्याची २००१ साली भेट घेतली. हा फोटो जालावरून साभार.



चार्ल्स व फ्रान्झ फिशिंगचा आनंद घेताना...




डावीकडून चार्ल्स व त्याची पत्नी जॅकी, फ्रान्झची पत्नी हिया व फ्रान्झ. वरील दोन्ही फोटो जालावरून साभार.

चार्ल्स आणि फ्रान्झ हे एका अनोख्या मैत्रीच्या नात्यात गुंफले गेले ते त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत. योगायोग असा की दोघेही २००८ साली काही महिन्यांच्या अंतराने मृत्यू पावले. फ्रान्झ स्टिगलरने युद्धासारख्या क्रूर वेळीदेखील आपल्यातील माणुसकी जिवंत ठेवली. फ्रान्झने चार्ल्सला भेट दिलेल्या एका पुस्तकात लिहिलेला संदेश त्याच्याच शब्दांत...

*In 1940, I lost my only brother as a night fighter. On the 20th of December, 4 days before Christmas, I had the chance to save a B-17 from her destruction, a plane so badly damaged it was a wonder that she was still flying.*

*The pilot, Charlie Brown, is for me, as precious as my brother was.*

*Thanks Charlie.*
*Your Brother,*
*Franz*

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पिट्सबर्ग

२०व्या शतकाच्या सुरवातीला पिट्सबर्ग हे न्यू यॉर्क आणि शिकागोच्या खालोखाल रोजगार निर्माण करणारे अमेरिकेतील महत्त्वाचे शहर होते. स्टीलबरोबरच ॲल्युमिनिअम, लोखंड, काच निर्मिती हे इथले मुख्य उद्योगधंदे होते. पण १९८० साली अमेरिकेने Deindustrialization करण्याचा निर्णय घेतला, ज्यायोगे इथले बरेचसे कारखाने बंद केले गेले वा दुसरीकडे हलवले गेले.

**अभिजीत अवलिया**



अल्लेघेणी, मोनोन्गहेला आणि ओहिओ अशा तीन नद्यांच्या संगमावर वसलेले अमेरिकेतील एक अतिशय सुंदर शहर म्हणजे पिट्सबर्ग. शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर असलेल्या स्टीलशी संबंधित उद्योगधंद्यांमुळे पिट्सबर्गला 'स्टील सिटी' आणि शहरात असणाऱ्या तब्बल ४४६ पुलांमुळे 'सिटी ऑफ ब्रिजेस' अशी बिरुदावलीदेखील दिली गेलेली आहे. आज जगातील सर्वात सुंदर शहरांपैकी एक गणले जाणारे पिट्सबर्ग दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मात्र एक अतिप्रदूषित शहर बनले होते. ह्याचे कारण म्हणजे युद्धकाळात वाढलेली स्टीलची गरज. ही वाढीव मागणी पूर्ण करण्यासाठी इथले कारखाने दिवसाचे २४ तास काम करत असत आणि त्यामुळे इथली हवा व पाणी प्रचंड प्रमाणावर प्रदूषित झाले. पण दुसऱ्या महायुद्धानंतर शहरातील हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण कमी करण्याचा एक कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्यात आला. आणि ह्याचाच परिणाम म्हणजे गेली काही वर्षे बऱ्याच मासिकांतर्फे केल्या गेलेल्या बऱ्याच सर्व्हेमध्ये पिट्सबर्गची गणना अमेरिकेतल्या / जगातल्या राहण्यास सर्वोत्तम शहरांमध्ये होऊ लागली.

२०व्या शतकाच्या सुरवातीला पिट्सबर्ग हे न्यू यॉर्क आणि शिकागोच्या खालोखाल रोजगार निर्माण करणारे अमेरिकेतील महत्त्वाचे शहर होते. स्टीलबरोबरच ॲल्युमिनिअम, लोखंड, काच निर्मिती हे इथले मुख्य उद्योगधंदे होते. पण १९८० साली अमेरिकेने Deindustrialization करण्याचा निर्णय घेतला, ज्यायोगे इथले बरेचसे कारखाने बंद केले गेले वा दुसरीकडे हलवले गेले. त्या कारखान्यांत काम करणारे कामगार एकतर कामधंदा गमावून बसले वा त्यांनी कामाच्या शोधार्थ दुसरीकडे स्थलांतर केले. २०व्या शतकाच्या शेवटी माहिती तंत्रज्ञानाची लाट आली. ह्या शहरानेदेखील ही संधी हेरली आणि उत्पादन क्षेत्राकडून तंत्रज्ञान आधारित उद्योग, शिक्षण, पर्यटन, वैद्यकीय सेवा ह्या व्यवसायांकडे मोर्चा वळवला. आज बऱ्याच टेक्नॉलॉजी कंपन्यांनी आपली मुख्य कार्यालये पिट्सबर्गमध्ये स्थापन केली आहेत.

कॅथेड्रल ऑफ लर्निंग (पिट्सबर्ग विद्यापीठ)



१६३ मीटर उंच असलेली ही ऐतिहासिक बिल्डिंग पिट्सबर्ग विद्यापीठाची मुख्य बिल्डिंग असून जगातील चौथी सर्वात उंच शैक्षणिक इमारत आहे. ह्या इमारतीमध्ये विद्यापीठाच्या बहुतेक विभागांची मुख्य कार्यालये आहेत. १९२६मध्ये घेण्यात आलेल्या एका निर्णयानुसार ज्या ज्या देशांचे नागरिक पिट्सबर्गमध्ये मोठ्या प्रमाणावर राहत आहेत आणि ज्यांनी शहराच्या विकासावर मोठा प्रभाव टाकलेला आहे, अशा देशांनी त्यांच्या संस्कृतीला अनुसरून एक नॅशनॅलिटी रूम विकसित करायची, असा निर्णय घेण्यात आला. अशा प्रकारे ३० देशांच्या ३० नॅशनॅलिटी रूम्स इथे विकसित करण्यात आल्या आहेत. ह्यात एक आपली भारताचीदेखील असून भारताने नालंदा विद्यापीठाच्या धर्तीवर ही रूम विकसित केली आहे. नालंदा विद्यापीठाचे वर्णन करणारा ऑडिओदेखील ऐकण्याची सोय केलेली आहे.

भारताने विकसित केलेली नॅशनॅलिटी रूम


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.





कॅथेड्रल ऑफ लर्निंगमधील ही कॉमन रूम



ही कॉमन रूम २०व्या शतकातील स्थापत्यशास्त्राचा एक उत्तम नमुना मानली जाते.

पॉईंट स्टेट पार्क



ऑगस्ट १९७४मध्ये सुरू करण्यात आलेले हे पार्क अल्लेघेणी, मोनोन्गहेला आणि ओहिओ या नद्यांच्या संगमावरच असून जवळपास ३६ एकरात पसरलेले आहे. हिवाळ्याच्या सुरुवातीला जेव्हा फॉल कलर्सची सुरुवात असते, तेव्हा इथल्या झाडांची रंग बदलणारी पाने पाहणे एक नेत्रसुखद अनुभव असतो. पॉईंट स्टेट पार्कपासून जवळच आहे Duquesne Incline. पिट्सबर्ग शहराचे बरेचसे भाग उंचीवर वसलेले आहेत. असाच एक भाग माउंट वॉशिंग्टन. तिथे मालाची ने-आण करणे सोपे पडावे, ह्यासाठी हा ८०० फूट लांबीचा


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

Duquesne incline १८७७ साली सुरू करण्यात आला. माउंट वॉशिंग्टनमधील रहिवाशांना एवढ्या उंचावरून खाली मुख्य शहरात येणे-जाणे खूप जिकिरीचे पडत असे. त्यामुळे कालांतराने Duquesne inclineमधून प्रवासी वाहतूकदेखील सुरू करण्यात आली.

Duquesne inclineमधील प्रवासी वाहतूक करणारी लाकडी वॅगन



ही वॅगन ८०० फूट अंतर जवळपास अर्ध्या मिनिटात ५ फूट रुंदीच्या रेल्वे ट्रॅकसारख्या रुळांवरून चढून जाते आणि आपण पोहोचतो माउंट वॉशिंग्टनला. इथून दिसणारा पॉईंट स्टेट पार्क आणि पिट्सबर्गचा डाउनटाउन भाग म्हणजे फक्त बघतच राहावे असा नजारा.



फोर्ट पिट पूल - पिट्सबर्गमधील ४४६ पुलांपैकी पॉईंट स्टेट पार्कमधून दिसणारा फोर्ट पिट पूल



हेइन्झ फील्ड स्टेडियम



फुटबॉल हा अमेरिकेतील एक लोकप्रिय खेळ. १९२० साली सुरू करण्यात आलेली नॅशनल फुटबॉल लीग ही अमेरिकेतील एक अत्यंत महत्त्वाची फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखली जाते. ह्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या ३२ संघांपैकी एक आहे पिट्सबर्गचा 'पिट्सबर्ग स्टिलर्स'. हेइन्झ फील्ड हे पिट्सबर्ग स्टिलर्स ह्या संघाचे होम ग्राउंड आहे.

पिट्सबर्ग कल्चरल डिस्ट्रिक्ट



पिट्सबर्ग डाउनटाउनमध्ये कल्चरल डिस्ट्रिक्ट नावाचा एक भाग आहे. हा शहराचा सांस्कृतिक भाग म्हणता येईल. इथे बेनेडम सेंटर, बायहम थिएटर यासारखी बरीच थिएटर्स, आर्ट गॅलरीज आहेत.

कार्नेजी सायन्स सेन्टर


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



१९९१ साली सुरू झालेले हे सायन्स सेंटर पिट्सबर्गचे सर्वात जास्त भेट दिले जाणारे म्युझिअम आहे.

ह्या म्युझिअममध्ये असणाऱ्या रोबोवर्ल्ड विभागात ३०पेक्षा जास्त कायमस्वरूपी रोबोटिक डिस्प्ले असून हे जगातील सर्वात मोठे कायस्वरूपी रोबोटिक म्युझिअम आहे.

इथले एक वेगळे ठिकाण म्हणजे National Aviary. ही अमेरिकेतील सगळ्यात मोठी Aviary असून त्यात जवळपास २०० प्रकारचे पक्षी आहेत. पक्ष्यांसाठी त्यांच्या मूळ अधिवासाप्रमाणे वेगवेगळी छोटी जंगले Aviaryच्या आत तयार केलेली आहेत.

शहराचा डाउनटाउन भाग म्हणजे कॉर्पोरेट कंपन्यांच्या उत्तुंग इमारतींबरोबरच जुन्या, अत्यंत सुंदर अशा पुरातन इमारती आणि आखीव रेखीव रस्ते असणारा भाग आहे.

पिट्सबर्गचा डाउनटाउन भाग









मार्केट स्क्वेअर


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



प्रेस्बायटेरिन चर्च



आणि ही टुमदार घरे





जुन ते सप्टेंबर थोडाफार असलेला उन्हाळा सोडला, तर एरवी इथे हिवाळाच असतो. नोव्हेंबर ते फेब्रुवारी म्हणजे कडाक्याच्या थंडीचे आणि बर्फवृष्टीचे महिने. नोव्हेंबरच्या शेवटी झालेल्या बर्फवृष्टीनंतर दिसणारे एक दृश्य


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.





अशा ह्या अमेरिकेतील सर्वात सुंदर शहरांपैकी एक असलेल्या शहराला जमल्यास नक्कीच भेट द्या. तुम्ही नक्कीच ह्या शहराच्या सौंदर्याच्या प्रेमात पडाल.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# La Ruta Del Cares

डोंगरांत पडणाऱ्या पावसाचं आणि बर्फाचं पाणी जवळच असलेल्या सागराकडे नेणाऱ्या इथल्या उत्तरवाहिनी नद्यांमध्ये देवा (Deva) ही एक महत्त्वाची नदी. एका ब्रिजवरून गाडीने ही नदी पार करताना नावाची पाटी वाचल्यावर ही नदी एकदम आपली वाटली होती.

**निशाचर**



अटलांटिक महासागराला पायाशी घेऊन उभा असणारा उत्तर स्पेन! लाखो वर्षांपूर्वी नष्ट झालेल्या डायनोसॉरच्या खऱ्याखुऱ्या पाऊलखुणा इथे पाहायला मिळतात, तशीच पस्तीस ते चाळीस हजार वर्षांपूर्वी मानवाने रंगवलेली गुफाचित्रंही. पण सोळाव्या शतकात अमेरिका खंडाहून युरोपला परतणाऱ्या खलाश्यांसाठी या भागाचं वेगळंच महत्त्व होतं. जिवावर उदार होऊन केलेल्या सागरसफरीनंतर युरोपच्या भूमीचं प्रथमदर्शन त्यांना होत असे उत्तर स्पेनच्या एका पर्वतरांगेमुळे. तेव्हापासून Los Picos de Europa अर्थात युरोपची शिखरे असं नाव मिळालेली ही पर्वतरांग किनारपट्टीला साधारण समांतर आहे. सागराकडे पाठ करावी, तर एखाद्या अभेद्य तटासारखे हे पर्वत उभे ठाकलेले दिसतात.



स्पेनच्या अस्तुरियाज, कांताब्रिया आणि लिऑन प्रांतांमध्ये पसरलेले हे पर्वत कांताब्रियन पर्वतराजीचा एक भाग आहेत. याच कांताब्रियन पर्वतांमुळे उत्तर भागात उर्वरित स्पेनच नव्हे, तर बहुतांश युरोपपेक्षा जास्त पर्जनमान्य आहे. उन्हाळ्यात बाकीचा देश भाजून निघत असताना इथे मात्र २० ते २५°C तापमान असतं. इथल्या वैशिष्ट्यपूर्ण हवामानामुळे आणि जीववैविध्यामुळे हा भाग España Verde (हरित स्पेन) म्हणून ओळखला जातो.

कांताब्रियन पर्वत, विशेषतः पिकोज हे स्पेनच्या इतिहासाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आफ्रिकेहून आलेल्या मुसलमान मूर आक्रमकांनी आठव्या शतकात स्पेन आणि पोर्तुगालवर ताबा मिळविला. फक्त उत्तरेचा काही पर्वतीय भाग त्यांना जिंकता आला नाही. राजकीय आणि धार्मिक आक्रमणात या पर्वतांनी लोकांना आसरा दिला. तिथे राहणारे लोक धर्मांतरापासून वाचले, म्हणून ते शुद्ध आहेत असा विचार प्रचलित आहे. म्हणूनच स्पेनच्या युवराजाला वा युवराज्ञीला Príncipe / Princesa de Asturias (Prince / Princess of Asturias) म्हणतात असे वाचले होते. पण या नावामागे स्पेनच्या Reconquistaचा (पुनर्विजयाचा) इतिहास आहे. मूर शासकांकडून ख्रिश्चनांनी स्पेन पुन्हा जिंकून घ्यायला सुरुवात झाली पिकोजमध्ये असलेल्या कोवाडोंगा येथील लढाईपासून. या Battle of Covadonga म्हणून प्रसिद्ध लढाईत लहानश्या ख्रिश्चन सेनेचा नेता होता सरदार पेलायो. त्याने जिंकलेल्या भूभागातून पुढे अस्तुरियाज हे राज्य स्थापन केलं आणि कांगास (Cangas de Onís) या गावातून राज्यकारभार पाहिला. एका आख्यायिकेनुसार कोवाडोंगा येथील एका गुहेत लपवून ठेवलेल्या व्हर्जिन मेरीच्या मूर्तीसमोर पेलायोने प्रार्थना केली, तिच्या आशीर्वादाने पेलायोने मूर सैन्याचा पराभव केला. पेलायोच्या घराण्याचा इतिहास, मेरीचा आशीर्वाद, लढाईसाठी डोंगराळ भागाचा वापर अशा अनेक गोष्टींमुळे शिवाजी महाराजांची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

त्या गुहेत नंतरच्या राजांनी Our Lady of Covadongaचं देऊळ बांधलं. गुहेच्या समोर असलेल्या टेकडीवर एक बॅसिलिकाही आहे. कोवाडोंगा हे अस्तुरियन लोकांसाठी आजही पवित्र क्षेत्र आहे.




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



डॉन पेलायोच्या लढ्याला पार्श्वभूमी म्हणून लाभलेल्या पिकोज पर्वतराजीत स्पेनचं पहिलं नॅशनल पार्क १९१८ साली निर्माण करण्यात आलं. नव्वदच्या दशकात त्याचा विस्तार करून Picos de Europa National Park हे नाव देण्यात आलं. आता हे पार्क युनेस्कोच्या Biosphere Reserve मध्ये येतं. मध्य, पूर्व आणि पश्चिम असे तीन massifs असलेले पिकोज गिर्यारोहणासाठी आणि प्रस्तरारोहणासाठी उत्तम आहेत. परंतु दुर्गमता, माहितीचा आणि सार्वजनिक वाहतुकीचा अभाव, पाऊस या कारणांमुळे काही त्यातल्या त्यात प्रसिद्ध ठिकाणं सोडल्यास इकडे पर्यटकांचा ओघ कमी आहे. अशा प्रसिद्ध जागांपैकी एक आहे La Ruta del Cares.

डोंगरांत पडणाऱ्या पावसाचं आणि बर्फाचं पाणी जवळच असलेल्या सागराकडे नेणाऱ्या इथल्या उत्तरवाहिनी नद्यांमध्ये देवा (Deva) ही एक महत्त्वाची नदी. एका ब्रिजवरून गाडीने ही नदी पार करताना नावाची पाटी वाचल्यावर ही नदी एकदम आपली वाटली होती. देवाची उपनदी असलेली कारेस (Cares) नदी पिकोजच्या मध्य आणि पश्चिम massifsच्या मध्ये असलेल्या घळीतून वाहते. सुमारे शंभर वर्षांपूर्वी तिच्यावर जलविद्युत प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पाच्या देखभालीसाठी कारेसच्या घळीत एक पायवाट खोदण्यात आली. ती वाट म्हणजेच La Ruta del Cares (Cares Trail) आता पिकोज नॅशनल पार्कचं आकर्षण ठरली आहे. इथे भटकायला जसे गिर्यारोहक येतात, तसेच हौशी पर्यटकही येतात. मूळचा सुमारे २१ कि.मी.चा मार्ग लिऑन प्रांतातील पोसाडा (Posada de Valdeón) या गावापासून सुरू होऊन काइन (Caín) ला येऊन अस्तुरियास प्रांतातील पोंसेबोस (Poncebos) ला पोहोचतो. त्याचा काइन ते पोंसेबोस हा १३ कि.मी.चा ट्रेक जास्त लोकप्रिय आहे.



जुलै २०१५च्या उत्तर स्पेनच्या भटकंतीत हा ट्रेक करायचाच असं नवऱ्याने आणि मी ठरवलं होतं. या ट्रेकसाठी काही गोष्टींचं पूर्वनियोजन करणं आवश्यक आहे. काइन वा पोंसेबोसला राहण्याखाण्याच्या मर्यादित सोयी आहेत. त्यामुळे कांगास किंवा अरेनास (Arenas de Cabrales) ला राहणं बरं पडतं. स्वतःच्या गाडीने प्रवास करायचा तर पोंसेबोसहून अरेनास जवळ आहे. पण स्वतः ड्राइव्ह केल्यास २६ कि.मी.चा परतीचा ट्रेक करणं किंवा थोडाच भाग पाहून परत फिरणं हे पर्याय आहेत. तसेच पोंसेबोसहून सुरुवातीला जवळजवळ ३०० मीटरचा खडा चढ आहे. कांगासला जास्त सुविधा आहेत, तिथून आसपासचा परिसर पाहणं सोपं आहे. शिवाय जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत कांगासहून काइनसाठी रोज सकाळी दोन बसेस असतात. दुपारनंतर काइन आणि पोंसेबोसहून कांगासला परतीच्या बसेस असतात. कांगासला राहून बसने काइनला येऊन ट्रेक करून पोंसेबोसहून परत यायचं, असं आम्ही ठरवलं. नकाशात कांगास वरच्या बाजूला आहे आणि बसचा मार्ग निळ्या रंगात दाखविलेला आहे.

या ट्रेकमध्ये काइन आणि पोंसेबोस सोडल्यास खाणंपिणं, अगदी प्यायचं पाणीही मिळत नाही. त्यामुळे हे सगळं बरोबर नेणं भाग आहे. १३ कि.मी.त कुठेही स्वच्छतागृहं नाहीत. कुठेही फारशी सावली किंवा बसायला जागाही नाही. ही एक वाट सोडली तर इतर वाटा नाहीत, कोणतेही shortcuts नाहीत. उन्हाळ्यात गर्दीचाही त्रास होऊ शकतो. बराचसा ट्रेक कड्याच्या बाजूने आहे. वाट बहुतेक ठिकाणी किमान दीड मीटर रुंद आहे, पण कुठेही संरक्षक कठडे नाहीत. तरीही पोंसेबोसकडचे ३ कि.मी. वगळता उंचीची भीती नसेल तर हा ट्रेक कठीण नाही.

कांगासला आमचा दोन दिवस मुक्काम होता. पाऊस पडणार हे सांगायला हवामान खात्याची गरज नव्हती. तसंही लख्ख ऊन असेल, तर सावली नसल्याने आणि चुनखडीच्या डोंगरांमुळे परावर्तनाने वाढणारा उष्मा यामुळे ट्रेक करणं कठीण होतं. त्या मानाने ढगाळ वातावरण सुसह्य असतं. अर्थात जोरदार पाऊस किंवा धुकंही वाईट!

दोनच बस आहेत, भरल्या तर काय असा विचार करून आदल्या दिवशी संध्याकाळी कांगासला पोहोचल्यावर तिकिट काढायला बस स्टँडला गेलो. पण तिकिट खिडकी बंद झाली होती. बस स्टँड उचलून कोकणात कुठेही ठेवावा असा होता. तसेच नंबर असलेले तिरके समांतर फलाट, गाडी कुठे लागणार माहीत नसलेले प्रवासी आणि एक अंधारं कँटीन. प्रवाश्यांची संख्या आणि बसेसची अवस्था हेच फरक होते फक्त.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८च्या बससाठी अर्धा तास आधी जाऊन परतीचं तिकिट काढलं. कँटीनला बटाटा घातलेलं ऑम्लेट आणि पाव अशी न्याहारी केली आणि बसमध्ये पुढच्या जागा पटकावल्या. बस रिकामी होती, आमचा गर्दीचा अंदाज सपशेल चुकला होता. बस सुटायच्या आधी एक तरुण जोडपं फक्त चढलं. प्रवास सुरू झाला आणि पाच मिनिटांत ढग आणि धुक्यामुळे बाहेर काही दिसेनासं झालं. अडीच तासाचा प्रवास होता. घाटाच्या रस्त्यावर ड्रायवर गाडी कशी चालवणार हा विचार करत बसण्यापेक्षा झोप काढली.

काइनला पोहोचलो, तर थंडी आणि मुसळधार पाऊस! तीच बस किती वेळाने परत जाणार ते ड्रायव्हरला विचारून ठेवलं. एक कॅफे दिसला, त्यात शिरलो. आत मस्त ऊबदार होतं. हॉट चॉकोलेट्ची ऑर्डर दिली. आमच्यामागोमाग बसमधलं जोडपंही आलं. मुलाच्या पाठीवर मोठ्ठं बॅकपॅक आणि त्यावर स्लीपिंग बॅग्ज बांधलेल्या. आणि मुलीकडे एक छोटीशी पर्स फक्त, आत अर्धा लीटर पाण्याची बाटलीही राहिली नसती. दोघांनाही मनातल्या मनात कोपरापासून नमस्कार केला.

सुदैवाने अर्ध्या तासाने पाऊस थांबला. बाहेर पडून थोडा वेळ चालून धुक्याचा वगैरे अंदाज घेऊ म्हणून निघालो. तर मागोमाग ते दोघंही आले. आणखी एक वयस्कर जोडपंही आमच्यापुढे दिसलं. चला, सोबत तर होती. कारेस नदीच्या बाजूने चालायला सुरुवात केली. नदीला पाणी खूप कमी होतं.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



लगेच कारेसवर बांधलेला छोटा बंधारा लागला. बंधाऱ्याआधी ट्रेकचा नकाशा आणि profileचा बोर्ड होता. पुढचे १० कि.मी. हलका उतार किंवा सपाट रस्ता होता. शेवटी एक तीव्र चढ आणि मग पोंसेबोसपर्यंत उतार होता.






बंधाऱ्याचं आरस्पानी पाणी बघून बंधारा पार केला. वाटेत एक बोगदा आहे. तिथे बरोबर आणलेल्या टॉर्चचा उपयोग झाला. बोगद्यातून बाहेर आलो, तर उलट्या दिशेने एक तरुण धावत येताना दिसला. (काही ॲथलीट इथे सरावासाठी धावायला येतात असं वाचलं होतं.) बोगद्याआधी तो थांबला. तो परत धावत जाणार होता. त्याला इंग्लिश येत होतं. त्याच्या म्हणण्याप्रमाणे धुकं नव्हतं. ढगही एका ठरावीक उंचीवर अडकतात. त्यामुळे visibilityचा प्रश्न नव्हता. शिवाय पावसामुळे गर्दीही कमी होती. (नाहीतर उन्हाळ्यात बऱ्याचदा गर्दीमुळे चालणं मुश्कील होतं.) त्याचे आभार मानले. आता आम्हाला काहीही शंका नव्हत्या; कांगासला परत फिरण्याची गरज नव्हती. त्या अरुंद खिंडीसारख्या भागातून बाहेर आलो, तर आजूबाजूला कडे आणि वर ढग. एका अविस्मरणीय ट्रेकची ती सुरुवात होती.



कारेसच्या पात्राची खोली हळूहळू वाढत होती, पात्रात पाणी असं नव्हतंच. मध्येच वाट गुहेतून जात होती. वाटेत दोन पूल लागले.




कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.





आतापर्यंत पात्र तसं अरुंद होतं. अचानक झाडं कमी झाली, दरी रुंदावली आणि वेगळाच नजारा दिसला.



वाट मध्येच डोंगराच्या पोटातून जात होती. कुठे Aqueductही दिसत होतं. अधूनमधून मागे वळून पाहायचा मोह होत होता.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



नदी आता दरीत खोल कुठेतरी होती. पुढे दिसणारी वाट पाण्यापासून खूप उंचावर होती. याआधी पाहिलेल्या gorgesपेक्षा इथलं दृश्य खूप वेगळं होतं.



एका जागी कोवाडोंगाकडे जाणारा फाटा फुटला होता. तिथे लावलेल्या बोर्डनुसार कोवाडोंगाला चालत जायला ९ तास लागतात. अशी वाट आहे ही माहिती नवीन होती. बोर्डनुसार आमचा साधारण अर्धा ट्रेक झाला होता. तिथे फक्त लागणारा वेळ दिला होता, अंतर नव्हतं. अर्धा ट्रेक झाला असेल असं आम्हाला तरी वाटलं नाही.




कारेस रूट ज्याच्यासाठी प्रसिद्ध आहे तसं 'खाली खोल दरी, वर उंच कडा' दृश्य दिसत होतं. आणि त्या कड्याला वेटोळं घालून बसलेली पायवाट! दगडात एखादं लेणं कोरावं तशी ती वाट कोरून काढणाऱ्या मानवाच्या जिद्दीला काय म्हणावं!!



कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



ट्रेलवर अजूनतरी तुरळकच माणसं होती. पोंसेबोसहून जास्त लोक ट्रेक सुरू करतात. त्यामुळे इथून पुढे विरुद्ध दिशेने येणारे लोक भेटण्याची शक्यता होती. एका ठिकाणी वाटेच्या बाजूला थांबण्यासारखी जागा दिसली. भूकही लागली होती. मग बरोबर आणलेले तिकडचे रसाळ पीच आणि आलुबुखार खाल्ले. तहान आणि भूक दोन्ही भागले. १५ मिनिटं थांबलो असू. आमच्यासारखेच जागा शोधणारे आल्यावर आम्ही मुक्काम आवरता घेतला.

वाटेत हे रावसाहेब दिसले. गळ्यात मस्त घंटा बांधलेली होती. तोरा त्या कडेकपारींचा राजा असल्यासारखा होता. उन्हाळ्यात चरण्यासाठी बकऱ्यांना वगैरे डोंगरांत आणतात. तिथे असलेल्या गुहांमध्ये हे प्राणी रात्री जाऊन राहतात.



या वाटेवर आम्ही एकाच दिशेने जाणार होतो. त्यामुळे पुन्हा पुन्हा मागे वळून पाहत होतो. विरुद्ध दिशेने चालताना परिसर कसा दिसत असेल याची कल्पना येत होती. लोकांची गर्दी असती तर असं थांबून पाहणं, फोटो काढणं शक्य झालं नसतं. एका ठिकाणी बाजूला खडीची लांबलचक घसरगुंडी होती. कुठे गुहेतून वाट जात होती. अधूनमधून हलका पाऊस पडत होता. आजूबाजूची उंचच उंच शिखरं अजूनही ढगांच्या पडद्याआड होती. त्यांच्या उंचीचाही अंदाज येत नव्हता.







आणखी एकदोन वळणं घेतली आणि एवढा वेळ मागे पाहिल्यावर दिसणारी वाट डोंगराच्या आड दिसेनाशी झाली. आता डोंगराला उतार असा नव्हताच. उजवीकडे सरळसोट कडा आणि डोक्यावर दगडांचा overhang. त्या फत्तरांतल्या भेगा बघून इथे दरड कोसळायचा किती धोका आहे हे अचानक जाणवलं. त्यात नवीन काही नव्हतं. अश्या धोक्याचा इशारा देणारे फलकही दिसले होते. पण आपण डोंगराच्या पोटात आहोत आणि हजारो टन वजनाच्या दगडांखालून जातोय, यातला धोका त्या क्षणी जाणवला खरा. त्यात मोबाईलला रेंज नाही हेही आठवलं. अशी भीती दाखविणारा निसर्गच लगेच मंत्रमुग्धही करत होता. खरं तर तेच चुनखडीचे डोंगर, त्यांची एका साच्यातून काढल्यासारखी वळणं, थोडीफार हिरवळ आणि खोल कुठेतरी तळाशी आहे की नाही अशी शंका यावी इतकं पाणी! पण पावलागणिक आपण पुढे जावं आणि मधूनच मागे सोडलेल्या वाटेसाठी उदास वाटावं, असं होत होतं.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



हा भाग पार केला आणि अचानक पुढची पुसटशी वाट समोर आली. समुद्रसपाटीपासून एवढ्या कमी उंचीवर असा निसर्ग प्रथमच पाहायला मिळत होता.



आपण सृष्टिसौंदर्य पाहण्यात दंग असावं आणि एखाद्या चळवळ्या माणसाला ती शांतता सहन न होऊन त्याने एखादा वाईट विनोद करावा असं थोडंफार ही पाटी पाहून झालं.




या पंपानंतर पुढचा पेट्रोल पंप किती अंतरावर आहे हे सांगणारी पाटी बघितली आहे. पण तिथे कचरापेटी नसताना कचरा किती अंतरावर टाका हे सांगण्यात काय हंशील? (अंतरही चुकलंय?!) बरं, काइनला अशा सूचनेसकट कचरापेटी ठेवलेली काही दिसली नव्हती. यावरून आठवलं, स्पेनला कचरापेट्यांवरही सरकारचं चिन्ह म्हणून राजमुकुट असतो. पहिल्यांदा पाहिल्यावर गंमत वाटली होती.

आता चढ सुरू होणार होता. जसजसं पुढे जावं, तसा निसर्गाचा पट बदलत होता.



कड्याच्या टोकाशी पाण्याकडे उतरणारी एक वाट दिसत होती. ही वाटही पुढे पोंसेबोसला जाते. तिकडून ट्रेकला सुरुवात केली, तर पाण्याच्या बाजूने जात असल्याने चुकून ही वाट धरण्याची शक्यता असते. पण या वाटेने कडा चढणं येरागबाळ्याचे काम नोहे!


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



काही जागांबद्दल कितीही वाचलं, फोटो बघितले तरी प्रत्यक्ष तिथे गेल्यावर होणारा परिणाम काही वेगळाच असतो. निसर्गाचं रौद्रभीषण सौंदर्य आपल्या क्षुद्रतेची जाणीव करून देतं, पण ही जाणीव आपल्याला निसर्गाच्या जवळही घेऊन जाते. तर दुसरीकडे कुणा अनाम लोकांच्या कष्टांमुळे आपण हे सृष्टीचं रूप किती सहज पाहू शकतो, याची मनाला टोचणीही लागते.





चढ संपल्यावर थोडी सपाटी लागली. चालायला सुरुवात केल्यापासून प्रथमच एवढी मोकळी जागा लागली होती. दोन्ही दिशांनी येणारे लोक इथे थांबत होते. आम्हीही थोडे दमलो होतो. त्यामुळे १०-१५ मिनिटं विश्रांती घेतली. इथे सगळ्यांचीच फोटोग्राफी सुरू होती. पण कोणीही त्या नादात अतिसाहस करताना दिसलं नाही. उंचावर आल्याने मागचा मार्ग लांबवर दिसत होता.



सपाटीला वळसा घालून पुढे गेल्यावर मागचं दृश्य पूर्ण बदलून गेलं.



आता पोंसेबोसला पोहोचेपर्यंत उतार होता. एकदोन जागी दगडात पायऱ्याही खोदलेल्या होत्या.

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.





या वाटेची कोणे एकेकाळी देखभाल करणाऱ्यांसाठी बांधलेलं घर असावं.

थोडं चालल्यावर वाट खूप अरुंद झाली. उतार संपायचं नाव घेत नव्हता. इथे दगडधोंडेही खूप होते. त्यामुळे उतरताना लक्ष देणं भाग होतं.





उतार संपतासंपता तळाशी पार्क केलेल्या गाड्या दिसू लागल्या. पायवाटेचा शेवटचा टप्पा दगडात बांधलेला आहे. वाट गाडीरस्त्याशी येऊन थांबली. रस्त्यापलीकडे कारेस नदी तिच्या लयीत वाहत होती. काही क्षणांसाठी ढग बाजूला झाले आणि आम्हाला भोवती असलेल्या शिखरांचं प्रथमच दर्शन झालं.





❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# मोनालिसाच्या गूढ स्मिताची विलक्षण रहस्यकथा

सकाळी मोनालिसाच्या दालनात शिरता शिरता "लोरेंझो, लोरेंझो, लिबेरामी..." असे शब्द कानावर पडले. इटालियन भाषेत 'लिबेरामी' म्हणजे "मला सोडव"... हा काय प्रकार आहे? हा लोरेंझो कोण?

**चित्रगुप्त**



मोनालिसा हे जगातले सर्वाधिक प्रसिद्ध चित्र. अगदी एका दिवसासाठी पॅरिसला येणारेसुद्धा ते बघण्याचा आटापिटा करतात. मोनालिसाच्या दालनात नेहमीच प्रचंड गर्दी असल्याने खरे तर कुणालाही ते चित्र धडपणे बघताही येत नाही, आणि एवढा खर्च, आटापिटा करून त्यात बघण्यासारखे एवढे खास असे काय आहे, हेही उमजत नाही.





पूर्वी मोनालिसाला एवढे प्रसिद्धीचे वलय नव्हते, हे खालील चित्रावरून दिसते :



लूव्र म्यूझियमचे हे चित्र सुप्रसिद्ध अमेरिकन संशोधक आणि चित्रकार सॅम्युएल एफ.बी. मोर्स ('मोर्स कोड'चे जनक) यांनी १८३१-३३ या काळात काढलेले आहे. यात काळ्या कोटात वाकून उभ्या असलेल्या मोर्सच्या पलीकडे अगदी खालील ओळीत मोनालिसा अन्य चित्रांच्या दाटीवाटीत बसलेली दिसते.

**बऱ्याच जणांना या चित्राविषयी खालील प्रश्न पडतात :**

१. हे चित्र एवढे प्रसिद्ध का आहे?
२. हे एवढेसे चित्र पूर्ण करायला लिओनार्दोसारख्या प्रतिभावंताला चार वर्षे का लागली असावीत? आणि
३. मोनालिसाच्या गूढ स्मिताचे रहस्य काय आहे ?

यांची समाधानकारक उत्तरे मलाही ठाऊक नव्हती, पण अलीकडेच माझ्या आयुष्यात अचानक घडून आलेल्या एका अद्भुत, अविश्वसनीय घटनाक्रमातून मला या गोष्टींचा उलगडा तर झालाच, त्याखेरीज अनेक अकल्पनीय गूढ गोष्टी नव्यानेच समजल्या (उदाहरणार्थ, जीएंच्या 'इस्किलार' कथेतील 'सेरिपी - एली - इस्किहार'चा मोनालिसाशी - आणि माझ्याशीही - जवळचा संबंध आहे... वगैरे )

मित्रहो, हा सर्व काय प्रकार आहे, हे तुम्हाला सांगायचे, तर ती एक फार मोठी हकीगत आहे. ती माझ्या स्वत::च्या रोजनिशीतून आणि पंधराव्या/सोळाव्या शतकातील 'लॉरेंझो गेरर्दिनी' या इटालियन चित्रकाराच्या रोजनिशीतील नोंदींमधून उलगडू शकते, त्यामुळे या दोन्ही रोजनिश्या इथे देतो आहे:

भाग १. माझ्या ध्वनिमुद्रित रोजनिशीतील काही नोंदी

**पॅरिस दि. १ ऑक्टोबर २०१७. रात्री ११:५५ वाजता.**
मोनालिसासंबंधी प्रश्नांचा, ते चित्र पुन्हा एकदा प्रत्यक्ष बघण्यातून काही उलगडा होतो का हे बघायला आज 'लूव्र'मध्ये गेलो खरा, पण अति गर्दीमुळे चित्र नीट बघता आले नाही. मग इकडे तिकडे फिरताना अचानक एक प्राचीन कट्यार दिसली. का कुणास ठाऊक, त्या कट्यारीविषयी खूपच आकर्षण वाटले, आणि जीएंच्या 'सेरिपी'ची आठवण झाली.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



लूव्रमधील 'सेरिपी'

रात्री घरी आल्यावर पुन्हा एकदा 'इस्किलार ' कथा वाचली... सेरीपी - एली - इस्कीहार... अद्भुतच सगळे....

... रात्रीचे बारा वाजत आलेत, आता झोपावे... उद्या पुन्हा एकदा मोनालिसा जवळून बघण्याचा प्रयत्न करून बघावा.

**पॅरिस दि. २ ऑक्टोबर २०१७.**
सकाळी मोनालिसाच्या दालनात शिरता शिरता "लोरेंझो, लोरेंझो, लिबेरामी..." असे शब्द कानावर पडले. इटालियन भाषेत 'लिबेरामी' म्हणजे "मला सोडव"... हा काय प्रकार आहे? हा लोरेंझो कोण?

मोनालिसाकडे बघतो, तो ती माझ्याकडे आर्तपणे बघत ते शब्द उच्चारात आहे, असा भास झाला. "मला या गर्दीतून सोडव" असे मोनालिसा म्हणत आहे की काय, या कल्पनेने मला हसूच आले.

दालनातल्या प्रचंड गर्दीमुळे चित्राजवळ जाणे शक्यच नव्हते, म्हणून तिथल्या सुरक्षा-प्रमुख बाईला माझा खास आर्टिस्ट पास दाखवून चित्र जवळून बघण्याबद्दल विचारल्यावर तिने रात्री नऊला म्युझियम बंद होण्याआधी फक्त पाच मिनिटांसाठी बघू देण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे नऊला पाच असताना तिथे गेलो. सगळ्या प्रेक्षकांना बाहेर काढल्यावर तिने मला कठड्याच्या आत जाऊ दिले. ... पुन्हा तोच भास : "लोरेंझो, लिबेरामी... लिबेरामी..." थक्कच झालो.

सुट्टीची वेळ झाल्यानं असेल, पण आता बाईच्या चेहऱ्यावरचे कडक भाव मावळून ती जरा रिलॅक्स झाल्यासारखी वाटत होती, म्हणून तिला मोनालिसाबद्दल मला पडणारे प्रश्न आणि "लोरेंझो, लिबेरामी... लिबेरामी..."बद्दल विचारले.

माझे प्रश्न ऐकताना तिच्या चेहऱ्यारचे भाव झरझर बदलत होते. आधी ती अवाक झाली, आणि शेवटी खूप समाधानाने तिचा चेहरा फुलून आला. "छान, छान. तू जरा खाली लॉयन गेटजवळ थांबतोस का? मी येतेच तिथे, मग आपण बोलू."

दहा मिनिटात आल्या आल्या ती म्हणाली, " मी आता तुला जे सांगणार आहे, ते ऐकून तू मला वेड्यातच काढशील, पण ते खरे आहे. मी या दिवसाची कधीपासून वाट बघत होते. पॅरिस सोडून मला माझ्या वृद्ध आईवडिलांकडे गावी जायचे आहे, पण माझ्यावर असलेल्या मोठ्या जबाबदारीमुळे ते शक्य नव्हते. पण लोरेंझो, शेवटी आज तू आलास ... आता मी मोकळी झाले "

मला काही कळेचना, हा सर्व काय प्रकार आहे ते.

"आता मी काय सांगते ते नीट ऐक आणि त्याप्रमाणे कर" असे म्हणत तिने एक लहानशी मखमली मंजुषा माझ्या हातात ठेवली. ती उघडताच आतल्या तेजस्वी रत्नाकडे बघून माझे डोळे दिपले.

"इस्किहार' रत्न आहे हे. अतिशय मूल्यवान. प्राचीन काळी ग्रीसमधील डेल्फीच्या मंदिरात होते हे रत्न. पुढे शार्लमेनच्या काळात ते पॅरिसला आणले गेले ... पण ते जाऊ दे. आता तू हे रत्न अगदी जपून ठेव, आणि उद्याच ते घेऊन 'क्लो ल्यूस 'ला जा. तिथेच तुझ्या प्रश्नांची उत्तरे तुला मिळतील "

एवढे बोलून सेन नदीवरील पूल झरझर ओलांडून ती दिसेनाशीसुद्धा झाली.

मी आश्चर्यचकित होऊन घरी परतलो आणि 'क्लो ल्युस'चा अर्थ शोधला : लिओनार्दो दा विंची १५१६ साली राजा फ्रान्सिस-१ याने आमंत्रित केल्याने फ्रान्समध्ये येऊन १५१९मध्ये मृत्यू पावेपर्यंत ज्या जागी रहात होते, ती जागा म्हणजे 'क्लो ल्युस'.

आता उद्याच तिकडे जायचे.

( क्लो ल्यूस दि. ३ ऑक्टोबर २०१७. संध्याकाळी ७:३० )







कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



क्लो ल्यूसचे बाहेरून दृश्य आणि लिओनार्दोचे दा विंचीचे शयनकक्ष.

थोड्या वेळापूर्वी क्लो ल्यूसला येऊन पोहोचलो. पोहोचायला खूपच उशीर झाल्याने घाईघाईत एक फेरी मारून सर्व बघावे लागले. या प्राचीन वास्तूत त्या प्रतिभावंताचे पावलोपावली जाणवणारे अस्तित्व अनुभवून मी अगदी भारावून गेलेलो आहे. मी चित्रकार आहे, आणि इथला सर्व भाग फिरून बारकाईने बघायचा आहे, असे सांगितल्यावर जवळच्याच एका जुनाट घरात माझी रात्री राहण्याची सोय करण्यात आली आहे.



बापरे ! या घरात एकट्याने रात्र काढायची म्हणजे कठीणच आहे.....

**क्लो ल्यूस दि. ४ ऑक्टोबर २०१७.**
**रात्री २ :३०**
घरात आलो खरा, पण भीतीने अजिबात झोप लागत नाहीये. कुठून आपण इथे आलो, असे झालेय. कशीतरी रात्र पार पडली की अगदी सकाळी पॅरिस गाठायचे, आणि ते रत्न त्या बाईला परत करायचेय ....

**पहाटे ४:००**
पहाटे जरा डोळा लागला, तेवढ्यात कसल्यातरी आवाजामुळे जरा जाग आली. खिशातला रेकॉर्डर सुरू करून ठेवला, तेवढ्यात अचानक "लोरेंझो, बाहेर ये" असे शब्द स्पष्टपणे कानावर पडले. खडबडून जागा झालो. उठून इकडे तिकडे बघतो, तर तिथे कुणीच नाही. मात्र बाहेरून तीच हाक पुन्हा पुन्हा ऐकू येत होती.

खोलीचं अवजड, जुनाट लाकडी दार उघडून आता बाहेर आलो आणि बघतो तर .... टिपूर चांदण्यात मोठमोठ्या वृक्षांच्या भेसूर वाटणाऱ्या सावल्यांमधे उभी, पायघोळ अंगरखा घातलेली, छातीपर्यंत पांढरीशुभ्र दाढी रुळणारी गूढ व्यक्ती .... तीच मला साद घालत आहे : "लोरेंझो, ये. मी तुझीच वाट पाहत होतो"

... आश्चर्यच आहे.... ही दिव्य व्यक्ती कोण, आणि मला 'लोरेंझो' म्हणून का बोलावत आहे? काहीच काळात नाहीये. मी भारल्यासारखा त्या व्यक्तीजवळ जाऊन पोहोचलोय.

"अरे, मी लिओनार्दो, ओळखले नाहीस? तू माझा पट्टशिष्य, लोरेंझो गेरर्दिनी ... एली गेरर्दिनीचा भाऊ. चल, आपण स्टुडियोत जाऊ या" म्हणत ते झपाझप चालू लागल्यावर मीही भारल्यासारखा मागोमाग जाऊ लागलोय.

आता आम्ही स्टुडियोत पोहोचलोय. इथे भिंतीवर तीन चित्रे लागलेली आहेत. हीच तीन चित्रे लिओनार्दोने १५१६ साली इटलीतून फ्रान्समध्ये येताना बरोबर आणली होती, मला ठाऊक आहे. यातले एक म्हणजे सुप्रसिद्ध 'मोनालिसा'.



त्या चित्रांकडे हात दाखवत लिओनार्दो म्हणाले, "आठवते ना लोरेंझो, इटलीतून आपण ही तीन चित्रे मोठ्या कसोशीने आल्प्स पर्वत ओलांडून इथे घेऊन आलो.. तुझ्या बहिणीचे, 'एली'चे हे चित्र तर आपण प्राणपणाने जपत आणलेले आहे. राजा फ्रान्सिसने आपल्याला हा प्रासाद रहाण्यासाठी दिला.... आठवले ना आता?"

.... ही 'एली' कोण? आणि मोनालिसाच्या चित्राला ते माझ्या बहिणीचे, 'एली'चे चित्र का म्हणत आहेत? मला खरे तर हा सर्व भास आहे, स्वप्न आहे की वास्तव, हेच कळत नाहीये... आणि हळूहळू माझे वर्तमानकाळाचे, देहाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे भान हरपत चाललेले आहे.

"बरं, तू जरा फिरून ये, म्हणजे आठवेल सर्व काही, आणि हो, आणि येताना 'सेरिपी' आणायला विसरू नकोस " असे म्हणत त्यांनी चौकातील एका दाराकडे हात दाखवला. मी ओढल्यासारखा त्या दाराकडे खेचला गेलो...

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



त्या दरवाजातून बाहेर पडल्यावर आणखी एक लोखंडी फाटक दिसले.



फाटकातून पलीकडे गेल्यावर समोर काही पायऱ्या आणि एक इमारत दिसते आहे....



पायऱ्या चालून त्या इमारतीच्या सज्जात आल्यावर समोर दूरवर दिसणारे दृश्य थक्क करणारे आहे.. अरे, हे तर एल ग्रेकोने रंगवलेले टोलेडोचे दृश्य... हे इथे फ्रान्समध्ये कसे ?

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



कृष्णमेघांनी भरून आलेले, काळवंडलेले आकाश, दूरवर दिसणारे प्राचीन प्रार्थनामंदिर आणि जर्जर इमारती, डोंगरांचे चढ-उतार, पाउलवाटा आणि नदीवरील पूल... हे तर 'एल ग्रेको' च्या चित्राने अजरामर केलेले स्पेन मधील 'टोलेडो' गाव....

... माझे भान पुरतेच हरपत चालले आहे...मला भोवळ येते आहे......मी पडणार आता...

**संपादकीय तळटीप:** चित्रगुप्त यांनी या कथामालिकेची सुरुवात मिपाच्या दिवाळी अंकात पहिले पुष्प प्रकाशित करून केली आहे.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# हे टाळता आले असते? वारिग फ्लाईट २५४

अखेर उजवे इंजीन प्रथम आणि त्यानंतर दोन मिनिटांनी डावे बंद पडले आणि ९ वाजून ६ मिनिटांनी विमान जंगलात कोसळले. मात्र दोन्ही वैमानिकांनी आपले कौशल्य पणाला लावून, कोसळताना किमान नुकसान होईल याचा प्रयत्न केला.

**लाल टोपी**



गेल्या काही वर्षांत मलेशियन एअरलाइन्सच्या, एअर एशियाच्या किंवा काही दिवसांपूर्वी कोलंबियात फुटबॉल संघाच्या विमानाला अपघात झाले आहेत. नॅशनल जिओग्राफिक आणि डिस्कव्हरी या वाहिन्यांवर 'एअरक्रॅश इन्व्हेस्टिगेशन' ही मालिका नियमित पाहत असे. विमान अपघाताच्या कारणांचा मागोवा घेण्याची प्रक्रिया अतिशय रोचक पद्धतीने या मालिकेत मांडली जात असे. अशाच काही अपघातांमध्ये उघड झालेली कारणे अनेकदा चकित करणारी आणि म्हणूनच 'अरे, इतक्या साध्या चुकांमुळे गंभीर अपघात झाले, मनुष्यहानी झाली किंवा गंभीर अपघात होता होता वाचला' असा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही. तर अशाच विषयावर हा लेख आधारित आहे. वर उल्लेख केलेल्या दूरदर्शन मालिका त्या विशिष्ट अपघातासाठी केवळ संदर्भ म्हणून उपयोगी पडल्या आहेत. या विषयातील माझा काही अभ्यास नाही, केवळ आवड म्हणून विविध अपघातांबद्दल त्या वेळेस वृत्तपत्रांत आलेल्या बातम्या, वेगवेगळे लेख, अहवाल, विकी या सर्वांचा अभ्यास करून लिहिला आहे.

३ सप्टेंबर, १९८९. वारिग एअरलाइन्सचे फ्लाईट-२५४ ब्राझीलमधील साओ पावलो ते बालेम या प्रवासासाठी सकाळी ९.४३ला निघाले. या प्रवासात सहा ठिकाणी थांबत संध्याकाळी नियोजित ठिकाणी - बालेमला पोहोचणार होते.

३ सप्टेंबर १९८९ हा दिवस ब्राझिलच्या फुटबॉल चाहत्यांसाठीदेखील अतिशय महत्त्वाचा होता. ब्राझिल चिलीबरोबर १९९०च्या विश्वकप फुटबॉलच्या पात्रता फेरीचा अंतिम सामना खेळणार होते. या सामन्यात विजय मिळाला, तरच ब्राझिल १९९०च्या विश्वकप स्पर्धेसाठी पात्र ठरणार होता. या देशाचे फुटबॉलप्रेम साऱ्या जगाला माहीत आहेच. त्यामुळे सम्पूर्ण देशाचे लक्ष या सामन्याकडे लागून राहिले होते.



सकाळी ९.४३ला साओ पावलोहून निघालेले वारिग-२५४ दिवसभरात पाच ठिकाणांचे थांबे घेत संध्याकाळी ५.३० वाजता माराबा येथून त्या दिवसाच्या अंतिम थांबा असणाऱ्या बालेमच्या दिशेने निघण्याची वाट पाहत होते. साधारणत: त्याच वेळेस ब्राझिल-चिली फुटबॉलची लढतही सुरु झाली होती.

मराबा ते बालेम हे अंतर ३४६ कि.मी. आणि साधारणत: ४८ मिनिटांचे आहे. या प्रवासामध्ये ४७ प्रवासी आणि ७ कर्मचारी असे एकूण ५४ प्रवासी होते.

वैमानिकांनी त्या वेळेस वापरात असणाऱ्या एअरक्राफ्ट परफॉर्मन्स मॅनेजमेंट सिस्टम (पीएमएस) या प्रणालीमध्ये मराबा ते बालेम या प्रवासाशी निगडित सर्व माहिती भरली. त्याच वेळेस विमानाच्या दिशादर्शनासाठी असलेल्या हॉरिझाँटल सिच्युएशन इंडिकेटरमध्ये २७० अंश ही माहिती भरून विमान उड्डाणासाठी तयार झाले. हे उपकरण भरलेल्या माहितीनुसार विमानाने संध्याकाळी ५.४५ला मराबा येथून उड्डाण केले. ऑटो पायलटने १५८ अंशाच्या कोनात वळत निर्धारित केलेली दिशा पकडली.

फ्लाईट प्लाननुसार वैमानिकांनी बालेमच्या आसपास पोहोचल्यावर नित्याच्या प्रक्रियेप्रमाणे नियमित ध्वनिलहरीवर बालेम नियंत्रण केंद्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र अनेक वेळा प्रयत्न करूनही त्यात यश आले नाही. त्यामुळे त्यांना उपलब्ध असणारा दुसरा पर्याय या विमानाच्या कर्मचाऱ्यांनी अवलंबला. त्यांच्याकडे उच्च ध्वनिलहरी असलेला रेडिओ सेट वापरून बालेमशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. या वेळी मात्र बालेमशी त्यांचा संपर्क झाला. त्या वेळी आपण बालेमच्या जवळ असून विमानतळावर उतारण्याच्या तयारीचा भाग म्हणून कमी उंचीवर येण्याची परवानगी मागतली. बालेम विमानतळावर १९८९मध्ये रडार व्यवस्था उपलब्ध नव्हती. त्यामुळे नियंत्रण कक्षातील कर्मचारी वैमानिकाने सांगितलेल्या अंतराबाबत स्थानावरच अवलंबून होते. नियंत्रण कक्षाकडून त्यांना उतरण्याची परवानगी मिळाली.

आतापर्यंत ब्राझिल-चिली फुटबॉल सामन्यात ब्राझिलने १-० अशी आघाडी घेतली होती.

कमी उंचीवर आल्यानंतर बालेमशी निगडित भौगोलिक ओळखीच्या खुणा - उदा. मरझो आयलंड्स, ॲमेझॉन नदी दिसून येत नव्हत्या. बालेमच्या ओळखीच्या खुणा शोधत असतानाच पीएमएसने उणे अंतर दाखवायला सुरुवात केली - म्हणजेच निर्धारित मार्गानुसार विमान बालेमपासून पुढे निघाले होते. त्यामुळे कॅप्टन गोमेझने १८० अंशाच्या कोनात वळवून तो बालेमच्या ओळखीच्या खुणा शोधण्याचा प्रयत्न करू लागला. त्यासाठी त्याने कमी उंचीवरून आणि कमी वेगाने प्रवास सुरू केला. (४००० फूट आणि ३७० की.मी.) या प्रयत्नात त्याला नदी दिसली. ती ॲमेझॉनच आहे, असे समजून त्या नदीच्या प्रवाहाचा संदर्भ घेऊन पुढील प्रवास चालू ठेवला. आतापर्यंत नियोजित वेळेपेक्षा ३० मिनिटे जास्त लागली होती.

इकडे फुटबॉलचा सामना विचित्र स्थितीत पोहोचून ब्राझिल पराभूत झाले होते. सामना संपायला २० मिनिटे बाकी असताना ब्राझिल १-० असा आघाडीवर होता, त्याच वेळी चिलीच्या गोलरक्षकावर धारदार शस्त्राने हल्ला झाल्यामुळे सामना मध्येच थांबवून चिलीचा विजय झाल्याचे जाहीर झाले होते. १९९०च्या विश्वकप स्पर्धेसाठी ब्राझिल पात्रही ठरले नव्हते. ही अभूतपूर्व घटना होती. ब्राझीलसाठी तर राष्ट्रीय शोक असल्याची घटना होती. (मात्र काही दिवसांनी


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

नाट्यपूर्ण घटना घडून ब्राझिलला विजयी घोषित करण्यात येऊन विश्वकप स्पर्धेच्या अंतिम सामन्यापर्यंत पोहोचले. हा घटनाक्रमदेखील अतिशय रोचक आहे. परंतु तो एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. त्याविषयी पुन्हा कधीतरी).

नियोजित वेळेपेक्षा ३० मिनिटे जास्त लागल्यामुळे आणि अजूनही बालेमच्या खुणा दिसत नसल्याने प्रवासीदेखील अस्वस्थ होऊ लागले. फर्स्ट ऑफिसर झिलेच्या मते त्यांच्या दिशादर्शनात चूक होऊन ते बालेमऐवजी सांतारेम विमानतळाच्या जवळ पोहोचले असावेत. त्यामुळे फर्स्ट ऑफिसर आणि कॅप्टनने नजीकच्या विमानतळावर पोहोचण्याचा निर्णय घेतला. त्यांनी रेडिओवरून बालेमशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यात यश आले नाही.

आता नवीनच आणि गंभीर समस्या उद्भवली होती. नजीकच्या विमानतळापर्यंत पोहोचण्याएवढे इंधन विमानात नव्हते. अखेर रात्री ०८.०५ला बालेम नियंत्रण कक्षाकडून 'तुमच्या निश्चित ठिकाणाविषयी माहिती द्या' असा संदेश मिळाल्यावर गोमेझ आणि झिले यांच्या समजाप्रमाणे ते करजान विमानतळाजवळ असल्याचे त्यांनी कळवले. मात्र आतापर्यंत गोमेझ आणि झिले दोघेही दिशा जाणून घेण्याबाबत एकंदरीतच गोंधळून गेले होते.

अखेर रात्री ८.३०च्या सुमारास, उपलब्ध असलेल्या इंधनात कोणत्याही नजीकच्या विमानतळावर पोहोचण्याची शक्यता नसल्यामुळे गोमेझ आणि झिले यांनी आपातकालीन स्थितीत रेन फॉरेस्टमध्येच विमान उतरवण्याचे ठरवले. वास्तविक ते नक्की कोठे आहेत हे त्यांना माहीत असते, तर अगदी याच वेळी ते सेरा दे कचिंबो या हवाईतळापासून गेले, तेथे बोइंग ७३७ सहज उतरू शकले असते.

त्या वेळी अशा स्वरूपाच्या स्थितीत निश्चित कोणती प्रक्रिया वापरावयाची याची कार्यप्रणाली तयार केलेली नव्हती, त्यामुळे या दोघांनीच त्यांच्या अनुभवानुसार योजना तयार केली. त्यानुसार इंधन संपूर्ण वापरले जाईपर्यंत योग्य ती उंची आणि किमान आवश्यक वेग (८००० फूट आणि ताशी २७८ कि.मी.) कायम ठेवून उडत राहायचे, त्यामुळे आपात स्थितीत जमिनीवर आपटल्याने स्फोट होऊन आग लागण्याची शक्यता टाळता येणार होती. दुसरे म्हणजे इंजीन सुरू असल्याने विमान उतरताना आवश्यक असणाऱ्या इतर कार्यप्रणालीदेखील त्यांना सुरू ठेवता येणार होत्या. रात्री ८.४०ला मुख्य वैमानिकाने 'इंधन संपत आल्यामुळे आता जंगलात आपात स्थितीत उतरत आहोत' असा संदेश बालेम नियंत्रण केंद्राला दिला आणि १० मिनिटे पुरेल इतके इंधन शिल्लक असताना आपण ॲमेझॉनच्या जंगलात उतरत आहोत ही माहिती प्रवाशांना दिली.

अखेर उजवे इंजीन प्रथम आणि त्यानंतर दोन मिनिटांनी डावे बंद पडले आणि ९ वाजून ६ मिनिटांनी विमान जंगलात कोसळले. मात्र दोन्ही वैमानिकांनी आपले कौशल्य पणाला लावून, कोसळताना किमान नुकसान होईल याचा प्रयत्न केला.

५४पैकी सहा प्रवासी या वेळी मृत्यू पावले. सात प्रवासी गंभीर जखमी, तर बाकी सर्व प्रवासी किरकोळ जखमांसह सुखरूप होते. मात्र घनदाट जंगलात अन्नपाण्याशिवाय अडकून पडले होते. ही रविवारची रात्र होती.



बालेम विमानतळावरून रात्रीच शोधमोहिम सुरू करण्यात आली. आसपासच्या जंगलात कसून शोध घेण्यात आला. मात्र दोन दिवस उलटले, तरी विमानाचे अवशेष किंवा प्रवासी यांचा काहीही तपास लागला नाही.

इकडे दोन दिवस मदतीची वाट पाहून, जे चालू शकत होते आणि कमी जखमी झाले होते अशा चार प्रवाशांनी मदत शोधण्यासाठी स्वतःच जायचे ठरवले. जंगलात सुमारे ३ तास पायपीट केल्यानंतर त्यांना एक फार्म हाउस मिळाले. परंतु तेथे बाहेरच्या जगात संपर्क साधण्याची काहीही सुविधा नव्हती. अखेर मोटारीने दुसऱ्या फार्मवर पोहोचून नजीकच्या फ्रांका विमानतळावर संदेश पोहोचला आणि मंगळवारी दुपारी १२.३० वाजता वारिग फ्लाइट-२५४चा निश्चित ठावठिकाणा मिळाला. अपघाताचे ठिकाण घनदाट जंगलात असल्याने तेथे तत्काळ पोहोचणे सहज शक्य नव्हते, म्हणून हवाई दलाच्या विमानांनी दुपारी अन्नाची पाकिटे टाकली. दुसऱ्या दिवशी, म्हणजे बुधवारी दुपारी सर्व प्रवाशांची तेथून सुटका करण्यात आली. मात्र गंभीर जखमी झालेले ७ प्रवासी तोपर्यंत मरण पावले होते. ४१ प्रवासी या अपघातातून सुखरूप वाचले.

अपघाताची चौकशी लगेचच सुरू झाली. अपघाताचे ठिकाण चौकशी अधिकाऱ्यांना बुचकळ्यात टाकणारे होते. मराबापासून बालेमच्या विरुद्ध दिशेला सुमारे ९६५ कि.मी.वर अपघात झाला होता. मूळ फ्लाईट प्लाननुसार विमान येथे पोहोचणे अजिबात अपेक्षित नव्हते. त्यामुळे विमानाचा शोध घेताना या भागाकडे अजिबात लक्ष दिले गेले नव्हते. अधिक तपास केल्यानंतर एका धक्कादायक गोष्टीचा उलगडा झाला.



प्रवासाचा अपेक्षित मार्ग


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



अपघाताचे ठिकाण

कॅप्टन गार्सेज नुकताच सुट्टी संपवून कामावर हजर झाला होता. दरम्यानच्या काळात फ्लाईट प्लानमध्ये विमानाच्या दिशेचा उल्लेख करण्याच्या पद्धतीत बदल झाला होता. पूर्वी तीन अंकांत केला जाणारा उल्लेख आता चार अंकांत केला जाऊ लागला होता, याची काहीच कल्पना नसलेल्या गॉर्सेजने मरीबा ते बालेम या प्रवासाठी दिशादर्शक माहिती भरताना प्लानमध्ये असलेली ०२७० ही माहिती २७०.० अशी भरली. प्रत्यक्षात ०२७.० उजवीकडचा शेवटचा अंक दशांश चिन्हाच्या नंतर असायला हवा होता. त्यामुळे २७ अंशाच्या कोनात वळण घेण्याऐवजी ते २७० अंशात घेतले गेले आणि सुरुवातीपासूनच विमान दिशा भरकटले होते. खरे तर साहाय्यक वैमानिकाने आपली माहिती भरताना ही चूक त्याच्या लक्षात यायला हवी होती. ती लक्षात आली नाही, कारण वैमानिकाने जी माहिती भरली होती, त्याचीच त्याने कॉपी केली. नियमाप्रमाणे असे करणे चुकीचे होते.

ही मुख्य चूक लक्षात येण्याच्या अनेक संधी या दोघांनी गमावल्या. बालेमला मराहून पूर्वेला जाणे अपेक्षित होते. मात्र उड्डाणानंतर विमानाने मावळतीच्या सूर्याच्या दिशेने मार्ग धरला होता. अनुभवी वैमानिकांच्या हे सहज लक्षात आले असते. या मार्गावर नेहमी प्रवास करणाऱ्या किमान तीन प्रवाशांनी आपण नेहमीच्या मार्गापेक्षा वेगळ्या दिशेने जात आहोत हे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आणून दिले होते. पण "कॅप्टनला आपल्यापेक्षा जास्त कळते" असे उत्तर देऊन त्यांना गप्प करण्यात आले.

बालेम नियंत्रण कक्षाबरोबर संपर्क साधताना नेहमीच्या फ्रिक्वेन्सीवर वैमानिक संपर्क साधू शकले नाहीत, कारण स्पष्ट होते - ते बालमपासून खूप दूर होते. त्यामुळे त्यांना उच्च फ्रिक्वेन्सी असणाऱ्या रेडिओच्या वापर करावा लागला. ही बाब वैमानिक आणि नियंत्रण केंद्रातील कर्मचारी या दोघांच्याही लक्षात यायला हवी होती, परंतु लक्षात आली नाही.

लक्षात आले नाही, कारण...

या प्रकरणाशी असंबद्ध अशी वाटणारी फुटबॉल सामन्याची माहिती वर मध्ये मध्ये आली आहे. खरोखरी तसा संबंध नसायला हवा होता. मात्र प्रत्यक्षात तसा संबंध होता. वैमानिक, नियंत्रण केंद्रावरील कर्मचारी त्या वेळी रेडिओवरून प्रसारित होत असलेले फुटबॉल सामान्याचे वर्णन ऐकत होते. तसे पुरावे मिळाले आहेत. सामना रोमांचक आणि अनेक घडामोडींनी भरलेला होता. त्यामुळेच इतर साधारण परिस्थितीमध्ये ज्या गोष्टी सहज लक्षात आल्या असत्या, त्या या ठिकाणी लक्षात आल्या नाहीत आणि हा अपघात घडला.

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# स्मृतीगंध

ग्रूपमध्ये दोघांचे विचार जुळायचे. वैचारिक पातळीवर तो तिला जवळचा वाटायचा. ग्रूपमध्ये वादावादी झाली की ते दोघेही नकळत एकमेकांची बाजू घ्यायचे. अद्वैत जरा सावळा, अभ्यासात हुशार आणि वादावादीत मुद्देसूद बोलण्याने सामोरच्याची हवाच काढून टाकायचा. पुढे जवळीक वाढत गेली. कधी ग्रूपमध्ये, तर कधी ग्रूपशिवाय कँटीनमध्ये भेटीगाठी वाढू लागल्या. कॉफीच्या एका कपाभोवती गप्पा रंगू लागल्या आणि अद्वैतच्या विनोदी स्वभावाचा नवाच पैलू तिला जाणवायला लागला आणि भावलाही.

**प्रभाकर पेठकर**



दिवाळी तोंडावर आली होती. शनिवार-रविवारला जोडून सोमवारची सुटी आल्याने आज नीरजाने फराळाचा घाट घातला होता. सकाळपासून चिवडा आणि चकल्या बनवून झाल्या होत्या. आता जरा निवांत बसावं आणि घोटभर चहात श्रमपरिहार शोधावा, असा विचार करून नीरजाने चहा टाकला. आता उद्या बेसनाचे लाडू बनवू या, की मग बस झालं. बाकी सर्व बाजारातून तयार आणायचं. हल्ली पूर्वीसारखी श्रमाची कामं जमत नाहीत आणि तेवढा उत्साहही नाही राहिला. रवी - तिचा नवरा - नेहमी तिला चिडवायचा की आता तू म्हातारी झालीस. कशाला हे सर्व घरी करायचं? बाजारातूनच आण. पण तिला आपल्या हातचे निदान २-४ पदार्थ तरी आपल्या नवऱ्याच्या आणि मुलाच्या पोटी जावेत असं वाटायचं.

कपात चहा गाळून आणि चवीला म्हणून २ चकल्या घेऊन ती गॅलरीतल्या खुर्चीत विसावली. संध्याकाळचे ५ वाजले होते. सहाव्या मजल्यावरून खाली नजर टाकली. खाली कॉलनीत संध्याकाळची एक निवांत धावपळ चालू होती. दिवाळीसारखा मोठा आणि महत्त्वाचा सण तोंडावर आल्याने कॉलनीच्या मारवाड्याच्या दुकानात चांगलीच गर्दी होती. दिवाळी आल्यामुळे मारवाड्याचं दुकानही विविध वस्तूंनी खचाखच भरलं होतं. वेगवेगळ्या भाजण्या, अनारशाच्या पिठापासून तयार मिठाई आणि आकाश कंदील, फटाके सर्व काही होतं. त्यामुळे दुकान गिऱ्हाइकांनी फुललं होतं.

हवेत छान गारवा होता. वाराही जरा उदार मनाने वाहत होता. चहा घेता घेता नीरजा रिलॅक्स झाली. आजची फराळाची कामं आटोपली होतीच. रात्रीचा स्वयंपाकही करायचा नव्हता. रात्री जेवायला बाहेर जायचं होतं. तिच्या मुलाच्या - सुशांतच्या - बॉसने जेवणाचं आमंत्रण दिलं होतं. खाली कॉलनीतील मुलांचा गोंगाट चालू होता. 'शर्वरीsss, मालविकाsssss, अनन्ताsssss' अशा ललकाऱ्यांनी बाल उत्साह ओसंडत होता. दिवाळीची सुट्टी 'एन्जॉय' करणं चाललं होतं. मॅगी, दूध-बिस्किटं खाऊन ही मुलं खेळायला नुकतीच बाहेर पडली असणार. तिच्या लहानपणी भारतात 'मॅगी'चं आगमन झालं नव्हतं. एवढंच काय, हॉटेलिंग हा प्रकारही नव्हता. घरीच सांजा, पोहे, पोळीचा कुस्कुरा, दूध पोळी नाहीतर फोडणीचा भात हीच पंचपक्वान्नं असायची. शाळेत तर कित्येकदा, तिला आवडायचं म्हणून पोळीचा लाडू नाहीतर गव्हाच्या पिठाचा शिरा असायचा. गव्हाच्या पिठाच्या शिऱ्याने तिच्या शाळेतल्या स्मृती चाळवल्या. तिच्या मैत्रिणींनाही तिच्या आईच्या हातचा गव्हाच्या पिठाचा शिरा खूप आवडायचा. घरचं खमंग साजूक तूप, वेलची पावडर आणि गूळ.... अहाहा!!!

शाळेच्या तिच्या जुन्या मैत्रिणी आठवल्या, सर-मॅडम, मुख्याध्यापक आणि अगदी घंटेचे टोल बडविणारा, सुटीची नोटीस वर्गात आणणारा शिपाईसुद्धा आठवला. ह्या सर्व आठवणी म्हणजे तिच्या चिंतामुक्त जीवनातील दागिने होते. नकळत ती सुखावली. शाळेच्या वर्धापनदिवशी ती नाटकात कामं करायची, भरतनाट्यमचं क्लासेसही लावले होते. अभ्यासात फार हुशार नाही, पण चुणचुणीत होती.

कॉलेजची आणि नवयौवनाची सुरुवात एकत्रच झाली. कॉलेजच्या मैत्रिणी फक्त मराठी भाषक नव्हत्या, तर मिश्र भाषक होत्या. पण विचार जुळले होते आणि आता नुसत्या मैत्रिणी नव्हत्या, तर मित्रही होते. त्यांचा असा ३-४ मैत्रिणी आणि २-३ मित्रांचा चमू होता. अभ्यासाव्यतिरिक्त कँटीनच्या मीटिंग्ज, एकांकिका स्पर्धा, स्पोर्ट्स डे हे सर्व असायचंच, तसंच राजकारण, समाजसेवा, ज्येष्ठांचा शिस्तीचा अवाजवी धोशा असे अनेक गंभीर आणि चेष्टेचे विषय असायचे. कृतु (कृतिका), मितू (मिताली), अनु (अनघा), सागू (सागरिका) वगैरे मैत्रीणी आणि रुष (ऋषी), आदू (अद्वैत) (पण तिला आदू नाही, तर अद्वैत नांवच खूप आवडायचं), वैभू किवा भूभू (वैभव) वगैरे मित्र एखाद्या विषयावर शिरा ताणताणून वाद घालायचे. आवाज खूप वाढला की कँटीनचा तंबी येऊन तंबी देऊन जायचा. मग गाडी सौम्य विषयांकडे वळायची.

"नीरजाssss, ए नीरजाssss!" नीरजा दचकून भानावर आली. देशपांडे आजी खालून हाका मारत होत्या.

"काय हो?"

"अगं, किती हाका मारल्या? काय करते आहेस? झाली का फराळाची तयारी?"

"हो, झाली. या की वरती चव पाहायला."

"अग नको. वेळ नाहीए अजिबात. सामान आणायला निघाले आहे."

"बsssssरं" तिलाही आजी आत्ता वर यायला नकोच होत्या. आत्ता तिच्या निवांत समयी तिला एकांत हवा होता.

नवरा अजून ऑफिसातून आला नव्हता आणि मुलगा त्याच्या खोलीत कॉम्प्युटरवर मग्न होता. नाही म्हटलं तरी अद्वैतच्या आठवणी जाग्या झाल्याच.

ग्रूपमध्ये दोघांचे विचार जुळायचे. वैचारिक पातळीवर तो तिला जवळचा वाटायचा. ग्रूपमध्ये वादावादी झाली की ते दोघेही नकळत एकमेकांची बाजू घ्यायचे. अद्वैत जरा सावळा, अभ्यासात हुशार आणि वादावादीत मुद्देसूद बोलण्याने सामोरच्याची हवाच काढून टाकायचा. पुढे जवळीक वाढत गेली. कधी ग्रूपमध्ये, तर कधी ग्रूपशिवाय कँटीनमध्ये भेटीगाठी वाढू लागल्या. कॉफीच्या एका कपाभोवती गप्पा रंगू लागल्या आणि अद्वैतच्या विनोदी स्वभावाचा नवाच पैलू तिला जाणवायला लागला आणि भावलाही. तिला खळखळून हसायची सवय होती. तो अगदी मंत्रमुग्ध होऊन पाहत राहायचा.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

आज त्या सर्व आठवणी ताज्या होऊन ती मनोमन सुखावली. शेवटची चकली पुरवून पुरवून खाताना, ते तारुण्याचे क्षण आपण पुन्हा जगतो आहोत असा तिला भास झाला. आयुष्यातील हे सोनेरी क्षण लग्नानंतर तिने मनाच्या पाटीवरून जाणीवपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक पुसून टाकले होते. पण आज त्या अवखळ आठवणी चौखूर उधळल्याच होत्या जणू. आवरायचं म्हटलं तरी आवरत नव्हत्या.

एव्हाना त्यांच्या ग्रूपमधील मित्रमैत्रिणींनी (आणि ग्रूपबाहेरील काही विद्यार्थ्यांनीही) तिच्या आणि अद्वैतच्या नात्याला लेबलं लावायला सुरुवात केली होती. मितूने तर संधी पाहून थेट प्रश्नच केला होता. पण "तसं कांही नाहीये गं!" असं म्हणतानाही 'तसंच' काही आहे असे जिवाला हुरहुर लावणारे भास नीरजाला होऊ लागले होते. तो एक अव्यक्त प्रेमाचा काळ होता.

अद्वैतला त्याच्या बाबांनी एक बाईक घेऊन दिली. बुलेट की काय म्हणतात ती. तर दुसऱ्या दिवशी नीरजा कॉलेजला जायला बस स्टॉपवर उभी होती, तर हा बाईक घेऊन तिच्या समोरच येऊन ठाकला. अगदी फिल्मी. तिच्या आवडीचा टीशर्ट त्याने घातला होता. कस्स्ला रुबाबदार दिसत होता. अद्वैतने नीरजाला त्याच्या बाईकवर बसायची खूण केली. स्टॉपवर तसे ओळखीचे कोणी नव्हतेच. ती सराईताच्या आविर्भावात बसली, पण मनातून 'कोणी बघत तर नाही नं?' आशंकेने घाबरली होती.

"ओढणी नीट आवरून घे आणि माझ्या खांद्याला धर." अद्वैत म्हणाला.

बाईक निघाली, तेव्हा एक हलकासा हेलकावा बसला आणि तिने घाबरून त्याच्या खांद्याला धरलं. मुद्दामहून झालेला तसा तो पहिलाच स्पर्श होता. रस्ताभर तो काय बोलतोय इकडे तिचं लक्षच नव्हतं.

कॉलेज जवळ आलं, तसं ती म्हणाली, "कॉलेजच्या गेटजवळच मला सोड."

पण तो थांबलाच नाही. अगदी थेट, त्यांचा ग्रूप बसला होता तिथेच जाऊन थांबला. ग्रूपमध्ये त्याच्या नवीन बाईकचीच जास्त चर्चा झाली. त्यांच नातं मित्र-मैत्रिणींनी गृहीतच धरलं होतं, हे तिला जाणवलं.

त्या दिवशी ती घरी पोहोचली ते हवेत तरंगतच. बाबा आरामखुर्चीत काहीतरी पुस्तक वाचत होते आणि धाकटा भाऊ उमेश एक मोडका मिक्सर दुरुस्त करायचा प्रयत्न करीत होता. दोघांनी मान वर करून बघितलं, पण काही बोलले नाहीत. नाहीतर नॉर्मली बाबा, "या, झालं का कॉलेज?" किंवा उमेश "आल्या महाराणी धाड मारून" किंवा तत्सम वाक्य फेकायचे. पण आज तसं काही झालं नाही. तिला नवल वाटलं. आईलाच विचारावं. कपडे वगैरे बदलून ती स्वयंपाकघरात गेली.

आईने चहाचा कप हाती देता देताच "कोण होता गं?" असा रोखून पाहत प्रश्न केला.

"क..कोण?" तिने वेड पांघरायचा प्रयत्न केला. पण ह्या एकदम झालेल्या हल्ल्याने ती मनोमन थंडगार पडली होती.

"तोच तो, ज्याच्या खांद्यावर हात ठेवून कॉलेजच्या नावावर गावभर भटकतेस, तो."

माय गॉड! पहिल्याच दिवशी बातमी घरापर्यंत पोहोचली होती. ती स्वतःहून एक दिवस घरात सांगणार होतीच, पण हे म्हणजे फार लवकरच भांडं फुटलं होतं.

"वसंताने पाहिलं तुम्हाला आज." वसंता म्हणजे नीरजाचा मामा. त्याने कधी, केव्हा आणि कुठे पाहिलं, देव जाणे. पण तत्परतेने बहिणीच्या कानावर घातलं होतं. बाहेरच्या खोलीत शांतता होती, पण सहजता नव्हती.

"किती दिवस चाललंय हे?" आईने अजून एक मिसाईल डागलं.

"अगं! कसलं काय? माझा कॉलेजचा मित्र आहे. चांगल्या घरचा आहे. आज पहिल्यांदाच आणि तेही, तो म्हणाला म्हणून त्याच्या बाईकवरून गेले. नेहमी बसनेच तर जाते." तिने आवाजात अगदी सहजता आणायचा आटोकाट प्रयत्न केला. प्रकरण जास्त तापलं नाही. पण "हे असले थेर आपल्या घरात चालणार नाहीत, सांगून ठेवते आहे" असा एक माफक दम मिळाला.

अद्वैत सातार्‍याला गेला होता. ८-१० दिवस येणार नव्हता. त्यामुळे त्याच्यासमोर लपवाछपवी करायचा प्रसंग टळला. तो आल्यानंतरही त्याने ऑफर केलेली लिफ्ट तिने शिताफीने नाकारली आणि बस प्रवासच सुरू ठेवला. त्याला कळेना काय झालं. पण अदरवाईज, त्यांच्यातील नातं हसतखेळतच राहिलं. घरचेही तिच्याशी हसून खेळून वागायला लागले आणि तिने सुटकेचा नि:श्वास टाकला. पण तिच्या नकळत चक्र फिरत होती आणि अचानक बॉंब पडला.

बाबा म्हणाले, "उद्या कॉलेजला जाऊ नकोस. तुला बघायला एक स्थळ येणार आहे."

बापरे, स्थळ? एवढ्या झटपट? ती हादरली, रडली. "अजून शिक्षण पूर्ण होऊ द्या" असाही हट्ट करून पाहिला, पण तिच्या हट्टापुढे नेहमीच नमतं घेणारे तिचे बाबा म्हणाले, "अगं बेटा, त्यासंबंधी बोललोय मी त्यांच्याशी. लग्नानंतर तुझं शिक्षण पुढे चालूच राहील. ते थांबवणार नाहीत."

बराच वेळ तिने वाद घातला, रुसली, अबोला धरला, पण आई-बाबा बधले नाहीत. .............ती हरली.

हे सर्व लवकरच अद्वैतच्या कानावर घालणं गरजेचं होतं. त्यांच्यातलं नातं अव्यक्त असलं, तरी दोघांनीही मनाने स्वीकारलेलं होतं. तिने अद्वैतला समुद्रकिनारी बोलावलं. आज त्यांच्या नात्याचा, सूर्याच्या साक्षीने, अस्त होणार होता. काहीच कल्पना नसलेला अद्वैत खूप आनंदात होता. आज आपल्या नात्याला मूर्त स्वरूप प्राप्त होणार, म्हणून होणारा आनंद अद्वैतच्या चेहर्‍यावरून ओसंडत होता. त्याचा विरस होणार, त्याच्यावर दु:खाचा डोंगर कोसळणार ह्या कल्पनेने तिला खूप वाईट वाटलं, पण नाइलाज होता.

"अद्वैत, माझं लग्न ठरलंय." तिने धाडकन विषयच संपवून टाकला.

"काऽऽऽऽय?" अद्वैतच्या शब्दातील कंप, धार तिला सहन झाली नाही. तिच्या अश्रूंचा बांध तुटला. ती हमसाहमशी रडू लागली. हादरलेला अद्वैत पुरता भांबावला. काय करावं कळेना. पण लवकरच सावरला.

तिला आपल्या आधाराची गरज आहे, हे जाणून त्याने स्वतःचं दु:ख बाजूला ठेवून तो म्हणाला, "नीरजा, काय झालं हे? असं व्हायला नको होतं. पण....शेवटी आई-बाबांची इच्छा त्यांच्या मुलीच्या सुखासाठीच आहे. त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे. तू वाईट वाटून घेऊ नकोस, अपराधी तर मुळीच वाटून घेऊ नकोस. आयुष्यात सर्वच गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होत नसतात."

नीरजा ऐकत होती. अद्वैत बोलत होता. सूर्य अस्ताला जात होता आणि ............ तसंच त्यांचं नातंही.

खूप वेळ दोघेही शांत बसून राहिले. नीरजाने स्वतःला बरंच सावरलं होतं. आकाशात दोन पक्षी बराच वेळ विहरत होते. अद्वैत आणि नीरजा दोघेही त्यांना पाहत होते. त्यांना पाहताना दोन वेगवेगळी मनं एकाच भूतकाळात घुटमळत होती. भूतकाळातून पाय निघत नव्हता. त्या पक्ष्यांवरून आपलं लक्ष दूर करून ते त्या मोहक भूतकाळाला जाणीवपूर्वक दूर लोटण्याचा प्रयत्न करीत होते, पण भूतकाळाच्या दोर्‍या कच्च्या नव्हत्या. दोघांचीही बोटं एकमेकांच्या बोटांमध्ये केव्हा गुंफली गेली, दोघांनाही कळलं नाही.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

ह्या सोनेरी आठवणींतून बाहेर येताना नीरजाने एक मोठ्ठा नि:श्वास सोडला. तिच्या लग्नात, संसारात ती आता सुखी होती. नवरा रवी एक सुशील, घरावर, संसारावर प्रेम करणारा होता. मुलगा सुशांत हुशार होता. दोघांनाही नोकरीत स्थैर्य लाभलं होतं. वरच्या पदांवर होते दोघेही. भूतकाळ हा आता निव्वळ भूतकाळ उरला होता. तिचं वर्तमानावर प्रेम होतं आणि मुलाच्या उज्ज्वल भविष्याबाबत ती आश्वस्त होती. नुकतीच त्याला एका आय टी कंपनीत नोकरी लागली होती. आज त्याच्या बॉसनेच जेवणाचं आमंत्रण दिलं होतं. पंचतारांकित हॉटेलात जायचं होतं. त्या तोलामोलाचा जामानिमा केला पाहिजे. नवरा रवी तसा कितीही हुशार असला, तरी मुखदुर्बळच. अशा बहुतेक प्रसंगात बोलण्याचा जिम्मा तीच उचलायची. पण आज सुशांतची बॉस फॅमिली येणार होती. अघळपघळ गप्पा मारून चालणार नाही. नीट विचार करून बोलायला हवं. आपल्या बोलण्यात काही चूक होऊ नये, म्हणून परीक्षेपूर्वीचे 'अपेक्षित प्रश्न संच', 'संभाव्य प्रश्न' वगैरे गाईडचा अभ्यास मनातल्या मनात ती करत होती.

रवी, सुशांत आणि ती वेळेवरच हॉटेलला पोहोचले. तो पंचतारांकित थाटमाट आणि झगमगाट दडपून टाकणारा होता. सुशांतने स्वागतिकेकडे चौकशी केली आणि त्यांनी त्यांना त्यांच्या आरक्षित टेबलाकडे नेऊन बसविलं. तेवढ्यात सुशांतचा बॉस, त्याची पत्नी आणि सुशांतच्याच वयाची मुलगी असे तिघेही तिथे आले. सुशांतच्या बॉसच्या पत्नीची साडी फार भारी होती. खानदानी श्रीमंत वाटत होती. मुलीची आणि सुशांतची आधीची ओळख असावी, कारण त्याच्याशी हस्तांदोलन करताना त्यांच्या ओळखीची हिंट नीरजाने टिपली होती.

"बाबा, आई, हे माझे बॉस, त्यांच्या पत्नी आणि मुलगी." सुशांत ओळख करून देत होता.

हात जोडत नीरजाने प्रथमच त्यांना पाहिलं.

नकळत ती ओरडली,

"आँ! अद्वैत, तू?"

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पांढरा कावळा

"क्काय?? पेलाय का तू? का गांजा फुकून आलाय?" दत्ताच्या मंदिरातला पुजारी घामाघूम होऊन म्हणाला.

"खरंच दिसला वो. दोन कोसावर बाभळीचं झाड हाय. तिथंच बसला हुता." झोळी खाली ठेवत मी म्हणालो.

"आसंल. मग?"

"मग काय? पांढरा हुता त्यो."

**जव्हेरगंज**



झोळी पाठीवर घेतली. एक हात जमिनीवर टेकवून सावकाश उठलो. सूर्य टाळ्यावर आला होता. खडकाळ डोंगर. मृगजळांचं राज्य असलेली ती टेकाडं. हे बाभळीचं झाड किती वाळून गेलंय. कुठे एखादी पालवी दिसतेय का बघितलं. पण व्यर्थ.

खालच्या तुटक्या फांदीवर कावळा बसलेला आढळला. तो 'काव काव' असं दोनदा ओरडला. आणि इथेच आक्रीत घडलं.

देऊळ फारसं लांब नव्हतं. त्यावरची भगवी पताका अजूनही उंच फडकत होती. तिथूनच हात जोडले. सगळी त्याची कृपा. जगात कोट्यवधी कावळे आहेत. झाडून सगळे काळे. मग हाच कसा पांढरा?

"बगळा बिगळा आसंल, न्हाय तर काय" फटफटीवरचा इजारवाला म्हणाला.

"न्हाय न्हाय, वरडला त्यो. काव काव करून. आयच्यान" मी तुटकं चप्पल अंगठ्यात गच्च धरून म्हणलो.

"त्या तिथं टपरीवर च्यापाणी करा. येवढ्या उनाचं डोकं धरलंय तुमचं" इजारवाला काही ऐकायलाच तयार नव्हता.

"चला, दाखवतो तुमाला. आजून बसला आसंल"

"ये, सरक बाजूला. हात लावायचा नाय गाडीला. म्हनं पांड्रा कावळा. डोकंबिकं फिरलं काय?"

माणसाला इश्वास नाय. आमालाबी नसता. पण या डोळ्यांनी बघितलं हाय. त्यो पांढराच हुता.

फटफटीवाला गेला, तसं टपरीवर गेलो. टपरी कसली, लाकडी खांबांवर उभारलेलं नुसतंच एक छप्पर. तिथल्या म्हाताऱ्या बाईनं स्टोला पंप मारून चहा बनवला.

"या भागात पाण्याची लय आबाळ" मी घोट घेत विषय काढला.

"आवो, आठ येकार जिमीन हाय. समदी पडीक. दुनी ल्याक गेल्यात शेरात. मला म्हातारीला येकलं सुडून. आता ह्ये हाटेल टाकून कसंबसं जगायचं बघा." म्हातारी झोपेतनं उठल्यासारखी नुसती बडबडत सुटली.

"तसं नव्हं. ह्या भागात लैच वणवण" मी आणखी एक घुटका घेतला.

"काय सांगू तुमाला, ह्या सरकारचा मुडदा बशिवला. धरान बांदलंय तिकडं मंबैलान पुण्याला. हिकडं आमी आमच्या मौतीनं मरणार.."

मी तिला मध्येच थांबत म्हणलं."कावळं लय हिकडं. है ना?"

"आं?" वय झालंय म्हातारीचं.

"कावळा दिसला मगाशी, पांढराच. त्या तिथं बाभळीवर" मी बाहेर येऊन ती बाभळ दिसतीय का बघितलं.

"आसं व्हय" लहान लेकराला बोलावं तशी ती म्हातारी बोलली.

"पण पांढराच हुता."

"कायकी. काय लागलं तर सांगा. बिडीकाडी बी ठिवलीय. मी जरा लवांडती." म्हातारीनं पोतं हातरलं होतंच. तशीच लवांडली.

मग झोळी घेऊन पुन्हा उठलो. फुफाट्याच्या वाटेनं मैलभर चाललो. मातीची बरीचशी घरं लागली. एकाच्या पडवीत लाल डब्बा दिसला. कुतूहलाने तिकडं गेलो. लगेचंच एक पोरगं पळत आलं. "यीतू का लावायला फोन? का दीव लावून?"

म्हटलं, काय हे? "काइनबॉक्स हाय" तो पोऱ्या म्हणाला.

मी चिठोरं बाहेर काढलं.

"गांजा पिलाय का तू? का हातभट्टी?"

"आरं, खरंच तर"

"काय खरंच? आसं कुठं आसंतंय व्हय"

"तू यिवून बघ"

"फूटू काढलाय का?"

"कशाचा?"


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"कावळ्याचा!"

"बॅटरी संपलीय"

"मजी तू पेलाय"

"आसल्या ठिकाणी यिवून कोण कशाला पील?"

"मग फेसबुकवर अपडेट टाक. फुटू काडून. चल ठेवतो."

मी फोन ठेवला, तेव्हा ते पोरगंही भेदरून गेलं होतं.

सूर्य मावळायला अजून अवकाश होता. देऊळ आता टप्प्यात आलं होतं. दिवसाउजेडी गाठणं चांगलंच. राती चोराचिलटांची भीती. झोळी उचलली आणि पुन्हा चालू लागलो. मैलभर चाललो असेल नसेल, मागून एक टेम्पो ट्रॅक्स भरधाव आली. आतून एक अवखळ स्त्री हातात माईक घेऊन खाली उतरली. तिचा पुरुषी पेहराव बघून माझी पाचावर धारण बसली.

रोल! कॅमेरा! ॲक्शन!

"क्या आपने वाकई हरे कौवेको देखा है?"

"आज की ताजा खबर!! इस गांव मे रहेते है हरे कौवे"

"MAN BEHIND THE WHITE CROW!!"

"हे, आर यू दॅट पर्सन, हू सीन ए व्हाइट क्रो?" ताज हॉटेलमध्ये मला एकाने विचारलं.

"Yes, of-course. Actually I am going to temple named Datta. and I saw the crow. I am the lucky."

"वहाव..!" शॅम्पेनची बॉटल फोडून आख्खी माझ्या हातात देत तो म्हणाला.

मी एक घोट घेतला, तेव्हा पोर्चमधल्या चिअर्सलीडर्सनी जल्लोश सुरू केला. "एंजॉय" म्हणून तो एक जण निघून गेला. नंतर मला कळलं की तो शेन वॉटसन का कुणी होता.

"ही कावळ्यांची अतिशय दुर्मीळ जमात आहे. अश्मयुगात जेव्हा नियँडरथल शिकारीला बाहेर पडला, तेव्हा त्याने हत्यारे वाहून नेण्यासाठी या कावळ्यांचा उपयोग केला. अंटार्क्टिकाच्या बर्फाळ प्रदेशात यांचे वास्तव्य होते. ते अणकुचिदार चोचीने सील माशांची शिकार करीत. मानवाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे हे कावळे ख्रिस्तपूर्व ४००० साली नामशेष झाल्याचे उल्लेख आहेत. आजच्या युगात त्याचे दिसणे ही ऐतिहासिक घटना आहे. हा पुरुष नाही, महापुरुष आहे." बोट दाखवून प्रोफेसरांनी माझे अभिनंदन केले. ऐंशी किलोचा हार माझ्या गळ्यात पडला. त्याचे चिक्कार फोटो देशोदेशींच्या वृत्तपत्रांत छापून आले.

आठमजली माझ्या घरात मी टॉप फ्लोअरला राहतो. वरती कावळ्याची भव्य प्रतिकृती टांगलेली आहे. त्याच्या दर्शनाला पंतप्रधान जेव्हा आले होते, तेव्हाच मी खालच्या मजल्यावर आलो होतो. एरव्ही कधी येत नाही. प्रधानमंत्री स्वतः म्हणाले होते, "आप जैसे लोगोंकी इस देस को जरूरत है|" मी भावविवश होऊन त्यांना कडकडून मिठीच मारली. पंतप्रधानांनी कावळ्यावर संशोधन करण्यासाठी मला अडीच हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. तो चेक मी पाठीमागच्या खिशात ठेवला. हॉलच्या एका कोपऱ्यात डोनाल्ड आणि मेलेनिया उभे होते. मी त्यांच्याकडे गेलो, तेव्हा "लव्हली, लव्हली.." म्हणून ते टाळ्या पिटायला लागले.

"Just tell me bro. What exactly you have seen. I wanna hear it again & again" मेलेनियाला चुप करत डोनाल्ड म्हणाला आणि सारा आसमंत दुमदुमला.

"पांढरा कावळा! मी पांढरा कावळा बघितला!!" मराठी बाणा जपत मी आरोळी ठोकली.

"क्काय?? पेलाय का तू? का गांजा फुकून आलाय?" दत्ताच्या मंदिरातला पुजारी घामाघूम होऊन म्हणाला.

"खरंच दिसला वो. दोन कोसावर बाभळीचं झाड हाय. तिथंच बसला हुता." झोळी खाली ठेवत मी म्हणालो.

"आसंल. मग?"

"मग काय? पांढरा हुता त्यो."

"आरं, पांढरा आसला म्हूणून काय त्याचं लोणचं घालू?"

जरा डोकं खाजवलं. पुजारी राग देऊन निघून गेला. बाजूची म्हातारीकोतारी सावरून बसलेली. मी गोधडी काढून फरशीवर हातरली. उशीला झोळी घेतली. दिवसभर चालून चालून खूपच दमून गेलो होतो. पडल्या पडल्या डोळा लागला. तेवढ्यात मला गदागदा हलवून उठवत रविना टंडन म्हणाली, "सोने से पहेले एक गुडनाईट किस तो बनता है बॉस"

आणि मी "अभी नही, जाओ" करत पायथ्याशी बसलेल्या कुत्र्याला लाथ घातली.

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# सोंगाड्या

सोंगाड्या वेडा असला, तरी तो कधी कोणाच्या अंगावर धावून गेला नाही की कोणाशी वाईट वागला नाही. मुलांनाही तो लांबूनच हसवीत असे. कधीच कुठल्या मुलाला त्याने उचलून घेतले नाही. म्हाताऱ्या माणसांना तो आदराने नमस्कार करत असे, तर इतरांच्या वाटेला जात नसे. कोणी त्याला त्याच्याबद्दल विचारले तर तो काहीतरी हातवारे करी, पण कोणालाच काही कळत नसे.

**जागु**



सोंगाड्या कुठेही दिसताच मुलांच्या चेहऱ्यावर हसू आणि डोळ्यात चमक आल्याशिवाय राहायची नाही. सोंगाड्या म्हणजे एक मुलखावेगळे व्यक्तिमत्त्व. कधी वेडेवाकडे हातवारे, चेहरे करून मुलांना हसवणारा, तर कधी डोळ्यात अचानक पाणी येणारा, कधीही न बोलणारा - मुका आणि विशेष म्हणजे लहान मुले ज्या कार्यक्रमात असतील त्या कार्यक्रमात वेगवेगळ्या वेषभूषा करून त्यांना हसवणारा, वेडा म्हणून ओळखला जाणारा सोंगाड्या कुठे राहतो, काय करतो याचा कुणालाच थांगपत्ता नव्हता. विशेष म्हणजे त्यांचा खरा चेहरादेखील कोणी कधी पाहिला नव्हता आणि तो वेडा आणि तसा काही अपाय न करणारा असल्याने कोणी ह्या बाबीकडे लक्षही देत नसे.

एक दिवस शाळेची शिवजयंतीची मिरवणूक निघून रस्त्यावर आली आणि अचानक अंगात मावळ्यांचा पोषाख, डोक्यावर फेटा, रंगाने काळाकुट्ट केलेला चेहरा, पिळलेल्या झुबकेदार मिशा, वर हातात खेळण्यातली ढाल आणि तलवार घेऊन वेडेवाकडे लढाईचे हातवारे करतच तो धावत आला. दोन्ही पाय फाकवून त्याने एक उंच उडी मारली आणि लढाई केल्याचा वेडावाकडा आव आणू लागला, त्याबरोबर मुलांमध्ये हास्यकल्लोळाची एकच लाट पसरली. शिक्षकांच्या "जय भवानी जय शिवाजी" नाऱ्यासोबत ओरडताना मुलांचे लक्ष विचलित झाले. खरे तर शाळेतील शिक्षकांनाही हसू येत होते, पण मुलांची शिस्त भंग होऊ नये म्हणून त्यांना मुलांना दम भरावा लागला. पण दम भरताच सोंगाड्याचा चेहरा विलक्षण करुण झाला. त्याचा उत्साही चेहरा क्षणात कोलमडून लावलेल्या रंगापेक्षा काळाठिक्कर दिसू लागला. पाणीदार झालेले डोळे त्या पोषाखाला विचित्र वाटू लागले. लांबूनच त्याने शिक्षकांना हात जोडून नमस्कार केला आणि नको नको अशी खूण करत आणि धूम ठोकून निघून गेला. हे धूम ठोकून निघून जाणेही इतके मजेशीर होते की पुन्हा मुले खळखळून हसू लागली.

जमलेल्या शिक्षकांना आणि रस्त्यावर असलेल्या लोकांना वाटले की पैसे मागण्यासाठी हा कोणीतरी सोंगाड्याचे रूप घेऊन आला असेल. आता तो घरोघरी जाईल आणि पैसे मागून आपल्या गावाला निघून जाईल.

रामजन्मोत्सव, हनुमान जयंती देवळात अगदी थाटामाटात साजरा करत. दुपारी जन्मोत्सवाच्या वेळी देवळाभोवती जत्राच भरायची. जत्रेत वेगवेगळ्या लहान-मोठ्या मुलांच्या वस्तू, खेळणी विकायला असायची. त्यामुळे मुलांचीही भरपूर रेलचेल असायची. रामनवमीला रामाच्या पोषाखात अंग पूर्ण निळ्या रंगाचे करून आलेला सोंगाड्या धनुष्य-बाण घेऊन फिरत असे. आपल्याजवळचा बाण घेऊन तो स्वतःच्या नाकावर चिकटवून वेगवेगळे चाळे करून मुलांना हसवत असे. तर हनुमान जयंतीच्या दिवशी मारुतीचा पोषाख परिधान करून उड्या मारत गदा फिरवत मुलांना खो-खो हसवत असे. अशी मुले हसली की सोंगाड्याला खूप आनंद व्हायचा. त्याच्या रूपातले फक्त स्पष्ट दिसणारे डोळे होते, त्यात त्याच्या भावना रेंगाळलेल्या दिसायच्या.

कोणाचा वाढदिवस, बारसे असले की बऱ्याचदा सोंगाड्या विदूषकाचा पोषाख घालून 'बिनबुलाये मेहमान'प्रमाणे हजर असायचाच. बारशाच्या निमित्ताने आला की आपल्या हातात फुगे घेऊन यायचा आणि सगळ्या छोट्या मुलांना वाटायचा.

वाढदिवसासाठी येताना खांद्यावर एक चॉकलेटची झोळी घेऊन यायचा आणि मुलांना वाटायचा. ही चॉकलेट्स आणि फुगे हा कुठून आणतो ह्याबद्दल बऱ्याचदा इतर गावकऱ्यांना प्रश्न पडे. पण चौकशी करता गावात कोणत्याही दुकानदाराकडून त्याने चॉकलेट घेतल्याचे किंवा पळवून नेल्याचे कानावर यायचे नाही.

सोंगाड्याला अशा समारंभात येण्यापासून कोणी अडवायचेही नाही, कारण लहान मुलांना आवडत असल्याने आणि बिचारा कधी त्रास देत नसल्याने, तसेच नित्याने सगळीकडे वावरत असल्याने सगळ्या गावकऱ्यांना तो आपल्यातलाच वाटायचा. त्याच्यावर दया येऊन लोक त्याला खायला, जेवायला द्यायचे, पण तो ते कधीच घेत नसे.

सोंगाड्या वेडा असला, तरी तो कधी कोणाच्या अंगावर धावून गेला नाही की कोणाशी वाईट वागला नाही. मुलांनाही तो लांबूनच हसवीत असे. कधीच कुठल्या मुलाला त्याने उचलून घेतले नाही. म्हाताऱ्या माणसांना तो आदराने नमस्कार करत असे, तर इतरांच्या वाटेला जात नसे. कोणी त्याला त्याच्याबद्दल विचारले तर तो काहीतरी हातवारे करी, पण कोणालाच काही कळत नसे. त्याच्यासोबत कधी कोणी दिसले नाही, त्यामुळे तो एकटाच राहत असणार हे नक्की होते, पण तो आपल्या उदरनिर्वाहासाठी काय करत असेल, हे वेगवेगळे पोषाख कुठून आणत असेल? बरे, त्याचा पोषाखही कधी किळसवाणा नसे, तर अगदी स्वच्छ नेटनेटका. त्यामुळे कधी कोणाला त्याची घृणा वाटली नाही.

एकदा शाळेचा आनंद मेळावा होता. अशा कार्यक्रमात तर सोंगाड्याची हजेरी हवीच. मुलेही वाट पाहतच होती त्याची. सोंगाड्या येऊन मुलांना चॉकलेट्स वाटतच होता, तेवढ्यात पहिल्या इयत्तेतील गौरीला भोवळ येऊन ती खाली पडली. ते पाहताच सोंगाड्या "गौरी गौरी" असे ओरडत धावत गौरीजवळ गेला आणि तिला मांडीवर घेऊन "कोणीतरी पाणी आणा पटकन" असे घाबरून ओरडला. कोणीतरी पाणी आणून दिले, ते सोंगाड्याने गौरीच्या डोळ्यावर मारले. तो "गौरी, बाळा, ऊठ. बाळा माझ्याकडे बघ" सोंगाड्या डोळ्यात पाणी आणून जिवाच्या आकांताने बोलत होता. मेळाव्यासाठी आलेल्या पालकांना हा दुहेरी धक्का होता. एक धक्का गौरीच्या भोवळीचा आणि दुसरा सोंगाड्याच्या आवाज फुटण्याचा आणि तो आवाजही ओळखीचा असण्याचा. तो आवाज होता हीरो कृष्णा कॉन्ट्रॅक्टरचा.

कृष्णा हा गावातील नामवंत सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर होता. कृष्णा आपल्या कामासोबत समाजसेवेतही गुंतलेला असायचा आणि त्याचा आणखी एक छंद होता नाटकांत काम करायचा. तो एक उत्तम कलाकार होता. लहानपणापासून त्याला ॲक्टिंगची सवय होती आणि शाळेतील स्नेहसंमेलनात, नाटकात काम


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

करता करता तो व्यावसायिक नाटकांतही हौसेखातर आपली कलाकारी सादर करत होता. त्यामुळे त्याला गावात सगळे 'हीरो कृष्णा कॉन्ट्रॅक्टर' म्हणून ओळखायचे. त्याच्या नाटकांमुळे त्याच्या आयुष्यात त्याला अनेक मित्र मिळाले होते, तर ठेकेदार ह्या व्यवसायामुळे त्याच्या हाताखाली अनेक कामगार काम करत होते. त्यांच्यासाठी तो कृष्णा शेठ, तर मित्रांसाठी कृष्णा हीरो आणि त्याची ओळख होती कॉन्ट्रॅक्टर कृष्णा हिरो. व्यवसाय, समाजातील स्थान, मान-सन्मान अव्वल होते. संपत्तीही समाधानकारक होती. घरात लक्ष्मी नांदत होती, पण कौटुंबिक स्वास्थ्य मात्र हरवले होते. घरातील लक्ष्मी घराला पाठ फिरवून गेली होती.

कृष्णा आपल्या आई-वडिलांसोबत राहत होता. दोन बहिणींची लग्ने झाली होती. नाटकात काम करता करता त्याची ओळख मेघा या गोड मुलीबरोबर झाली. मेघा एका कंपनीत कामाला होती व अभिनयाची आवड असल्याने आणि तिच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने थोड्या आर्थिक प्राप्तीसाठी ती नाटकांच्या प्रयोगांना हजर असायची. नाटकात कृष्णा प्रमुख नायकाचे, तर मेघा प्रमुख नायिकेचे काम करायची. रंगमंचावर नाटकातील प्रेम रंगवताना ते कधी एकमेकांच्या प्रेमात गुंतले हे त्यांचे त्यांना कळले नाही. सुसंस्कृत मुलगी आणि हरहुन्नरी, नकार देण्यासारखे काहीच नसणारा मुलगा मिळाल्याने दोन्ही घराच्या संमतीने कृष्णा आणि मेघा यांचे प्रेम विवाहबंधनात एकरूप झाले.

मेघा सासू-सासऱ्यांना हवे नको ते पाहत घराच्या इतर जबाबदाऱ्याही यशस्वीपणे पार पाडत होती. कृष्णा आणि मेघा यांच्या वैवाहिक आयुष्यालाही चांगलीच गोडी आली होती. एकमेकांच्या आवडी-निवडी पुरवणे, एकमेकांना वेळ देणे, काळजी घेणे सारे काही दृष्ट लागू नये असे चालू होते ह्या नवदांपत्याचे. असेच सहा महिने गेले आणि कृष्णा आणि मेघाला मातृत्व प्रदान करून घरात दुडुदुडू चालणाऱ्या पावलांची चाहूल लागली. कृष्णाने आणि घरातील सगळ्यांनीच मेघाला हातांच्या तळव्यावर जपले आणि दिवस भरताच नवचैतन्य घेऊन गौरी जन्माला आली. कृष्णाचा आनंद द्विगुणित झाल्याने त्याने पूर्ण गावाला मिठाई वाटली. मेघाचे बाळंतपण आणि गौरीचे आगमन हा जणू दीपावलीचा सोहळाच. असेच आनंदात दिवस चालले होते गौरीच्या लक्ष्मीच्या पायगुणाने आणि कृष्णाच्या प्रामाणिक कामामुळे कृष्णाला आणखी मोठमोठी कॉन्ट्रॅक्ट्स मिळू लागली. त्यातूनच इतरांसाठी धावणाऱ्या कृष्णा हीरोकडे सामाजिक कार्यकर्त्यांची रेलचेल वाढून त्याच्या सामाजिक कार्यातील जबाबदाऱ्याही वाढल्या. अनेक सामाजिक संस्थांचा तो पदाधिकारी बनला होता. आता मेघा नाटकात नसल्याने म्हणा की सवडच मिळत नाही म्हणून म्हणा, त्याने आपला अभिनयाचा छंद बाजूलाच ठेवला होता. मेघानेही त्याला त्यासाठी प्रोत्साहन दिले नाही, कारण आता तिच्याच वाट्याला कृष्णा फार कमी येत होता. रात्रीचे झोपायला येणे, सकाळी उठून आपल्या कार्यात मग्न होणे, कधी जमलेच तर जेवायला येणे, नाहीतर बाहेरच त्याची व्यवस्था व्हायची. त्यामुळे मेघाला त्याचा दुरावा जाणवू लागला. कृष्णा घरी येई, तेव्हा गौरीचे मात्र फार लाड करायचा. त्याच्या काळजाचा तुकडा होता गौरी. घरी आला की सर्वप्रथम तिला डोळ्यात साठवण्यासाठी त्याची तगमग असायची.

मेघाच्या कृष्णावरील प्रेमात गौरी वाटेकरू आली होती आणि आपसूकच मेघाकडे कृष्णाचे थोडे दुर्लक्षच व्हायला लागले. मेघाला हे जाणवू लागले. तिला थोडी एकटेपणाची भावना वाटू लागली. ती थोडी उदास राहू लागली. तरी ती कृष्णाला समजून घेत होती म्हणूनच आपला एकाकी पणावर मात करण्यासाठी ती मार्ग शोधत होती. गौरी एक वर्षाची झाल्यावर मेघाने कृष्णाकडे आपले व्यक्तिस्वातंत्र्य जपण्यासाठी पुन्हा नोकरीवर रुजू होण्याची मागणी केली, पण कृष्णाने तिला साफ नकार दिला. कारण होते गौरीचे पालनपोषण आणि घरच्या जबाबदाऱ्या. गौरीला सासू सांभाळण्यासाठी तयार होती, पण तिची तब्येत अधूनमधून बिघडत होती, त्यामुळे कृष्णाला तिचीही काळजी होती. मेघाने घरी गौरीसाठी एक बाई ठेवू या असे सांगितल्यावर तर कृष्णाचा संतापच झाला. दुसऱ्यांच्या हातात आपले बाळ द्यायचे नाही ह्या मतावर कृष्णा ठाम होता. आता त्यांच्यात ह्या विषयावरून अधूनमधून बाचाबाची चालू झाली. कृष्णा मेघाला म्हणे, "तुला कशाला नोकरी करायला हवी? आपल्या घरात काय कमी आहे? तुला काय हवे अजून? तुला काय हवे ते मिळते, मग बाळाला सोडून तुला कशाला जायला हवे?" मेघाही मग कृष्णावर आग पाखडत असे. "पूर्वी तू किती माझ्यावर प्रेम करायचास, मला वेळ द्यायचास. मी तुला सर्वस्व मानलं आणि माझे सर्वस्वच आता दूर दूर जात आहे म्हटल्यावर मी कसे दिवस काढायचे? गौरीवर मीपण तुझ्यापेक्षा जास्त प्रेम करते आणि मी तिला जन्म दिला आहे. मलापण तिची काळजी आहे. पण याचा अर्थ मी घरच्या जबाबदाऱ्यांत बुडून जाऊन माझे व्यक्तिस्वातंत्र्य घालवायचे असे नाही ना? घर माझे एकटीचेच आहे का? मी पण एक कर्तबगार मुलगीच होते. मी घेतलेल्या शिक्षणाचा, माझ्या कर्तबगारीला मला न्याय नको का द्यायला? आणि गौरीचे पालन तर आपल्याच घरात होणार आहे ना?" असे रोज रोज दोघांमध्ये वाद होऊ लागले आणि हे वाद इतके विकोपाला गेले की कृष्णा आता फक्त झोपण्यापुरता घरात येऊ लागला, मेघाला टाळू लागला. गौरीची मात्र तो बरोबर खबरबात ठेवायचा. रात्री यायचा तेव्हा तिला मांडीवर झोपवायचा आणि तिला हवे-नको ते सगळं आणून ठेवायचा.

दिवस असेच जात होते. गौरी आता ३ वर्षांची झाली होती व नर्सरीत जाऊ लागली होती. घरांतील ह्या वादामुळे कृष्णाचे आई-वडीलही दोघांना समजावता समजावता हतबल झाले. मेघा कंटाळून आता घरच्या जबाबदाऱ्यांबाबतही टाळाटाळ करू लागली. त्यावरून तिचे आणि सासूचेही थोड्या प्रमाणात खटके उडू लागले. गौरी आता ३ वर्षांची झाली होती व नर्सरीत जाऊ लागली होती. दिवसात मेघाला सगळे असह्य झाले आणि तिने कृष्णाकडे विषय काढलाच. तिला गौरीला घेऊन वेगळे राहायचे होते आणि त्यासाठी ती घटस्फोट घ्यायलाही तयार होती. "मला तुझी प्रॉपर्टीही नको. मी माझे कमावीन आणि गौरीचा सांभाळ करीन, पण आता ह्या घुसमटीत राहणार नाही" हा ठाम निर्णय मेघाने कृष्णाला सांगितला आणि कृष्णावर जणू वीजच कोसळली. शब्दाला शब्द वाढत गेले आणि मेघाचा संताप इतक्या पराकोटीला गेला की तिने तडक आपली गौरीच्या सामानासकट बॅग भरली आणि गौरीला घेऊन माहेरी निघून गेली. जाताना तिने कृष्णाला कडक धमकी दिली. मला आणि गौरीला भेटण्याचा अजिबात प्रयत्न करायचा नाही. जर तसे केलेस, तर मी घटस्फोटाची मागणी करीनच आणि गौरीला घेऊन कुठेतरी लांब राहायला जाईन.

मेघाचे माहेर बाजूच्याच गावात होते. तीन गावांची मिळून अशी एकच शाळा असल्याने घर बदलण्याने गौरीच्या शिक्षणात काही फरक पडणार नव्हता. शिक्षणात फरक पडत नसला,तरी गौरीच्या मनावर आपले आजी-आजोबा, बाबा दूर गेल्याचा मनावर विपरीत परिणाम होऊ लागला. ती सारखी त्यांची आठवण काढून रडू लागली व आजारी पडू लागली. मेघाही कामावर रुजू झाल्याने तिला आणखी एकाकी वाटू लागले. नवीन आजीआजोबांबरोबर रुळायला तिला खूप वेळ गेला. शिवाय पहिल्या घरांतील सुखसुविधा ह्या घरात नसल्याचाही तिच्यावर परिणाम होत होता. गौरी शांत शांत राहू लागली होती. मेघाने तिला खुलवण्याचा खूप प्रयत्न केला, पण तिचा एकच हट्ट असे - पप्पांच्या घरी जायचे आहे. इकडे आड आणि तिकडे विहीर असे मेघाचे झाले होते.

आपल्या काळजाचा तुकडा आपल्यापासून लांब गेल्याने कृष्णा पूर्ण खचून गेला होता. त्याचे ना कामात लक्ष लागत होते, ना समाजकार्यात. आई-वडिलांनाही ह्या परिस्थितीमुळे वरचेवर आरोग्याच्या तक्रारी चालू झाल्या होत्या. कृष्णाला हा आघात सहन होत नव्हता. मेघा दूर गेल्याने कृष्णाला तिचीही आठवण आता येऊ लागली. पण तिचा घराबाहेर पडण्याचा निर्णय मानण्यास त्याचे मन तयार होत नव्हते. आता उठावे आणि तडक गौरीला भेटावे, तिला घेऊन यावे हा विचार वारंवार त्याच्या मनात येत असे. पण मेघाने शेवटी जाताना कानात घुमलेल्या धमकीच्या घटस्फोटाच्या कटू शब्दांच्या लाटा वारंवार मनावर उसळत होत्या. कृष्णाने मेघाबरोबर कितीही भांडण केले असले, आकांडतांडव केले असले, तरी त्याच्या मनात मेघाबद्दलचे मनात असलेले बेशुद्ध अवस्थेतील प्रेम जिवंत होते आणि ते पडलेल्या दुराव्याने शुद्धीत येऊ पाहत होते. त्यात घटस्फोट झाला तर गौरी कायद्याने आपल्यापासून दूर होईल आणि जनसामान्यात बदनामी होऊन आई-वडीलही पूर्ण खचून जातील, ह्या विचारांनी कृष्णाच्या मनात थैमान घातले होते. काय करावे हे काहीच सुचत नव्हते त्याला. त्यातच एक दिवस नाटकाचे डायरेक्टर त्याला भेटायला आले. त्यांना त्यांच्या नाटकासाठी योग्य नायक मिळत नव्हता. त्यांच्या मनात असलेल्या पात्रासाठी कृष्णाच फिट बसत होता. त्यांनी कृष्णाला नाटकात काम करण्याची विनंती


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

केली, पण आपली मानसिक स्थिती चांगली नसल्याने सध्या तो हे काम करू शकत नाही, हे त्याने त्यांना सांगितले. डायरेक्टर थोडे नाराजच झाले. बाकी हालहवालीच्या गोष्टी करता करता कृष्णाच्या लक्षात आले की हे नाटक गौरी असलेल्या गावातच होळीच्या मुहूर्तावर करायचे आहे. कृष्णाच्या काळजात एक मंद तारा चमकला. गौरीला डोळे भरून पाहण्यासाठी कृष्णाची कोणत्याही थराला जायची आता तयारी झाली होती. कृष्णा डायरेक्टरांना म्हणाला, "मी काम करीन, पण मला कोणी ओळखणार नाही असा माझा मेकअप करूनच मी रंगमंचावर उतरेन. शिवाय आवाजही बदलेन. आणि मी ह्या नाटकात आहे हे आपल्या टीमशिवाय इतर कोणालाही कळणार नाही." डायरेक्टर म्हणाले, "मला अट मान्य आहे आणि आवाज बदलण्याची गरज नाही, कारण नायक मुका आहे." आता तर कृष्णाने हा रोल पक्काच करून टाकला आणि इथूनच तयार झाला मुका सोंगाड्या.

होळीला रंगमंचासमोर पुष्कळ गर्दी जमली होती. पडदा उघडला, नाटक चालू झाले आणि कृष्णा रंगमंचावर आला. कृष्णाने नाटकात एका श्रीमंत मुलीच्या प्रेमात पडलेल्या मुक्या विदूषकाची भूमिका साकारली होती, जी भूमिका भावनाप्रधान असली तरी विदूषकाच्या वेषामुळे लहान मुलांना फार गमतीशीर वाटली. मुलांच्या गर्दीतच मेघा गौरीला घेऊन बसलेली कृष्णाच्या नजरेला पडली आणि काही क्षण कृष्णा स्तब्धच झाला. त्याने पटकन स्वतःला सावरले. गौरी विदूषकातल्या वेषातील आपल्या बाबाकडे पाहून हसत होती. मेघा गौरीच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून आनंदी झाली होती आणि तिला ती काम करत असलेल्या नाटकाची टीम समोर पाहताना आनंद होत होता आणि कृष्णाबरोबर नाटकातील सहवासाचे क्षणही आठवत होते. नाटक संपल्यावर मेघा गौरीला घेऊन पडद्यामागे सगळ्यांना भेटायला गेली. विदूषक झालेला कृष्णा मेघाला काही कळणार नाही याची काळजी घेऊन लगेच गौरीजवळ गेला आणि तिला डोळे भरून पाहून तिचे मनोरंजन करत होता. सगळ्यांना झाला प्रकार माहीत असल्याने त्यांनी तिची चौकशी केली असता मेघाला गहिवरून आले व तिने थोडक्यात गौरीवर होत असलेल्या मानसिक कुचंबणेची माहिती त्यांना दिली. विदूषकाच्या रूपातील कृष्णा हे सगळं ऐकून हळहळत होता. शेवटी ती म्हणाली की आज ह्या नाटकातील विदूषक पाहून ती खूप महिन्यांनी हसली आहे. हे ऐकताच कृष्णाने ठरवले की आता आपण गौरीला भेटण्यासाठी आणि तिला खूश ठेवण्यासाठी सोंगाड्या व्हायचे.

गौरी जिथे जाण्याची शक्यता असेल तिथे - म्हणजे गौरीच्या मैत्रिणींच्या वाढदिवसाच्या पार्टीला, गावातील सार्वजनिक कार्यक्रमांना व शाळेतील सार्वजनिक कार्यक्रमांना कृष्णा वेष बदलून जाऊ लागला. तो आपल्या गाडीतच वेष बदलू लागला आणि कोणी आसपास नाही अशा आडमार्गाने जाऊ लागला. गौरीबरोबर इतर मुलांनाही चॉकलेट्स वाटून आणि गमतीशीर नकला करून हसवू लागला. सुरुवातीला शाळेतील शिपायांनी त्याच्यावर नजर ठेवली, पण ह्याच्यापासून मुलांना कोणताच अपाय नाही याची त्यांना खातरी पटून ते त्याला बिनधास्त वावरू देऊ लागले. गौरीलाही सोंगाड्याची गंमत वाटत होती व ती आपल्या आईला हीच एक गंमत धावत जाऊन सांगायची. त्यामुळे सोंगाड्यामुळे का होईना, पण गौरी आता जरा रुळू लागलीआहे, याची मेघाला खातरी पटू लागली.

आज अचानक गौरीला आलेल्या भोवळीमुळे सगळेच शिक्षक-पालक गौरी भोवती जमले होते. त्यातच गौरीबरोबार असलेले गौरीचे आजोबा थक्क होऊन हे सारे पाहत होते. कॉन्ट्रॅक्टर कृष्णा हीरो आपल्या मुलीसाठी अशा वेषात फिरत होता, ह्यावर - कुणी हे पाहिले नसते, तर - कुणाचा विश्वासच बसला नसता. आजोबांनी झाला प्रकार मेघाला फोन करून सांगितला व ताबडतोब तिथे निघून यायला सांगितले. मेघा धावत पळत गौरीच्या काळजीने आणि वडिलांनी सांगितलेल्या कृष्णाच्या आश्चर्यकारक लीला पाहण्यासाठी धडधडत्या काळजाने आली. मेघाने पाहिले - कृष्णाने गौरीला जवळ घेतले होते. त्याच्या डोळ्यातून अश्रू घळघळा वाहत होते. गौरीनेही आपल्या पप्पांना ओळखल्याने ती त्याला घट्ट बिलगली होती व तिच्या डोळ्यातूनही आनंदाश्रू वाहत होते. मेघा हे दृश्य पाहून विरघळली आणि ती दोघांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली " गौरी, चल आता पप्पांच्या, म्हणजे आपल्या घरी. तुझ्या आनंदासाठी मी सगळे त्याग करायला आता तयार आहे." मेघाचा आवाज ऐकताच कृष्णाने वर पाहिले. दोघांची नजरानजर झाली आणि त्याच नजरेत ते पुन्हा एकरूप झाल्याची ग्वाही मिळाली. कृष्णानेही मेघाची पूर्वी घडल्या प्रकाराची माफी मागितली व ह्यापुढे तुला नोकरी व जे आवडेल ते तुझ्या मर्जीप्रमाणे खुशाल कर हे दिलदारपणे सांगितले. गौरी निरागस अश्रू, तर कृष्णा आणि मेघा पश्चात्तापातून गाळून निघालेले आनंदाश्रू ढाळत होते. भोवताली सगळे जमलेल्यांनाही आश्चर्यकारक आनंद झाला होता. सगळ्यांनी मेघा आणि कृष्णाला भावी सुखी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर गौरीला तिचा कायमचा सोंगाड्या पप्पा मिळाला, जो आता फक्त आणि फक्त गौरीसाठीच बिनवेषातील सोंगाड्या बनतो आणि मेघासाठी तिच्या आयुष्यातील खराखुरा नायक मिळाला.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# शेवटचा दिस

“मी तुम्हाला पत्ता एसेमेस केला आहे. उद्या रात्री दहा वाजता या.” एवढे बोलून समोरच्या माणसाने कॉल कट केला. मला काही बोलायची संधी दिली नाही. मी फोन चेक केला. त्याच नंबरवरून एक एसेमेस आला होता. मी पत्ता वाचला. शहराच्या बाहेरचे ठिकाण होते. मी विचार करू लागलो, हे तर काहीतरी भयानक आहे. आता काय करायचे? जायचे का उद्या? माझा काही घातपात केला तर? पण मला मारून कोणाला काय मिळणार?

**चॅट्सवूड**



"सर कुठं जायचंय?"

"अरे, त्या पुलावरून घे ना"

मी टॅक्सीच्या ड्रायव्हरला सांगितले. त्याने मान डोलावली. त्याने गाडी पुलाच्या दिशेने वळवली. मी टॅक्सीच्या मागच्या सीटवर एकटाच बसलो होतो. मी बाहेर बघितले. रात्र झाली होती, पावसाने जोर पकडला होता. बाहेर गाड्यांची संख्या तशी कमीच होती. बरे आहे, मी डोळे मिटले. दीर्घ श्वास घेतला. मी वाकून माझे डोके माझ्या दोन पायांमध्ये सरकवले. मी तसाच बसून राहिलो. ड्रायव्हरने माझ्याकडे नाराजीने बघितले. मी कण्हत होतो. मग ड्रायव्हरने न राहवून मला विचारले,

“सर, काय होतंय?”

“अरे, काही नाही रे, पोट खूप दुखतंय." मी माझे पोट उजव्या हाताने पकडत, त्याच्याकडे बघत म्हणालो. मी पोट पकडून आता डाव्या कुशीवर पडलो.

“काय खाल्लं होतं?” ड्रायव्हरने परत विचारले.

“काय माहीत, अचानक दुखू लागलं.” मी म्हणालो.

ड्रायव्हरच्या चेहऱ्यावर चिंता दिसली. मी अगदी अवघडून बसलो होतो. आमची टॅक्सी आता पुलावर आली होती. हा पूल बराच उंच, मोठा होता. अगदी दिमाखात उभा होता. रात्रीची वेळ असल्यामुळे गाड्या जास्त नव्हत्या. या पुलावर गाडी थांबवता येत नसे. मला ओकारी आली. बाहेर काही पडले नाही. माझ्या तोंडातून लाळ खाली ओघळली.

"सर, सर...थांबा थांबा.." ड्रायव्हर घाबरून म्हणाला. त्याला वाटले, मी टॅक्सीमध्येच उलटी करीन, टॅक्सी खराब करीन, सीट घाण होईल, नुकसान होईल. ड्रायव्हरने टॅक्सीचा वेग कमी केला. पुलाच्या डाव्या बाजूला टॅक्सी थांबवली. त्याने माझ्याकडे मागे वळून बघितले, मी त्याच्याकडे बघितले. मी टॅक्सीचा दरवाजा उघडला, सुसाट धावत बाहेर पडलो!!

मी धावत जाऊन पुलाच्या कठड्याजवळ आलो. पाऊस चांगलाच वाढला होता. मी लगेच भिजलो. मी कठड्यावर चढू लागलो. पण माझा पाय घसरला, तोल गेला आणि खाली पडलो. मी लगेच उठलो. परत कठड्यावर चढणार, तेवढ्यात मला मागून, कमरेभोवती कोणीतरी पकडले. मला मागे खेचले. मी प्रतिकार केला, पाय आपटले, कोपराने त्याला मारले, पण त्याची पकड ढिली झाली नाही. त्याने मला खेचून परत त्याच टॅक्सीजवळ आणले. टॅक्सीचा दरवाजा उघडा होता. मी प्रतिकार केला, जोर लावून त्याला मागे ढकलण्याचा प्रयत्न केला, पण जमले नाही. मला त्याने टॅक्सीत ढकलून दिले. माझ्यामागून गाडीचे दार लावले. मला पकडणारा तो माझा ड्रायव्हर होता. तो पुढे जाऊन टॅक्सीमध्ये बसला. त्याने रियर व्ह्यू मिररमध्ये मला बघितले. तो भलताच वैतागला होता.

एका मिनिटामध्ये हा सगळा प्रकार घडला. मी भांबावून गेलो. ड्रायव्हरने पटकन टॅक्सी सुरू केली. दोन-तीन गाड्या थांबल्या. त्या गाड्यांमधली माणसे आमच्याकडे बघत होती, पण तिकडे न बघता ड्रायव्हरने टॅक्सी भरधाव पळवली. टॅक्सीने तो पूल लगेच पार केला. ड्रायव्हर काही म्हणाला नाही. तो शांतपणे टॅक्सी चालवत होता.

मी रडायला लागलो, नेहमीसारखं! मला का याने वाचवले? मला वाचवणारा हा कोण? हा कोण देव आहे का? मला मरायचे होते, जीव द्यायचा होता, सगळे संपवायचे होते!! मी मूकपणे रडू लागलो. राग आला होता, रडूही येत होते.

“थांबव” मी ड्रायव्हरला एका बॉससारखे म्हणालो.

पण त्याने टॅक्सी थांबवली नाही, त्याने काही उत्तर दिले नाही. अरे यार काय झाले? असे का करतोय? याला पैसे पाहिजेत का? मी पाकिटातून दोन हजाराची नोट काढली.

“हे घे” मी नोट देत त्याला म्हणालो.

त्याने नोट घेतली नाही. माझ्याकडे दुर्लक्ष केले. तो शांतपणे टॅक्सी चालवत होता. “अरे, काहीतरी बोल ना” मला ओरडावेसे वाटत होते, पण काही बोलता येत नव्हते. मला स्वतःचीच लाज वाटत होती. तो टॅक्सी चालवत राहिला. टॅक्सी अंधाऱ्या रस्तावरून जात होती. स्ट्रीट लाईट नव्हते की माणसे नव्हती. मला हा रस्ता माहीत नव्हता. टॅक्सी छोटाशा गल्लीतून जाऊ लागली. “आता मला हा लुटणार..” माझ्या मनात विचार आला, तसा मी घाबरलो. मी पटकन माझे पैशाचे पाकीट हातात घेतले. माझ्याकडे साधारण तीन-चार हजार होते, क्रेडिट कार्ड होते. माझ्या गळ्यात सोन्याची चेनसुद्धा होती. मला लुटले असते, तर बरेच पैसे याला मिळाले असते. मी घाबरलो, आपले आता काही खरे नाही!! टॅक्सीचा वेग कमी झाला, तशी माझ्या डोक्यात कल्पना आली. मी टॅक्सीचे दार उघडून बाहेर उडी मारून पळून जाणार होतो..

पण त्याने अचानक टॅक्सी थांबवली!!

मी आजूबाजूला बघितले. कोणीच नव्हते. अंधार होता. पाऊस गेला होता. पडकी घरे होती, त्यात कोणी राहत नसावे. एक-दोन कुत्री उगीच भुंकत होती. भयाण वातावरण होते. मला काय करावे ते कळेना. या निर्जन जागी याने मला का आणले?

तो माझ्याकडे न बघत म्हणाला.. “पैसे कमावणार?”


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

मी बुचकळ्यात पडलो. एकतर हा माणूस - माणूस नाही, देवदूत!! मला आत्महत्या करण्यापासून वाचवतो - मी दिलेले पैसेही घेत नाही, मला हा काय जॉब देणार आहे?

“काय?” मी त्रासून विचारले.

“पैसे कमावणार? पैसे?” त्याने मागे माझ्याकडे बघत मला विचारले. उजव्या हाताचा अंगठा, तर्जनी बोटाला घासत तो म्हणाला.

“नाही. आय एम फ्रॉम रिच फॅमिली.” मी ताठ बसत म्हणालो. माझी हनुवटी नकळत वर गेली. मी नजर फिरवली, तसा तो हसायला लागला. हसत तो मला म्हणाला,

“ते दिसलंच, तू किती रिच आहेस ते.’

मी शरमेने मान खाली घातली. त्याचे वाक्य जिव्हारी लागले. त्याने त्याच्या पाकिटामधून एक व्हिजिटिंग कार्ड बाहेर काढले. मला ते कार्ड देत तो म्हणाला, “हे कार्ड घे.”

“का?” असे म्हणत मी ते कार्ड हातात घेतले. कार्ड बघू लागलो.

ते प्लॅस्टिकचे, करड्या रंगाचे कार्ड होते. त्यावर ठळक काळ्या रंगात एक फोन नंबर होता. तो नंबर नीट दिसत नव्हता, म्हणून मोबाइलच्या प्रकाशात मी तो नंबर बघू लागलो. आता नंबर स्पष्ट दिसत होता. नंबरच्या अगदी खाली एक बार कोडसुद्धा होता. कार्डच्या मागच्या बाजूस एक छोटे चिन्ह होते. मी ते चिन्ह नीट बघितले. माझ्या अंगावर काटा आला!!

त्या चिन्हात, एक माणूस गळफास लावून पंख्याला लटकत होता!!

ते कार्ड बघत मी म्हणालो, “तुझं कार्ड आहे का?”

“माझं नाहीये.” ड्रायव्हर म्हणाला, “तुला पैसे हवे असतील, तर या नंबरवर फोन कर.”

“मला पैसे नको...” मी काही बोलणार, तेवढ्यात तो म्हणाला,

“मग जीव कशाला देत होतास?” तो वैतागून म्हणाला, तसा मी दचकलो. माझ्याकडे उत्तर होते, पण मला ते त्याला सांगायचे नव्हते. मला स्वतःचीच घृणा वाटत होती.

“तू नको कमवू, पण तुझ्यामुळे मला तरी मिळतील.” ड्रायव्हर मला म्हणाला.

“नको रे” मी कार्ड त्याच्या दिशेने फेकले. मला मार्केटिंगचा प्रकार वाटला. काहीतरी वस्तू कोणाच्या तरी गळ्यात मारायची... मला असली काही कामे करायची नव्हती.

“अरे” असे म्हणत तो खाली पडलेले कार्ड शोधू लागला. तो कार्ड घेण्यासाठी खाली वाकला. मी दार उघडून टॅक्सीबाहेर पडणार, तेवढयात मला म्हणाला, “ऐक ना, तुला बरेच पैसे मिळतील, पाच लाख वगैरे.”

“नको यार” असे म्हणून मी टॅक्सीबाहेर आलो. पाऊस थांबला होता. बरीच रात्र झाली होती. मला भूक लागली होती. माझ्यामागोमाग ड्रायव्हर टॅक्सीबाहेर आला.

“कार्ड तर ठेव ना” माझ्या खिशात कार्ड कोंबत तो म्हणाला.

“नको रे” मी कार्ड फेकणारच होतो, पण माझे लक्ष परत त्या चिन्हाकडे गेले. तेच ते चिन्ह, एक माणूस गळफास घेऊन पंख्याला लटकत होता!! व्हिजिटिंग कार्डवर असे चिन्ह कोणी का छापेल? याचा काय अर्थ? हा नंबर कोणाचा? कसला हा बार कोड? मी ते कार्ड बघत हा सगळा विचार करत होतो.

“फोन करून काय करू?” मी त्याला विचारले.

“ते लोक सगळं सांगतील.” मी या प्रकारात रस घेतोय हे बघून ड्रायव्हर सुखावला.

मी अजूनही कार्डकडे बघत होतो.

“हां, पण कार्ड घेऊन जा. त्यांना भेटल्यावर कार्ड दे.” एखाद्या लहान मुलाला जसे सांगतात, तसे मला त्याने समजावले.

“कोण भेटेल?” मी कार्डवरून बोटे फिरवत म्हणालो.

“मला माहीत नाही. चारशे सत्तर रुपये.” ड्रायव्हरने माझ्यासमोर हात पुढे केला.

"काय?" माझी तंद्री भंगली.

“चारशे सत्तर रुपये, गाडीचं भाडं” ड्रायव्हर चढ्या आवाजात मला म्हणाला.

“अरे हां” मी खिशातून पाकीट काढले. तीच दोन हजारांची नोट बाहेर काढली, त्याला दिली. दोन्ही हाताने नोट पडकून, मान वर करून तो नोट बघू लागला. नोट खरी आहे याची खातरी करून तो म्हणाला, “सुट्टे नाहीयेत.”

“कीप द चेंज” मी उत्तर दिले, तसा तो परत माझ्याकडे बघून हसला, मला दोन्ही हाताने दंडवत केला, टॅक्सीत बसला, टॅक्सी सुरू केली आणि भुर्रकन निघून गेला. मी त्या जाणाऱ्या टॅक्सीकडे अन मग कार्डकडे बघितले.

मी चालत मेन रोडवर आलो. मी माझ्या आत्महत्येचा विचार दूर सारला. मी या सगळ्याचा विचार करू लागलो. या कार्डचा काय उपयोग?

मी फोन करू का? फोन करून काय करू? काहीतरी बेकायदेशीर काम असेल का? मग त्याचे भरपूर पैसे देतील. मला पैशाची गरज तर नाहीच, पण हे सगळे अजब वाटत होते!! मी थोडा विचार करून फोन केला. रिंग वाजत होती, काही उत्तर आले नाही. मी फोन कट करणार, तेवढ्यात तिकडून आवाज आला, “हॅलो?”

“तुमचा नंबर... मला त्या टॅक्सी ड्रायव्हरने दिला.” मी गडबडलो. काय बोलावे ते कळेना. जे मनात आले, ते बोलून गेलो. त्या टॅक्सी ड्रायव्हरचे नावही मला माहीत नव्हते. समोरून काही आवाज आला नाही. माझा आवाज ऐकू जातोय की नाही? परत बोलू का? मी शांतपणे उत्तराची वाट बघत होतो.

मी काही बोलणार, तेवढ्यात -

“मी तुम्हाला पत्ता एसेमेस केला आहे. उद्या रात्री दहा वाजता या.” एवढे बोलून समोरच्या माणसाने कॉल कट केला. मला काही बोलायची संधी दिली नाही. मी फोन चेक केला. त्याच नंबरवरून एक एसेमेस आला होता. मी पत्ता वाचला. शहराच्या बाहेरचे ठिकाण होते. मी विचार करू लागलो, हे तर काहीतरी भयानक आहे. आता काय करायचे? जायचे का उद्या? माझा काही घातपात केला तर? पण मला मारून कोणाला काय मिळणार? मला वाटतेय काहीतरी बेकायदेशीर काम देतील, ते ऐकून घेऊ, सरळ नाही म्हणून परत येऊ. जर बेकायदेशीर काम असेल, आपण नाही म्हटले आणि त्यांनी चिडून आपल्याला मारले, तर? आत्महत्या म्हणूनही दाखवतील? नाहीतरी आपण जीव देणार


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

होतो. कोणाला संशयसुद्धा येणार नाही. जर आपण ते कामं केलं आणि मग यांनी आपला खात्मा केला, तर? माझ्या डोक्यात गदारोळ माजला होता.

मी दुसरी टॅक्सी करून घरी आलो. घर दुमजली होते. मी वरच्या मजल्यावर पेइंग गेस्ट म्हणून राहत असे. खालच्या मजल्यावर घराचे मालक राहत होते. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिना बाहेरूनच होता. तीस वगैरे पायऱ्या चढून जाव्या लागत असत. या पायऱ्या पावसाने निसरड्या झाल्या होत्या. मला पायऱ्या चढायचा नेहमी कंटाळा येत असे.

मी घरात आलो. माझे डोके दुखत होते. भिजलो होतो, थंडी वाजत होती. दोन-तीन वेळा सडकून शिंकलो. खूप दमलो होतो. पटकन मॅग्गी केली. तेच माझे जेवण होते. मग झोपलो. मी चांगला दहा तास तरी झोपलो असेन. उठल्यावर लगेच फोन चेक केला. कोणाचा फोन आला नव्हता.

मी सकाळी उठलो, नाश्ता करायला बाहेर आलो, पण डोक्यात हा घोळ सुरूच होता. मी पुन्हा ते कार्ड बघितले. ते चिन्ह काही माझ्या डोक्यातून जाईना. पंख्यावर गळफास घेऊन लटकणारा माणूस !!!

जाऊ की नको? असा विचार करत संध्याकाळ झाली. मी एका भारी हॉटेलमध्ये जाऊन मस्त जेवलो. मला तसे काहीच काम नव्हते. 'मरू दे, जे होणार ते होईल' असा विचार करत, मी मोबाइल ॲपवरून टॅक्सी मागवली, निघालो!! टॅक्सीत असताना हृदय धडधडत होते. घाबरलो होतो. मरायला न घाबरणारा माझ्यासारखा माणूस आता का घाबरतोय? पण माझ्या मनात कमालीची उत्सुकता होती. मला काय बरे काम देतील? त्या पत्त्यापर्यंत पोहोचायला टॅक्सीला साधारण एक तास लागला. मला वाटले नव्हते एवढा वेळ लागेल. दिलेल्या पत्त्यावर शेवटी पोहोचलो.

टॅक्सीतून बाहेर आलो. समोर बघितले. अर्धवट काम झालेली उंच, दहा मजली एक इमारत होती, बांधकाम अजून सुरू होते. बाहेर सिमेंट, विटांचे ढिगारे पडले होते. मी गेटपर्यंत आलो. गेटवर एक वॉचमन उभा होता. मला वाटले, तो हटकेल. मी त्याला बघून थांबलो, तर त्याने टेरेसकडे बघितले. टेरेसवर एक माणूस उभा होता. त्या माणसाने हातानेच मला “वर ये” म्हणून खुणावले.

या बिल्डिंगला लिफ्ट नव्हती. परत पायऱ्या!! परत या पायऱ्या चढा... मला अगदी 'वीट' आला होता या पायऱ्यांचा!! पण नाखुशीने मी पायऱ्या चढलो. कसातरी टेरेसवर आलो. पुरता थकलो. घाम आला. घाम पुसत टेरेस बघू लागलो. टेरेस भव्य होते. अजून काम सुरूच होते. बांधकामाचे सामान पडले होते. विटा, सिमेंट, रंगाचे डबे, इत्यादी. मी जरा आजूबाजूला बघितले. या परिसरात हीच सर्वात उंच इमारत होती. बाकीचा भाग विकसित झाला नव्हता. आजूबाजूला अगदीच तुरळक घरे होती. मी गच्चीवरून आजूबाजूचा परिसर बघत असताना माझ्याकडे एक माणूस टक लावून बघत होता. अगदी लहान मुलगाच होता. वीस-बावीस वर्षांचा असेल. त्याने जीन्स, टी शर्ट घातला होता. त्याचा चेहरा अगदी निर्विकार होता. तो माझ्याकडे टक लावून बघत असताना मी त्याच्याकडे गेलो. त्याला “हॅलो” म्हणालो. “व्हिजिटिंग कार्ड?” त्याने मला विचारले.

मी त्याला लगेच कार्ड दिले. त्याने त्याचा मोबाइल खिशातून काढला. त्या व्हिजिटिंग कार्डवरचा बार कोड स्कॅन केला. त्याने मला मोबाइलवर एक फोटो दाखवला आणि विचारले, “याने कार्ड दिलं का?”

मी फोटो बघितला. कालच्या टॅक्सी ड्रायव्हरचा फोटो होता. मी मान हलवून “हो” म्हणालो.

“बाकीचे लोक थोड्या वेळात येतील. तुम्ही बसून घ्या.” असे म्हणून त्याने मला खुर्ची दाखवली.

मी निमूटपणे प्लास्टिकच्या खुर्चीत जाऊन बसलो. त्याने कोणालातरी फोन केला. तो फोनवर बोलू लागला. मी टेरेसच्या दरवाजासमोर बसलो होतो. त्या दरवाजाच्या शेजारील भिंतीवर हॅलोजनचा दिवा लावला होता. त्या दिव्याचा प्रकाश सरळ माझ्या डोळ्यात जात होता. मी खुर्ची थोडी सरकवली, नजर खाली वळवली. माझ्यासमोर प्लास्टिकच्या दोन खुर्च्या होत्या. मी मोबाइल काढून वेळ बघितली. साडेदहा वाजत होते. मी तसाच बसून राहिलो. हा मुलगा माझ्यापासून दूर होता. माझ्याशी काहीच बोलत नव्हता. मला कंटाळा येऊ लागला.

थोड्या वेळात दोन माणसे एकत्र आली आणि माझ्यासमोर येऊन बसली. दोघे वयाने चाळिशीचे दिसत होते. एक जण अंगाखांद्याने मजबूत होता, मेहनत करून कमावलेले शरीर होते, तर दुसरा स्थूल होता, खुर्चीत आरामात पहुडला होता. दोघेही माझ्याकडे टक लावून बघत होते, माझा अंदाज घेत होते. मी साहजिकच नजर खाली वळवली. त्या दोघांना बघून हा तरुण मुलगा आमच्याजवळ आला. त्यांचे "हाय, हॅलो, काय कसा आहेस?" हवापाण्याच्या गप्पा झाल्या. मग त्या तरुण मुलाने माझ्याकडे मोर्चा वळवला त्याने माझ्याकडे बघितले मग या

दोघांकडे बघत तो म्हणाला,

“कितीची बेट लावणार?”

त्यावर तो मजबूत अंगकाठी असलेला मनुष्य म्हणाला,

“अरे, आधी नियम तर सांग, मी नियम विसरलो.”

स्थूल माणसाने होकारार्थी मान हलवली. काय चाललेय ते मला कळेना. मी त्या छोट्या खुर्चीत अवघडलो होतो.

“ओ के, मी नियम सांगतो.”

माझ्याकडे बघत तो तरुण म्हणाला. त्याने मला स्वतःचे नाव सांगितले नव्हते, म्हणून माझ्या मनात मी त्याचे नाव ‘तरुण’ असेच ठेवले. ‘तरुण’ माझ्याकडे बघत नियम सांगू लागला,

१) तुम्ही जगणार का मरणार यावर पैज लागेल.

२) तुम्ही मरणार म्हणून एक जण पैज लावेल, तर तुम्ही जगणार म्हणून दुसरा पैज लावेल.

३) पैजेचा कालावधी सात दिवस असेल. आठव्या दिवशी पैजेचा निकाल लागेल.

मला ऐकून धक्काच बसला, जीवन-मरणावर पैज? माणसे आहेत का राक्षस? हा कसला खेळ? माझ्या मनात गोंधळ उडाला. मी स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करत होतो. माझी चुळबुळ सुरू झाली. मी अस्वस्थ झालो. तिघे जण शांतपणे माझ्याकडे बघत होते. मला काही सुचत नव्हते. मी का अडकू या भानगडीत?

“मी मरणार नाहीये, मी तो विचार कालच सोडून दिला.” मी एकदम निश्चयाने म्हणालो.

स्थूल माणूस बोलायला लागला. “हे बघ,” तो माणूस मला समजावू लागला.

“तुला मरायचं होतं. तुझ्या डोक्यात तो विचार चालू आहेत. तू जगणार की मरणार यावर आम्ही पैज लावणार.”


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

“मला आता नाही मरायचं.” मी परत मोठ्याने म्हणालो.

“हे तू आता म्हणत आहेस. उद्या सकाळी उठल्यावर तुला मरावंसं वाटेल. तुला वाटतं का, पुढच्या आठवड्यात तू जिवंत असशील?” अंगकाठीने मजबूत माणूस म्हणाला.

त्याचा मुद्दा बरोबर होता. माझा स्वतःवर विश्वास नव्हता. काल रात्रीपर्यंत मला जगायचे नव्हते. कदाचित इथून निघून गेल्यावर मला परत जीव द्यावासा वाटेल. मी काही बोललो नाही. काय बोलावे ते कळत नव्हते. मी 'तरुण'कडे बघितले.

'तरुण' मला म्हणाला, “मी ओळख करून देतो.”

“हे आहेत ‘मिस्टर ए,” तो स्थूल माणसाकडे हात करत म्हणाला, “आणि हे आहेत ‘मिस्टर बी” अंगकाठीने मजबूत माणसाकडे हात करत तो म्हणाला.

"नावं राहतील ना लक्षात?” मिस्टर बी हसत, माझ्याकडे बघत म्हणाला.

मी हसलो नाही की उत्तर दिले नाही. हा सगळा प्रकार इतका अजब होता की मी वेड्यासारखा दोघांकडे बघत होतो, अशा प्रकारामध्ये ते त्यांची खरी ओळख कधीच उघड करणार नव्हते, त्यांची खरी नावे मला कधी कळणार नव्हती. त्यांच्या दृष्टीने हे सोयीचे होते.

"सर, तुम्ही किती रक्कम लावणार?" ‘तरुण’ने ‘मिस्टर ए’ला विचारले.

"स्थूल माणूस म्हणजे मिस्टर ए" मी माझ्या मनात परत एकदा नोंद करून ठेवली.

"माझी रक्कम तर ठरलेली आहे, दहा लाख. पण कशावर लावू, हे कळत नाहीये" मिस्टर ए माझ्याकडे बघत म्हणाले.

बाप रे! दहा लाख!! अशा पैजेसाठी? माझ्या मरणावरच लावा, मी काही फार काळ जिवंत राहणार नाही, माझ्या अगदी तोंडावर आले होते, पण मी काही बोललो नाही.

"मी याच्या मरणावर लावतो.... दहा लाख" मिस्टर बी लगेच म्हणाला.

"थांब ना" मिस्टर ए त्याला म्हणाला.

'मिस्टर ए'लाही माझ्या मरणावर पैसे लावायचे होते. मी थोड्याच दिवसात जीव देईन असे त्याला वाटत होते. मला काय वाटते आहे हे कोणीच विचारत नव्हते. मी पुढे काय करणार ते मलासुद्धा माहीत नव्हते!! मी चाललेला प्रकार काही न बोलता बघत होतो.

"ये तो कुछ दिनो का मेहमान है, काय रे!" मिस्टर बी माझ्याकडे बघत म्हणाला. मी काहीतरी बोलावे अशी त्याची अपेक्षा होती. मी अगदी नम्रतेने म्हणालो,

"सर, हा सगळा प्रकार चुकीचा आहे, हे असं..."

"तू काल जीव देत होता, ते बरोबर होतं का? आम्ही थोडी बेटिंग केली की तुला लगेच राग आला." मिस्टर बी लगेच म्हणाला. मी हे ऐकून मान खाली घातली. मला चूक, बरोबर ठरवायचा काहीच अधिकार नव्हता. ते त्यांच्या मजेसाठी हा खेळ खेळत होते. मला काही इजा करणार नव्हते. मला फक्त जगायचे होते, नाहीतर मरायचे होते!!

मी तसाच खाली बघून विचार करू लागलो. माझ्या डोक्यात एक शंका आली.

"मी जिवंत राहिलो - म्हणजे मी पैज जिंकलो, तर माझा काय फायदा?"

"तुला पैसे..." तो मिस्टर ए, स्थूल माणूस बोलू लागला.

"पैसे नको आहेत" मी ठामपणे म्हणालो.

"मग तू जीव का देत होतास?" मिस्टर बीने प्रश्न विचारला. तोच प्रश्न काल मला टॅक्सी डायव्हरने विचारला होता. मी त्याला उत्तर देऊ शकलो नाही आणि आजही उत्तर देणार नव्हतो.

“माझ्या आधी तुम्ही अशा किती वेळा पैजा लावल्या आहेत?”

मी परत प्रश्न केला. त्यावर कोणीच काही म्हणाले नाही. मग मिस्टर ए म्हणाला,

“आधी चार वेळा पैज लावली आहे.”

“हो” असे म्हणून 'तरुण'ने मान डोलावली.

“आपला स्कोर इक्वल आहे. दोन-दोन! मी दोन वेळा जिंकलोय, हे दोन वेळा जिंकलेत.” मिस्टर बी म्हणाले.

“पण मी हा खेळ का खेळू? माझा काय फायदा?” मी बोलून गेलो, वैतागलो होतो.

पण तेवढ्याच शांतपणे मिस्टर ए म्हणाला,

“हा प्रश्न तू स्वतःला विचार, आम्हाला नाही. तुला पाहिजे तर तू आता निघून जाऊ शकतोस. तू जिवंत राहिलास किंवा मेलास काय, आठव्या दिवशी पैजेचा निकाल लागेल, कोणीतरी एक पैज जिंकेल.”

“म्हणजे शेवटी मीच ठरवणार की जगायचं का मरायचं...” मी खुर्चीतून उठत म्हणालो.

"हो....आम्ही फक्त बघणार, शेवटी निर्णय सर्वस्वी तुझाच आहे." मिस्टर बी मला म्हणाला.

खेळ सुरू झाला. पैज सुरू झाली. मी या खेळात ओढला गेलो. मी जसा खुर्चीतून उठलो, तसे हे दोघेही उठले. मी दूर जाऊन उभा राहिलो. गच्चीवरून आसपासचा परिसर बघू लागलो. माझ्या मागे ‘मिस्टर ए’ आला. मी त्याच्याकडे बघितले.

मिस्टर एने माझ्याकडे न बघत प्रश्न केला, “तू अजून कारण नाही सांगितलंस?” मला त्याचा प्रश्न कळला. मी कारण लपवून ठेवले होते. मी मागे बघितले. मिस्टर बी आणि ‘तरुण’ एकमेकांशी बोलत होते. मला काय बोलावे ते कळेना. सांगू की नको?

“ठीक आहे, नको सांगूस. मी समजू शकतो.” मिस्टर ए म्हणाला. मी कसनुसा हसण्याचा प्रयत्न केला.

“क्या गुफ्तगू हो रही हैं, हमे भी बतायें” असे म्हणत मिस्टर बी आमच्याकडे आला. त्याने माझ्या खांद्यावर हात टाकला. मी काही बोललो नाही. या सगळ्याचा विचार करत होतो. माझ्या डोक्यात आणखी एक शंका आली. मी परत विचारले,

“जर मी आठव्या दिवशी इथे आलोच नाही, तर? मी पळून गेलो तर?”


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

“पळून जरी गेलास, तरी तू जिवंतच राहणार ना? मग मिस्टर ए जिंकले.”

“पण तुम्हाला कसं कळणार मी जिवंत आहे ते?” मी प्रतिप्रश्न केला.

“तुझं प्रेत जेव्हा सापडेल, तेव्हा मी जिंकेन” मिस्टर बी अगदी सहज म्हणाले. 'प्रेत' शब्द ऐकून माझ्या अंगावर काटा आला. मी शहारलो.

“चला, निघू या” असे म्हणून मिस्टर बी निघाला. “सी यू” माझ्याकडे बघत तो म्हणाला, मिस्टर बी नुसताच हसला. त्याला नक्कीच वाटत होते की या दोनच दिवसात मी जीव देऊन मोकळा होईन. त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.

ते दोघे निघून गेले. थोड्या वेळाने मी आणि ‘तरुण’ दोघे निघालो. मी मोबाइल ॲपवरून परत एक टॅक्सी मागवली. आम्ही दोघे जिने खाली उतरत होतो, तेव्हा मी 'तरुण' ला विचारले,

“मागच्या पैजेच्या वेळी काय झालं होतं?”

‘तरुण’ने सुस्कारा सोडला. त्याला सांगायचे नव्हते. त्याने थोडा वेळ घेतला आणि सांगू लागाला,

“मागच्या वेळी एक जण गावाकडून आला होता. त्याला बरेच दिवस नोकरी मिळाली नाही. त्याची उधारी थकली होती, कर्ज झालं होतं. इथे आल्यावर बराच रडला. पैज लागली. आतासारखी स्थिती होती. मिस्टर एने त्याच्या जगण्यावर पैसे लावले आणि बीने मरण्यावर. सहा दिवस व्यवस्थित होता, पण सातव्या दिवशी.." एवढं बोलून ‘तरुण’ गप्प झाला.

“त्याने जीव दिला?” मी तरुणचे वाक्य पूर्ण केले. तरुणने फक्त “हो” म्हणून मान डोलावली.

“मिस्टर ए त्याला पैशाची मदत करणार होते. नोकरी लावून देण्याचं आश्वासन दिलं होतं, पण त्याचा विश्वास बसला नाही. त्याने घाई केली.” तरुण म्हणाला. तो गेल्याचे तरुणलासुद्धा वाईट वाटले. त्याच्या चेहऱ्यावर ते दिसले.

आम्ही दोघे त्या पायऱ्या उतरू लागलो. या पायऱ्या!! संपत का नाहीत?

"हे कार्ड त्या टॅक्सी ड्रायव्हरकडे कसं आलं?" मी तरुणला पायऱ्या उतरताना विचारले.

“या शहरात, अशी बरीच कार्डस बऱ्याच लोकांकडे आहेत. जेव्हा त्यांना वाटतं की कोणी व्यक्ती निराश आहे, आत्महत्येच्या प्रयत्न करत आहे, तेव्हा हे लोक त्यांना हे कार्ड देतात आणि आमच्याकडे पाठवतात. त्या टॅक्सी ड्रायव्हरचा मोबदला मी मघाशीच पाठवून दिला.” तरुणने मला सविस्तर सांगितले.

आम्ही खाली आलो. मी त्याचा निरोप घेऊन माझ्यासाठी आलेल्या टॅक्सीकडे गेलो. टॅक्सीत बसलो. या सगळ्या प्रकारची उजळणी करू लागलो.

मी बराच शांत झालो होतो, पण माझी जगायची भावना अजूनही मंदच होती. मला खरेच जगण्यामध्ये स्वारस्य नव्हते, मिस्टर ए जिंकला काय किंवा मिस्टर बी जिंकला काय, मला काही फरक पडणार नव्हता. मी आज मेलो काय किंवा आठव्या दिवशी मेलो काय, कोणीतरी एक जिंकणार होता, कोणीतरी एक हरणार होता.

ही कंटाळलेली श्रीमंत माणसे जगण्यातला रोमांच शोधात होती. अशा पैजा लावून स्वतःचे मनोरंजन करत होती तेवढाच त्यांना टाईमपास!! मी त्यांच्यासाठी तात्पुरते एक प्यादे होतो!! एकच बरी गोष्ट होती की हा निर्णय घेण्यासाठी त्यांनी माझ्यावर दबाव टाकला नाही. माझा जगण्याचा किंवा मरण्याचा निर्णय सर्वस्वी माझा असणार होता.

“मी जगू का?” माझ्यासमोर हा यक्षप्रश्न अजूनही अनुत्तरित होता.

मी घरी आलो. दमलो होतो. लगेच जाऊन झोपलो. अगदी 'मेल्यासारखा' झोपलो. सकाळी उठलो, तेव्हा मला छान वाटतं होते. माझ्यावरचा ताण बराच कमी झाला होता. माझ्याकडे करण्यासारखे काहीच नव्हते. मी घरी फोन केला, घरच्यांशी बोललो. त्यांनाही बरे वाटले. मलाही बरे वाटले.

मी मोबाइल बघितला. तरुणकडून काही फोन आला नव्हता. मी जिवंत आहे का हे बघण्यासाठी तरी याने मला फोन करावा, पण असे फोन त्याने जर केले असते, तर माझी चिडचिड झाली असती.

माझा निर्णय अजून होत नव्हता. जगावे का? मी स्वतःला विचारत होतो, पण अजून उत्तर मिळत नव्हते. पण एक बदल नक्की झाला होता. जगावे का? या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही की आधी खूप त्रास होत असे, हा त्रास खूप कमी झाला होता.

या सगळ्याचा विचार करत असताना, सात दिवस कधी उलटून गेले कळले नाही. मी सात दिवस तरी जिवंत राहिलो. मला छोटा का होईना, स्वतःबद्दल अभिमान वाटू लागला. तरुणचा मेसेज आला. त्याने त्याच ठिकाणी, रात्री दहा वाजता बोलावले होते. पठ्ठ्याने फोनसुद्धा केला नाही, मेसेज पाठवला. पण मी ठरवले होते, मी जाणार होतो. या लोकांना शेवटचे भेटणार होतो. निरोप घेऊन परत येणार होतो, पुन्हा असल्या भानगडीत पडणार नव्हतो.

मी घरातले दिवे मालवले, बाहेर पडलो. दारावर कुलूप चढवले. बाहेर पाऊस पडत होता. मी वैतागलो, मी परत कुलूप उघडून आत गेलो आणि रेनकोट घालून बाहेर आलो. तो रेनकोट फार ढगळा होता. मी कुलूप लावले. किल्ली हातात फिरवत पायऱ्या उतरू लागलो. पण किल्ली हातातून खाली पडली. किल्ली पकडण्यासाठी मी पुढे झेपावलो, पण पायऱ्यांचा अंदाज आला नाही. पावसामुळे त्या निसरड्या झाल्या होत्या. माझा पाय घसरला. आधार घेऊ शकलो नाही. मी सरळ पाठीवर कोसळलो. माझे डोके पायऱ्यांवर आदळले. वेदनेची सणक डोक्यात जाणवली. धडपडत खालच्या पायरीपर्यंत कोसळलो, मी डोळे मिटले.....

त्याच रात्री, साडेदहा वाजता, टेरेसवर.

“उगीच आलो. हा नाही येणार. मी पैज जिंकलोय.” मिस्टर बी म्हणाला.

मिस्टर ए शांत होता. तो खूप हताश दिसत होता. तरुणने चेहरा निर्विकार ठेवायचा प्रयत्न केला. पण त्याला वाईट वाटत होते, पण तो काही बोलला नाही.

“आपण बॉडी मिळेपर्यंत...पेपरला न्यूज येईपर्यंत वाट बघू.” मिस्टर ए अगदी निराश होऊन म्हणाला. यावर कोणीच काही बोलले नाही.

जन्म मृत्यू हा आपल्या हातात नसतो, तो त्या परमेश्वराच्या हातात आहे. त्याने वेळ ठरवलेली असते. ती वेळ विधिलिखीत आहे,, ती आपण बदलू शकत नाही किंवा बदलण्याचा प्रयत्नसुद्धा करू नये! तुमची वेळ भरली की एका क्षणात तो तुमचा जीवनक्रम संपवेल.

मी डोळे उघडले. प्रकाश माझ्या डोळ्यात गेला. परत डोळे मिटले, हळूहळू उघडले. मी कूस बदलली. एक तीव्र सणक डोक्यात जाणवली..."आई ग” मी कण्हलो....


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

“सावकाश.....” माझ्यासमोर 'तरुण' उभा होता. मी त्याच्याकडे बघितले. हा इथे काय करतोय?? मी इथे कसा आलो?

“आम्हाला वाटलं तू....” तो एवढे बोलून थांबला.

“तू इथे कसा..” मला नीट बोलता आले नाही.

"मी तुला फोन करणार नव्हतो, पण 'मिस्टर ए' ला खातरी होती की तू जिवंत राहणार. त्यांनीच मला तुला फोन करायला लावला. मी फोन केला, तर तुझ्या घरमालकांनी फोन घेतला. त्यांनी तुला झालेल्या अपघाताबद्दल सांगितलं. मी खातरी करायला आलो. अपघात होता का आणखी काही?” तरुण म्हणाला.

“अपघात होता. मी तुमच्याकडे यायला निघालो होतो....पाय घसरून पडलो.”मी म्हणालो. माझे डोके ठणकत होते.

“घरमालकांनी जेव्हा बघितलं... तुला हॉस्पिटलमध्ये घेऊन आले.” तरुण म्हणाला.

'तरुण' पुढे बोलू लागला,

“डॉक्टर म्हणाले, डोक्याला जबर मार लागला, रक्तस्रावसुद्धा झाला, पण तरीही तू वाचलास.” तरुण बोलत होता, पण माझे त्याच्याकडे लक्ष नव्हते. मी इकडे तिकडे बघितले, एका हॉस्पिटलच्या खोलीत,बिछान्यावर झोपलो होतो. मी डोक्याला हात लावला. माझ्या डोक्याला एक पट्टी बांधली होती.

मी 'तरुण'कडे बघितले. त्याने खिशातून तेच व्हिजिटिंग कार्ड काढले आणि माझ्या जवळच्या टेबलवर ठेवले. मी त्या कार्डकडे बघितले.

“मिस्टर बीने भेट म्हणून दिलंय.” तरुण म्हणाला.

“मिस्टर बीने?” मी विचारले. माझा विश्वास बसला नाही.

पण 'तरुण' माझ्याकडे बघून नुसताच हसला, काही बोलला नाही.

“चल, मी जातो” असे म्हणत तो जाऊ लागला. मी त्याला थांबवू शकत नव्हतो, पण जाताना तो मध्येच थांबला, मागे वळला आणि माझ्याकडे बघत म्हणाला,

“मिस्टर एने कारण विचारलं आहे.” कारण या शब्दावर जोर देत 'तरुण' म्हणाला. मला त्याचा प्रश्न कळला. 'मी जीव का देणार होतो?' याचे कारण मी अजूनही सांगितले नव्हते, आता मी हसलो. हसत म्हणालो..."जगण्यासाठी कारण लागतं....मरण्यासाठी नाही"

ते ऐकून, पटकन तरुणने त्याचा मोबाइल बाहेर काढला, काहीतरी टाइप करू लागला.

मी गोंधळून विचारले, “काय करतोयस?”

“क्या डायलॉग है बॉस...व्हॉट्स ॲप स्टेटस ठेवतो” असे म्हणून 'तरुण' हसू लागला. मीही त्याच्या हसण्यात सामील झालो. ‘तरुण’ने निरोप घेतला, तो निघून गेला.

माझे डोके दुखणेणं बरेच कमी झाले होते. मी तसाच पडून राहिलो. मी तरुणने दिलेल्या व्हिजिटिंग कार्डकडे बघितले. माझ्या मनात विचार आला...

“हे कार्ड मी कोणाला देऊ शकतो?”

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# उनाडटप्पू

दोघे जेव्हा बसमधून उतरले, तेव्हा संध्याकाळ झाली होती. अंधार पडला होता. थंडी वाजत होती. त्या आवारात जास्त घरे नव्हती. सुनसान जागा होती. प्रतीकला घर कुठे आहे हे माहित नव्हते. प्रतीकने अंदाज घेत घर शोधले. घर छोटेच होते. आजूबाजूला कोणी नव्हते.

**चॅट्सवूड**



"उभ्या लाइफमध्ये काहीतरी आडवं केलं पाहिजे"

असं म्हणून लौकिक खाली बसला. त्याने त्याची निळ्या रंगाची, उजव्या पायातील स्लीपर हातात घेतली. स्लीपरचा बंद बाहेर आला होता, तो जागच्या जागी बसवू लागला.

"भावा... मर्दा.... करू या काहीतरी" लौकिकच्या खांद्यावर हात ठेवत प्रतीक म्हणाला. लौकिक आणि प्रतीक नेहमीसारखे 'विपुल की चाय' टपरीवर चहा घेत होते. हा त्यांचा नेहमीचा कट्टा होता.

प्रतिक आणि लौकिक... दिसायला तसे साधारण, वागण्यात असाधारण. जीवनाबद्दल काहीच धोरण त्यांच्याकडे नव्हते. नुकतेच बारावी काठावर पास झाले होते, पण त्यांना कुठल्याच काठावर प्रवेश मिळाला नाही. दोघांनी गयावया केल्यावर एका कॉलेजला दया आली. या कॉलेजमध्ये मुलं कमी, बाक जास्त होते. दोघांना पहिल्या वर्षाला प्रवेश मिळाला. फर्स्ट इयरचे विषय हा विषय या दोघांनी फार ताणला. कला शाखेत कल्ला करायला नव्हते, केमिस्ट्रीबद्दल क्लॅरिटी नव्हती, गणित यांना गौण वाटले. शेवटी जमेल त्या, जमेल तसे, जमेल तेव्हा एखाद्या विषयाच्या वर्गात बसू लागले.

याच काळात भारतात चमत्कार झाला. जिओ कंपनीकडून इंटरनेट फुकट मिळायला लागले. 'फुकट तर नाही दुखत' हे धोरण राबवून रोज सलग बारा तास यू ट्युब व्हिडिओ बघू लागले. दिसेल तो व्हिडिओ बघायचा. काही असो मग. मान खाली करून, पाठीचा कणा वाकवून दोघे मोबाइलला चिकटले. हे सगळे व्हिडिओ बघून त्यांना 'जग मोठे...आपलं नाव छोटे' याचा प्रत्यय आला. एके दिवशी इंटरनेट स्लो झाले आणि यांची मती फास्ट झाली. बाहेर पाऊस पडत असताना डोक्यात विजा चमकल्या. 'सेल्फी विथ रेन' घेताना दोघांना साक्षात्कार झाला - आपले हक्काचे यू ट्यूब चॅनल पाहिजे!!असे एक टकाटक चॅनल, त्यावर पाहिजे ते टाकू शकतो, काहीही, कसेही, केव्हाही करू शकतो!! असे व्हिडिओ टाकायचे की लोक येडे होऊन पेढे वाटतील, आपल्याभोवती वेढे घालतील!!

'डोक्यात आले...कामात दिसले.' पुढचा-मागचा विचार न करता, यू ट्यूबवर लॉग इन केले. मग लक्षात आले, नाव काय द्यायचे? काम मोठे अन... नाव छोटे? असे कसे चालेल? मग तीन दिवस 'चिवड्यावर चर्चा' झाली, भांडणे झाली, विचार झाला. विनिमय होईना, नाव काही ठरेना!!

लौकिकचा कारभार 'मीच खरा...मागे सरा' असा होता. त्याला काहीतरी आसक्त, विरक्त, अभिज्ञ वगैरे नाव ठेवायचे होते. पण अभिज्ञ 'अपिलिंग' वाटत नव्हते. 'अभिज्ञ'चे स्पेलिंग काय करावे? हाच यक्षप्रश्न होता. तेव्हा साधेच, चार अक्षराचे नाव ठेवावे असे ठरले.

"आपलं चॅनल...तर आपलंच नाव देऊ" प्रतीकचा मूड अन मुद्दा वेगळाच होता.

"लौ...." लौकिक विजेचा धक्का बसल्यासारखा म्हणाला.

"लव्ह?"

"लौ.. फक्त लौ....ऐकताना लव्ह वाटेल...लिहिताना लौ असेल." लौकिक तोऱ्यात म्हणाला.

"लेका असं हाय का? तुझ्या नावाचा शॉर्ट फॉर्म.... माझ्या नावाचं काय??" प्रतीक स्वतःच्या हक्कासाठी लढत होता. मग 'लौ' नावाला 'किक' मारून शेवटी 'लौप्र' नाव ठेवण्यात आलं. दोघांनी स्वतःच्या नावाचे आद्याक्षर दान केले, यू ट्यूब चॅनल सुरू झाले.

"लौप्रज....शेवटाला झेड ॲड करू." प्रतीक म्हणाला.

"नको रे... लोकांना कळणार नाही" लौकिकने समजावले, पण 'लौप्र' नाव लोकांना कळेल, आपण 'लोकप्रिय' होऊ, असा दांडगा विश्वास त्यांना होता.

लौकिकच्या काकाकडून एक डीएसएलआर कॅमेरा प्रकट झाला. ॲमेझॉनमधून एक माईक मागवला, काम सुरू झाले. पण कशाचे काम?

कशाचा व्हिडिओ करावा? हा प्रश्न नवीन कॅमेऱ्यावर सत्याऐंशी सेल्फीज काढून झाल्यावर या दोघांना पडला.

पहिला व्हिडिओ काय करावा हे कळत होते, वळत होते, पण वळवळत नव्हते. पहिला व्हिडिओ आगळावेगळा असावा, अजागळ नको, असे ठरले. सोशल एक्सपेरिमेंट करावा, पण तो सोसेल का? कुणाला राग आला तर? कुणी मारायला आले तर? मग काय करायचे?

"सोशल एक्सपेरिमेंट म्हणजे?" प्रतीकने विचारले. प्रतीकची 'मराठी भारी....इंग्लिशला सॉरी' अशी अवस्था असे.

"अरे, म्हणजे सामाजिक प्रयोग." लौकिक म्हणाला. लौकिकचे मराठी जरा जास्तच भारी होते.

"म्हणजे?"

"अरे म्हणजे, तो नाही का आपण व्हिडिओ बघितला होता - मुलाचा रस्त्यावर ॲक्सिडेन्ट होतो, पण कोणीच मदत करायला येत नाही, पण मुलीचा जेव्हा ॲक्सिडेन्ट होतो, तेव्हा मोजून शंभर लोक तिला मदत करायला धावत येतात."


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"अरे हां...आलं लक्षात."

"आपणपण असंच काही करू या, एकदम.... " लौकिकने हातवारे करून भावना पोहोचवल्या. प्रतीकने फक्त मान डोलावली. अजूनही प्रश्न तोच होता, करायचे काय?

लोकांना सहज प्रश्न विचारावेत, त्यांचे मत जाणून घ्यावे, असे ठरले. पण काय प्रश्न विचारावा? हाच मोठा प्रश्न पडला. मग त्यांनी डोके खाजवून बराच कोंडा पडला.

"असं विचारायचं की पहिलं प्रेम कधी झालं?" लौकिक म्हणाला.

प्रतीकला वाद घालायचा कंटाळा आला होता. त्याला झोप आली होती. काही सुचत नव्हते. त्याने हो म्हणून मान डोलाव. "ओके भावा...करू हवा" असे प्रतीकने म्हटल्यावर लौकिक चेकाळला उद्या सकाळी बस स्टँडवरच्या लोकांना हा प्रश्न विचारायचा, त्यांची प्रतिक्रिया शूट करायची असे ठरले.

सकाळी नऊला सुरुवात झाली. प्रतीकने कॅमेरा, लौकिकने माइक पकडला. एकदम जोशात ते येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना विचारू लागले, पण कोणी थांबेनाच!! 'काम नाही सुरू... शेवट करू' अशी परिस्थिती झाली. दुपारी दोन वाजेपर्यंत एकही माणूस बोलायला तयार झाला नाही. लौकिकचा धीर खचला. रस्त्यात डिव्हायडरवर बसून तो रडू लागला. प्रतीकला वाईट वाटले. 'भाऊ रडतोय.... दुखणी काढतोय' हे बघून प्रतीकला काय करावे ते कळेना. तो इकडे तिकडे बघत त्याच्या शेजारी उभा राहिला. तेवढ्यात एक माणूस त्यांच्याकडे आला. तो लौकिककडे बघत म्हणाला, "काय रे, काय झालं...का रडतोय?"

तसा लौकिक रडायचा थांबला. त्याने त्या माणसाकडे बघितले. त्याला काय बोलावे ते कळेना.

शेवटी प्रतीक म्हणाला, "नाय, ते व्हिडिओ बनवायचा होता....पण कोणी..."

"माझा घ्या की मग" तो माणूस उत्साहाने म्हणाला, तसे हे दोघे खुलले. लौकिक उभा राहिला. या माणसासमोर माइक धरत त्याने प्रश्न केला,

"तुमचं पहिलं प्रेम कोण होतं?"

"पहिलं प्रेम....पहिलं प्रेम....." तो माणूस दोन-तीन वेळा म्हणाला.

"तीन-चार होते रे, त्यातलं पहिलं आठवत नाही... हां, पण शेवटचं प्रेम आठवततंय."

"शेवटचं?"

"हां शेवटचं, ते चांगलं आठवतंय.' तो माणूस म्हणाला. लौकिकने प्रतीककडे बघितले.

"तुमची मिसेस का?" लौकिकने विचारले.

"नाही नाही....ती सेकंड लास्ट होती" असे म्हणून तो माणूस हसू लागला. लौकिकला काय करावे ते कळेना. तोही हसू लागला. दोघेही हसत आहेत हे बघून प्रतीकही हसू लागला.

आणखी थोडे बोलून तो माणूस निघून गेला.

"तुमचं शेवटचं प्रेम काय होतं?" हा प्रश्न ते दिसेल त्या लोकांना, दिसेल तिथे, दिसेल तेव्हा विचारू लागले.

बरेच लोक थांबून त्यांना उत्तर देत होते.

एक म्हणाला, "माझं शेवटचं प्रेम - माझी बाईक."

दुसरा म्हणाला, "माझं शेवटचं प्रेम माझी तिसरी गर्लफ्रेंड."

"प्रेम वगैरे झूठ हैं"

"मी प्रेम नाही... मी फक्त गेम करतो"

"आधी प्रेमात होतो.. आता फक्त रम घेतो"

एकाने तर 'पाहिलंच प्रेम पण तिचा नव्हता नेम' ही कविता म्हणून दाखवली.

अशी बरीच उत्तरे मिळाली. बरेच 'फूटेज' मिळाले. आता हे फूटेज 'एडिट' करण्याची गरज होती, तेव्हा प्रतीकने मामाच्या जुन्या घरी जाऊ, असे ठरवले. त्या घरी मामाचा जुना डेस्कटॉप कॉम्प्युटर पडून होता, त्यावर एडिट करू, असे ठरले. प्रतीकचा मामा परदेशात स्थायिक झाला होता, त्यामुळे त्याच्या जुन्या घरात आता कोणी राहत नसे. प्रतीक लहानपणी त्या घरी गेला होता, त्यानंतर कधीच गेला नव्हता. मामाचे घर नेमके कुठे आहे हे त्याला माहीत नव्हते. त्याने मामाला फोन केला, पत्ता घेतला. घर शहराबाहेर होते. ह्या दोघांनी बस पकडली आणि निघाले. दोघांनी घरी 'यायला उशीर होईल... कॉलेजचा प्रोजेक्ट आहे असा निरोप धाडला. थोडक्यात, 'काम भारी तर रात्रीची वारी' होणार होती.

दोघे जेव्हा बसमधून उतरले, तेव्हा संध्याकाळ झाली होती. अंधार पडला होता. थंडी वाजत होती. त्या आवारात जास्त घरे नव्हती. सुनसान जागा होती. प्रतीकला घर कुठे आहे हे माहित नव्हते. प्रतीकने अंदाज घेत घर शोधले. घर छोटेच होते. आजूबाजूला कोणी नव्हते. 'एरिया सुनसान, ना आदमी ना मकान' असा सारा प्रकार होता. मामाचे घर कुठेतरी कोपऱ्यात होते. हे दोघे जसे घरासमोर आले, तसा प्रतीकने डोक्याला हात मारला!!

"काय झालं?" लौकिकने विचारले.

"चावी विसरलो" प्रतीक म्हणाला.

लौकिकचा चेहरा पडला, पण प्रतीक लगेच म्हणाला, "थांब भावा... सगळं करेल हा छावा."

''कशाला...चल परत जाऊ' लौकिक म्हणाला.

"थांब रे भावड्या" असे म्हणत प्रतिकने दगड शोधला आणि दोन्ही हातांनी दगड उचलून कुलपावर घातला. पण कुलुप तुटले नाही. मोठा आवाज झाला, पण आजूबाजूला तसे कोणीच नव्हते. नाहीतरी ते प्रतीकच्या मामाचे घर होते, त्यामुळे नंतर नवीन कुलूप लावले असते. प्रतीकने आणखी घाव घातले. शेवटी ते कुलूप तुटले. प्रतीकने लौकिककडे बघत म्हणाला,

"भावा.... मी बिनधास्त... तू फक्त हास "

असे म्हणत प्रतीकने कडी काढून दरवाजा उघडला. त्याचे समोर लक्ष गेलं आणि प्रतीक एक पाऊल मागे सरकला!! लौकिक दचकला, त्याचा तोल गेला. तो घाबरला, धडपडत धावतच सुटला. प्रतीक तसाच उभा राहून समोर बघत होता. आयला, हे काय झाले? कुलूप तोडलं...समोर ही कोण??

दारात एक मुलगी कमरेवर हात ठेवून उभी होती!!


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

मुलगी साधारण प्रतीक-लौकिकच्या वयाची होती. ती रागाने प्रतीककडे बघत होती. इथे लौकिक धावत पार लांब पोहोचला!!

प्रतीकने रागात विचारले "कोण तू??"

"म्या कोण? भयताडा तू कोण हायस?" ती मुलगी चिडून म्हणाली.

'ती म्हटली भयताडा... झाला राडा' प्रतीकची बोबडी वळली. त्याने मागे बघितले. लौकिक आता थांबला होता. लांबून बघत होता, प्रतीकने हाताने त्याला परत बोलावले, पण लौकिक काही परत येईना.

"माझ्या मामाचं घर हाय. तू कोन?" उसने अवसान घेत प्रतीक म्हणाला.

"ह्ये घर मह्या आयचं हाय" त्या मुलीचा राग वाढला.

"कुलूप का होतं मग?" प्रतीकने उलट प्रश्न केला.

"रोज रातच्याला माही आय कुलूप लावून कामाला जाती.....मी घरात येकटीचं असत्ये" ती मुलगी म्हणाली.

आपण चुकीच्या घराचं कुलूप तोडलं!! प्रतीकला कळले, लौकिक लांब पळाला!! त्या मुलीचा रुद्रावतार बघून प्रतीक टरकला. त्याने लौकिकला हाक मारून परत बोलावले. लौकिक लांबून हा सगळा प्रकार बघत होता. तो परत धावत प्रतीककडे आला. त्याला सगळ्याचा अंदाज आला. ती मुलगी लौकिककडे रागाने बघू लागली. लौकिक स्वतःचा हात पुढे करत म्हणाला, "हाय, आय एम लौकिक....."

तिने लौकिककडे नुसतं बघितले. काही बोलली नाही.

"कुलूप कशाले तोडलं?" ती मुलगी रागावून ओरडली.

"च्च....कशाले नाही क...शा....ला..... '' लौकिकने तिला म्हणाला.

"कानाखाली जाळ काढू का?"

तसा लौकिक एक पाऊल मागे सरकला. त्याने प्रतीककडे बघितले. प्रतीक म्हणाला,

"माफ करा दीदी...आम्हाला वाटलं..."

प्रतीकचे बोलणे सुरू होण्याच्या आत त्या मुलीने दरवाजा लावला. दोघांनी एकमेकांकडे बघितले. दोघे माघारी निघाले. नेमके काय घडले याचा विचार करू लागले. मामाचे घर काही सापडले नाही, त्यात दुसऱ्याच्या घराचे कुलूप तोडून आलो!! नशीब, त्या पोरीने आरडाओरडा करून गाव गोळा केला नाही. लोकांनी मारून आपला 'गोळा' केला असता, तुरुंगात रवानगी झाली असती. घरी जाताना दोघे एकमेकांशी बोलले नाहीत. बस करून घरी आले.

दुसऱ्या दिवशी दोघे नेहमीच्या कट्ट्यावर बसले होते, तेवढ्यात लौकिक म्हणाला,

"त्या खोलीवर आज परत जाऊ या?"

"कशाला...येड लागलं का तुला?" प्रतीक म्हणाला.

"हो....." लौकिक लाजत म्हणाला. प्रतीकला काय कळेना, हा असे का वागतोय?

प्रतीकने विचारले, "येड लागलं? का?"

लौकिक लाजला!! गालात हसला!! कट्ट्यावरून खाली उतरला. "अब तुम ही हो....बस तुम ही हो.. जिंदगी.." असे काहीतरी गाणे गुणगुणायला लागला.

प्रतीक खाली उतरला, त्याला म्हणाला, "भावा काय होतंय?"

लौकिक मिश्कील हसला. म्हणाला, "दोस्त तुम नही समझोगे...ये दर्द...."

"ती पोरगी असली हानल ना....सगळीकडून दर्द होईल" प्रतीक रागावून म्हणाला.

"पण मला ती आवडली...आय एम इन लव्ह!"

"तुझं लव्ह तिला नाय कळणार." प्रतीक हात जोडत म्हणाला.

"तू येणार आहेस की नाही?" लौकिकने एकदम धमकी दिली. "भावासाठी एवढंपण नाही करणार?" लौकिकने प्रतीकची स्टाईल वापरली, तसा प्रतीक शांत झाला. काय करावे ते त्याला कळेना. ती मुलगी भलतीच वस्ताद होती. परत भेटायला गेलो, तर तिने नक्कीच धरून मारले असते. पण लौकिकला कसे समजवणार?

"काय म्हणून भेटायचं... कारण काय सांगायचं?" प्रतीकने प्रश्न विचारला.

डोक्यात पडेलला लौकिक विचारात पडला. लौकिकचा पडेल, रडेल चेहरा बघून प्रतीकला राहवले नाही.

"येक आयडिया हाय" प्रतीक म्हणाला, तसा लौकिकचा चेहरा खुलला. प्रतीकला खरे तर लौकिकला त्या मुलीपासून लांब ठेवायचे होते. पण लौकिक 'प्रेमात अन डोक्यात' पडला होता, त्यामुळे प्रतीकचा आवाज कमी आणि नाइलाज जास्त झाला.

प्रतीक म्हणाला, "काल तिच्या घराचं कुलूप तोडलं....तिला एक नवीन कुलूप देऊ."

"भावा.. मर्दा...जिंकलंस.."

असं म्हणत लौकिकने प्रतीकला मिठी मारली. लौकिकला आयडिया भलतीच आवडली. तो चेकाळला!! लगेच एक 'मोठे' कुलूप घेण्यात आले. सगळा पॉकेट मनी खर्च झाला. बस केली, ते परत निघाले. या सर्वात आपण एक व्हिडिओ शूट केला आहे, तो 'एडिट' करायचा आहे, हे सगळे त्यांनी 'पोस्टपोन' केले.

दुपारीच त्या मुलीच्या घराजवळ पोहोचले. लांबून बघितले, तर दार बंद होते. या दोघांना दार वाजवायचे साहस होईना. लौकिकला धाडस होईना, प्रतीकचा आळस जाईना.

"भावा, तुला आवडलीय....तू कुलूप देऊन ये....तिच्याशी बोलून घे" प्रतीक लौकिकला म्हणाला.

'तुझी आवड...पण मला नाय सवड' असा पवित्रा घेत प्रतीक मागे हटला, लौकिकने कसे तरी पाय चालवले, पुढे जाऊ लागला.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"कानाखाली जाळ काढू का?"

लौकिकला तिचे वाक्य आठवले. त्याने गालाला हात लावला. तिचे रौद्र रूप आठवले आणि तो गर्रकन मागे वळला!!

कुलूप प्रतीकच्या हातात देत तो म्हणाला.."आपण इथेच तिची वाट बघू."

ते ऐकून प्रतीक मुकाट खाली बसला. लौकिक येरझाऱ्या घालू लागला. दुपारी एक वाजता ते तिथे आले होते, रात्री आठ वाजेपर्यंत तिथेच होते. त्या घरातून एवढ्या वेळात ना कोणी आत आले, ना बाहेर गेले. दोघे कंटाळले. आणखी वाट बघण्यात अर्थ नव्हता. लौकिकचा मूड गेला, प्रतीकला फूड खायचे होते. त्याला भूक लागली होती. त्यामुळे दोघे माघारी परतले. लौकिक बसमध्ये 'सुन रहा हैं ना तू...रो रहा हू मैं...' गाणे म्हणू लागला, प्रतीक वैतागला.

तिसऱ्या दिवशीसुद्धा लौकिकचा हट्ट सुरू झाला. प्रतीकने मूठ घट्ट करत त्याला समजावले.

"व्हिडिओ एडिट करू, मग तुझं लव्ह सेट करू" असे म्हणून प्रतीकने लौकिकला मनवले. इंटरनेट कॅफेत जाऊन व्हिडिओ एडिट करायचे ठरले. व्हिडिओ एडिटिंगचा 'ए'सुद्धा माहीत नव्हता, त्यामुळे तो व्हिडिओ ऐटीत एडिट करायला त्यांना सात दिवस लागले, पण तरी मनासारखे एडिट होईना. लौकिकचे तर लक्चष नव्हते. तो वेगळ्याच दुनियेत होता. त्याने 'तुझी आठवण....मनात साठवण असा एक व्हॉट्सॲप स्टेटस ठेवला होता. लौकिकच्या प्रेमाचा काही नेम अन एम नाही, हे प्रतीकला कळले होते. एडिट करायला आता एक कॉम्प्युटर हवाच होता. प्रतीकने मामाला पुन्हा व्हॉट्स ॲप कॉल लावला आणि पत्ता विचारून घेतला. मामानेसुद्धा तोच पत्ता परत सांगितला. प्रतीक कोड्यात पडला. आयला तोच पत्ता!! तेच घर!! ते मामाचे घरच नाही, तिथे तर ती मुलगी राहते.

"काहीतरी चुकलं असेल... परत जाऊ " लौकिक म्हणाला. लौकिकला नाहीतरी तिथे जायचे होते. त्या पोरीला भेटायचे होते. तिला प्रेमात पाडायचे होते. परत बस करून दोघे त्या घराकडे गेले. त्या भागात काही लोकांना पत्ता विचारला, खातरी करून घेतली. पण मामाने त्याच घराचा पत्ता दिला होता. त्या दोघांना काही कळेना. मामा चुकीचा पत्ता का देतोय? मामा आपलाच मामा का करतोय? पण मामा असे का करेल? असा विचार करत ते दोघे परत त्याच घरपर्यंत पोहोचले आणि त्या घरासमोर उभे राहिले.

"जा, बोलून ये." प्रतीक लौकिकला म्हणाला.

"तू पण चल ना" लौकिक काकुळतीने म्हणाला. प्रतीक वैतागला, पण हा लौकिक ऐकणार नाही, हे त्याला समजले. प्रतीकने खिशातून कुलूप काढून लौकिकला दिले.

"तिलाच पत्ता विचारू" प्रतीक म्हणाला, तसा लौकिकला धीर आला. लौकिक पुढे, प्रतीक त्याच्यामागून हळूहळू जाऊ लागला. कासवाच्या गतीने ते कसेबसे घराच्या दारासमोर आले. त्या दिवशी प्रतीकने तोडलेले कुलूप अजूनही तिथेच पडले होते. प्रतीकने ते बघितले. लौकिकच्याही ते लक्षात आले, पण दोघांनी त्याकडे दुर्लक्ष केले. लौकिकने दार वाजवायला हात पुढे केला. त्याचा हात थरथर कापत होता. प्रतीकने थोडा वेळ वाट बघितली आणि मग मोठ्याने हाक मारली, "दीदीSS...."

पण काही उत्तर मिळाले नाही. प्रतीकने दोन-तीन वेळा हाका मारल्या, पण कोणी बाहेर आले नाही. लौकिकची भीड चेपली. त्याने दार वाजवले. दार वाजवल्यावर दार आत लोटले गेले. दार आतून बंद नव्हते, घर उघडेच होते. लौकिक दचकला. आता काय करावे? घरात जावे? का मागे फिरावे?

"दीदी, नवीन कुलूप द्यायला आलोय......" प्रतीक मोठ्याने म्हणाला, पण उत्तर आले नाही. काय करावे ते कळेना.

"चिठी लिहून कुलूप इथेच ठेवून....." लौकिक प्रतीकला सांगत होता. प्रतीकने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. तो विचार करू लागला. आपण जर आता माघारी गेलो, तर लौकिक परत इथे घेऊन येईल. आता काय तो सोक्षमोक्ष लावावा, असा विचार करून प्रतीक सरळ घरात घुसला!!

"ए, नको जाऊस" असे म्हणत लौकिक त्याच्या मागोमाग घरात गेला.

दुपारचे दोन वाजले होते. घरात पूर्ण अंधार होता. एकही दिवा चालू नव्हता. आत कोणीच नव्हते. कुबट वास होता, जळमटे, धूळ साचली होती. प्रतीकने हाका मारल्या, तरी कोणी "ओ" देईना. लौकिक एका हातात नवीन कुलूप, दुसऱ्या हाताने प्रतीकला पकडून चालत होता. त्या घरात फक्त दोन खोल्या होत्या - एक छोटा हॉल आणि एक किचन. घरात काही सामान नव्हते. कपडे नव्हते, काहीच नव्हते. सगळीकडे धूळ, कचरा पडला होता. अशा घरात कोण राहतेय? का राहतेय? दोघांनी घर बघितले. घरात कोणीच नव्हते. मग इथली माणसे गेली कुठे? ती मुलगी, तिची आई कुठे गेली? घर असे उघडे का ठेवले? घरात एवढा कचरा का? या दोघांना काही कळेना. प्रतीकने हॉलमध्ये बघितले. तिथे एक जुना डेस्कटॉप पडून होता. दोघांना काही कळेना, हे घर कोणाचे आहे? अशा अवस्थेत का आहे? काय गौडबंगाल आहे?

लौकिकची भीती कमी झाली. तो एका स्टूलवर बसला आणि प्रतीकला म्हणाला, "मामाला फोन लाव."

"कशाला?" प्रतीकने विचारले.

"लाव ना..' लौकिक म्हणाला.

तसा प्रतीकने फोन लावला. रिंग वाजत होती.

लौकिक म्हणाला, "मामाला विचार, आधी इथे कोण राहत होतं?"

प्रतीकने ऐकून घेतले. त्याची ट्यूब पेटली. मामाला त्याने हाच प्रश्न विचारला. मामाने साहजिकच त्याला "का?" म्हणून विचारले. प्रतीकनेसुद्धा "नाही, असंच...घरात बराच कचरा आहे" असे काहीतरी म्हणून वेळ मारून नेली. त्यानंतर मामा बोलतच होता आणि प्रतीक ऐकून घेत होता. लौकिक त्याच्याकडे बघत होता. सुमारे पाच मिनिटानंतर प्रतीकने फोन ठेवला. प्रतीकने लौकिककडे बघितले, पण तो काहीच बोलला नाही.

"चल इथून" प्रतीक लौकिकला म्हणाला.

"अरे, काय झालं?"

"तू चल" प्रतीक ओरडलाच!!

लौकिक निमूटपणे उठला. दोघे घराबाहेर आले. प्रतीकने घराला नवीन कुलूप लावले आणि काही न बोलता तो माघारी निघाला. लौकिकला काही कळेना. तो त्याला "काय झाले?" "मामा काय म्हणाला?" हे सगळे विचारत होता, पण प्रतीक काहीच बोलत नव्हता. कसलातरी विचार करत होता, शेवटी दोघे बस स्टँडवर आले.

"अरे, काय झालं? सांग ना" लौकिक म्हणाला.

प्रतीकने त्याच्याकडे बघितले. तो म्हणाला,

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

"भावा, मला वचन दे, तू कधी परत या खोलीत जाणार नाहीस."

"अरे, पण का?"

"नाय, तू आधी वचन दे!" प्रतीक लौकिकचा हात स्वतःच्या डोक्यावर ठेवत म्हणाला.

लौकिकला वचन देणे भाग होते. त्याने "हो" म्हणून मान डोलावली.

प्रतीक सांगू लागला,

"मामाने त्या घरात एक भाडेकरू ठेवले होते. एक मुलगी, तिची आई अशा दोघीच राहत होत्या. आई हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून कामाला होती. तिला रोज रात्री हॉस्पिटलला शिफ्ट असायची. ती रोज रात्री घराला कुलूप लावून कामावर जायची. त्या खोलीत तिची मुलगी रात्री एकटी राहायची, एकटीच झोपायची. एकदा ती मुलगी तापाने फणफणली. सात दिवस झाले, तरी ताप उतरला नाही. पण नंतर ताप उतरू लागला. त्या मुलीला बरं वाटू लागलं. मुलीला बरं वाटतंय म्हणून तिची आई परत कामावर गेली. परत कुलूप लावलं. ती मुलगी आत नेहमीसारखी एकटीच झोपली होती, सकाळी आई परत आली, तिने दार उघडलं......"

एवढे बोलून प्रतीक थांबला, काही बोलला नाही. त्याने नजर आकाशाकडे फिरवली. लौकिक जे समजायचे ते समजला. तो दचकला. त्याने आवंढा गिळला. तो पुढे काहीच बोलला नाही.

नंतर सुमारे अर्धा तास कोणीच काही बोलले नाही, प्रतीकने आकाशाकडे बघत देवाचे आभार मानले.

तो लौकिकला म्हणाला..."वाचलो"

हे ऐकून लौकिकने मान डोलावली. जे काही घडले, ते अगम्य होते. हे सगळे पचवायला, रिचवायला त्यांना बराच वेळ जाणार होता.

"पण मग..." एवढं बोलून लौकिक थांबला, त्याला काय बोलावे ते कळेना.

तो परत म्हणाला, "पण मग ती कुठे गेली? आज का नाही दिसली?"

प्रतीकने खांदे उडवले. त्याच्याकडे उत्तर नव्हते. पण त्याला काहीतरी आठवले. तो बोलू लागला,

"माझा आजोबा जेव्हा गेला ना, तेव्हा आई म्हणायची, तो गेला तरी इथेच आहे असं वाटायचं. पप्पांना पण तो दिसायचा. काही दिवस असं वाटलं, की तो इथंच हाय, पण नंतर तो गेला, तो परत आलाच नाय."

लौकिकने सगळे ऐकून घेतले. तो काही म्हणाला नाही. थोड्या वेळाने तो म्हणाला,

"आपण दार उघडलं, म्हणून ती निघून गेली....."

प्रतीकने त्याच्याकडे बघितले, भुवया उंचावल्या.

"म्हणजे आपण दार उघडलं, तिला मुक्ती मिळाली?" लौकिक आकाशाकडे बघत म्हणाला.

"बहुतेक" प्रतीक म्हणाला.

बस आली. दोघे बसमध्ये चढले, बसले. मामाला आणि कोणालाच काही सांगायचे नाही, असे दोघांचे ठरले.

"सॉरी भावा" लौकिक म्हणाला.

"सॉरी का?"

"तू बरोबर म्हणत होतास, त्या मुलीच्या नादी नको लागू म्हणून. पण तरी मीच तुला इथे रोज..." लौकिक म्हणाला.

"बस्स का भावा...तू सॉरी म्हणून मस्करी करतोय" प्रतीक त्याला गुद्दा मारत म्हणाला.

लौकिक आणि प्रतीकने कसातरी व्हिडिओ एडिट केला आणि यू ट्यूबवर अपलोड केला. त्याला सुमारे सहाशे सदोतीस व्ह्यूज मिळाले. लौकिक निराश झाला, पण प्रतीकने त्याला समजावले. या सगळ्या प्रकारात पहिल्याच व्हिडिओचा फज्जा उडाला, पण असे काम करताना मज्जा येते, हे त्यांना कळले. यू ट्यूब व्हिडिओज काढण्याचे काम त्यांनी चालूच ठेवले.

प्रतीकला दुसऱ्या व्हिडिओसाठी 'जब्राट अन भन्नाट' आयडिया मिळाली - आता ते लोकांना त्यांच्या भुतांच्या अनुभवाबद्दल विचारणार आहेत.

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# ती

होती तिची मनीषा चौकट ओलांडून, दूर सुखाच्या गावी जाण्याची
बुक्क्या मारून दाबलेलं, तिच्या पंखातलं बळ, मोठी झेप घेऊ पाहत होतं
धडपडतच कशीतरी गाठली तिने मिळेल ती गाडी, कोंबून घेत स्वतःला घुसली कशीबशी आत
इथेही कामी आली तडजोड, स्वाभिमानाशी केलेली, थोडी जागा मिळवण्यासाठी......

पडून होते तसेच अजून डोळ्यांच्या पापण्यात उसवलेल्या नात्यांचे धागे दोरे
पण तिची नजर शोधत होती अंधुक काचातून, येणारा तिचा गाव, अन पुढे निघून गेलेलं मन...

तिच्याजवळ होता, फक्त शरीराचा गोळा, चालीरितींच्या बेड्यांचे व्रण पडलेला
न्यायचा होता तिला तो लांब नवा आकार देण्यासाठी, मनासारखे रंग भरण्याकरिता
पण भेटले रस्त्यावर तिच्याच गावाचे तुकडे थोड्या थोड्या अंतरावर, अन तिच्याच सारखे देह थोड्याफार फरकांचे
गाडी नुसतीच धावत होती अन नव्हत्या दिसत खुणा कुठेही एखादा नवा गाव असण्याच्या...

आलीच नाही एकही वेस की तिला पार करत मोकळा श्वास घेता येईल अशी
पृथ्वीबरोबर नशीबही गोल होऊन पुन्हा त्याच बिंदूवर थांबल्यासारखं वाटलं तिला....

'समाज' नावाचं आकाश संपलंच नाही कितीही जमीन तुडवत दूर आली तरी...
मग कुणाला दाखवणार होती ती तिचं नवं अस्तित्व, तिचं वेगळेपण आणि नावीन्य?
अजून तिच्यासारख्यांचा गाव जन्माला यायचा होता ...
अजून तिला हात देणाऱ्या हातात बळ यायचं बाकी होतं ...
तोवर ती अशीच चक्रव्यूहातून पळत राहणार, बाहेर पडण्याची वाट मिळेपर्यंत.....

महेश भालेराव

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# शब्द

शब्दांना नसते वय
शब्दांना कसले भय!
शब्दांना उलगडताना
शब्दातच मिळते लय!!

शब्दांत सुख आभास
शब्दांत वेदना खास!
शब्दावीण घुसमट होते
शब्दात मोकळा श्वास!!

शब्दा-शब्दांचा मेळ
शब्दांचा चाले खेळ!
शब्दांच्या नभात होते
शब्दांची चांदणवेळ!!

शब्दांतून व्हावे व्यक्त
शब्दात उरावे फक्त!
शब्दांतून देव घडावा
शब्दात मिळावा भक्त!!

शब्दांचा कैसा थाट
शब्दांची पोच अफाट!
शब्दांनी बहरुन जाते
शब्दांची पाउलवाट !!

शब्दांची पडते भूल
शब्दांत गूढ चाहूल!
शब्दांचा भ्रमर फिरावा
शब्दांत उमलता फूल!!

शब्दांत क्लेश आनंद
शब्दांत वृत्त अन् छंद!
शब्दात मोकळे व्हावे
शब्दातच व्हावे बंद!!

शब्दांस सुरांचे माप
शब्दांत तान आलाप!
शब्दांत प्रेम आईचे
शब्दात ओरडे बाप!!

शब्दातच गझल-अभंग
शब्दातच ओवी दंग!
शब्दातच फिके पडावे
शब्दात सापडे रंग!!

शब्दातच अल्ला-राम
शब्दातच भक्ती ठाम!
शब्दात फिरावे स्वैर
शब्दातच अल्पविराम!!

शब्दात अर्थ उलगडतो
शब्दाविण जन्मच अडतो!
शब्दांची पेरण होते
शब्दांचा पाऊस पडतो!!

शब्दांच्या गावा जावे
शब्दातच नित्य रहावे!
शब्दांना गुणगुणताना
शब्दांचे गाणे व्हावे!!

केतन पटवर्धन

❏


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पतीची आरती

गणपतीबाप्पा गेले आणि सकाळ-संध्याकाळच्या पूजा, आरत्या, घंटानाद, सगळे बंद झाले. घर एकदम शांत शांत झाले. मी गमतीने बायकोला म्हणालो, "अगं, गणपती वर्षातून फक्त १० दिवस येतो, तरी तू इतक्या मनोभावे सकाळ-संध्याकाळ त्याची आरती करतेस. मी तुझा गणपती नसलो, तरी'पण'पती आहे, पण तू कधी माझी आरती केली नाहीस." त्यावर बायकोने तिरस्कारिक नजरेने बघून "आरती? अन तुमची? तोंड बघा आरशात!" असे खेकसून वर "झोपा आता गुपचूप" असा आदेश दिला.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमधून येऊन बघतो, तर बायको ताम्हण, निरांजन आणि घंटा घेऊन दारात उभी. तिने चक्क माझ्यावर आरती केली होती, ती अशी :

खूप चरता, झक मारता, घोरता नुस्तेची।
एरवी तेरवी पेग रिता होईची।
सर्वांगी लोंबते लटी चरबीची।
तोंडी तळके माल, मज्जा भेळेची।।१।।

सदैव निद्रैव, लै चंगळ करशी।
रेकिती चंगळ करशी।
दणकून खाशी पण कामं ना करशी।
सदैव निद्रैव।।धृ।।

रत्न क्वचित जरा मज देई भ्रमरा।
दागिन्यांची पेटी भरू दे ना जरा।
का रे बजेट बघत बसतो पोरा।
जन म्हणती कद्रू रे चेंगट सावरिया।।२।।

तोंडावर पावडर कधीतरी लाव ना।
टकलं, व्हंडं, वक्रतोंडबघवेना।
वासमदिरेचा सुटलाहेवदना।
चकाटी पिटावे, बिर्याणी भक्षावे, ढेकरदेपुन्हा।।३।।

शीतल डोळस

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# बघतो जिकडे तिकडे दिसती

बघतो जिकडे तिकडे दिसती मनातले ना कळणारे
कळता सुखात असतो हल्ली नशिबावर जळफळणारे ..

संधी साधत जगती येथे त्यांच्या पदरी यश पडते
अचूक वेळी संधीचा ते वारा बघुनी वळणारे ..

शब्द मधुरही कानी पडता टपके लाळ तोंडातुनी
पिकल्या पानी मनात हिरवळ आढळती पाघळणारे ..

प्रामाणिक राहून ते जरी करती काम इमानाने
पाठी लागत असती त्यांच्या काही काही छळणारे ..

ताव मारती टाळूवरच्या लोण्यावर मेलेल्याच्या
मिरवत असती सभेस दावत नक्राश्रू घळघळणारे ..

द्वेष असो वा कौतुक अपुले स्थितप्रज्ञ असती काही
व्यथा मांडता समोर त्यांच्या क्षणात ते विरघळणारे ..

कौतुक त्यांच्या नसते नशिबी असती जोवर जिवंत ते
जगती त्यांच्या अवतीभवती जगण्यावर त्या जळणारे ..

प्रयत्न केले किती जरी पण पाणी उलट्या घड्यावरी
सुखात भिजले किती जरी ते दु:ख सदा उगाळणारे ..

विदेश

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# पुरंदराचं तेजस्वी पातं

मुरारबाजींचं व त्यांच्यासमवेतच्या सर्व मावळ्यांचं अतुलनीय शौर्य म्हणजे एक दीप्तीमान तुरा आहे स्वराज्यगाथेतला! त्यातून प्रेरणा न मिळालेला मराठी माणूस विरळाच. त्याच शौर्याचं वर्णन करायचा एक अल्प प्रयत्न. त्यांना शत-शत नमन.

कफन बांधुनी आलेला.. कफनातच गेला..
शत्रूचा आवेशही गळला.. कफनातच मेला..
संख्येची ना तमा तयाला..आता वज्राघात!
हट्टानं अन् पेटून उठलं तलवारीचं पातं!

असंख्य शस्त्रं जेथे थकली.. ते शब्दांनी झालं
खानाच्या बोलांनी काळीज अंगारून आलं..
उफाळला तो त्वेष पुरंदरी.. अवघा निमिषांत..
हट्टानं अन् पेटून उठलं तलवारीचं पातं!

कडाडून जणू वीज उमटली शस्त्राघातातुनी..
प्रलयभयंकर शब्द उतरला गडमाथ्यावरुनी..
अगणित शत्रूंमध्ये घुसला जळता प्रपात!!
हट्टानं ते पेटून उठलं तलवारीचं पातं!

तलवारींचं रुद्रभैरवी तांडव गरजत रणी..
चिरफाळला जो उभा राहिला त्यांच्या अंगेजणी..
खानाच्या वेधानं सुटला तो लोळ रोरावत!!
हट्टानं ते पेटून उठलं तलवारीचं पातं!

वेगाचा तो नाद गूंजला.. गरजूनच गेला!
खान वाचला जरी.. आसुरी माज शांत झाला!
"नरडीचा त्या घोट गिळाया [उरले] अंतर चार हात!"
नि:श्वासातून जणू म्हणालं हट्टाचं पातं!

तेजस्वी तो प्रताप केवळ.. त्याला उपमा नाही..
संक्षेपानं बचावल्याच्या पराभवाची ग्वाही!
त्या हट्टानं धडकी भरली शत्रू काळजांत!!
स्वराज्याच्या शिरपेचातील तेजस्वी पातं!!

राघव

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# दीपोत्सवा, आज तरी तुझं इथे स्वागत!

दीपोत्सवा,
आज तरी तुझं इथे स्वागत
अजून तरी इथे फुटतायत फटाकेच - निरपराध मस्तकं नाहीत - म्हणून सहर्ष स्वागत
अजून तरी इथे ठिणग्या उडतायत आतशबाजीतूनच - रोखलेल्या बंदुकांतून नाहीत- म्हणून मन:पूर्वक स्वागत
अजून तरी इथे भिरभिरतायत भुईचक्रच - बॉंबस्फोटानंतरची धूळवादळं नाहीत- म्हणून सानंद स्वागत
अजून तरी इथे अंगावर काटा आणतेय गुलाबी थंडीच - मनमानी अटकेची भीती नव्हे – म्हणून हार्दिक स्वागत
अजून तरी इथला प्रकाश उत्सवी दिव्यांचा आहे –
उन्मादी मशालींचा भेसूर उजेड त्याची जागा घेण्यापूर्वी
हे दीपोत्सवा,
तुझं (कदाचित) शेवटचं, सहर्ष, मन:पूर्वक, सानंद, हार्दिक वगैरे स्वागत!!

अनन्त यात्री

❑

आलीच नाही एकही वेस की तिला पार करत मोकळा श्वास घेता येईल अशी
पृथ्वीबरोबर नशीबही गोल होऊन पुन्हा त्याच बिंदूवर थांबल्यासारखं वाटलं तिला....

'समाज' नावाचं आकाश संपलंच नाही कितीही जमीन तुडवत दूर आली तरी...
मग कुणाला दाखवणार होती ती तिचं नवं अस्तित्व, तिचं वेगळेपण आणि नावीन्य?
अजून तिच्यासारख्यांचा गाव जन्माला यायचा होता ...
अजून तिला हात देणाऱ्या हातात बळ यायचं बाकी होतं ...


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# भाऊबीज

तुझ्या डोहडोळ्यात डोकावणारे
मला पाहवेनात ते चेहरे
गळाभेट होता स्वतःची स्वतःशी
किती व्हायचे कावरेबावरे

तुझा श्वास होई कुणाची रुबाई
उसासा गझल अन मिठी स्पंदने
कुणी ओठ ओठांत घ्यावेत अलगद
कुणी उतरवावीत आभूषणे

खुला केशसंभार रजनी कुणाची
कुणा चोरटा स्पर्श तो आवडो
कुणी फक्त यावे, कुस्करून जावे
कळ्या सापडो वा फुले सापडो

तुझी देहवीणा अशी कर्मयोगी
सुरांची तिच्या व्हायची साधना
मला सारखे हेच वाटायचे की
बघ्याचीच माझी असे भूमिका

ठरवले जरासे तुझे व्हायचे मी
पहाटे पहाटे तुला भेटतो
तुला ठेवतो चांदणे शुभ्र माझे
तुझे विश्व माझ्याकडे ठेवतो

बेसनलाडू

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# गाणे

ओलांडून कितीकदा प्रकटले मी या जगाच्या मिती
येतानाच कळेल काय इथला मुक्काम माझा किती?
श्वासांची गणिते करून क्षणही जन्मांतरी मोजले
केव्हा या घरट्यामधून उडणे भाळी असे कोरले?

'आता येथुन एक पाउल पुढे आहे तुला जायचे
त्या ठायीच तुझे नवे घर असे, तेथेच थांबायचे'
कोणी सांगत राहते हर क्षणी कानी असे काहिसे
जाते मोजत पाउले किति तरी मुक्काम तो ना दिसे

पाकोळी घुमटात एकटी झुरे देहात आत्मा तसा
इच्छेवाचुन देहही वसतसे कोणी दिलेला वसा
होते निर्मम चित्त मात्र सुटका सोपी कुठे एवढी?
मुक्तीची अडवून वाट बसली दारी भुते केवढी

जन्माशी जुळला असे तरि कुठे मृत्यू कुणाला कळे?
त्याचा काढत माग जीव जळतो, आयुष्यही काजळे
आरंभातच अंत पाहत कसे नाट्यांश रंगायचे?
आरोही अवरोह गात कुठले गाणे पुरे व्हायचे?

क्रांति

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# तीखी पुरी



मिपाकरहो, आपल्या सर्वांना दिवाळीच्या मन:पूर्वक शुभेच्छा.

दिवाळी म्हणजे घरोघरी फराळ, फटाके आणि पाहुणे या बिग थ्रीचे आगमन झाले असेलच. तर घरी येणाऱ्या पाहुण्यांना फराळाबरोबर वाढायला आणि बच्चेकंपनीला येता जाता तोंडात टाकायला एक झटपट पाककृती आपण बघणार आहोत.

**साहित्य:**

- कणीक २ वाट्या
- मीठ,
- हळद
- लाल तिखट
- तीळ
- किंचित ओवा
- १ लहान चमचा साखर विरघळलेले पाणी
- तेल - साधारण अर्धी वाटी किंवा किंचित कमी



**कृती:**

कणकेत मीठ, हळद, लाल तिखट, तीळ, ओवा आणि तेल घालून कणीक नीट मिक्स करावी. मिक्स केलेले पीठ जरासे भरड दिसू लागेल इतपत तेल टाकावे.मग साखरेचे पाणी घालावे. मग साधे पाणी टाकून सगळे एकत्र करून छान मळून काढावे.



या पिठाच्या अगदी पातळ पुऱ्या लाटून घ्याव्या. लाटलेल्या पुऱ्या थोडा वेळ तशाच राहू द्याव्या. लगेच तळू नयेत.



लाटल्यानंतर एक दहा-पंधरा मिनिटांनी त्या पुऱ्या तेलात मंद आचेवर तळून घ्याव्यात. पुऱ्या फुलता कामा नये.

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.





थंड झाल्या की डब्यात भरून ठेवाव्यात.



अगदी दहा- बारा दिवसही पुर्‍यांना काहीही होत नाही. छान राहतात. साखरेच्या पाण्यामुळे पुर्‍या क्रिस्पी होतात. टेक्श्चरही छान येते. गुजराती घरांमध्ये तर हा पदार्थ दिवाळीत हमखास बनवला जातो.

दिवाळीतच नाही, तर इतर वेळीही या पुर्‍या कधीही करून ठेवण्यासारख्या आहेत. चहाच्या वेळी खायला आणि प्रवासाला नेण्यासाठी उत्तम. दिवाळीच्या गोडाधोडाच्या जेवणावर उतारा म्हणून आणि दगदगीचा श्रमपरिहार म्हणूनसुद्धा या पुर्‍या आयत्या वेळी मस्त कामाला येतात. कुठलीही चटकन होणारी रस्साभाजी किंवा घट्ट दाल फ्राय बनवा आणि त्याबरोबर या खुसखुशीत पुर्‍यांचा आस्वाद घ्या.

पद्मावती

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# दौलत की चाट

कोणे एके काळी दिल्ली नावाचे एक महानगर होते. तेथे दौलत नावाचा एक व्यापारी राहत होता. हिवाळ्यात त्याचा एक नेम होता. नेमाला तो काय करी? तर म्हशीचे घट्ट दूध घेई. त्याबरोबर मलई घेऊन ते एका मोठ्या मातीच्या भांड्यात एकत्र करी. मग ते भांडे झाकून रात्री बाहेर ठेवी. त्यावर बर्फाची लादी ठेवी.



(अर्धा लीटर होल मिल्क(तुम्ही म्हशीचे दूध वापरू शकता), अर्धा ते पाऊण कप हेवी क्रीम. हे दूध तापवू नये)



दूध व मलईचे मिश्रण घट्ट झाकणाच्या डब्यात ठेवी.



तो डबा बाहेर रात्री चंद्रप्रकाशात ठेवी.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे तो उठी. दूध आणि मलईचे भांडे घरात घेऊन येई. त्यात साखर आणि केशर घाली. मग ते मिश्रण रवीने घुसळायला सुरुवात करी.

जसे जसे ते मिश्रण घुसळले जाई तसे तसे त्यावर फेस जमा होई. जमा झालेला फेस तो एका स्वच्छ गाळणीने गोळा करून एका ताटलीत जमा करी. फेस जमा केलेली ताटली थोडी कलती ठेवी. जेणेकरून दूध एका बाजूला जमा होई. मग ते दूध परत तो दुधाच्या मिश्रणाच्या पातेल्यात जमा करी.



(थोडे केशर आणि ४ टीस्पून साखर. आपल्या आवडीप्रमाणे साखरेचे प्रमाण कमी अधिक करावे)



अशा प्रकारे फेस येऊ लागेल.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.



अशा प्रकारे ताटलीत स्वच्छ गाळणीने फेस गोळा करी. ताटली खाली सांडशी ठेवावी म्हणजे ती एका बाजूने कलती राही. जेणेकरून दूध एका बाजूला गोळा होई.



असे करीत ताटलीत पुरेसा फेस जमा झाला की तो मातीच्या कपांमध्ये तो फेस भरायला सुरुवात करी. तसे करताना तो एक चमचा फेस कपात भरल्यावर त्यावर तो अगदी बारीक साखर(पिठी साखर) भुरभुरी. त्यावर परत फेस भरी. असे करत करत ऐका वर एक फेस आणि साखरेचा थर रची.

बारीक कुटलेले पिस्ते, थोडी वेलची आणि थोडा खवा सजावटीसाठी.



शेवटी सजावट म्हणून त्यावर अगदी चिमूटभर वेलचीची पावडर भुरभुरी. मग त्यावर खवा पसरवून घाली आणि शेवटी पिस्ता अगदी बारीक कुटून पसरवी.



झाले, हा अनोखा चाट तो हिवाळ्यात दर दिवशी दिल्लीकरांस विकावयास सज्ज होई.



मंडळी सर्वप्रथम ही पाकृ नेटफ्लिक्सवरील "राजा रसोई और अन्य कहानियां" या माहितीपट मालिकेमध्ये दिल्लीवरच्या भागात पाहिली. तेव्हापासून आपण दिल्लीला कधी जाऊन हा चाट खाणार याची ओढ लागली. मात्र तोपर्यंत काय? अनायासे मिपा दिवाळी अंकाची घोषणा झाली आणि आयती संधी मिळाली.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

मग मिपावरील सर्व सुग्रास पाकृ देणाऱ्या भाऊ आणि भगिनींना नमन करून रवी हाती घेतली ;-) . भारताला स्वातंत्र्य मिळायच्या आधी दिल्लीत एक दौलत नावाचा व्यक्ती हा चाट प्रकार विकायचा. म्हणून मग या पाककृतीला दिल्लीकरांनी नाव दिले "दौलत की चाट". हा चाट प्रकार फक्त हिवाळ्यात मिळतो. साधारपणे दिवाळी ते होळीच्या सुमारास. आजही हा चाट प्रकार अतिशय लोकप्रिय आहे. चाट विक्रेते आजही हा चाट पारंपरिक पद्धतीने करतात. जसे की दूध आणि मलई एकत्र करून रात्रभर बाहेर झाकून ठेवतात. त्यावर बर्फही लावतात. मग भल्या पहाटे उठून ते मिश्रण घुसळतात आणि विक्रीसाठी सज्ज होतात. हिवाळ्यात आणि दूध मलईचे मिश्रण अशासाठी बाहेर ठेवतात की बाहेर पडणाऱ्या दवामुळे हे मिश्रण अधिक हलके होण्यास मदत होते. जिभेवर ठेवल्याबरोबर हा चाटचा प्रकार विरघळून जातो इतके ते हलके असते. अर्थात एक गोष्ट विसरू नये ती म्हणजे हा पदार्थ लाकडी चमच्याने खावा!!

या चाटच्या उगमाचा थोडासा वेध घेऊयात. कुणी म्हणतात की मुघल राजवटीच्या काळात हा प्रकार अफगाणांबरोबर आला. कुणी म्हणतात की हा प्रकार "सिल्क रूट" मार्गे भारतात आला. पण आपल्याला काय चांगले ते खाण्याशी मतलब ;-) . असेही म्हणतात की पौर्णिमेला हा चाट केल्यास आणखींना बहारदार होतो. त्यामुळे या दिवाळीच्या गुलाबी थंडीत आपणही खा आणि आपल्या मित्रपरिवारालाही खाऊ घाला तोंडात विरघळणार दौलत की चाट. मी वर केलेली पाकृ पारंपरिक पद्धतीने केली आहे. मात्र तुमच्यासाठी सोप्या पद्धतीने सांगते. वर सांगितलेले साहित्य घ्यावे. दूध आणि मलई(क्रीम)चे मिश्रण रात्रभर फ्रीज मध्ये ठेवावे. सकाळी ते ब्लेंडर ने घुसळावे. बाकी सजावट वर सांगितल्याप्रमाणेच करावी.

लगेच खायचे नसल्यास हा चाट फ्रीज मध्ये ठेवावा आणि मग त्वरित खावे. इति दौलत की चाट नामे कथा सुफळ संपूर्ण!!



माहितीचा स्रोत - राजा रसोई और अन्य कहानियां, बावर्ची.कॉम

जुइ

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# बकलावा



बकलावा नाव ऐकलं, तर सर्वसाधारणपणे काय येते डोळ्यासमोर? पण हे मध्यपूर्वेतील एका मिठाईचे नाव असून ती अतिशय स्वादिष्ट असते, हे समजल्यावर तिचा शोध घेणे क्रमप्राप्त होते.

बकलावा म्हणजे मध्यपूर्वेतील एक पक्वान्न. हा खूप वेगवेगळ्या प्रकारे बनवला जातो. म्हणजे मूळ कृती एकच, पण आकार वेगवेगळे. बकलावा ज्याने एकदा खाल्ले त्याला वेड लावते, अशी माहिती मिळाली. एका मैत्रिणीने तुर्कस्थानातून आणलेला बकलावा खाल्ल्यावर याचे प्रत्यंतर आले. मुंबईत बकलावा कुठे मिळतो हे गूगलबाबाच्या कृपेने समजले, तरी त्याच्या किमती पाहून देणाऱ्या असल्याने घरातच करता येईल का? याचा विचार मनात घोळू लागला.

तसे पाहिले, तर खटाटोप मोठाच आहे या पदार्थाचा, पण 'चवीचे खाणार तो शॉर्टकट शोधणार', या मी स्वतः बनवलेल्या म्हणीनुसार मी शोध घ्यायला सुरुवात केली. आणि आता बकलावा मी घरीच बनवते.

मैदा, लोणी, साखरेचा पाक, अक्रोड, बदाम, पिस्ते - विशेषतः पिस्तेच, यांची रेलचेल असलेला हा पदार्थ 'रिच' असतो. त्यामुळे कधीतरी खायला हरकत नाही, विशेषतः दिवाळीच्या सणाला करायलाही हरकत नाही.

मूळ पाककृतीत असलेल्या याच्या पेस्ट्रीशीट्स बनविण्यासाठी पीठ मळणे, आणि त्याचा शीट्स लाटणे या दोन्ही स्टेप्स कमी करून मी आता बकलावा करू लागले आहे. इच्छा झाली की तासाभरात खायला मिळतो आणि 'धन्य ती सुगरण किंवा बल्लवाचार्य ज्यांनी बकलावा बनवला असेल'असा विचार मनात येतो.

सांगते, सांगते, कृतीच सांगते आता.

साहित्य :

❖ स्प्रिंगरोल फिलोशीट्स किंवा तयार समोसापाती. (एका पॅकेटमध्ये भरपूर बकलावा तयार होतो.)
❖ २ वाट्या साखर.
❖ बोटभर दालचिनीचा तुकडा
❖ १ वाटीभर बदाम, पिस्ता आणि अक्रोड यांची भरड पूड किंवा आवडीनुसाार कोण्या एकाची, किंवा दोघांची पूड (मी थोडेसे बदाम आणि जास्त पिस्तेच वापरते.)**
❖ साधारण दीड ते २ वाट्या पातळ केलेले लोणी.

** ही पूड मिक्सरमधून करण्यापेक्षा भिजवून, साले काढून, बारीक चिरून घेतले तर दिसतेही छान आणि लागतेही छान. चिरल्यावर हा चूर एका ताटलीत ठेऊन उघडाच फ्रीजमध्ये ठेवून दिला की छान वाळतो. मग तो काचेच्या बाटलीत किंवा हवाबंद डब्यात घालून फ्रीजमध्येच ठेवायचा. हे काम निवांतपणे करून ठेवावे, म्हणजे आठवण आली की ही पूड तयार असली की चटकन काम होते.

**कृती :**

१. साखरेचा दोनतारी पाक करून घ्यावा. पाक होत आला की त्यात दालचिनीचा तुकडा टाकावा.
२. ओव्हनप्रूफ डिशला ब्रशने लोणी लावून घ्यावे.
३. १ फिलोशीट त्यात अंथरावी. त्यावर पातळ केलेले लोणी ब्रशने लावावे. त्यावर दुसरी फिलोशीट अंथरून त्यावर पातळ केलेले लोणी ब्रशने लावावे. अशा रितीने सहा फिलोशीट लावून झाल्या की त्यावर सारण म्हणून तयार केलेला चुरा सढळ हाताने पसरावा. वर अंथरायच्या फिलोशीटला पातळ केलेले लोणी ब्रशने लावावे. लोणी लावलेली बाजू सारणावर ठेवून वरच्या बाजूलाही पातळ केलेले लोणी ब्रशने लावावे. वर आणखी ५ फिलोशीट्स ठेवून पुन्हा एकदा सारण घालून त्याच्यावर सहा फिलोशीट्स लोणी लावून अंथरावीत.
४. आता सुरीने हव्या त्या आकाराचे काप द्यावेत.
५. साखरेचा पाक चिरांमध्ये चमच्याने घालावा.
६. ओव्हन 180 अंशावर प्रीहीट करून घ्यावा .
७. डिश ओव्हनमध्ये ठेवून १५ ते २० मिनिटे बकलावा भाजावा.
८. घरामध्ये दरवळणारा वास शेजाऱ्यांच्या घरात जाऊ देऊ नये. वाटेकरी वाढतात. (यासाठी ओला नॅपकिन किचनमध्ये टांगून ठेवावा.)
९. १५ मिनिटांनी सुरी घालून पाहावी. स्वच्छ निघाली, तर बकलावा झाला असे समजावे. नसेल तर आणखी ५ मिनिटे ठेवावे.
१०. बकलावा थंड होईपर्यंत धीर धरावा, कारण साखरेचा पाक आणि लोणी थंड व्हायला वेळ घेतात.
११. थंड झाला की कुणाचीही वाट न पहाता आस्वाद घ्यायला सुरुवात करावी.



सुरन्गी

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# हातोळे



बदलापुरात अनंत हलवायाकडे श्रीखंड घेताना एकदा हा पदार्थ दिसला होता. खायला अगदी चविष्ट वाटला. खाताना, त्यात काय काय असावे याचा अंदाज घेत केलेली ही पाकृ.

**साहित्यः**

- साजूक तूप (मोहन आणि तळणीसाठी)
- मैदा साधारण एक वाटी
- साखर/पिठीसाखर एक वाटी
- खवा २५० ग्रॅम
- वेलदोडे
- सुका मेवा

**कृती:**

सारणासाठी खवा एका जाड बुडाच्या पातेलीत परतायला घ्यायचा. परतून साधारण तो असा दिसायला लागला की गॅस बंद करून त्यात आवडीप्रमाणे साखर दळून मिसळावी

ते थंड होईपर्यंत मैद्यात त्याच्या अंदाजे पाव भाग साजूक तूप गरम करून मोहन घालावे आणि घट्ट मळावे. गोळा साधारण असा दिसायला हवा.

मैद्याच्या सारख्या आकाराच्या लाट्या लाटून, एका लाटीत खव्याचे सारण भरावे आणि दुसरी लाटी त्यावर ठेवून पाण्याचे बोट फिरवून कडा नीट बंद कराव्यात. नंतर त्याला मुरड घालून हातोळे साजूक तुपात तळून घ्यावेत.

त.टी: ओरिजनल पाकृत हातोळे, चिरोटे पाकात घालतात तसे केले होते. हे मी वेळेअभावी थोडक्यात केलंय ;)

चलचित्र:
https://www.youtube.com/watch?v=Nu-Qfm6wpyM

(तांत्रिक अडचणीमुळे छायाचित्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत.)

सूड

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# बदाम केशर कतली




**साहित्य:**

- १ वाटी बदाम,
- १/२ वाटी साखर,
- केशराच्या १०-१२ काड्या,
- १ टे. स्पून दूध,
- १ टी स्पून तूप,
- पाणी

**कृती:**

१. एका वाटीत चमचाभर कोमट दूध घेऊन त्यात केशराच्या काड्या चुरून घाला.
२. एका भांड्यात एक वाटी बदाम साधारण दुप्पट पाण्यात भिजवा आणि आचेवर ठेवा.
३. पाणी उकळले की आच बंद करा आणि बदाम एका चाळणीवर टाका. त्यावर लगेच थोडेसे गार पाणी सोडा. यामुळे बदामाची साले सहज निघतील. सर्व बदामांची साले काढून घ्या.
४. एका सुती कापडावर सर्व सोललेले बदाम पसरवा आणि थोडा वेळ वाळू द्या.
५. बदाम कोरडे झाले की, मिक्सरमध्ये फिरवून त्याची पूड करून घ्या. मिक्सरमध्ये फार वेळ फिरवू नका नाहीतर तेल सुटेल. ही पूड एका ताटलीत काढून घ्या.
६. एका भांड्यात किंवा कढईत १ वाटी पाणी आणि १/२ वाटी साखर घ्या. मध्यम आचेवर ठेवा आणि अधूनमधून ढवळत राहा.
७. सर्व साखर विरघळून पाण्याला उकळी आली की त्यात बदाम पूड घाला.
८. मिश्रण जळणार नाही याची काळजी घेत हलवत राहा. हे मिश्रण सुरुवातीला ओलसर असेल.
९. साधारण ८-१० मिनिटांनी ते एकत्र यायला लागेल. यात दुधात एकत्र केलेले केशर घालून आणखी २-३ मिनिटे हलवत राहा. मिश्रण भांड्यापासून सुटून एकत्र गोळा झाले की आच बंद करा.
१०. थोडेसे मिश्रण घेऊन त्याची गोळी करता आली, तर ते हवे तसे कोरडे झाले आहे.
११. ताटाच्या मागच्या बाजूला तुपाचा हात लावून त्यावर किंवा एका बटरपेपरवर हे मिश्रण जरासे थंड होण्यासाठी काढून ठेवा.
१२. ५ मिनिटांनी लाटण्याने सर्व बाजूंनी एकसारखे लाटा.
१३. वड्या जितक्या जाड-पातळ हव्यात तेवढे लाटून झाले की वड्या पाडून घ्या.



केशर घातल्याने या कतलीला वेगळाच स्वाद आणि सुरेख पिवळसर रंग येतो. अगदीच झटपट आणि घरात आहे त्या साहित्यात होणाऱ्या या मिठाईचा दिवाळीत आनंद लुटा!



रुपी

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# अमोल गवळी यांची व्यंगचित्रं









.....पाणी टंचाईवर जालीम उपाय.....





कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.













कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.













कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.














कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.














कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.














कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.













अमोल गवळी

❑

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

# विंचवाचं बिऱ्हाड



(प्रयोगासाठी लेखकाची पूर्वपरवानगी आवश्यक आणि डी आर एम नंबर आवश्यक.)

**१.**

(रंगमंचावर एका उंच ठिकाणी एक मध्यमवर्गीय माणूस - वय अंदाजे ३५ - उभा आहे. तो काहीतरी विचार करतोय आणि त्याचा विचार पक्का झाल्यावर तो उंच ठिकाणावरून उडी मारतो. त्याच वेळी त्याची बायको घरात दचकून जागी होते.)

बायको :- ( घाबरून ) अहो.........

मुलगी :- काय झालं आई? .......

**२.**

(घरमालकाचा मुलगा घरात बसला आहे. ज्या माणसाने उंच ठिकाणावरून उडी मारली, तो विंगेमधून प्रवेश करतो. हातात एक नोटिस.)

घरमालक :- वाचली नोटिस?

माधव :- हो...... पण.....

घरमालक :- आता पण बीण काही नाही. आज तारीख काय आहे ?

माधव :- चार.

घरमालक :- मला नोटिसमध्ये म्हटल्याप्रमाणे एकतर भाडेवाढ द्या, नाहीतर पुढच्या महिन्याच्या ३ तारखेपर्यंत घर खाली करून द्या.

माधव :- अहो, एवढी भाडेवाढ अचानक कशी काय परवडणार आहे?

घ.मा. :- ते मला काही सांगू नका हो....... आणि real estateमध्ये सध्या काय चालू आहे, हे मी तुम्हाला वेगळं सांगायचं का? भाडं वाढवून द्यायचे नसेल, तर घर खाली करायचं ... कळलं का? काय म्हणतोय मी? कळलं का?

माधव :- भाडे करार तुमच्या वडिलांसोबत झाला होता. एकदा त्यांच्याशी मला बोलायचं आहे.

घ.मा. :- हे पहा, तुम्ही सभ्य माणूस आहात, म्हणून सभ्यपणे सांगतोय. आणि माझ्या वडिलांचं म्हणाल, तर त्यांचे सगळे आर्थिक व्यवहार मीच पाहतो आता. तशी power of attorney दिली आहे मला. तुम्ही घर खाली करा हो.... मला जास्त बोलायला लावू नका.

माधव :- अहो अशी अचानक भाडेवाढ नाही जमणार. आणि एका महिन्यात दुसरं घर तरी कुठे शोधू मी..? माझ्या मुलीची शाळाही जवळ आहे........ please असं करू नका.... मी देईन भाडेवाढ.... पण तुम्ही मागितलेली भाडेवाढ जरा जास्त आहे.

घ.मा. :- मला घर खाली करायचे दुसरे पर्यायही माहीत आहेत. (चिडून ) तुमच्या मुलीची शाळा जवळ असू देत नाही तर मसण..... तुम्ही घर खाली करा हो...... ३० दिवस आहेत तुमच्याकडे. किती ?

माधव :- ३० दिवस....

घ.मा. :- येतो मी......

(जातो. घरमालकाचा मुलगा जात असताना अश्विनी येते.. )

अश्विनी :- हा घरमालकाचा मुलगा कशाला आला होता या वेळी?

माधव :- नोटिस द्यायला आला होता.

अश्विनी :- कसली नोटिस?

माधव :- भाडं वाढवून द्या, नाहीतर घर सोडा. हे घे, वाच.

अश्विनी :- वेडबीड लागलं आहे का? आता ४ महिन्यांपूर्वीच तर आलो ना आपण, आणि आता लगचे भाडेवाढ? आणि आपण करार त्यांच्या वडिलांबरोबर केला होता ना? हा कोण आला नोटिस देणारा?

माधव :- power of attorney दिली आहे म्हणाला त्यांच्या वडिलांनी. काही नाही गं, दुसरा कोणीतरी मिळाला असणार जास्त भाडं देणारा...

अश्विनी :- म्हणून आधीच्या भाडेकरूला हाकलायचं? शी... मला असल्या माणसांचा खूप राग येतो. आणि तुमचापण.

माधव :- माझा?

अश्विनी :- नाहीतर काय..... नेहमीप्रमाणे मूग गिळून गप्प बसले असणार तुम्ही... एक शब्द तोंडातून फुटला असेल तर शपथ ... मीच घरात असायला हवं होतं.

माधव :- मीच घरात असायला काय हवं होतं? आणि तुला असं का वाटतंय मी बोललो नाही म्हणून? मी सगळं सांगितलं त्याला. आपल्या सुमीची शाळा इथून जवळ आहे. पुढल्या वर्षी भाडेवाढ करून देऊ. माझी आर्थिक परीस्थिती बेताची आहे.... सगळं सांगितलं. पण त्याचं एक ना दोन.... धमकी देऊन गेला तो.... मला घर खाली करून घ्यायचे दुसरे पर्यायपण माहीत आहेत म्हणून..

अश्विनी :- आणि तुम्ही घाबरलात. तुमच्या भितरेपणाचा सगळे फायदा घेतात. काय करायचं आहे? काही विचार केला आहे का?

माधव :- दुसरं भाड्याचं घर बघायला लागू आपण. याच एरियामध्ये बघू. म्हणजे सुमीच्या शाळेचा प्रश्न येणार नाही.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

अश्विनी :- मला हे बिलकुल मान्य नाहीये. सतत टांगती तलवार घेऊन जगायचं आहे का आपण? आणि पुढला घरमालकही आपल्याला घरातून हाकलणार नाही कशावरून?

माधव :- मग काय करू मी? दुसरा काही पर्याय आहे का आपल्यापुढे? का आपलं सामान रस्त्यावर यायची वाट पाहायची आहे?

अश्विनी :- आपण गेल्या आठवड्यात ती जाहिरात पहिली होती ना. स्वस्त घर योजना...... सरकारची सबसिडी....... त्याची चौकशी करायची का?

माधव :- मी तुला तेव्हाच सांगितलं होतं... स्वस्तबिस्त असं काही नसतं. ड्रामा असतो सगळा. जाहिरातीचा भपकेबाजपणा असतो. अशी स्वस्त घरं मिळत असती ना, तर जगात सगळ्यांचीच घरं झाली असती.

अश्विनी :- ते मला काही माहीत नाही. आणि चौकशी करून यायला काय हरकत आहे?

माधव :- ज्या गावाला जायचंच नाहीये, त्या गावाची बस पकडण्यात काय अर्थ आहे? आणि DOWN PAYMENTचं काय करणार आहोत आपण? सुमीच्या शिक्षणासाठी आणि लग्नासाठी पैसे जमवता जमवता नाकी नऊ येतंय.

अश्विनी :- अहो, माझे लग्नातले दागिने मोडू हवे तर. नाहीतरी ते रोज घालून कुठे मिरवतो आपण? आणि मी पार्ट टाइम नोकरी करते.

माधव :- आणि सुमीकडे कोण लक्ष देणार? सध्या पेपरमध्ये उलटसुलट वाचयला आणि ऐकायला कमी मिळतं का?

अश्विनी :- हे पहा, हा भितरेपणा सोडा आता आणि मी या वेळेस गेले तर स्वत:च्या हक्काच्या घरात जाणार आहे, जिथून मला कोणी 'जा' म्हणणार नाही. तुम्ही विचार करा आणि निर्णय घ्या. मी सुमीला क्लासमधून आणायला जात आहे. कळतंय का मी काय म्हणते आहे ते?

माधव :- बघू. घेऊ निर्णय लवकरच.

**३.**
(ऑफिस)

मॅनेजर :- हे काय? तुम्ही अजून काळे यांचं स्टेटमेंट दिलं नाही? काल सांगितलं होतं तुम्हाला.

माधव :- सॉरी सर.. दोन मिनिटांत देतो.

मॅनेजर :- हे बघा, मला कामं वेळच्या वेळी व्हायला हवी आहेत.

माधव :- हो सर...

सहकारी :- काय रे साहेबाच्या सारख्या शिव्या खात असतो?

शिपाई :- अहो साहेब, हे गेले दोन दिवस असंच करत आहेत. लक्षच नाही यांचं. परवा कोण ते देसाईंचं स्टेटमेंट द्या म्हणाले साहेब, तर यांनी सुर्वे यांचं स्टेटमेंट दिलं. आता देसाई आणि सुर्वे हे पुण्यातले आंबेवाले आहेत एवढं सोडलं, तर काही संबध आहे का?

सहकारी :- ए, तू जा. आणि दोन चहा घेऊन ये. उगाच बडबड करू नकोस. आणि ती काळेंची फाइलपण आण. काय झालं वाडेकर, एनी प्रॉब्लेम?

माधव :- हो...... म्हणजे नाही....

सहकारी :- काय हो-नाही? माणसाने कसं घडाघडा बोलावं. काय झालं? बायकोबरोबर भांडण झालं का?

माधव :- नाही.....

सहकरी :- मग?

माधव :- घरमालकाचा मुलगा आला होता... नोटिस दिली आहे.

सहकारी :- कसली नोटिस?

माधव :- भाडेवाढ करा, नाहीतर पुढल्या महिन्यात घर सोडा......

सहकारी :- च्यायला..... चल, नडायचं का?

माधव :- नाही, नको.

सहकारी :- घातलीस शेपूट.....

माधव :- घर खाली करा नाहीतर मला दुसरे पर्यायपण माहीत आहेत अशी धमकी देऊन गेलाय.

सहकारी :- काय मोगलाई आहे का ?

माधव :- पण रामराज्यही नाहीये.

सहकारी :- अरे नसू देत. कायद्याचं राज्य तर आहे... आपण वकील गाठू या.

शिपाई :- (चहा आणि फाइल घेऊन येतो.) काय झालं साहेब?

सहकारी :- ए, जरा थांब ना. बोलतोय ना मी...

माधव :- नाही, वकील नको....

सहकारी :- बरं, मग दुसरं भाड्याचं घर बघायचं का? माझ्या ओळीखीत एक एजंट आहे.

माधव :- बायको मागे लागली आहे. त्या कोण त्या बिल्डरची स्वस्त घर योजना आहे म्हणून......

सहकारी :- अरे, बायकोचं कुठे ऐकतोस? या बायकांना काय कळतं?

शिपाई :- साहेब, तुम्ही करा बुक. चांगली स्कीम आहे म्हणे. माझ्या शेजारच्यांनीपण बुकिंग केलंय.. ६ महिन्यांत ताबा मिळणार आहे. आणि ताबा मिळेपर्यंत हप्ता बिल्डरच भरणार आहे.

सहकारी :- तू बुकिंग केलं आहेस का? मग कशाला बडबड करतोस? आणि तुला सांगतो, भाडेकरू हा राजा असतो राजा. एवढे सहज नाही हाकलता येत घरातून. त्यातून कॉर्पोरेशन tax, सोसायटी वर्गणी सगळं मालक भरतो. आपण राजासारखं राहायचं. मी ५००० ते ६०००मध्ये तुला दुसरं भाड्याचं घर पाहून देतो.


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

मॅनेजर :- अरे, अजून स्टेटमेंट आलं नाही? काय चाललं आहे? किती वेळा एक एक गोष्ट सांगायची मी?

सहकारी :- सर, याचा जरा प्रोब्लेम झाला आहे.....

मॅनेजर :- काय झालंय?

सहकारी :- त्यांना मालकाने.....

मॅनेजर :- त्यांना बोलता येतं..

माधव :- घरमालकाने नोटिस दिली आहे - भाडेवाढ कर, नाहीतर घर सोड म्हणून. त्याचंच टेन्शन आहे.

मॅनेजर :- वाडेकर, शांत व्हा. काहीतरी मार्ग निघेलच.

सहकारी :- मी तेच म्हंटलं याला. दुसरं भाड्याचं घर पाहू म्हणून.

माधव :- नाही, पण बायको म्हणते आहे... की ती स्वस्त घर योजना आहे ना, त्यात आपलं स्वत:चं घर घेऊ म्हणून.

मॅनेजर :- असं कोण म्हणतं? बायको?

माधव :- हो...

मॅनेजर :- अरे, मग बरोबरच बोलते ती. हे बघ, बायकोचं नेहमी ऐकायचं असते. आणि मला सांगा, आता धाडस नाही केलं, तर कधी करणार? हेच तर वय असतें. तू कर धाडस. होईल सगळं नीट. चला, कामाला लागा. आणि आता तरी स्टेटमेंट पाठवा लवकर.

माधव :- हो सर. सर..... ऑफिसमधून कर्ज मिळेल ना?

मॅनेजर : बघू रे, नको काळजी करूस.

शिपाई :- बघा, मी बोललो नव्हतो?

सहकारी :- अरे, साहेब त्याच्या जागी. तू ऐक माझं. स्वस्तबिस्त घर नसतं. आणि तो फ्रॉड निघाला, तर? तुला हवं तेवढं कर्ज नाही दिलं, तर? कुठे भानगडीत पडतोस याच्या....... कळतंय का मी काय सांगतोय ते?

माधव :- सरांना सांग, मी काळेकडून राहिलेले पैसे वसूल करूनच अपडेटेड स्टेटमेंट देतो.

**४.**
अश्विनी :- केलं बुकिंग?

माधव :- हो. आज जाऊन आलो त्यांच्या ऑफिसमध्ये.

अश्विनी :- चला, देवच पावला. मी आलेच देवापुढे साखर ठेवून. (साखर ठेवून परत बाहेर येते.) घ्या साखर.

माधव :- हं. बस गं जवळ..... (बायकोला शेजारी बसवतो.) मला कधीच वाटलं नव्हतं आपण घर घेऊ शकू म्हणून....

अश्विनी :- मला तर अजून स्वप्नच वाटत आहे. हक्काचं घर. थोडं लांब असलं, तरी कुठे बिघडलं..... पण त्या घरातून मला कोणीच बाहेर नाही काढू शकणार.

माधव :- वन बीएचकेचा फ्लॅट!

अश्विनी :- ए माधव......... आपण ना, घराला लस्टर कलर देऊ.. आणि मॅचिंग असे पडदे घेऊ.

माधव :- आणि इथे सोफा सेट....., समोर LED TV... मध्ये असा एक छोटासा टीपॉय.

अश्विनी :- स्वयंपाकघरात ट्रॉलीज...

माधव :- आणि बेडरूममध्ये...

अश्विनी :- (नवऱ्याच्या तोंडावर हात ठेवत) तुझं आपलं काहीतरीच.

माधव :- तू लाजलीस ना, की खूप सुंदर दिसतेस आशू!

अश्विनी :- आज किती दिवसांनी मला तू आशू म्हणालास रे, मध्या.

माधव :- हो ना. मी संध्याकाळी ऑफिसमधून दमून भागून येईन, इथे सुमी बसली असेल अभ्यास करत आणि तू मला चहा करून आणशील...... आपण मस्तपैकी टेरेसमध्ये चहा पीत बसू.

अश्विनी :- माझं स्वतःचं घर, आपलं घर. जिथे फक्त आणि फक्त माझा अधिकार असेल... घरातल्या छोटीतली छोटी गोष्ट माझ्या मनाने मला करता येईल. कोणी कोणी नाही विचारणार. माझा छोटासा संसार आणि माझं छोटंसं घर...

अश्विनी :- घर हे दोघांचं..

माधव :- दोघांनी सजवायचं.

अश्विनी :- घर हे आनंदाचं..

माधव :- गुलमोहरापरी बहरायचं..

अश्विनी :- घर हे आपलं

माधव :- हक्काने नांदायचं...

अश्विनी :- ए माधव, तुला आठवतो का रे....

माधव :- काय गं?

अश्विनी :- ( लाजत ) पाहण्याचा कार्यक्रम......

**(flashback)**
माधव :- तुम्हाला पुण्यास यायला आवडेल ना?

अश्विनी :- (दबक्या आवजात ) हो.

माधव :- तुम्हाला काही नाही विचारायचं?


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

अश्विनी :- तुमचं घर आहे का हो पुण्यात?

माधव :- चांगलं आठवतं आहे..... माझा चेहरा खूप पडला होता.

अश्विनी :- माहीत आहे. मला खरं तर ना, खूप हसू येत होतं त्या वेळी. कसला चेहरा पडला होता तुझा.

माधव :- काय गं आशू, माझ्याकडे घर नव्हतं, तरी झालीस तू लग्नाला तयार...

अश्विनी :- हं. घर काय? माणूस महत्त्वाचा. मला तू भावला होतास. आणि घराचं म्हणशील, तर आता तेरा वर्षांनी का होईना, होत आहे ना आपलं घर? ए मध्या, होईल ना सगळं नीट?

माधव :- का गं, तुला का असं वाटत आहे?

अश्विनी :- काही नाही रे, उगाच मनात आपली एक भीती.

माधव :- होईल गं. सगळं नीट होईल. नको काळजी करूस.

(दोघे एक गाणं गुणगुणतात.)

**५.**
सहकारी :- आम्हाला काय नुसते पेढे दिलेस. पार्टी कधी देणार आहेस ते सांग......

माधव :- अरे, देऊ की पार्टी. एकदा ताबा तर मिळू देत.

शिपाई :- साहेब, पार्टी मलापण हवी आहे. लई मस्त झालं बघा. घर बुक केलं ते. बरं झालं, यांचं ऐकलं नाही.

सहकारी :- पेढा मिळाला आहे ना? आणि मी आपलं प्रीकॉशन घे एवढंच सांगत होतो. बरं, लोन फाइल केलीस का तयार? साहेबांपुढे लवकर पुट अप कर, म्हणजे कर्ज लवकर सँक्शन होईल तुझं.

माधव :- कर्ज जास्त घ्यायची वेळ येणार नाही आता.

सहकारी :- का रे, लॉटरी लागली की काय?

माधव :- नाही रे.

सहकारी :- अरे, तू सगळं सेव्हिंग ओतलंस का त्या स्वस्त घरामध्ये? वेडाबिडा झालास का तू?

माधव :- काळजी करू नको रे.... कर्जाच्या हप्त्याचे पैसे वाचतील, परत करीन सेव्हिंग.

मॅनेजर :- वाडेकर, व्हॉट्स ॲपही पोस्ट आली आहे बघा.. कोण तो बिल्डर आहे ना, तो फ्रॉड निघाला म्हणे. अहो, ती सरकारी योजना नव्हती, असं आलंय यात. तुम्ही चौकशी केली होती ना?

सहकारी :- वाडेकर... अरे, नको काळजी करूस. खरी नसेल ती बातमी. अरे, आजकाल व्हॉट्स ॲपवर काहीही येतं. वाडेकर.... मी काय म्हणतोय.....

माधव :- मी येतो....

**६.**
अश्विनी :- अहो... पण तुम्ही काळजी करू नका. अहो, ऐकताय ना? अहो, मी तुमच्याशी बोलत आहे. हे बघा, आपण जाऊ दुसरीकडे राहायला. थोडं लांब असेल तरी चालेल. पण तुम्ही डगमगून जाऊ नका. अहो, ऐकताय ना.

माधव :- सगळं संपलंय.

अश्विनी :- काही संपलं नाहीये. थोडेफार पैसे गेले आपले. किती भरले होते? १०००० ना?

माधव :- सुमीच्या शिक्षणाचे पैसे आणि तुझे दागिने यामधून आलेले पैसे सगळे गुंतवले मी..... कमी कर्ज म्हणून....

अश्विनी :- अहो.... हे काय केलं तुम्ही? सगळे पैसे गुंतवलेत, मला न विचारता?

माधव :- हो.....

अश्विनी :- हो काय हो? अहो, सुमीच्या पैशांना हात लावायचा नव्हता, ठरलं होतं ना आपलं? अहो, आणि दागिने विकायच्या आधी मला का नाही सांगितलं?

माधव :- तूच म्हणली होतीस दागिने विकू म्हणून. आणि या सगळ्याला तू कारणीभूत आहेस. तरी तुला सांगत होतो, हे स्वस्तबिस्त घर असं काही नसतं म्हणून.

अश्विनी :- हे बघा, उगाच माझ्यावर खापर फोडू नका. मी फक्त चौकशी करायला सांगितली होती. आहे नाही ते सगळे पैसे घालायला नव्हते सांगितले.

माधव :- पण मी म्हणलो होतो ना, आपण दुसरं भाड्याचं घर पाहू म्हणून.... शी! आता सगळं संपलंय.. मीच मूर्ख, जे तुझं ऐकत बसलो...

अश्विनी :- माझ्यावर चिडचिड करू नका उगाच. चूक तुमची आहे.

माधव :- (ओरडतो.) हो, चूक माझी आहे. तुझं ऐकलं, ही चूकच केली. दागिने विकले - माझीच चूक, आणि सगळ्यात मोठी चूक - तुझ्याशी लग्न केलं. आता काय जीव देऊ का?

अश्विनी :- ओरडू नका. सुमी रडायला लागली बघा. (सुमीला जवळ घेते.)

(माधव चिडून घरातून जातो.)

अश्विनी :- अहो, कुठे निघालात?

**७.**
शिपाई :- साहेब, हा ५०० मीटरचा रूल गेला, ते लई मस्त झालं बघा... आता कुठल्यापण बारला बसा, काही प्रॉब्लेम नाही......

सहकरी :- अरे, विषय काय, तू बोलतोस काय? या वाडेकरने माझं ऐकलं असतं ना, तर ही वेळच आली नसती. वाडेकर, अरे काळजी करू नकोस. आणि काळजी करत असशील तर घे एक पेग.....

शिपाई :- अहो, कशाला त्यांना अजून बोलताय? त्यांनी धाडस तरी केलं.... नाहीतर तुम्ही.

 कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.

सहकारी :- कसलं आलंय रे घंटा धाडस... तरी मी याला बोललो होतो, भाडेकरू राजा असतो म्हणून. आणखी एक बोललो होतो....... काय बरं? हां. बायकोचं कुठे ऐकतो म्हणून..... झाली ना माती?

शिपाई :- ओ वाडेकर साहेब, बोला काहीतरी. असं नुसतं बसून राहू नका. घेता एक पेग? काही होणार नाही. सगळम दु:ख विसरून जाल. आईका माझं.

सहकारी :- अरे, त्याला बायकोने सांगितलं आहे. दारू पिऊ नकोस म्हणून.....

शिपाई :- अहो साहेबम कशाला जखमावर मीठ चोळत आहात? वाडेकर साहेब, तुमच्या कष्टाचा पैसा आहे आणि कष्टाचा पैसा गेला की लई दु:ख होत बघा. घ्या एक पेग, काही नाही होणार.

सहकारी :- गेला, सगळा पैसा गेला...

(वाडेकर तडक उठून निघून जातो.)

सहकारी :- जीव बीव तर नाही देणार ना ...?

**८.**
(रंगमंचावर एका उंच ठिकाणी एक मध्यमवर्गीय माणूस, वय अंदाजे ३५, उभा आहे. तो काहीतरी विचार करतोय आणि त्याचा विचार पक्का झाल्यावर तो उंच ठिकाणावरून उडी मारतो. त्याच वेळी त्याची बायको घरात दचकून जागी होते.)

अश्विनी :- ( घाबरून ) अहो.........

मुलगी :- काय झालं आई?

अश्विनी :- अगं, बाबा अजून आले नाही आहेत. कुठे गेले असतील? माझा डोळा कधी लागला, तेच कळलं नाही मला.

अश्विनी :- (फोन लावते.) हॅलो, हां, सोमण का? मी अश्विनी वाडेकर बोलत आहे. नाही हो! हे आले नाही अजून. त्यांचा फोनही बंद आहे. हो, ठीक आहे. आले की कळवते तुम्हाला. ( फोन ठेवते.) बाप रे! आता कुठ शोधू यांना? शी, मला तर काही सुचतच नाहीये..

सुमी :- आई, नको काळजी करूस. येतील बाबा. कुठे कुठे जाणार नाहीत.

अश्विनी :- आणि नाही आले तर?

सुमी :- असं कशाला म्हणतेस आई? येतील ना!

(अश्विनी परत फोन लावते, पण लागत नाही. तेवढ्यात माधव येतो आणि अश्विनी पटकन त्याला बिलगते.)

माधव :- झालंय काय?

अश्विनी :- किती उशीर झाला?

माधव :- ते होय... अगं, पोलिसांकडे गेलो होतो.

अश्विनी :- पोलिसांकडे?

माधव :- तक्रार करायला. तुला काय झालं घाबरायला?

अश्विनी :- मग काय..

माधव :- तुला काय वाटलं, मी जीव दिला की काय.. .

अश्विनी :- चुकूनही तो शब्द काढू नका.

माधव :- अगं, नव्याने सुरू करू सगळं. नव्याने डाव मांडू. देशील ना मला साथ, जशी आतापर्यंत दिलीस, अगदी तशी? तुला खरं सांगतो आशू, एकदा मनात येऊन गेला विचार .... जीव देण्याचा.... पण या सुमीचा चेहरा समोर आला. जाणवलं मला की, माझं घर हे तुमच्यात आहे..... तू आणि ही सुमी हेच माझं घर. स्वत:चं घर मिळेल, नाही मिळणार... आणि तूच म्हणाली होतीस ना मला की तू भावला होतास, घर होईल तेव्हा होईल, नाही झालं तरी चालेल.... तोपर्यंत आहेच की आपलं विंचवाचं बिऱ्हाड!

(असं म्हणून अश्विनी आणि सुमी, दोघींनाही जवळ घेतो.)

श्रीवल्लभ पांचपोर

❑


कॉपीराईट २०१७ मिसळपाव डॉट कॉम, सर्व हक्क राखीव.